# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दिनांक १९-०९-२००३ ते २०-११-२००३

**रजिष्टर क्र.०९**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा

| अ.क्र. | सर्वसाधारण सभेचा दिनांक | विषय क्र. व ठराव | प्रश्न क्रमांक (प्रश्नोत्तरे) शेरा |
|---|---|---|---|
| १. | १९-०९-२००३ | १४२-अ ते १४९/७ | १६६ ते १६७ |
| २. | ०६-१०-२००३ | -- | -- |
| ३. | ०७-१०-२००३ (१२.३० वा.) | १५०/१ | -- |
| ४. | ०७-१०-२००३ (२.३५ वा.) | १५१ ते १५२/२ | -- |
| ५. | २०-१०-२००३ (तहकुब) | चर्चा | -- |
| ६. | १९-११-२००३ | १५३/१ ते १८०/१८ | -- |
| ७. | २०-११-२००३ | १८१/१ ते २०३/६ | १६८ ते १७९ |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
## दिनांक १९-०९-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**शुक्रवार दिनांक १९-०९-२००३ रोजी मा. महापौर सौ. विमलबाई राजपूत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृह येथे सकाळी ११.४० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. सभेला प्र. मा. आयुक्त यांचेसह संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | स. सभासद |
| २) स. स. श्री भाऊसाहेब ताठे | -//- |
| ३) स. स. श्री राधाकृष्ण गायकवाड | -//- |
| ४) स. स. श्री पांडूरंग यशवंतराव तायडे | -//- |
| ५) स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) स. स. श्री शे. ईलीयास किश्मानी शेख उमर | -//- |
| ९) स. स. श्री औतडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| १०) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ११) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १२) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| १३) स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १४) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १५) स. स. श्री पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १६) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १७) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १८) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १९) स. स. श्रीमती किवलेकर जयश्री सारंग | -//- |
| २०) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| २१) स. स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २२) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| २३) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २४) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २५) स. स. सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २६) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २७) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २८) स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २९) स. स. श्री नजर हमीद अ. ठाकूर | -//- |
| ३०) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |
| ३१) स. स. श्री डॉ. भागवत किसनराव कराड | -//- |
| ३२) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |

३३) स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन -//-
३४) स. स. श्री मगरे सुनील यादवराव -//-
३५) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
३६) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
३७) स. स. श्री महम्मद जावेद महम्मद रसहाक -//-
३८) स. स. श्री मोहन मेधावाले -//-
३९) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
४०) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४१) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ -//-
४२) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४३) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
४४) स. स. श्री सोपान भाऊराव पारे -//-
४५) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
४६) स. स. श्री अब्दुल कादीर मौलाना सय्यद -//-
४७) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
४८) स. स. श्री अशरफ मोतीवाला -//-
४९) स. स. सौ संगीता बाळू मैंद -//-
५०) स. स. श्री रणधिर अशोकसिंग हेलीये -//-
५१) स. स. श्री नासेरखान अ. रहेमान खान -//-
५२) स. स. सौ शाहीन जफर महमुद जफर -//-
५३) स. स. श्री जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
५४) स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागिरथ -//-
५५) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
५६) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
५७) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
५८) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली -//-
५९) स. स. सौ. सिध्दीकी नईज सुलताना -//-
६०) स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ -//-
६१) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
६२) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
६३) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
६४) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
६५) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्यीन खान -//-
६६) स. स. श्री तुळशीबगवाले किशोर बाबुलाल -//-
६७) स. स. श्री जगदीश कव्हैय्यालाल सिध्द -//-
६८) स. स. सौ बबीता सुभाष कागडा -//-
६९) स. स. श्री सय्यद अली सलामी सय्यद मिरा सलामी -//-
७०) स. स. श्री तनवाणी किशनचंद लेखराज -//-
७१) स. स. सौ निखत वखीत इजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास

२) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

**संवाद :-**

श्री राधाकृष्ण गायकवाड : मुंबईत अतिरेक्यांनी बॉंब स्फोट घडवून आणला ४० लोक मृत्यूमुखी पडले. तसेच नांदेड शहराचे आमदार गायकवाड स्व. प्रकाश खेडकर यांचे सुध्दा दुःखद निधन झाले. या सर्वाा सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री भागवत कराड, श्री काशीनाथ कोकाटे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :- श्रध्दांजलीसाठी सर्वांनी ०.२ मिनिटे स्तब्ध उभे रहावे.
याच वेळी सभागृहात मुंबई बॉंबस्फोट मधील मृत झालेल्यांना तसेच स्व. आमदार प्रकाश खेडकर यांना ०.२ मिनिटे सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

सौ चंद्रभागाबाई दाणे : नागेश्वरवाडी येथील लोखंडी पुल दोन वर्षापुर्वी पावसाच्या पाण्याचे वाहुन गेला होता. त्यात एका सायली नावाच्या मुलीचा पाण्यात बुडुन मृत्यू झाला. सदर पुलाचे काम करण्यासाठी अर्थसंकल्पात ०३ लक्ष तरतुद केलेली होती. काम सुरु केले नाही. काम सुरु करावे, नसता मी डायससमोर बैठा सभात्याग करतो.
(याच वेळी स. स. सौ दाणे मा. महापौर डायससमोर मोकळया जागेत जाऊन बसतात.)

मा. महापौर : स. सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री नासेरखान सरदारखान : जी कामे अर्थसंकल्पात घेतलेली आहे. त्या कामाचे अंदाजपत्रक झालेले नाही. त्या कामाच्या संदर्भातील काही संचिका परत येत आहे. कामे करणार नव्हते. तर बजेटबुक मध्ये का घेण्यात आले.

श्री सुनिल मगरे : पुलाचे काम का होत नाही. खुलासा करावा.
(याच वेळी मा. महापौर डायस समोर स. सभासद जावून मोठमोठयाने बोलतात. काहीही ऐकू येत नाही. स. सदस्या सौ. दाणे डायस समोरुन उठून त्यांचे जागेवर जावून बसतात.)

मा. महापौर : नागेश्वरवाडी येथील पुलाचे काम का सुरु केले नाही. खुलासा करावा. सर्व स. सदस्यांनी खाली बसावे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : संबंधित अधिकाीर नसेल तर, दुसऱ्या अधिकाऱ्यांनी खुलासा करावा किंवा मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : विनंती की, एका वेळेस एकाच सदस्यांनी बोलावे. कोणाचा काय प्रश्न आहे. हे एकत्रीत ०५ सदस्य बोलल्याने ऐकू येईल का? आताच स. सदस्य यांनी काय प्रश्न उपस्थित केला. मी जवळ असतांना सुध्दा मला ऐकावयास आले नाही. ऐकल्यानंतर खुलासा करणे सोपे होईल. पहिल्यांदा ऐकू तर द्या.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : बजेटबुक मध्ये नागेश्वरवाडी येथील पुलाच्या कामासाठी ३ लाखाची तरतुद केलेली आहे. ३ लाख मंजूर आलेले आहे. फाईल पाहून घ्यावे. त्या पुलामुळे एका मुलीचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. तरतुद असूनही पुलाचे काम का सुरु केले नाही.

श्री सुनील मगरे : आम्हाला आमच्या भावना व्यक्त द्याव्या. मंजूर झालेले काम होत नसेल तर योग्य नाही.

मा. आयुक्त : स. सदस्य श्री मगरे आपण कृपया मध्ये बोलू नका. स. सदस्या बोलतात. त्यांना बोलू द्या. एकावेळी कृपया एकाच सदस्यांनी बोलावे. अशी विनंती आहे.

श्री भागवत कराड : संबंधित अधिकारी यांना या विषयी पूर्ण माहिती आहे. त्यांना खुलासा करु द्या.

श्री सुनिल मगरे : आम्हाला आमच्या भावना व्यक्त करु द्याव्या. मंजूर झालेले काम होत नसेल तर, योग्य नाही.

श्री नंदकुमार घोडेले : प्रश्न मांडण्याचा अधिकार स. सदस्यांना आहे काय? ज्या काही सुचना सदस्यांना घ्यायच्या त्या मा. महापौर यांनी दयावेत. अशी माझी सूचना व विनंती आहे.

श्री प्रकाश निकाळजे : बजेटमध्ये पान क्र. १३१ वर नागेश्वरवाडी येथील पुलाचे कामासाठी रु. ०३ लक्ष ठेवलेले आहे. ते काम झालेले नाही. त्यामुळे संबंधित सदस्यांचे समाधान होत नाही. खुलासा करावा. काम का होत नाही.

अति. शहर अभियंता : नागश्वरवाडी येथील लोखंडी पूल वाहून सायली नावाच्या मुलीचा मृत्यू झाला. पुलाचे बांधकाम करण्यासाठी अर्थसंकल्पात ०३ लक्ष रुपयाची तरतुद केली होती. ०३ लाखाचे अंदाजपत्रक मंजूरीसाठी गेले परंत, अनाधिकृत वस्ती, काम करु नये. म्हणून ते अंदाजपत्रक मंजूर होणेसाठी प्रलंबित राहीले. मागील स्थायी समितीच्या बैठकीस या संदर्भात चर्चा होवून विशेष बाब म्हणून येथील पुलाच्या कामास मान्यता द्यावी. असे आदेशित केलेले होते. प्रस्ताव मा. आयुक्तांच्या मंजूरीसाठी ठेवला असता, सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा. असे निर्देशित केल्यानुसार विशेष बाब म्हणून सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यात येत आहे. नगर सचिव यांचेकडे संचिका पाठविलेली आहे.

श्री भागवत कराड : प्रस्ताव विषय पत्रिकेवर नाही. सचिव यांचेकडे तो प्रस्ताव दिला नसेल तर, तात्काळ मागवून घेवून, त्यास मंजूरी देण्यात यावी.

**विषय क्र. १४२-अ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उदय कॉलनी ते नागेश्वरवाडी वसाहतींना जोडणारा पादचारी लाकडी पूल ०८ वर्षापूर्वी महानगरपालिकेकडून बांधण्यात आला होता. मागील वर्षी त्या भागातील नागरिकांनी संपूर्णपणे नासधुस केली. आता फक्स त्या ठिकाणी लोखडी सांगळा अस्तित्वात आहे. मागील वर्षापासून प्रस्तूत ठिकाणी आर. सी. सी. पुल बांधणेकरीता, सतत पाठपुरावा होत आहे. प्रस्तुत कामाचे प्रस्तुत ठिकाणी पुल बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,२५,०००/- चे ऑगस्ट २००२ मध्ये तयार करण्यात आले होते. परंतू सदर नाल्याच्या दोन्ही बाजूस अनाधिकृत वसाहती असल्यामूळे व अनाधिकृत वसाहतीमध्ये काम न करण्याची धोरण ठरले असल्यामुळे त्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली नाही.

आता सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात पान क्र. १३१ वर अनुक्रमांक २८ अन्वये नवीन खडी रस्ते या लेखा शिर्षाखाली २ रु. ३.०० लक्षची तरतुद मा. सर्वसाधारण सभेने उपलब्ध करुन दिलेली आहे. जी की, पुल नविन दराने बांधण्यास अपूरी आहे. या ठिकाणी चालू दरसूचीनुसार आर.सी.सी. पुल बांधणेसाठी रक्कम रुपये ५.०० लक्ष अपेक्षीत आहे.

मा. सर्वसाधारण सभेमध्ये वरील प्रमाणे २ रु. ३.०० लक्ष उपलब्ध करुन, दिल्यानुसार अंमलबजावणी करणेसाठी अहवाल सादर करण्यात आला असता. प्रस्तुत प्रकरण मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्याची दिनांक ०२-०९-२००३ रोजी प्रशासकीय स्तरावर ठरले आहे. अनाधिकृत वसाहतीमध्ये/भागामध्ये नवीन कोणतेही काम घेता येत नाही. सर्वसाधारण सभेतही याबाबत निवेदन करण्यात आलेले आहे. अशा प्रकरणात विशेष बाब म्हणून स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे की, नागरीकांची गैरसोय होऊ नये. करीता सदरील पूल बांधण्याचे काम हाती घ्यावी. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर. तसेच रु. ५.०० लक्ष तरतुद उपलब्ध करुन देणे करीता प्रस्ताव सादर.

मा. महापौर : या प्रस्तावावर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र. १४२-अ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उदय कॉलनी ते नागेश्वरवाडी वसाहतींना जोडणारा पादचारी लाकडी पुलाचे बांधकाम करता यावे म्हणून, सदर कामासाठी प्रस्तावित रक्कम रु. ५.०० लाखाचे अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री काशीनाथ कोकाटे : अनाधिकृत वस्तीच्या नावाखाली ज्या सुविधा जनतेसाठी द्यावयास पाहिजे, त्या दिल्या जात नाही. ज्या नाल्यावरुन नागरीक आतापर्यंत जाता येत होते. तो नाला अनाधिकृत होवू शकतो का? जनतेचे आरोग्य चांगल्याप्रकारे रहावे, यासाठी स्वच्छता केली जाते का? जी घाण नाल्यामध्ये आहे ती काढली पाहिजे. जनतेचे हित लक्षात घेवून जे काम अगोदर केलेले असेल पुन्हा करणे आवश्यक आहे ते केले पाहिजे. नंतर इतर कामे केली पाहिजे. तो कोणत्याही भागातील प्रश्न असेल, तेथे काम करावे. संपूर्ण प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यात यावा.

मा. महापौर : हा विषय मंजूर करण्यात आलेला आहे. या विषय संपलेला आहे.

श्री गणेश तांबे : हा प्रस्ताव मंजूर करुन चालणार नाही. ज्या ज्या कामाच्या संदर्भात वर्क ऑर्डर दिल्या ती कामे सुध्दा सुरु झाली नाही. अशा कामांना पून्हा सभागृहात आणून घ्यावी लागणार आहे का? का सुरु करण्यात आले नाही.

श्री नासेरखान सरदारखान : बजेटबुक मध्ये जी जी कामे आलेली आहे. ती सर्व कामे व्हावी. ०७ महिने झाले कामे झाली नाही.

अति शहर अभियंता : अंदाजपत्रकाम जी कामे सामाविष्ठ आहे. त्या बाबीत आमच्या विभागाकडून अंदाजपत्रक तयार करुन प्रशासनाकडे मंजूरीसाठी दिले. निधी उपलब्ध नसल्यामुळे काही संचिका मंजूर झाल्या नाहीत.

श्री नासेरखान सरदारखान : बजेट पुस्तकात आलेली कामे का मंजूर होत नाही. खाजगीकरणाद्वारे कामे करण्यास ०४ कोटी रुपये खर्च करणार आहे. तो ही एकाच विभागावर तोच पैसा विकास कामासाठी खर्च करणे योग्य होईल. मागे जकात खाजगीकरणासाठी वृत्तपत्रात जाहीर प्रगटन केले. ०१ कोटी खर्च झाले. आतापर्यंत कार्यवाही नाही. हा पैसा जनतेचा असून, विकास कामासाठी खर्च न घेता, इतरत्र ठिकाणी खर्च होतो. नागरिकांच्या पैशातून विकास कामे झाले पाहिजे. आपले अधिकारी सक्षम नाहीत का?

मुख्यलेखाधिकारी : एकुण १४९ कोटीचे बजेट जेव्हा मान्य केलेले होते. पान क्र. ३०३ वर ८ कोटी २० लक्षची स्पील ओव्हरची कामे, अशी तरतुद करुन बजेट तयार केलेले होते. अर्थसंकल्प हा फेब्रुवारी, मार्च महिन्यात तयार होते.

श्री नासेरखान सरदारखान : हिंदी भाषेत खुलासा करावा. मराठी भाषा समजत नाही.

श्री राजू शिंदे : शासन नियमाप्रमाणे मराठी भाषेत कामकाज करावे.

श्री नासेरखान सरदारखान : या देशाची राष्ट्रीय भाषा हिंदी आहे. त्यामुळे हिंदी भाषेतून खुलासा व्हावा.

श्री काशीनाथ कोकाटे : हिंदी भाषा ही राष्ट्रीय भाषा आहे. त्या विषयावर वाद न करता, स. सदस्यांना समजेल या दृष्टीने त्यांनी हिंदी भाषेतून खुलासा मागविलेला आहे. भाषेच्या विषयावर वाद करु नये. जनतेच्या विषयावर चर्चा झाली तर बरे होईल.

श्री जयवंत ओक : अधिकाऱ्यांना ज्या भाषेत बोलता येत असेल, त्या भाषेत खुलासा दयावा.

श्री किशनचंद तनवाणि : मराठीतून कामकाज व्हावे.

मुख्यलेखाधिकारी : अर्थसंकल्पात सुमारे ८.२० कोटीची रुपयाची स्पील ओव्हरची कामे दर्शविण्यात आलेली होती. बजेट फेब्रुवारी, मार्च महिन्यात तयार होते. जी आकडेवारी दिल्या जाते. जी अंदाजीत रक्कमा देवून तयार केलेल्या असतात. स्पील ओव्हरच्या कामाचा मार्च/एप्रिल मध्ये आढावा घेतला असता १५.८४ कोटी रुपये इतके स्पील ओव्हर कामासाठी लागेल. यात जवळपासन ८ कोटी रक्कमा पाठविलेल्या आहेत. बजेट पुस्तकात नांवे असलेली कामांच्या ज्या संचिका प्रथमतः लेखा विभागात आल्या त्यांना प्रथम मंजूरी दिली. ०४ जुलै रोजीच मा. स्थायी समितीकडे अर्थसंकल्पीय तरतुदीसंबंधी तसा प्रस्ताव दिलेला आहे. त्यावर चर्चा होवून कोणती कामे करावयाची कोणती नाही व कोणत्या हेड मधून तरतुद वाढवून द्यायची. याबद्दल निर्णय झाल्यास ही कामे करण्यात येतील.

श्री नासेरखान सरदारखान : हिंदी राष्ट्रीय भाषा आहे. येत नसेल तर तसे अधिकाऱ्यांनी लेखी द्यावे.

सौ शाहीन जफर : हिंदी भाषेतून खुलासा करावा. त्यांना मरठी समजत नाही.

मा. महापौर : आतापर्यंत मराठी भाषेतच कामकाज होत आहे.

श्री जयवंत ओक : विषयाला वळण देऊ नये. मराठीतून अधिकाऱ्यांनी खुलासा केला. स. सदस्य प्रभाग समितीचे सभापती होते. त्यांनी कामकाज मराठीतून केले. सभा घेतल्या, ०३ वर्षापासून ते या सभागृहाचे सदस्य आहेत. यापूर्वी केव्हाच हिंदी भाषेची मागणी केली नाही.

श्री अफसरखान : हिंदी भाषा राष्ट्रीय भाषा आहे. अनेक वर्षापासून वापर होतो. अधिकाऱ्यांना हिंदी भाषा येत नसेल तर, योग्य नाही.

श्री नासेरखान सरदारखान : हिंदी भाषा अधिकाऱ्यांना येत नसेल तर, त्यांनी तसे लिहून द्यावे. हिंदी भाषा राष्ट्रीय भाषा आहे.

मा. महापौर : खुलासा केलेला आहे. विषय क्र. १ वर चर्चा करावी.

श्री स. अली मिरा सलामी : सभा कामकाज मराठीतून करता येते. एखादया सदस्यांना समजले नाही तर हिंदी भाषेतून खुलासा करणे योग्य होईल.

(याचवेळी मा. महापौर डायस समोर स. सभासद जावून मोठमोठयाने बोलतात.)

मा. महापौर : स. सदस्यांचे काम रिवाईप बजेटमध्ये घेण्यात यावेत.

श्री नासेरखान कुरैशी : एका सदस्यांचा हा प्रश्न नाही, माझ्या पूर्ण वॉर्डात सुध्दा कामे झालेली नाही, बजेट बुक मध्ये घेतलेले एकही काम झालेले नाही. जे अधिकाऱ्यांना मिळतात त्या सदस्यांची कामे होतात.

सौ निखत परवीन : जी कामे बजेट मध्ये घेतलेली होती. ते घेण्यात आलेली नाही.

श्री भागवत कराड : बजेटमध्ये नमूद केलेली विकास कामे होत नाही. बऱ्याच स. सदस्यांची तक्रार आहे, त्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात यावे. ०७ दिवसाच्या आत बैठक बोलवावी. ज्यांची कामे झालेली नाही, ते सदस्य कामाबाबत समोर मत मांडतील त्यास मान्यता दयावी.

मा. महापौर : या संदर्भात एक विशेष बैठकीच आयोजन करण्यात येईल.

श्री काशीनाथ कोकाटे : या विषयावर चर्चा करावी. बजेटनुसार कामे का होत नाही. २-४ वार्डातच काम करण्यासाठी अधिकारी नाहीत. हा जनतेचा पैसा असून, जनतेच्या कामासाठी वापरला जावा. कोणत्या वार्डात किती कामे झाली त्याचा तपशील द्यावा.

श्री अ. कादीर मौलाना : कामा संदर्भात मतभेद करता कामा नये.

श्री सलीम पटेल, समशेर पटेल : नावानिशी बजेट केले. ही कामे होणे आवश्यक आहे. विशेष सभा होत असेल तर, तारीख जाहीर करावी.

मा. महापौर : ०८ दिवसात विशेष बैठक घेण्यात येईल.

श्री काशीनाथ कोकाटे : १४८ कोटीचे बजेट संपलेले आहे असे घोषीत करा. खुलासा करावा.

श्री भागवत कराड : ज्या ज्या सदस्यांच्या वार्डातील कामे झालेली नसतील. त्याची यादी तयार करावी. त्यावर विशेष बैठक ठेवून निर्णय घेण्यात यावा. सर्वांना न्याय दयावा.

सौ निखत परवीन : सन २००१ या अर्थसंकल्पातील सुध्दा रस्ता दुरुस्तीची कामे झालेली नाही. संचिका मंजूरीला गेली असता, तरतुद नाही असे म्हटले जाते. यापुर्वीही भूखंड प्रकरणाच्या बाबतीत विशेष बैठक आयोजीत केली जाईल. असा आपण निर्णय घेतला होता. बैठक झाली नाही.

श्री भगवान रगडे : सत्यम फर्टीलायझरच्या संदर्भात वेळोवेळी सभागृहात चर्चा झाली. त्यांनी महापालिकेची फसवणूक केली. अहवाल आला. अहवालानुसार त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल. असे म्हटले, अनेक वेळा कार्यवाही होण्याबाबत मी मत मांडलेले आहे. लोकशाही पध्दतीने आंदोलन केले उपोषण केले. ०१ महिन्याच्या आत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. त्याचा खुलासा करण्यात यावा. संबंधितांवर पोलिस गुन्हा दाखल केलेला आहे का?

श्री भागवान घडामोडे : सत्यम फर्टीलायझर कारखाना चालू आहे का? खुलासा करावा. रॉयल्टी किती भरणा होते. किती कचऱ्याची विल्हेवाट लागते.

आरोग्य वैद्य अधिकारी : सत्यम फर्टीलाझर मालकास यांसंबधी अंतीम नोटीस करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार घेण्यात आलेली असून दि. १८-१०-२००३ रोजी नोटीसची मुदत संपते त्यानंतर कायदेशीर कार्यवाही करता येईल.

श्री भगवान रगडे : ०३ वर्षापासून केवळ नोटीसा देत आहे. किती नोटीसा आणखी देणार आहे. संबंधिताने महापालिकेची फसवणूक केली. ज्या पध्द्तीने कचऱ्याची विल्हेवाट लावणे गरजेचे होते. त्या पध्द्तीने कार्यवाही केली नाही. अहवालात संबंधित मालकाने महापालिकेची फसवणूक केली असे दिले असतांना आतापर्यंत त्या मालकावर पोलिस गुन्हा का दाखल झाला नाही.

आरोग्य वैद्य अधिकारी : जी नोटीस देण्यात आली. ती अंतीम आहे.

श्री भगवान रगडे : आताच विकास कामे होत नाही, बजेट नसल्यामुळे करता येत नाही, अशी चर्चा चालू होती. या मालकाने महापालिकेस कोणतेही उत्पन्न मिळु

दिले नाही. चांगल्या पध्द्तीने या घन कचऱ्याचा उपयोग केला असता, तर महापालिकेस मोठे उत्पन्न प्राप्त झाले असते. आताच चर्चा झाली नसती. विकास कामे करण्यास मदत झाली असती. संबंधितवर गुन्हा दाखल करावा. महापालिकेचे झालेले नुकसान भरपाई त्यांचेकडून वसुल करावी. गुन्हा दाखल करावा.

आरोग्य वैद्य अधिकारी : यापुर्वीही नोटीसा दिलेल्या होत्या ही अंतीम नोटीस दिलेली आहे. त्याची मुदत १८-१०-२००३ पर्यंत असून त्यानंतर कार्यवाही करता येईल. अंतीम नोटीस ही ०३ महिन्याच्या मुदतीने द्यावी लागते. यानंतर नोटीस देण्याची आवश्यकता नाही.

श्री भगवान रगडे : ठिक आहे. अहवालानुसार संबंधित मालकावर पोलीस गुन्हा दाखल करावा व पुढील बैठकीत या संबंधित योग्य निर्णय घेण्यात यावा.

श्री भगवान घडामोडे : शासनाने जैविक कचरा केला. कायदा करुन दोन वर्ष झाले. प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिम मा. गौतम साहेब येवून गेले. त्यांनी महापालिकेच्या बायेमिडीकल वेस्ट प्रकल्पाबाबत नाराजी व्यक्त केली. १५ दिवसात प्रोजेक्ट सुरु करु असे अधिकाऱ्यांने सांगितले. आजापर्यंत प्रोजेक्ट सुरु झाला नाही. जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून दोन्ही विषय सेन्सेटिव्ह असतांना कार्यवाही न होण्याचे कारणे काय.

आरोग्य वैद्य अधिकारी : जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प अदयाप कार्यरत झालेला नाही. मी झाल्यापासून दोन नोटीस दिलेल्या आहे. आता यानंतर ३० दिवसांची अंतीम नोटीस देवून करारनामा रद्द करुन बायोमेडीकल वेस्ट प्रकल्प दुसऱ्या एजंसीजला देण्याचा विचार करता येईल आणि त्याची जी तेथील मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही चालू आहे.

श्री स. अली मिरा सलामी : या महापालिकेमध्ये विषय समित्याची स्थापना केली. असे विषय त्या त्या समीती मध्ये मांडणे योग्य होईल. त्या त्या समित्यामध्ये सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे संयुक्तीक होईल. निर्णय घेतल्यानंतर त्या समितीच्या सभापतींनी त्या सभागृहात खुलासा केला पाहिजे.

श्री भगवान घडामोडे : हे सभागृह सर्वोच्च सभागृह आहे. प्रत्येक सदस्यांना आपआपले मत मांडण्याचा अधिकार आहे.

श्री अ. कादीर मौलाना : एका विषयावर चर्चा चालू असतांना निर्णय न होताच दुसऱ्या विषयावर चर्चा सुरु होते हे कितपत योग्य आहे. सभागृह कसे चालवावयाचे ही महापौर म्हणून आपली जबाबदारी काय आहे.

श्री पांडुरंग तायडे : रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. आतापर्यंत कोणत्या रस्त्याचे डांबरीकरण केव्हा कोणत्यावर्षी व कोणत्या वार्डात किती वेळा झाले याची माहिती दि.११-०९-२००३ रोजी लेखी पत्र देवून अति. शहर अभियंता यांना माहिती देण्यासाठी पत्र दिले अदयाप माहिती सादर झाली नाही. जय भवानी नगर येथील ड्रेनेज, पुंडलीकनगर येथील टँक्करच्या संदर्भात पत्र देवून माहिती विचारली, अदयाप दिली नाही.

मा. महापौर : विशेष सभा बोलविण्यात येईल. त्यावेळी हा प्रश्न उपस्थित करावा.

श्री अफसरखान : गट नंबर ६८,६९ मधील भुखंड प्रकरणाबाबत मागील बैठकीत मुद्दा मांडला होता. त्या बाबतीत स्थगीती देण्यात आलेली आहे. परंतू सध्या प्लॅटींगचे काम चालू आहे. मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. या बैठकीत

माहिती ठेवणार होते. प्रशासनाकडे माहिती सादर झालेली आहेत का? असेल तर देण्यात यावी.

श्री सुनील मगरे : गट नंबर ६८,६९ या भुखंडावर संबंधित मालकाकडे ३९ कोटीचे कर्ज असतांना त्या भूखंडास नगररचना विभागा मार्फत ले-आऊट मंजूर केला. केलेले ले-आऊट नियमानुसार आहे किंवा कसे त्याचा अहवाल देण्याचे आदेश दिले होते. तसेच अशाच प्रकारच्या इतर भूखंडाच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी विशेष सभा बोलविण्यात येईल. असे म्हटले होते. सभा बोलाविली नाही. अवैधरित्या ले-आऊट मंजूर केलेला आहे. अधिकाऱ्याकडून खुलासा घ्यावा. दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

मा. महापौर : अहवाल प्राप्त आहे.

श्री भगवान घडामोडे : मागील बैठकीत ६८,६९ सर्व्हे नंबर येथील भूखंडाचा विषय निघाला त्या जागेवर सर्रासपणे प्लॉटींगपणे चालू आहे. सभागृहातील त्यावर चर्चा होवून स्थगिती देण्यात आली आणि आता त्या जागेवर प्लॉटींग चालू आहे. टेन्टीटयूव्ह परवानगी कशी दिली. विचारणा व्हावी. त्या जागेवर कर्जाचा बोजा असतांना मंजूरी देणे, याचा अर्थ जनतेची फसवणूक होत आहे. जे कुणी प्लॉट घेतील, त्यांचेवर कर्जाचा बोजा पडेल ते बेघर होतील त्यांचे जीवनाशी महपालिका खेळत आहे. असे म्हटले तरी, योग्य होईल. याबाबतचा अहवाल सभागृहात दाखवावा. दोषीवर कार्यवाही व्हावी.

श्री अफसरखान : लाखो रुपयाचा भ्रष्टाचार होवून ले-आऊटला मंजूरी दिली जाते. दिलेली मंजूरी नियंमानूसार बरोबर आहेत का? यात गरीब नागरीक भरडला जाईल.

श्री भगवान घडामोडे : या विषयावर स्थायी समितीच्या बैठकीत सुध्दा चर्चा झालेली आहे. त्या बैठकीत मा. आयुक्तांनी खुलासा केला की, ज्या जमीनीवर कर्जाचा बोजा असेल ले-आऊटला मंजूरी देता येत नाही. असे आयुक्तांनी उत्तर दिले. जर असे असतांना टेन्टीटयूव्ह मंजूरी दिली असेल तर, आयुक्तांनी सुध्दा उल्लघंन केली असे वाटते. आयुक्तांचे आदेश सुध्दा पाळले जात नाही असे दिसून येते.

श्री जयवंत ओक : सभागृहात या संबंधीचा अहवाल आला असेल तर, खुलासा करावा तो वाचून दाखवावा आरोप करणे योग्य होणार नाही. अहवाल वाचून दाखवावा.

मा. महापौर : आरक्षण उठविण्यासंबंधीचा चौकशी अहवाल, दोषी व्यक्तीवर कार्यवाहीसाठी मा. आयुक्तांना सादर केला आहे. सर्वसाधारण सभेत माहितीस्तव हा अहवाल नगर सचीव वाचून दाखवितील.

नगरसचीव : अहवाल वाचून दाखवितात.

श्री नंदकुमार घोडेले : अहवाल वाचून दाखविला हा १२७ च्या नोटीसचा विषय आहे. ६८,६९ हा ले-आऊट मंजूरीचा विषय आहे. वाचलेला अहवाल ले-आऊट मंजूरी संदर्भात नाही.

श्री किशनचंद तनवाणी : हा अहवाल ६८,६९ ले-आऊट मंजूरी संदर्भाचा नाही.

श्री भगवान घडामोडे : अहवाल हा ८४,८६ रेखाकंना संदर्भात आहे. ६८,६९ ले-आऊटचा संदर्भात अहवाल मागविलेला होता. खुलासा द्यावा. विषय वेगळा आहे. अहवाल वाचन दुसऱ्या विषयावर होत आहे. यावरुन नगर रचना विभागाचे काम किती स्वच्छ, निर्मल आहे हे दिसून येते. आताच अहवाल वाचला यावर आयुक्त तसे सह. संचालक यांचे सहया नाहीत. या विभागात बेजाबबदारपणे काम चालते. आरक्षणाचे जे विषय डिलीट करुन संबंधित

मालकास महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी जिवदान दिले यात महापालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. यास संबंधित अधिकारी जबाबदार असून प्रशासन जबाबदार आहे. कार्यवाही होणे गरजेचे आहे.

श्री सुनिल मगरे : गट नंबर ६८,६९ च्या ले-आऊट संदर्भात खुलासा करावा.

सहा. संचालक : दि. २०-०८-२००३ च्या सर्वसाधारण सभेत ईटखेडा येथील गट नंबर ६८,६९ यावर ३९ कोटी कर्ज असून ही ले-आऊट मंजूरकरुन देण्यात आलेले आहे. हा प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केलेला होता. खुलासा खाली प्रमाणे सादर.

गट नंबर ६४/२,६६,६७,६८,६९/१,७०/१ मौजे येथील एकूण क्षेत्र १७,८१६४ हेक्टर रेखाकंन एकूण क्षेत्र १७,८१६४ हेक्टर त्यापैकी विकास योजना रस्ता व आरक्षणे क्षेत्र या खालील ६,०६,९८ हेक्टरला जा निव्वळ ११,७४६५ हेक्टर क्षेत्रसासाठी नगररचना विभागतील पत्र क्र. १०५७/०३ दि. २३-०५-०३ रोजी अन्वये विहीत अटीच्या अधिन राहून रेखांकनास तात्पुरत्या मंजूरीची शिफारस करण्यात आलेली आहे. गट क्र. ६८ चे क्षेत्रातील १,८१ हेक्टर व गट क्र. ६९/१ चे क्षेत्र ३.५७ हेक्टर असे या दोन गटाचे मिळून ५.३८ हेक्टर क्षेत्राचा उक्त रेखाकंनास समावेश आहे. गट नंबर ६८ वर कॅनरा बँक यांचा नाथ सिडस् लि. कंपनीवर १२५ हेक्टर जमीनीवर रक्कम रुपये ६.९० कोटी कर्जाचा बोजा फेर क्रमांक ३६८ ने होता तो बोजा फेरक्रमांक ५१३ ने बोजा कमीची नोंद २००१-२००२ च्या सातबारा उतारावर आहे. गट क्र. ६९/ वर(१) बँक ऑफ इंडीयाचा १३९३.७० लक्ष रुपयाचा बोजा, (२) देना बँक १३६६ लक्ष (३) युनायटेड वेस्टर्न बँक रु. ३९८.२० लक्ष रु. चा बोजा (४) सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक रु. ३६४ लक्ष त्यानंतर कॅनरा बँक ४७२.२२ लक्ष असा फेर क्रमांक ५३३ नुसार सन २००१-२००२ च्या सातबारा वर नोंद आहे. गट नंबर ६९/१ वर एकूण रुपये ३,९९४.१२ लक्ष म्हणजेच रु.३९.९४१२ कोटीचा बोजा दिसून येतो. तथापी उक्त रेखांकनास तात्पुरत्या मंजूरीची शिफारस करण्यात आलेल्या पत्रातील अळ क्र. १७ नुसार ७/१२ उतरानुसार मिळकती वरील इतरांचा बोजा विशेषतः बँकेकडील कर्जाची जबाबदारी अर्जदारांवर राहील. त्याबाबत वाद निर्माण झाल्यास तो त्यांनी परस्पर मिटवावा असे नमूद आहे.

श्री स. अली मिरा सलामी : नगररचना विभागावर संपूर्ण चर्चा करण्यासाठी किमानगट तास आवश्यक आहे. कमी वेळात सर्व प्रकरणांवर चर्चा करुन निर्णय घेवू शकणार नाही. कोणत्या नियमानुसार तात्पुरता ले-आऊट मंजूर करता येतो. भूखंडाच्या संबंधित चर्चा करण्यासाठी विशेष सभा बोलवावी.

मा. महापौर : गट नं. ६८,६९ संबंधी मागील बैठकीत स्थगिती दिली आहे. समिती चौकशी करीत आहे. नगररचना विभागासंबंधी विशेष सभा बोलविण्यात येईल.

श्री पांडुरंग तायडे : नगररचना विभागाच्या संदर्भात विशेष सभा बोलवावी. तसेच राज्य शासनाने मागासवर्गीय लोकांचा अनुवेग भरुन काढण्यासाठी मोहीम चालू आहे. महापालिकेमध्ये अनुवेग भरती मोहीम चालू असून, आजच्या स्थानिक वृत्तपत्रात पात्र उमेदवारांना कॉल न पाठविला ठराविक लोकांना या परिक्षेसाठी कॉल देण्यात आले असे दिले. जे पात्र असतील त्या सर्वांना कॉल लेटर द्यावे. श्री २ मी साहेब असतांना जशी पारदर्शकता ठेवण्यात

आली. त्याप्रमाणे ठेवावी. कोणताही गैरव्यवहार होता कामा नये. लाखो रुपयाचा गैरव्यवहार होण्याची शक्यता आहे. ज्यांनी अर्ज केला तो पात्र ठरविला गेला. अशा सर्व उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी मुलाखत पत्र द्यावे. कुणाची आर्थिक पिळवणूक होणार नाही. याची दखल प्रशासनाने घ्यावी. गैरव्यवहार झाल्यास आम्ही सर्व आघाडीचे नगरसेवक येथे महापालिका भेट समोर आमरण उपोषणास बसू याची दखल घ्यावी.

श्री सुनील मगरे : मागील काही दिवसांपुर्वी मागासवर्गीयांचा अनुषेश भरती करण्यासाठी महानगरपालिकेने कार्यवाही सुरु केलेली आहे. अनेक सुशिक्षित बरोजगारांचे वेगवेगळया पदासाठी अर्ज प्राप्त झाले. त्यात की ३ चे ३१ पदे आहेत. आजच्या सामना वृत्तपत्रात आले की, या अनुषेश पदांच्या भरतीमध्ये प्रचंड आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता आहे. ही बातमी कोणत्या आधारावर छापून आलेली असावी. वग-३ चे ३१ पैकी काही पदाच्या मुलाखतीसाठी बोलविण्यात आलेले आहे. कोणता निकष लावण्यात आलेला आहे. १५ पदे अशी आहेत की, त्या उमेदवारांना डायरेक्ट मुलाखत पत्र देण्यात आलेले आहे. काही विशिष्ट अशा पदांना लेखी परिक्षेसाठी बोलविण्यात आलेले आहे. माझे असे मत आहे की, एकच निकष सर्व पदासाठी लागला गेला पाहिजे. विशिष्ट अशी अर्हता पुर्ण करीत असलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी बोलविण्यात यावे. काही पदाच्या बाबतीत १५ उमेदवारांना बोलविण्यात आलेले आहे. तर काही पदाच्या बाबतीत अनेक उमेदवारांना बोलविण्यात आलेले आहे. त्यामुळे यामध्ये विसगती आलेली आहे. ज्यांनी अर्हता पूर्ण केली असेल त्या सर्वांना लेखी परिक्षेसाठी बोलविण्यात यावे. १५ उमेदवारांना डायरेक्ट कॉल कोणत्या आधारे दिले त्याचा सुध्दा खुलासा व्हावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : विविध पदासाठी अर्ज मागविण्यात आले. कागपत्रांची पुर्तता आहे किंवा नाही याची छानणी करुन पात्र असलेल्या उमेदवारांची यादी करण्यात आली. त्यानंतर मी उपआयुक्त यांचेशी चर्चा केली अशी पध्द्त चुकीची आहे. कोणताही निकष ठरविण्याचा अधिकार प्रशासनास आहे का? या संदर्भात मी पत्रही दिले आहे. प्रशासनाने एका पदासाठी १५ उमेदवारांना कॉल लेटर दिलेले आहे. या मोठा भ्रष्टाचार होऊ शकतो. लेखीपरीक्षा घेणार आहेत. त्यात जे उत्तीर्ण होतील त्यांना कॉल द्यावे. परंतू ज्यांनी अर्ज दाखल केलेले आहे. त्या सर्वांना लेखी परीक्षेचे कॉल लेटर देण्यात यावे. कुणावरही अन्याय होवू देऊ नये. जाहीरात देतांना मेरीट लावले जातील. असे काहीही ठरविण्यात आलेले नाही. सभा साहेबांच्या वेळेस पारदर्शकता होती. त्याप्रमाणे ठेवावी.

श्री सुनील मगरे ज्यांनी अर्ज सादर कला त्या सर्वांना मुलाखत पत्र देण्याबाबत आदेश दयावे.

मा. आयुक्त : पारदर्शकता पाहिजे, अशी अपेक्षा स. सदस्यांनी व्यक्त केलेली आहे. कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होवू नये म्हणून मा. स्वत: काळजी घेत आहे. जेवढे अर्ज प्राप्त झाले त्या हजारो लोकांना सरसकट मुलाखतीसाठी बोलविण्यात आले तर, हजारो लोकांना वेगवेगळया प्रकारे बाहेर काय होते याची कल्पना आपणांस आहे. आताच मत व्यक्त केले की, तत्कालीन आयुक्त श्री. शर्मा याचवेळेस जी पारदर्शकता होती. त्या पेक्षाही ३०% जास्त

पारदर्शकता या भरतीमध्ये राहणार आहे. कुणासही काही गैरव्यवहाबाबतीत प्रकार समजला मला दुरध्वनीवरुन माहिती द्यावी. त्याची चौकशी मी स्वतः करील गैरव्यवहार करण्यासाठी कुणासही संधी मिळणार नाही. याची खात्री मला आहे.

श्री सुनील मगरे : गैरप्रकार सांगुन होत नसतात. १५ पदांसाठी मोजक्या लोकांनाच कॉल दिले. ज्या उमेदवारांना लेखी परीक्षेतून वगळण्यात आले. त्यांना बोलविण्यात यावे.

मा. आयुक्त : स. सदस्यांचा गैरसमज झालेला दिसतो. जी भरती होणार आहे. ती नियमाप्रमाणे होणार आहे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : सुरुवातीला जी जाहिरात दिली. २७ तारखेला जे अर्ज भरुन घेतले त्यामध्ये असा उल्लेख होता का? नंतर सुधारणा केलेली आहे. माझी प्रशासनाशी चर्चा झाली मी पत्र दिले. त्या पत्राच्या नंतर जाहिरात दिली की, अमुक बदल करणार आहे. म्हणून मूळ जाहिरातीनुसार जी यादी उमेदवारांची आहे त्या सर्व उमेदवारांना कॉल लेटर दिले पाहिजे. त्यानंतर तोंडी परीक्षा होणार आहे. लेखी परीक्षेस सर्वांना संधी दयावी. जे पास होतील त्यांची तोंडी परीक्षा घ्यावी. परंतू आता ज्या ज्या उमेदवारांना २४ तारखेच्या लेखी परीक्षेचे कॉल लेटर दिले असतील ती परीक्षा घेण्यास हरकत नाही. परंतू जे राहिलेले असतील त्यांना सुध्दा कॉल लेटर पाठवून तारीख निश्चित करावी.

श्री अफसरखान : परीक्षेची तारीख निश्चित करावी.

मा. महापौर : मागासवर्गीय अनुशेष भरती संदर्भात सर्वांना कॉल लेटर पाठविण्यात यावे. सर्वांना न्याय दयावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : येत्या २४,२८ तारखेला ज्यांना लेखी परिक्षेस बोलाविले त्यांची लेखी परीक्षा घ्यावी व जे राहीले असतील त्यांना कॉल लेटर देवून, तारीख निश्चित करण्यात यावी.

मा. महापौर : जे राहिलेले असतील त्यांना सुध्द कॉल लेटर पाठविण्यात यावे. लेखी परीक्षेसाठी बोलाविण्यात यावे. बरोबरच परीक्षा घेण्यात यावी.

**विषय क्र. १४३/१ :** दिनांक २०-०८-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

श्री नंदकुमार घोडेले : विषय क्र. १३६/२ पान क्र. ३४ वर प्रस्तावाच्या संदर्भात जो निर्णय घेतला त्या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनास असे आदेश द्यावेत की, कुठलीही कार्यवाही या ठरावाच्या संदर्भात करु नये आणि नियमानुसार तो ठराव विखंडीत करावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : इतिवृत्तामध्ये वरील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

मा. महपौर : प्रशासनाने कार्यवाही करु नये.

श्री अफसरखान : इतिवृत्तातील पान क्र. २७ वर विषय क्र. ११७/१ मंजूर करण्यात आलेला आहे. सभागृहाची दिशाभूल करण्याच्या दुपटीने प्रस्ताव आणलेला होता. या प्रस्तावात दुरुस्ती करुन ज्या संस्थेला नेहमी ठेका दिला जातो. त्यांनाच १० ते १५ टक्के भाडेवाए करुन देण्यात यावे. टेंडर पध्दतीने देण्यात येवू नये. प्रस्ताव रद्द करावा.

श्री नासेरखान कुरेशी : दिशाभूल करुन प्रस्ताव सादर केला. मुस्लीम धर्मीयासाठी महत्वाचा असा बाजार तो शहागंज येथे भरतो. ०९ वर्षापासून जी संस्था बाजार चालविते. कोणतेही चुकीचे घटना घडलेली नाही. फसवणूक केलेली नाही. ज्या संस्थेला बाजार देण्यात येत असे त्यांनाच काही टक्के वाढवून देण्यात येत यावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : हा ठराव रद्द करता येतो का? खुलासा दयावा.

श्री अफसरखान : विषय क्र. १३६ हा सुध्दा रद्द करता येतो का? खुलासा दयावा.

श्री सलीम पटेल समशेर पटेल : राजकारण करण्यात येते. स्टेजवर बोलावून सत्कार केला नाही. ज्यांच्या वार्डात आहे. त्यांचा अभिप्राय घ्यावा. माझ्या स. स. श्री कैसनखार व स. स. श्री हिदायत अली यांच्या वार्डात येतो.

श्री मीर हिदायत अली : मिना बाजार कुणास द्यावे दुमत नाही. महापालिकेचे हित बघावे. या दृष्टीने घेतलेला निर्णय योग्य आहे. रद्द करु नये. बाजार कशा पध्द्तीने भरावा याची काळजी घेतली जात नाही. आग लागल्यास अग्निशमन विभागाची गाडी जावू शकत नाही. रस्ता नसतो.

मा. महापौर : एक-एक सदस्यांनी बोलावे.

श्री तकी हसन खान : हा विषय सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला आहे. इतिवृत्त कायम करतांना काही त्रुटया राहिले लिखाणाची ई-दुरुस्ती करता येते. मिनाबाजार कुणाला द्या. परंतु महापालिकेचे हित लक्षात घ्यावे. लिलाव पध्द्तीने पूर्वीचे संस्था घेवू शकते. दुमत नाही. अन्याय होत आहे. असे म्हणणे चुकीचे होईल.

श्री अफसरखान : भाडे वाढवून घ्यावे. त्याच संस्थेला देण्यात यावे.

श्री जयवंत ओक : महापालिकेचे उत्पन्न कसे वाढेल. त्या दृष्टीने निर्णय घ्यावा.

श्री मीर हिदायत अली : लिलाव पध्द्तीने दिल्यास महापालिकेस लाखो रुपयाचे उत्पन्न मिळेल. प्रशासनाचा याबाबतीत खुलासा घ्यावा.
(याच वेळी मा. महापौर डायस समोर जावून स.स. मोठमोठयाने बोलतात.)

मा. महापौर : १५% भाडेवाढ करुन पूर्वीच्याच संस्थेला देण्यात यावे.

श्री मिर हिदायत अली : खुली स्पर्धा व्हावी.

श्री तकीहसन खान : विषय क्र. १ मंजूर करावा.

मा. महापौर : दुरुस्ती करुन मंजूर व विषय क्र. १३५/१ संबंधित नगरसेवकांशी चर्चा करुन करावे.

**ठराव क्र. १४३/१ :** दिनांक २०-०८-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. १४४/२ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन आदेश क्र. टीएलपी-१००३/प्र.क्र.१६१ (२)/सेवा-२ दि. २६-०६-२००३ नुसार डॉ. भा.ह. काळे साथरोग शास्त्रज्ञ आ. प. कु. क. प्र. के. ओरंगाबाद यांनी आरोग्य वैदयकिय अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद या पदावर नेमणूक करण्यात आली आहे. संबधितास कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/अस्था-१/१४२६/२००३ दि. ३०-०७-२००३ अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद या पदावर दि. ०४-०७-२००३ रोजी मध्यान्होतर कामावर रुजू करुन घेण्यात आले आहे.

करीता, डॉ. भा.ह. काळे यांची रुजू झाल्याचे तारखेपसासून म्हणजे दि. ०४-०७-२००३ रोजी मध्यान्हनंतर आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद या

पदावर दोन वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनयुक्तीस मान्याता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १४४/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. भा. ह. काळे साथरोग शास्त्रज्ञ आ.व.कु.क.प्र.के. औरंगाबाद यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य वैदयकिय अधिकारी या पदावर ते रुजू झालेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०४-०७-२००३ मध्यान्हांनंतर पासून प्रतिनयुक्तीच्या अटी व शर्तीस अधिन राहुन ०२ वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर नेमणूक देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५/३ :** सर्वसाधारण सभा विषय क्र. ३७/२ दिनांक १९-०३-२००३ अन्वये नगररचना विभागाकडील प्रस्ताव शहर सुधार समिती सभेकडे पाठविण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार शहर सुधार समिती सभा दि. १६-०८-२००३ (दि. ०५-०७-२००३ रोजी तहकुब झालेली सभा) विषय क्र. ४/३ अन्वये ठेवण्यात आले असता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये प्राप्त होणाऱ्या सुचनेवर विहीत मुदतीत कार्यवाही पूर्ण करणे प्रथम शहर सुधार समिती व समितीच्या शिफारशीसह सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे या सुचनासह प्रस्तावास मंजूरी देवून, सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात येते की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार १२ मीटर (४० फूट) रुंद रस्ता हर्षनगर ते लेबर कॉलनी या रस्त्याने न.भु.क्र. ६८७४ व ६८७५ हया मिळकती बाधित आहे. उक्त मिळकत धारकाने बाधित क्षेत्र संपादन करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिनांक २८-०८-२००२ रोजी दिलेली आहे. प्रकरणात १२७ ची खरेदी सुचना असल्याने भुसंपादन प्रस्ताव खरेदी सुचना दिल्यांच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत म्हणजे दिनांक २७-०२-२००३ पुर्वी मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

उक्त रस्त्याने वरील मिळकती बाधीत असून बाधीत क्षेत्र अंदाजे अनुक्रमे २५२ चौ. मी. व २४१ चौ.मी. असे एकूण ४२३ चौ. मी. आहे. शिघ्र गणक दर रु. ३०००/- प्रति चौ.मी. आहे. करीता, संपादनासाठी सुमारे १५ लाख रु. खर्च अपेक्षीत आहे.

प्रकरणात मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिली असल्याने बाधीत क्षेत्र संपादन करणे आवश्यक आहे.

सबब उक्त मिळकतीचे वरील बाधीत क्षेत्र संपादन करण्यासाठी व त्यास लागणारा वरील प्रमाणे भुसंपादन खर्चासह भुसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री राधाकृष्ण गायकवाड : १५ लाख रुपयाची रक्कम कुणास द्यायची. नकाशा वेगैरे नाही. काहीही मार्गदर्शन होत नाही. म्हणून हा प्रस्ताव पूढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावा.

मा. महापौर : प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत असून, पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह सभागृह ठेवण्यात यावा.

**ठराव क्र. १४५/३:** सभागृहात झालेलया चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा व पूढील सभेत ठेवावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १४६/४ :** कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेच्या नक्षत्रवाडी ब्रुस्टर पंपगृह येथे ३०० अश्व शक्ती व्ही.टी. पंपाचा पुरवठा करणे, उभारणी करणे व त्याची समाधानकारक चाचणी देणे या कामासाठीच्या रुपये २०,९४,७८६/- च्या अंदाजपत्रकात मा. आयुक्त यांनी दिनांक १३-०८-२००३ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

नक्षत्रवाडी ब्रुस्टर पंपगृह १९८५ मध्ये कार्यान्वीत करण्यात आले आहे. त्यावेळी ३०० अ.श.चे.व्हि.टी. पंप बसविण्यात आले आहेत. व त्यावेळे पासून सदरील पंप चालू आहेत. सदर पंप १८ वर्ष जुने झालेले आहेत. त्यामुळे ते वारंवार ना-दुरुस्त होतात व वारंवार दुरुस्त करावे लागतात. त्यामुळे पंपाची कार्यक्षमता कायम राहत नाही. पंपाचे वयोमान साधारणत: १५ वर्षाचे असते. सदरील पंपाचे संघाचे वयोमान १८ वर्षाचे आहे.

उपरोक्त नमुद केलेल्या कारणांमुळे या पंपगृहातील दोन पंप (३०० अ. श.) त्यासाठी आवश्यक त्या मोटारीसह बदलण्याचा प्रस्ताव आहे. सदरील दोन पंप नवीन बसविल्यानंतर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी मदत होईल.

अंदाजपत्रकामध्ये घेण्यात आलेले काही दर हे महाराष्ट्र जीवन प्राधीकरणणाच्या यांत्रिकी/विदयुत दरसुचीच्या आधारित आहेत. (बाब क्र. १,२,३,४,५,६,७) व बाब क्र. २ चा दर हा पंपाचे उत्पादन करणाऱ्या कंपनीच्या अधिकृत वितराकांकडून घेण्यात आलेले आहे. या कामावर होणारा खर्च पंप दुरुस्ती व मशिनरी खरेदी या शिर्षाखालील रु. १८०.०० लक्ष यामधील तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी नक्षत्रवाडी ब्रुस्टर पंपगृह येथे ३०० अश्वशक्तीचे दाने व्ही.टी.पंप पुरविणे, बसविणे यासाठीच्या रुपये २०,९४,७८६/- च्या अदंाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

श्री राधाकृष्ण गायकवाड : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा. या पासून जनतेला किती फायदा होणार आहे.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : नक्षत्रवाडीचे जे पंप आहेत. तेथे फारोळयावरुन पाणी येते. नक्षत्रवाडी येथे जो एम.बी.आर. आहे. त्या ठिकाणी पाणी लिप्ट करण्यात येते. सदरचे पंप १९८५साली कार्यान्वीत झालेले होते. या पंपाचे आयुष्य कमी झाल्याने नेहमीच दुरुस्तीचे काम हाती घ्यावे लागत असून, यामुळे पाणी पुरवठयात नेहमीच व्यत्यय येतो. त्यामुळे दोन्ही पंप बदलण्याचा हा प्रस्ताव आहे.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. १४६/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी येथील ब्रुस्टर पंपगृह येथील ३०० अश्वशक्तीचे दोन व्ही.ही.पंप हे १८ वर्षापुर्वीचे जुने पंप असल्यामुळे सदर ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांत्रिकी व विदयुत विभागाचे दरसुची आणि पंपाची उत्पादन करणा:या कंपनीचे अधिकृत यांचेकडून ३०० अश्वशक्तीचे दाने व्ही.टी.पंप पुरविणे/बसविणे आणि त्यांची समाधानकारक चाचणी देणेच्या कामासाठी रक्कम रु. २०,९४,७८६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च पंप दुरुस्ती व मशिनरी खरेदी या शिर्षकातील १८० लक्ष रुपयाच्या तरतुदीमधुन करण्यास मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/५ :** हरसिध्दी पाण्याच्या टाकीपासून (फेज-२) पाणीपुरवठा वितरण व्यवस्था करण्यासाठी ३५० मी.मी. व्यासाची सि. आय मुख्य जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव आहे.

हरसिध्दी पाण्याच्या टाकीपासून फेज-१ कामाची ४०० मी.मी. व्यासाची सि.इय. जलवाहिनी टाकण्याचे काम सध्या चालू असून, पाण्याच्या टाकीपासून एन-११/एच सेक्टरपर्यंत २५० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीपर्यंत काम आहे. हरसिध्दी पाण्याच्या टाकीवरुन एकाच वेळेस जास्त भागात पाणीपुरवठा वितरण व्यवस्था चांगल्या प्रकारे होण्यासाठी एन-११/एच सेक्टरपासून ते सौभाग्य मंगल कार्यालयाच्या चौकापर्यंत (स्मशानभूमी कॉर्नर) पर्यंत नव्याने ३५० मी.मी. व्यासाची मुख्य सी. आय जलवाहिनी टाकणे अत्यंत आवश्यक आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २१,९३,०८२/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन २००२-२००३ या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले असून, यावर होणारा खर्च हा अर्थसंकल्प २००३-२००४ मधील ठेवलेल्या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे.

तरी हरसिध्दी पाण्याच्या टाकीवरुन वितरण व्यवस्था फेज-२ एन-११/एच सेक्टर पासून ते सौभाग्य मंगल कार्यालयापर्यंत २००,२५०,३००,३५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २१,२३,०८२ ला मंजूरी साठीची प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. १४७/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हरसिध्दी पाण्याच्या टाकीवरुन एन-११ एच सेक्टर पासून ते सौभाग्य मंगल कार्यालयापर्यंत पाणीपुरवठा वितरण व्यवस्था फेज २ साठी २०० मी. मी. २५० मी. मी. ३०० मी. मी. व ३५० मी. मी. व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्याचे रक्कम रु. २१,९३,०८२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४८/०६ :** मा. कार्यकारी अभियंता (वि/ड्रे) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील विविध मुख्य रस्त्यावरील तसेच प्रत्येक विभागात असलेले स्ट्रीट लाईट पथ दिवे, वेळेवर चालू व बंद होण्यासाठी टायमर लावणे गरजेचे आहे. सदरील पथदिवे मनपा व म.रा.वि.म. च्या पोलवर आहेत. म.रा.वि.म. कडे लाईनमन नसल्यामुळे सदरील पथदिवे वेळेवर बंद व चालू होत नाहीत. त्यानुसार म.रा.वि.म. व मनपाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे म.र.वि.म. ला टायमर लावून देणे यासाठी अंदाजे ४०० टायमरची आवश्यकता आहे. या टायमर कॉन्ट्रक्टर व बॉक्स राहील. याचा अंदाजे खर्च प्रति टामर ६५००/- प्रमाणे रु. २६.०० लक्ष खर्च येईल. सदरील टायमर लावल्यानंतर पथदिवे वेळेवर बंद व चालू होतील जेणे करुन विदयुत देयकाचा अनावश्यक येणारा खर्च कमी होईल. सदरील काम सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पातून करण्यास मान्यता मिळाली आहे. तरी सुमारे रुपये २६.०० लक्षचे टायमर खरेदी करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यास येते आहे.

**ठराव क्र १४८/०३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध मुख्य रस्त्यावरील व प्रत्येक विभागात असलेले स्ट्रिट लाईट पथदिवे वेळेवर चालू बंद होणेसाठी व विदयुत देयकाचा अनावश्यक होणारा खर्च कमी होण्यासाठी शहरातील विविध मुख्य रस्त्यावरील तसेच प्रत्येक विभागात असलेले स्ट्रिट लाईट पथदिवे वेळेवर चालू बंद होण्याकरीता ४००

टायमर कॉन्ट्रक्टर व बॉक्स सहीत खरेदी करण्याकरीता, रक्कम रु. २६ लाखाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९/७ :** आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मार्फत सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची मुळ विकास योजना १९७५ साली शासन निर्णय क्र. टीपीएस ३०७३-४९५८ डब्ल्यू दिनांक ०६-०१-१९७५ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक ०१-३०-१९७५ पासून आमलात आणण्यात आली आहे. सदर विकास योजनामधील क्रांती चौक-पैठणगेट या ३० मी. रुंद प्रस्तावित विकास योजना रस्ता विकसित करण्याचे कामी क्रांतीचौक ते सिल्लेखाना या भागाचे भूसंपादन करण्यात येत असून या रस्त्याची पूर्व बाजूकडील बाधित मिळकती संपादी केल्या आहेत. पश्चिमेकडील मिळकतीचे भूसंपादन करण्यात येत आहे.

औरंगाबाद शहराची सुधारीत विकास योजना शासनाने २००१ मध्ये मंजूर केली असून, त्यानुसार क्रंातीचौक ते पैठणगेट हा रस्ता ३०.० मी. प्रमाणे रसता रुंदीकरण प्रस्तावित असून कदीम मजिदच्या भागात रस्त्याची ३०.० प्रस्तावित रुंदीकरण कायम ठेवण्यासाठी १०.०६ मी. रुंदीचा Diversion Bridge प्रस्तावित केला आहे. तसेच पैठणगेट ते गुलमंडी चौक पर्यंत १५.० मी. रस्ता रुंदीकरण प्रस्तावित आहे.

उक्त रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही दरम्यान पश्चिम बाजूकडील बाधीत मिळकतीमध्ये कब्रस्थान व कदीम मशीदचा समावेश होतो. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. मा. उच्चन्यायालयाने ३० मी. रुंदी करीता विकास योजना रस्ता विकसीत करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे या बाधीत मिळकती संपादीत करण्यासाठी जिल्हा प्रशासन व वक्फ बोर्ड प्रतिनिधी यांच्यामध्ये वेळोवेळी झालेल्या चर्चेमध्ये सदर मिळकती धार्मिक असून, त्या संपादन केल्यास त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर होणारा परिणाम टाळण्याचे दृष्टीने जिल्हा प्रशासनाने मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग यांचेकडे या संदर्भात चर्चा झाली. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दिनांक २३-०३-२००१ चे पत्र देऊन रस्त्याचे आखणीत बदल प्रस्तावित करुन त्याप्रमाणे साईड ब्रीज बांधण्याची निविदा दिनांक ०७-०४-२००१ पूर्वी काढणे आवश्यक असल्याचे कळविले होते. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी या संदर्भात बैठक घेवून कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीकोनातून असा प्रस्ताव महानगरपालिकेसमोर ठेवण्याबाबत व पारित करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या त्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयासमोर पर्याय सादर करण्याकरीता सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता की,

मंजूर विकास योजना मधील प्रस्तावित ३० मी. रुंद विकास योजना रस्त्याचे आखणीत अल्पसाबद्दल करुन या रस्त्याने बाधीत होणाऱ्या मशिदच्या भागास धार्मी भावनाचे दृष्टीने कोणतीही बाधा न पोहचता, या मशीद लगतचे कब्रस्थानचे परिसरातून मशिदचे पश्चिमेकडील बाजूर ३३ फुट (१०.३० मी.) रुंद रस्ता साईड ब्रीज म्हणून विकसीत करण्यात यावा. जेणे करुन सध्या मशिदचे पूर्वेस असलेला ६७ व आता प्रस्तावित केलेला मशिदचे पश्चिमेकउील ३३ फूट असा एकत्रीत १०० फुट रुंद रस्ता विकसित होईल व तसा रस्ता विकसित करण्यासाठी सदर आखणी बद्दलाची म.प्रा.व व.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाहीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित केले होते.

सदरील प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव ठेवण्यासाठी मा. आयुक्त मनपा यांनी जा.क्र./नरवि/४९०/२००१ दि. ३१-०३-२००१ अन्वये सादर प्रस्ताव पाठविला असता, मा. महापौर, औरंगाबाद मनपा औरंगाबाद यांनी पत्र क्र. मनपा/महापौर २००१/५८९

दि. ०३-०४-२००१ रोजी कळविले आहे की, पैठणगेट ते क्रांतीचौक हा सार्वजनिक रस्ता मंजूर विकास आराखडयानुसार १०० फुट असून, त्यानुसार या रस्त्याचे रुंदीकरण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर रस्ता रुंदी करणाबाबत मा. उच्च न्यायालय तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या असता मंजूर विकास आरखडयानुसार त्या रस्त्याचे रुंदीकरण करणेबाबत मा. न्यायालयाने देखील आदेशीत केलेले आहे. मंजूर विकास आराखडयात दर्शविलेली रुंदी तसेच मा. न्यायालयाचे आदेश या बाबी विचारात घेता सदर रस्ता ३०० फूट रुंद करणे उचीत वाटते. करता, पैठणगेट ते क्रांतीचौक या रस्त्याचे १०० फुट रुंदीकरण मंजूर विकास आराखडयात दर्शविल्याप्रमाणे तसेच मा. न्यायालयाचे आदेशाप्रमाणे करण्यात यावे. या संदर्भाने विशेष सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवणे आवश्यक वाटत नाही.

हया नुसारचे अभिप्राय मा. शासनास कळविण्यात आले असता, शासन स्तरावर वरील प्रस्ताव शासनातर्फे औरंगाबाद शहराची प्रारुप (सुधारित) विकास योजना मंजूर करतांना विकास योजना वगळलेला भाग (ई.पी.) १०४ म्हणून मान्यता देण्यात आली. ही मान्यता टी.एस ३००१/१५९५सी. आर. २७३/२००१/युडी-३० दिनांक ०२ जानेवारी २००२ अन्वये मान्यता झाली.

हया नव्या बदललेल्या आखणीसाठी भुसंपादन व विकास कामासाठी शासनातर्फे १ कोटी ७७ लक्ष रुपये देण्यात येणार आहेत. हया साईड ब्रीजचे विकास काम महानगरपालिका करणार का? इतर कोणती संस्था करणार याबाबत शासनाने विचारणा केली आहे. त्याबाबत मा. सर्वसाधारण सभेपूढे प्रस्ताव ठेवला असता मा. सर्वसाधारण सभेने सदर प्रस्तावात विधी विभागाचा अभिप्राय घेऊन कायदेशीर बाब तपासून ठरावावर विचार करण्यात येईल असा निर्णय घेतला आहे.

प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने हयाबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सुनावणीचे वेळी वरील रुंदीकरणात बाधीत असलेल्या धार्मीक स्थळाचे (कदीन मजिद) बाबत चर्चा होतांना मा. जिल्हा प्रशासन, औरंगाबाद व शासनातर्फे माजी केंद्रीय कॅबीनेट सचिव श्री. जफर सौफुल्ला हयांनी याबाबत तोडगा काढावा. त्यासाठी अहवाल मागविला. त्यावर मा. उच्च न्यायालयाने मनपास निर्देश दिले आहे की, श्री जफर सैफुल्ला यांचे अहवालावर आपले मत काय? हयासाठी श्री जफ र सौफुल्ला यांनी सुचविलेले पर्याय मा. सर्वसाधारण सभेत ठेवण्यात आले असता, दिनांक १९-०३-२००३ रोजी संपन्न झ ालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र. ४२/३० नुसार सर्वसाधारण सभेत झालेल्या चर्चेनुसार सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने मा. न्यायालय जो निर्णया निर्देश देईल तो या सभागृहास मान्य राहील. असा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे मा. न्यायालयात अहवाल सादर केला असता मा. न्यायालयाने वाहतुकीच्या दृष्टीने मा. डॉ.पी.एस.पसरीचा, अतिरिक्त पोली महासंचालक (प्रशासन) महाराष्ट्र मुंबई यांचा अभिप्राय घेणेबाबत निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचा अहवाल श्री इ.पी. सावंत शासकीय अभियोक्ता औरंगाबाद यांच्याकडे सादर केला आहे. सदर अहवालावर महानगरपालिकेचे काय मत आहे? याबाबत मा. उच्च न्यायालयाने विचारणा केली आहे.

मा. डॉ.पी.एस. पसरीचा यांनी क्रांतीचौक ते किलेअर्क गुलमंडी रस्त्याची पाहणी करुन अहवाल दिल आहे की, क्रांतीचौक ते किलअर्क हा सुमारे १.५ कि.मी. लांबीचा वाणिज्य-रहिवाशी वापराचा असून मध्ये वर्गीयाच्या गरजा भागविणार भाग आहे. या संपूर्ण क्षेत्रात मोठया प्रमाणावर वाहतूक निर्माण होत नाही.

कब्रस्तान/मजिद भाग वगळता क्रांतीचौक ते सिल्लेखाना चौक या मधील रस्ता १०० फूट रुंद आहे. त्यानंतर सिल्लेखान चौक ते पैठणगेट या मधील रस्ता ६० फूट रुंद इतकी असून पैठणगेट ते किलेअर्कच्या रस्त्याचे रुंदी सुमारे ३० फूट आहे. जे. की. नंतरचा भाग अरुंद आहे. त्यावरील वाहतूकही स्वयंचलित व मानव शक्तीने चालणारी अशी मिश्र वाहनांची शिवाय अतिक्रमणे, फरीवाले अनिश्चित पार्कींग इत्यादीमूळे एकेरी आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन रस्त्याच्या आवश्यक रुंदीची गणना खालीलप्रमाणे केली आहे.

०१) दोन्ही बाजूस प्रत्येकी ३.५ मीटर रुंदीचा २ पदर (टु.वे गती)

०२) मध्यातून ०१ मीटर रुंदीची मध्यगा.

०३) चोबे बाजूस ०३ मीटर रुंद फूटपाथ.

अशा प्रकारे एकूण रस्त्याची रुंदी.

(३.५+३.५+३) +१.०+ (३.५+३.५+३) २९ मीटर (७० फूट)

तेव्हा क्रांतीचौक ते सिल्लेखाना चौक यामध्ये ७० फूट पेक्षा जास्त रुंदी ठेवण्यात काही हसिल नाही. तसेच कदीम मजीदच्या समोर वाहनांना थांबविण्यासाठी मज्जाव करण्यात यावा. पार्कींगच्या खुणाचे कोणतेही फलक ठळकपणे दिसता काम नये. कदीम मजीद व्यवस्थापनाला त्यांचे व्यासाचे क्षेत्र की, भरपूर उपलब्ध आहे. त्या ठिकाणी अंतर्गत वाहन तळासाठी पुरेशी जागा (२०० चौ.मी.) पुरविण्यासाठी निर्देश देण्यात यावेत. ज्यामुळे कब्रस्तान/मजीदकडे येणाऱ्या लोकांना रस्त्यावरील रहदारीस अडथळा होणार नाही. वाहतुकीच्या दृष्टीकोनातुर क्रांतीचौक ते किलेअर्क २१ मीटर (७० फुट) रुंद असावा. असे मत/अभिप्राय मा. डॉ.पी.एस.पसरीचा यांनी दिला असून त्यांच्या अहवालीचा इंग्रजी प्रत तसेच मराठी अनुवाद प्रत देण्यात येत आहे. कृपया अवलोकन व्हावे.

तरी मा. सर्वसाधारण सभेस विनंती करण्यात येते की, मा. डॉ.पी.एस. पसरीचा यांच्या उपरोक्त अहवालाबाबत सभागृहाचे मत व अभिप्राय देण्यात यावा. म्हणजे उक्त बाब मा. उच्च न्यायालयात सादर करता येईल.

**संवाद**

श्री किशनचंद तनवाणी : या संबंधी न्यायालयात प्रकरण चालू आहे. प्रस्ताव मा. आयुक्तांनी ठेवली की, मा. न्यायालयाने मत मागितले म्हणून ठेवण्यात आला. यासंबंधी मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री नंदकुमार घोडेले : ज्या प्रकरणांत प्रकरण न्यायप्रविष्ठ असेल तर त्यावर चर्चा करता येत नाही, असे विधी सल्लागार यांनी सभागृहात सांगितलेले प्रकरण विचारार्थ ठेवले करता येते का?

विधी सल्लागार : या विषया संदर्भात मा. उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यास प्रश्न विचारण्यासंबंधी प्रतिबंध केलेले आहे. परंतु जे मा. उच्च न्यायालयाने निर्देशित केलेले आहे की, या प्रकरणी डॉ. पसरिचा यांचा रिपोर्ट आहे. त्या संदर्भात महानगरपालिकेचे काय मत आहे. ते मत घेण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री तकीहसन खान : या रस्त्याच्या संदर्भात शासनाने अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. पसरिचा यांचा अभिप्राय मागविला त्यांनी त्याचा अभिप्राय न्यायालयात सादर केला. त्यानंतर यावर महापालिकेचे काय म्हणणे आहे. खुलासा मागविला

डॉ. पी. एस.पसरीचा यांना वाहतुकीच्या संदर्भात चांगला अभ्यास आहे. तज्ञ आहेत. भारताच्या वरीष्ठ पातळीवर अधिकारी म्हणून त्यांची निवड झालेली आहे. रसता वाहतुक संदर्भात योग्य असा अभिप्राय ते देऊ शकतात. वाहतुकीसाठी जो रस्ता सद्यस्थितीत उपलब्ध होऊ शकेल, त्या ठिकाणी ७० फुट रस्ता असावा असे दिले आहे. रस्ता हा सर्व ठिकाणी एक सारखा असणे असे दिले आहे रस्ता हा सर्व ठिकाणी एक सारखा असणे जरुरी आहे. परंतु अहवालात त्यांनी दिले की, या संपूर्ण मार्गामध्ये वाहतुकीचे प्रमाण फार मोठे नाही वर्ष २००२ व माझ्या भेटीच्या आदल्या दिवशीची वाहतुकीची करण्यात आलेल्या मोजमापावरुन येथील वाहतूक १+१ पदरी चालू शकते असे दिसते. जे सिंगल ट्रक आजच होणे आवश्यक होते. क्रांतीचौक ते किलेअर्क पर्यंत काही ठिकाणी ६० फूट १०० फूट ७० फूटाचा असा रस्ता आहे. आज मोठा रस्ता आहे. भविष्या तो लहान नको. ७० फुटाचा रस्ता व किलेअर्क पर्यंत रस्ता असावा असे डॉं. पसरिचा यांना वाटते. या रस्तयावर कुठेही पार्कीगसाठी जागा नाही. म्हणून जेथे ७० फूट आहे तेथे ७० फूटच राहू दयावे व ज्या ठिकणी १०० फूट आहे तेथे पार्कीगसाठी जागा घेवू शकेल. ३० फूट जागा पार्कीगसाठी राहू शकते. त्यामूळे कमी जास्त रस्ता होण्याची आवश्यकता पडत नाही. आजही डॉ. पसरीचा हे मुंबईच्या ट्रफीकचे काम पाहतात. जेव्हा काही बाबींच्या संदर्भात निर्णय होत नाही. जनमत घेत नाही. त्यावेळी अनुभवी व्यक्तीचा सल्ला/अभिप्राय घेतला जातो. त्यांचे इतका अनुभवी व्यक्ती पूर्ण भारतामध्ये नाही. आशिया खंडात दोन तीन व्यक्ती आहेत. अनुभवी व्यक्ती जेव्हा अभिप्राय देतात. त्यास मान्य करणे योग्य होईल. या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने सांगितल्यावरुन त्यानी मत दिले. हात जोडून विनंती करण्यात येते की, शहरातील लोक तर्क वितर्क करतात. महानगरपालिकेचे वातावरण गढुळ करतात, जो रिपोर्ट सादर झालेले आहे. त्यास मानयता दिल्यास या शहराच्या दृष्टीने महत्वाची बाब अशी की, शहराची शांतता, कायदा व सुव्यवस्था राखले जाईल. न्यायालयाने मत मागविलेले आहे. प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे. सभागृहाचे मत आवश्यक आहे. जो निर्णय घ्यायचा तो योग्य द्यावा. कुणाचयाही बोलण्यास बळी पडु नये. जेणे करुन या महानगरपालिकेची बदनामी होईल. यापूर्वी सुध्दा एक अहवाल सभागृहापूढे आलेला होता. त्यात न्यायालय जो निर्णय होईल तो या सभागृहास मान्य राहील असे म्हटले होते. या अहवालास मंजूरी यावी.

श्री जगदीश सिध्द : डॉ. पी. एस. पसरीचा यांनी या अहवालात एका ठिकाणी असे दिले की, १०० फूट रस्ता येणारी वाहतूक क्रांतीचौक कडून येणारा रस्ता ६०फूट ३० फूट रुंद इतक्या अरुंद रस्त्याला जोडणारा आहे. १०० फूट रस्त्यावरुन येणारी रहदारी ६० फूट रुंद आणि त्यानंतर ३० फूट इतक्या अरुंद अशा रस्त्याला रहदारी बाहेर वहविणे शक्य होत नाही. अशा प्रकारे वाहतुकीची गंभीर कोंडी निर्माण होते. चिकलठाणा ते क्रांतीचौक, रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक, प्रिन्ट्रॅव्हल ते क्रांतीचौक हा रस्ता १५०-१५० फूटाचे आहेत. १५० फूटाचा रस्ता ७० फूटाला जोडला जाऊ शकेला का? हा अहवाल चुकीचा असून शासनाने गफलत निर्माण केली. सन २००२ च्या डी.पी. प्लॅन नुसार आजही १०० फटाचा रस्ता आहे. संबंधित विभागास विचारणा करु शकता.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा निर्णय दिलेला आहे. न्यायालयात सर्व प्रकरण चालू असतांना महानगरपालिकेकडे पून्हा माहिती विचारणे याचा अर्थ शासनाचा या शहरातील जनतेमध्ये काही प्रकार घडविणे असे वाटते. मा. उच्च न्यायालय जो निर्णय घेईल तो आपणांस मान्य राहील. असा निर्णय घेण्यात यावा व हा प्रस्ताव नामंजूर करण्यात यावा.

श्री. स. अली सलामी : विषय का सादर करण्यात आला समजले नाही. यापूर्वीही डॉ. सैफुल्ला यांचा अहवाल सादर झालेला होता. त्यावर असा निर्णय घेण्यात आला की, जो न्यायालय निर्णय घेईल तो या सभागृहास मान्य राहील. यापूर्वी १९९७ ला सभागृहाने निर्णय घेतलेला आहे की, एन.एक्स.पी-१६ मध्ये दिले आहे. सन १९७५ विकास आरखडा सन १९९७ मध्ये दिले आहे. सन १९७५ विकास आराखडा सन १९९७ मध्ये सुधारीत मंजूर करुन पाठविलेला होता. यात धार्मीक स्थळांचा संदर्भात स्पष्ट निर्णय दिलेला होता की, तो मुद्दा या रस्ता रुदीकरणामध्ये उपस्थित होत आहे. निर्णय असा घेतलेला होता की, रस्त्याची आखणी करतांना कोणत्याही धार्मीक स्थळांना बाधा येणार नाही अशा प्रकारे आखणी करावी. यासाठी सर्व सदस्यांनी मंजूरी दिलेली होती. या प्रकरणांमध्ये महानगरपालिकेला विभागीय आयुक्त मार्फत न्यायालयाने विचारणे केली की, महापालिकेचे काय म्हणणे आहे. या संदर्भात सन १९९७ मध्ये जो सभागृहाने धार्मीक स्थळांच्या बाबतीत निर्णय घेतलेला होता. पुन्हा रस्ता व धार्मीक स्थळांच्या बाबतीत विचारणा होत असेल तर, विकास आरखडा तयार करतांना जो निर्णय सभागृहाने घेतलेला होता त्याची प्रत अधिकारी यांनी न्यायालयात दिली पाहिजे. विभागीय आयुक्तांना कळवावयास पाहिजे परंतु हे सर्व कागदपत्र बाजूला ठेवून सभागृहाच्या निर्णयाची वाट पहायची व आपण आपले निर्दोष रहायचे असे ध्येय अधिकाऱ्यांचे आहे. परंतू या प्रस्तावामध्ये आपण सर्वांनी सविस्तर बघीतले तर, डॉ. पी. एस. पसरीचा यांनी कुठे असे म्हटलेले नाही की, १०० फूटाचा रस्ता ७० फूट करावा. ७० फूट हा रस्ता वापरासाठी येणार असून फुटपाथ व दुभाजक लहान होणार चुकीचा प्रस्ताव नाही. ज्या ठिकाणी धार्मीक स्थळ येत आहे तेथे डॉ. पसरीचा यांनी असे सुचविले आहे की, २००० चौ. फुट जागा ही पार्कीगसाठी सोडावी. फुटपाथची जागा लहान व बारीक घेणार असून उर्वरीत रस्ता सुरळीत राहणार आहे. डॉ. पसरिचा यांनी जो अभिप्राय दिला तो चुकीचा नसून तो अहवाल मान्य करावा व जे १९९७ मध्ये विकास आराखडा मंजूर करतांना जो निर्णय सभागृहाने घेतलेला होता. त्यांच्या मान ठेवावा. अशी विनंती आहे. या प्रमाणेच रंगारगल्ली मध्ये मंदिराजवळ जागा सोडलेली आहे. चिकलठाणा मजिदजवळ जागा सोडलेली आहे. सुपारी हनुमान मंदीर हे सुध्दा रस्त्यात येते. त्याचा सुध्दा सन्मान आपण राखलेला आहे. त्याप्रमाणेच या मजिदचा सुध्दा सन्मान राखला पाहिजे. १९९७ मध्ये जो निर्णय घेतला त्यावर ठाम राहून या अहवालास मंजूरी दिली पाहिजे.

श्री. भगवान घडामोडे : मी या शहराचा नागरीक म्हणून बोलतो आहे. नागरीकांच्या सुध्दा अशा भावना आहे की, शहराची लोकसंख्या वाढत आहे. आर.टी.ओ. कार्यालयात चौकशी केल्या हजारोच्या संख्येने दरारोजचे वाहनाचे रजिस्ट्रेशन होत आहे. याचा अर्थ शहरातील रहदारी वाढत आहे.

क्रांतीचौकात येणारे उर्वरीत तीन रस्ते १५० फुटाचे असून हा रस्ता ७० फुटाचा करुन योग्य होणार नसून कुणीही राजकारण न करता शहराचा विकास थांबविण्याचे कार्य करणे योग्य होणार नाही. भावना दुख:वावयाच्या नाही, शहराचा विकास करण्याची गरज पडणार असून सुजान नागरीक केव्हा असेच म्हणेल की, लोकसंख्या वाढत असेल, वॉर्ड मोठा होत असेल तर, रस्ता सुध्दा मोठा असणे आवश्यक आहे. कोणत्याही भागात रस्ते रहदारी असल्यास व्यवसाय होतात. परंतू त्यासाठी रस्ता सुध्दा चांगला असणे आवश्यक आहे. आजची परिस्थिती अशी आहे की, गुलमंडी भागात जास्तीची वर्दळ असते. म्हणून नागरीक तेथे खरेदीसाठी जात नाही. कारण पार्कींगची व्यवस्था नाही. गर्दीमध्ये जाता येत नाही. म्हणून तेथे व्यवसाय सुध्दा ठप्प झालेले आहे. एका रस्त्याच्या प्रकरणांमुळे शहराचा विकास थांबवावयाचा का? खऱ्या अर्थाने राजकारण न आणता, धार्मीक बाजू समोर न ठेवता व न्यायालयाचा आदर ठेवावयाचा असेल तर, मा. सर्वोच्च न्यायालयाने डी. पी. प्लॅन प्रमाणे करा असे सांगितले. दोन दोन वेळेस दुरुस्ती झाली. त्यावेळेस सुध्दा १०० फुटाचा रस्ता असावा असे आहे. कमी जास्त रस्ता ठेवणे व एक दिवसात पाहणी करुन दिलेला अहवाल योग्य वाटत नसून येथील नागरीकांना येथील भौगोलिक परिस्थिती माहिती आहे. ते येथे राहतात. त्यांना सर्व माहिती आहे. रस्ता अरुंद करणे योग्य नाही. हा रस्ता १०० फूटाचा असावा.

श्री तकीहसनखान : संपूर्ण १.५ कि. मी. १०० फूट रस्ता होणार नाही. काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी जास्त होईल.

श्री कादीर मौलाना : हा आमचा देश आहे. या ठिकाणी लोकशाही पध्दतीने शासन व्यवस्था आहे. असा देश जगात कोठेही नाही. या देशात १८ जाती धर्माचे लोक वावरतात. सर्व जाती धर्मांची लोकांची मान मर्यादा या देशात राखली जाते. धर्माचा विचार केला जातो. आदर केला जातो. इतर देशात अशी स्थिती नाही. सर्व नागरीकांचीही जबाबदारी आहे. आमचं शहर पवित्र आहे. हिंदु/मुस्लीम यांचेत भाव बांधीलकी आहे. या सभागृहात शहरातील नागरीकांचे समस्या व त्यांना न्याय मिळविण्याच्या दृष्टीने या ठिकाणी जबाबदार असलेले सदस्य बसतात. आमचे शहर सर्व बाबतीत स्वच्छ राहावे. हिंदु/मुस्लीम व इतर समाज एकत्रितपणे वावरणे. प्रामणिकपणा प्रेम, बंधुत्व ठेवणे व ही आमची लोकशाही आहे. असे म्हटले तरी योग्य होईल. जर अशा वेळी एखादा धार्मीक स्थळाबाबत मुद्दा उपस्थित होत असेल तर ते समोपचाराने सोडवावा. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून महापालिकेचे मन विचारलेले आहे. स. स. श्री स. अली सलामी, श्री तकीहसन खान यांनी मत मांडलेले आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक जे आशीया खंडात रस्ता वाहतुकीच्या संदर्भात त्यांचा अभ्यास व अनुभव मोठा असून त्यांना अहवाल देण्याबाबत नियुक्ती केल्यानुसार त्यांनी त्याचा अहवाल सादर केलेला आहे. त्यावर महपालिकेचे या बाबतीत काय म्हणणे आहे. विचारणा केलेली आहे.

क्रांतीचौकापासून १०० फूटाचा रस्ता मजीदजवळ ७० फुट आहे. शहराचा विकास होण्याबाबतची भाषा मी बोलत नाही. परंतू शहरात अशा प्रकारचे किती रस्ते आहे की, काही ठिकाणी जास्त फुटाचे रस्ते आहेत.

त्यात महापालिका ते सिडको ऑफीस, मोंढा ते जिल्हाधिकारी कार्यालय, गुलमंडी ते रंगारगल्ली पुढे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या या रस्त्याला मिळणारा रस्ता या रस्त्याच्या विकास थांबलेला आहे. एक मुद्दा नाही. जो रस्ता ७० फूट होता. यात नुकसान काहीही नाही. अहवालामध्ये दिले आहे की, आज १+१ पदरी चालवू शकतो. भविष्यात गरज भागविण्यासाठी २+२ पदरी वाहतूक पुरेशी आहे. आजची परिस्थिती अशी आहे की, १+१ पदरी चालू शकते. डॉ. पसरीचा यांनी पूर्ण दिवस उभे राहून योग्य तो निकष लावून अहवाल तयार केलेला आहे. जो अहवाल आलेला आहे. तो योग्य असून त्यास मंजूरी दयावी व आलेला निर्णय न्यायालयासमोर सादर करावा.

श्री प्रकाश निकाळजे : प्रकरण न्यायालयात चालू आहे. आपले मत विचारले की प्रशासनाचे?

श्री अविनाश कुमावत : रस्त्याचा विकास करावयाचा होता म्हणून दुध डेअरीच्या बाजुच्या रस्त्या संतोषी मातेचे मंदीर येत होते. आम्ही स्वत: ते मंदीर रस्त्याच्या बाजूला केले. ही घटना १९२२ या वर्षी झाली. त्यापैकी स. स. श्री तकीहसनखान हे सुध्दा या सभागृहाचे सदस्य होते. त्यांना माहित आहे. त्यावेळी सभागृहात चर्चा झाली. महापौर यांनी स्वत:हून सांगितले की, मंदीर बाजूला घ्यावे. त्यावेळी मी विरोधी पक्षाचा होतो. तेथील नागरीकांना समजाविले. न्यायालयात जावू दिले नाही.

श्री तकीहसन खान : अतिक्रमण होत असेल ते वेगळे आहे.

श्री नासेरखान कुरेशी : याच रस्त्यामध्ये दर्गा येत होती. ती आम्ही आमच्या हांतानी बाजूला केलेली होती. या शहरचा विकास थांबविण्यात प्रश्न येत नाही. या ठिकाणी धार्मीक बाबींचा प्रश्न निर्माण झालेला आहे. क्रांतीचौक येथील दर्गा आमच्या हाताने काढली. रॉक्सी कॉर्नर येथील दर्गा शहराच्या विकासासाठी हटविण्यात आलेली आहे. मी स्वत: तेथे हजर होतो. या सभागृहात माझ्या पेक्षा जास्त ज्येष्ठ सदस्य आहेत. आपआपले मत मांडावे जो अहवाल आला त्यावर न्यायालयाने मत मागविले आहे. या पुर्वीही सैफुल्ला यांचा अहवाल प्राप्त झालेला होता. जो न्यायालयाचा निर्णय घेईल तो मान्य राहील असा निर्णय घेतलेला होता. या सभागृहातील सर्व धर्माचे सदस्य बसलेले आहे. विनंती की, एकमताने मंजूरीचा निर्णय घ्यावा. भाऊ बांधीलकी ठेवण्यात यावी.

श्री सुरजिसिंग खुंगर : या संदर्भात खूप दिवसापासून प्रकरण चालू आहे. वृत्तपत्रात अनेक वेळा बातम्या छापून आल्या. न्यायालयात केस चालू आहे. शहरात बऱ्याच ठिकाणी असे दिसून येईल की, रस्ते लहान झालेले आहे. या शहरात बऱ्याच दिवसापासून शांती समृध्दीचा मार्ग जनतेने अवलंबविला आहे. कोणाचाही त्रास देण्याचा व धार्मीक भावना दुखावण्याची भावना नाही. दंगे हाणामारी झाली नाही. सर्व शांतता दिसून येत आहे. कसलाही निर्णय घ्यायचा व त्यात राजकारण आणू नये. या सभागृहात सर्व सदस्य जबाबदार आहे. योग्य निर्णय घेणे अपेक्षीत आहे. या संबंधित न्यायालयात संपूर्ण चर्चा झालेली आहे. जे वकील आहे. त्यांनी सर्व न्यायालयात निर्देशनास आणून दिलेल आहे. या ठिकाणी ७० फूटाचा रस्ता दाखविलेला आहे. हरकत नाही. ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. याबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. शासन सुध्दा निर्णय घेवू शकत नाही. इतका हक्क या

सभागृहाला आहे. कोणतेही राजकारण न होता एकमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री प्रशांत देसरडा : बऱ्याच वेळेपासून चर्चा होते. हा रस्ता किती फुटाचा असावा. १०० फुट की, ८० फुट करायचे का? रस्ता वाहतुकीच्या संदर्भात अनुभवी व्यक्ती डॉ. पी. एस. पसरीचा यांची नियुक्ती केलेली होती. त्याचा अहवाल सादर झालेले आहे. हे वाचण्याअगोदर एखादा कोणताही सुजान एक्सपर्ट राहीला असता तर भविष्यात हा रस्ता १०० फुटाऐवजी १२० फुटाचाही करावा लागणार आहे, असे मत दिले असते. चुक होत नाही. असा कोणीही माणुस नाही. भेदभावाची भावना होवू नये किंवा कोणाच्या दबावाखाली चुकीचे मत दिले असावे. असे माझे मत आहे, नगररचना व इतर विभागाचे अधिकारी यांना या रस्त्याचा बाबतीत मार्ग काढण्याचे काहीच समजलेले नाही. यांना एकटयालाच कळाले. यामुळे शंका निर्माण होते. रद्द करावा. भविष्यात १२० फूट करता येत असेल तर करावा.

श्री तकीहसन खान : चूकीचा अहवाल दिला असे म्हणणे योग्य नाही. शासन स्तरावर त्यांची या बाबतीत अनुभवी व्यक्ती म्हणून नियुक्ती आहे. राज्य सरकार व केंद्र सरकार यांनी तज्ञ म्हणून नियुक्त केले ते चूकीचे आहे का?

श्री अफसरखान : बऱ्याच वेळेपासून या विषयावर चर्चा चालू आहे. त्याला चर्चेचा विषय न बनविता आताच स. स. श्री सलामी यांनी सांगितले की, १९९७ ला जो निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. त्यानुसारच संबंधित अधिकारी यांनी न्यायालयात माहिती सादर करावयास पाहिजे हेती, कोणताही विकास थांबविण्याचा प्रयत्न येथे होत नाही. क्रांती चौक रस्त्यावरील कब्रस्तान काढण्यात आले. कुणीही विकास होण्यास थांबविलेले नाही. दर्गाही हटविली परंतू हे अल्लाचे घर आहे. इबादत गाह आहे. आपण सर्वांनी भावनांचा आदर करावा. मंदिर असल्यास आम्हीही त्याचा आदर करु यात शंका नाही. जसे डि.पी. प्लॅन जालना रोड १३० फुट ऐवजी १०० फुट झालेला आहे. तसेच रेल्वेस्टेशन ते दिल्लीगेट हा रस्ता १२० फुटाच्या विकास आरखडयानुसार आहे. त्यास काही ठिकाणी १०० फुट करण्यात आलेले आहे. तसेच गुलमंडी ते रंगारगल्ली रस्ता सुध्दा कमी करुन दुरुस्ती करुन विकास केलेला आहे. सर्व धर्माचा आदर केलेला आहे. ज्या ठिकाणी धार्मीक भावना दुखावल्या जाऊ शकतात. त्या ठिकाणी रस्ते अरुंद झालेले आहे. डॉ. पसरीचा यांनी जो अहवाल दिला तो योग्य आहे. ७० फुटाचा जो रस्ता त्यांनी दाखविला तो योग्य असून, या रस्त्यावर कोणतीही जास्त प्रमाणात वाहतूक नाही हे सर्व नागरीक सदस्य यांना माहिती आहे. या प्रस्तावास मान्यता देवून आम नागरिकांना न्यायालयात असे दाखवावे की, हे सभागृहात सर्व सदस्य एकत्रीत येतात. भावनांचा विचार करतात. योग्य तो निर्णय घेतात. अशी सभागृहास विनंती आहे सन १९९७ जो सभागृहाने मजीद, मंदिर, चर्च याच्यामध्ये येत असेल तर त्यास न हटविता विकास करावा. निर्णय घेतला आहे. पुन्हा एकदा कळकळीची विनंती की, हा अहवाल एकमताने मान्य करावा.

श्री पांडुरंग तायडे : या शहरामध्ये सर्व जाती धर्माचे लोक राहतात. सर्व समाजाचे सदस्य या सभागृहात आहे. आज मजीदाचा प्रश्न उपस्थित झाला भविष्यात डी.पी.प्लॅन मध्ये मंदिर सुध्दा येऊ शकेल इतरही धार्मीक स्थळ येऊ

शकतात. राजकारण न करता कोणत्याही धर्माचा देव हा एकच असतो. राजकीय स्वरुप देणे चूकीचे आहे. धार्मीक भावना दुखविणे बरोबर नाही. सभागृहाच्या भावना लक्षात घेवून हा ठराव पास करावा. सर्व सदस्य एकत्र आहे. सर्वांचे मत सारखे आहे. सभागृहात राजकारण होत नाही हे जनतेपर्यंत जाऊ दयावे. सर्व राष्ट्रप्रेमी मुस्लीम बांधव आहे. त्याबद्दल मा. बाळासाहेब ठाकरे यांचा देखील विरोध नाही. प्रस्ताव मंजूर करावा.

श्री काशीनाथ कोकाटे : अत्यंत संयमाने विचारपूर्वक चर्चा चालू आहू. त्याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले पाहिजे. सन १९७५ मध्ये नगरपालिका असतांना शहराचा विकास आरखडा तयार आला. वेळोवेळी शहराती रहिवाश्यांचा व समस्यांचा विचार करुन विकास आराखडयामध्ये बदल केलेला आहे. सन १९९७ मध्ये समिती स्थापन झाली होती. विकास आरखडयामध्ये अनेक बदल समितीने दाखविलेले आहे. मुल विकास आराखडयामध्ये बदल केला नाही. असे म्हणता येणार नाही. रेल्वेस्टेशन ते हर्सुल टी-पॉईट यात सुध्दा बदल केलेला आहे. तसेच पंचायत समिती ते शहागंज ते सेंट फ्रांसीस जालना रोड यामध्ये देखील बदल केलेला आहे. सर्वसाधारण सभेने विकास आराखडयात बदल करण्याचा अधिकार आहे. विधायक कामासाठी हक्क वापरला जात असेल तर तेव्हा हा दृष्टीकोन समोर ठेवला पाहिजे. तयानुसार या अहवालावर सद्सद्विवेकबुध्दीने अहवालावर चर्चा करुन निर्णय घ्यावयास पाहिजे. क्रांतीचौक १०० फुट असतांना दुरुस्ती आली असेल तर विचार व्हावा. धार्मीक स्थळाला कोणतीही बाधा येणार नाही व विकास करावा असा निर्णय सन १९९७ झालेला असेल तर पुन्हा प्रस्ताव सादर करणे योग्य नाही. माझ्या माहिती प्रमाणे अशाच प्रकारचा प्रस्ताव सन २००१ मध्ये डॉ. भागवत कराड हे महापौर असतांना सर्वसाधारण सभेचे मत विचारले होते. ते ठेवण्यात आले नाही. सर्वसाधारण सभेत ठेवण्याची आवश्यकता नसेल तर आणण्याची गरजा नाही. यात कुणाच्या धार्मीक भावना दुखावल्या जावू नये. इतर रस्त्यांच्या बाबतीत जे धोरण महापालिकेने अवलंबिलेले आहे. तेच धोरणाचा सदस्यांसाठी अवलंबावे. १०० फुटाचा रस्ता ८० फुटाचा ९० फुट करण्याचे या सभागृहाचा अधिकार असतांना कुणावर ही अन्याय होता कामा नये. वेगळे काही करुन दाखविल्या जाते. हे दाखविण्याची गरज नाही. या एकाच रस्त्याचा विषय निर्माण होत नाही. शहरात अनेक रस्ते आहे की, जसे क्रांतीचौक ते किलेअर्क असे किती रस्ते आहे. त्यावर सुध्दा विचार करण्याची वेळ येणार आहे. आजच्या निर्णय घेणार आहेत. तो सर्व ठिकाणी अवलंबविला जाणार आहे. सन १९९७ मध्ये जी अंमजबजावणी करण्यात आली. ते प्रशासनाने न्यायालयास कळविले पाहिजे. सर्वांचे मत वेगवेगळे मांडलेले आहे. रहदारीस अडथळा होत नसेल व सर्वांना सोबत घेऊन जायचे असेल व क्रांतीचौक ते किलेअर्क या रस्त्याचा यापूर्वी जो काही भाग कमीकरुन रस्ता लहान असेल त्याप्रमाणे या अहवाल दिल्यानुसार सुध्दा मंजूर करावा. अशी माझी मागणी आहे.

श्री भगवान रगडे : या अहवालात असे दिले की, क्रांती चौक ते सिल्लेखान पर्यंत ७० फुट रस्ता ठेवले तरी, वाहतुक व्यवस्था सगळी बरोबर आहे. काही ठिकाणी कमी काही ठिकाणी जास्त चर्चा करण्याची गरजा नाही. ज्या पध्द्तीने ठराव आलेला आहे.

श्री आनंद तांदुळवाडीकर : गंभीर विषय आहे. मा. आयुक्त हे सुध्दा सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांना विनंती की, त्यांनी त्यांचे मत मांडावे.

मा. आयुक्त : मा. न्यायालयाने सर्वसाधारण सभेचे मत मागितलेले आहे. माझे मत मागितले असते तर, मी परस्पर पाठविले असते. येथे आले नसते.

श्री राधाकृष्ण गायकवाड : १०० फुट व्हावा किंवा ७० फुट व्हावा. यावर ०२ तासापासून चर्चा चालू आहे. सभागृहाचे वातावरण चांगले आहे. शांत आहे. सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले आहे. डॉ. पसरीचा हे ट्रफीकच्या संदर्भात अनुभवी आहे. मान्य आहे. परंतू जेव्हा झाले किती वेळ राहिले एक तास थांबवून पूर्ण शहराचा अभ्यास होवू शकतो का, हा माझा प्रश्न आहे. डेव्हलपमेंट प्लॅन आहे तो कुणी एका व्यक्तीने केलेला नसून जे कुणी तज्ञ आहे. त्यांनी तो केलेला आहे. दिनांक ०६-०१-१९७५ व १९९५ ला या शहराचा जेव्हा विकास आराखडा झाला त्यात क्रांतीचौक ते पैठणगेट हा रस्ता १०० फुटाचा असावा. अशी शासानाने सुध्दा मान्यता दिलेली आहे. तसेच मा. उच्चन्यालयाने देखील मा. सर्वोच्च न्यायालयाची या बाबतीत दखल घेतलेली आहे व १९७५ च्या विकास आराखडयानुसार हा रस्ता व्हावा असे कळविले आहे. त्या प्रमाणेच कार्यवाही व्हावी असेही आहे. सन १९७५ च्या आराखडयानुसार मा. उच्च न्यायालयाने दि. २०-०४-२००० आदेशानुसार हा रस्ता रुंदीकरण व्हावे असे कळविलेले आहे. त्यानुसार प्रशासनाने रस्त्यांच्या पुर्वेकडील मालमत्ता संपादीत केलेली आहे. व अहवालानुसार ७० फुटाचा रस्ता केल्यास त्या व्यक्तींना बसविणार आहात का. त्या लोकांवर अन्याय होणार नाही का. हा प्रश्न आहे. शासनाने रु. १.७७ कोटी खर्च करुन मजिदच्या पाठीमागच्या बाजून रस्ता काढावा. असा निर्णय जो घेतलेला आहे. तो सर्वसामान्य नागरिकांच्या नजेरत धुळ फेकण्यासारखा आहे. डॉ. पसरीचा यांनी मत दिले. त्याप्रमाणे डॉ. झकेरीया यांनी सुध्दा मत दिलेले होते. त्याच प्रमणे या मराठवाडयाचे भाग्यविधाते नेते ज्यांना सर्वलोक मानतात. असे स्व. गोविंदभाई श्राफ यांनी सुध्दा सांगितले होते की, त्या ठिकाणी मजिद नव्हती. हात धुण्यासाठी जागा होती. म्हणून मजिदचा प्रश्न समोर करुन जो निर्णय घेतला तो. मा. सुप्रमि कोर्टाने घेतलेला आहे की, १०० फुटाचा रस्ता असावा. त्यामुळे इतर लोकांचे मत घेण्याचे कारण नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून हा रस्ता १०० फुटाचाच असावा असे माझे मत आहे. डॉ. पसरीचा यांचा अहवालाचा विचार न करता १०० फुट व्हावे.

श्री नासेरखान सरदारखान : बाबा पेट्रोलपंप पासून जालना रोड हा रस्ता १३० फुटाचा असतांना सुध्दा १०० फुट करण्यात आलेले आहे.

मा. महापौर : या विषयावर दोन तासांपासून चर्चा चालू आहे. डी.पी. प्लॅननुसार हा रस्ता १०० फुट रुंद असावा. हा ठराव रद्द करण्यात येत असून, डॉ. पसरीचा याचा अहवाल रद्द करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १४९/७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. पी. एस. पसरीचा यांनी दिलेले अहवाल नामंजूर करुन ठराव रद्द करण्यास मंजूर देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**

**दिनांक १९०९-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील**
**प्रश्नोत्तरे**

श्री संजय शिरसाठ, नगरसेवक
(प्राप्त दि. १६-०८-२००३)

**प्रश्न क्र. १६६ :** महानगरपालिका अस्थापनेवर कार्यरत असलेल्या एकूण किती अधिकारी व कमचाऱ्यांविरुध्द महानगरपालिके अंतर्गत खाते निहाय चौकशी चालू आहे. अशा कोणकोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी चालू आहे. अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या खातेनिहाय चौकशी केव्हा पासून चालू आहे. अशा एकूण किती व कोणकोणत्या अधिकारी तथा कर्मचाऱ्यांचे अंतिम सविस्तर चौकशी अहवाल प्रशासनास प्राप्त झाले आहे. असे एकूण किती कोणकोणते अधिकारी व कर्मचाऱ्यांचे चौकशी अहवाल चौकशी अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे. प्राप्त झालेल्या चौकशी अहवालांवर प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे काय? असल्यास अशी कोणती कार्यवाही करण्यात आली.

अधिकारी व कर्मचाऱ्यांचे खात निहाय चौकशीचा कालावधी किती असतो. खातेनिहाय चौकशी पूर्ण झाल्यानंतर अशी प्रकरणे शासनाकडे पूढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली आहेत काय? पाठविण्यात आलेली असल्यास अशा कोणकाणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रकरणे पूढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविली.

महानगरपालिकेच्या एकूण किती व कोणत्याकोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशीची प्रकरणे सद्या प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे केव्हा पासून प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे प्रलंबित ठेवण्याची कारणे कोणती. प्रलंबित खातेनिहाय चौकशी प्रकरणांवर पूढील कार्यवाही केव्हा व कोणत्या पध्द्तीने करणार आहात? याबाबत विहीत आकडेवारीसह सविस्तर महिती आपले अभिप्रायासह सभागृहात सादर करण्यात यावी.

उपआयुक्त (प्र.)

**उत्तर क्र. १६६ :** सदरील प्रश्नाचे उत्तर सोबत जोडण्यात आलेले आहे.

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**
**मनपा अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द प्रस्तावित खातेनिहाय चौकशीबाबत महिती दर्शविणार तक्ता. ०३-०९-०३ ची स्थिती**

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | निलंबनाची तारीख | खाते चौकशीचे कारण | प्रकरणांची सद्यस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| ०१ | सर्वश्री एम.ए.साजेद | नाका लिपीक | २९-०८-९५ | जकात आर्थिक व्यवहार | संबंधितांच्या खाते चौकशी अधिकारी म्हणून श्री. आय. टी गायकवाड शहर अभियंता (सध्या निवृत्त) यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने संबंधितास सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करण्यात आला होता. तथापी स्थायी समितीने त्यात कामावर घेण्याचा ठराव पारीत केला. तो ठराव खंडीत करण्यासाठी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | शासनास पत्र देण्यात आले असून, प्रकरणी शासनाची पत्रव्यहार चालू आहे. |
| ०२ | बी. के. रगडे | वरीष्ठ लिपीक (सेवानिवृत्त) | ३१-०५-२००० | मालमत्ता विभागातील आर्थिक व्यवहार | प्रकरणी श्री एस. डी. पानझ ाडे तत्काली उपअभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव स्थायी समोर सादर करण्यात आला होता. तथापी रगडे यांनी त्यास कामावर घेण्यासंबंधाने सादर केलेल्या रिट याचिका क्र. ३६३ मध्ये झालेल्या आदेशाप्रमाणे श्री रगडे यास कामांवर रुजू करुन घेण्यात पारीत केलेलया ठरावाच्या अनुषंगाने प्रकरण कार्यवाही अंतर्गत आहे. |
| ०३ | के. आर. कुलकर्णी | शाखा अभियंता | १९-०५-२००० | कामात निष्काळजीपणा | प्रकरणी उपआयुक्त (महसूल) यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचेकडून चौकशी अहवाल अदयाप प्राप्त झालेले नाही. त्याची विभागीय चौकशी निष्कर्षाच्या अधिन राहून संबंधितास कामावर रुजू घेण्यात आले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | एस. पी. खन्ना | उप अभियंता | फक्त खाते चौकशी | बांधकाम परवानगीतील निष्काळजी पणा | प्रकरणी चौकशी अधिकारी म्हणून मुख्य लेखाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तथापी चौकशी अहवाल सादर करण्यासाठी पत्र देण्यात आलेली आहेत. |
| ०५ | डी. जी. कालेले | शाखा अभियंता | -//- | -//- | -//- |
| ०६ | खाजा वहाजोद्दीन | रेखापाल-क. लिपीक | ३१-१-२००१ | वि. क्र. ३ आर्थीक गैरव्यवहार | प्रकरणी चौकशी अधिकारी म्हणून श्री सी. एस. यांनी शहर अभियंता यांनी नियुक्ती करण्यात आली होती. चौकशी अहवाल प्राप्त त्यानुसार संबंधिता विरुध्द पो. स्टे मध्ये तक्रार नोंदविण्यात आलेली असून अपहारीत रक्कमेचा भरणा करण्यासाठी अन्यथा बडतर्फीचा कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असे संबंधितास कळविण्यात आलेले असून, पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे. |
| ०७ | एल. टी. कोल्हे | विभागिय अधिकारी (सेवा निवृत्त) | फक्त खाते चौकशी | -//- | प्रकरणी श्री. सी. एस सोनी शहर अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला असून, प्रकरण कार्यवाही अंतर्गत. |
| ०८ | मो. रफीक | वाहनचालक | -//- | बेशिस्त वर्तन | प्रकरणी श्री सय्यद सिंकदर अली, उपअभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. चौकशी अहवाल प्राप्त झाला असून, त्यानुसार चौकशी अहवाल निर्णयास्तव सादर करण्यात आलेला आहे. प्रकरण कार्यवाहीस्तव. |
| ०९ | डी. पी. कुलकर्णी | तत्कालीन उप अभियंता (सध्या कार्यकारी अभियंता) | फक्त खाते चौकशी | समुह गृह विकास योजना अंतर्गत दिलेल्या बांधकाम परवानगी | प्रकरणी श्री. सी. एस. सोनी, शहर अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यांचेकडून प्राप्त झालेला चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला असून, प्रकरण कार्यवाही अंतर्गत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | एस. पी. खन्ना | उपअभियंता | फक्त खाते चौकशी | समूहगृह विकास योजना अंतर्गत दिलेल्या बांधकाम परवानगी | प्रकरणी श्री. सी. एस. सोनी, शहर अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यांचेकडून प्राप्त झालेला चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला असून, प्रकरण कार्यवाही अंतर्गत. |
| ११ | एस. एल. पवार | शाखा अभियंता | -//- | -//- | -//- |
| १२ | एस. एस. कुलकर्णी | शाखा अभियंता | -//- | -//- | -//- |
| १३ | एस. एन. उमाळकर | शाखा अभियंता | -//- | -//- | -//- |
| १४ | डी. डी. कालेले | शाखा अभियंता | -//- | -//- | -//- |
| १५ | डी. आशा सोळुंके | सदशिक्षक | २६-२-२००२ | गैरवर्तवणुक | प्रकरणी श्री. संजयपवार लेखाधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. चौकशी अहवाल प्राप्त झाल असून, त्या अनुषंगाने कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. |
| १६ | डॉ. डी. एस. देशपांडे | आ. वै. अ. (सेवानिवृत्त) | फक्त खाते चौकशी | औषध खरेदीतील गैरव्यवहार वैदयकिय अधिकारी यांच्या नियुक्ती बाबत. | प्रकरणात सेवानिवृत्त न्यायाधिश श्री. एस. एस. निरखी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून, दि. २१-६-२००३ च्या आदेशान्वये चौकशी पूर्ण करण्याकरीता ३ महिने इतकी मुदतवाढ देण्यात आलेली असून, या मुदतीत चौकशीचा कार्यवाही पूर्ण करुन चौकशी अहवाल मा. आयुक्तांनकडे सादर करण्यासाठी दि. १-९-२००३ च्या पत्रान्वये त्यांना कळविण्यात आलेल आहे. |
| १७ | श्रीमती मुमताज फातेना | सहशिक्षिका | -//- | कार्यालयीन शिस्तीचा भंग | प्रकरणी श्री. विजय जावरे. प्रकल्प संचालक, यांची दि. ११-२-२००३ रोजी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून, चौकशी कामी प्रकरणाची मुल संचिका त्यांचेकडे दि. १८-२-२००३ रोजी पाठविण्यात आलेली असून चौकशी अहवाल मा. आयुक्ताकडे सादर करण्यासाठीही कळविण्यात आलेले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | सर्वश्री श्री डी. एन. साळवे | कनीष्ठ लिपीक | -//- | रु. ३७,२८४/- चा उशिराने भरणा | प्रकरणी श्री विजय जावरे प्रकल्प संचालक यांनी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झालेला असून, त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. |
| १९ | सय्यद कय्युम | स्वच्छता निरिक्षक | २१-२-२००३ | विनापरवानगी जळ कनेक्शन बाबत. | प्रकरणी श्री. डी. रा. गिरी मालमत्ता अधिकारी यांची २२-५-२००३ रोजी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून, चौकशी अहवाल मा. आयुक्तांकडे सादर करण्सासाठीही कळविण्यात आलेले आहे. |
| २० | बी. राम. अंभोरे | तत्कालीन रेखापाल | २१-२-२००३ | धनादेशात खाडाखोड | संबंधितास निलंबित करण्यात आले होते, तथापी चौकशी निष्कर्षास अधिन राहून कामावर रुजू करून घेण्यात आलेले आहेत. प्रकरणी श्री संजय पवार लेखाधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून चौकशी अहवाल आयुक्ताकडे सादर करण्यासाठी कळविण्यात आलेले आहे. |
| २१ | के. एन. जाधव | कनीष्ठ लिपीक | फक्त खाते चौकशी | बनावट मृत्यू प्रमाणपत्राच्या सत्यप्रती दिल्याबाबत | प्रकरणी संबंधिताच्या खाते चौकशी श्री टी. जी. जाधव विभागीय अधिकारी/१ यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून, (२२-५-२००३) चौकशी अहवाल मा. आयुक्ताकडे सादर करण्यासाठी कळविण्यात आलेले आहेत. |
| २२ | आय. टी. गायकवाड | शहर अभियंता (सेवानिवृत्त) | -//- | ज्यूवेल डेस्क खरेदी मधील अनियमत्ता | प्रकरणी श्री. अण्णासाहेब शिंदे उपआयुक्त (महसूल) यांची दिनांक २३-७-२००३ रोजी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून, प्रकरणांची मुळ संचिका चौकशी कामी त्यांचेकडे ३१-७-२००३ रोजी पाठविण्यात आलेली आहे व चौकशी अहवाल मा. आयुक्ताकडे सादर करण्यासाठीही कळविण्यात आलेले आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | डी. व्ही. जोशी | कनिष्ठ लिपीक | -//- | -//- | -//- |
| २४ | एस. ई. काळे | कनिष्ठ लिपीक | -//- | -//- | -//- |
| २५ | व्हि. के. काळे | कनिष्ठ लिपीक | -//- | -//- | -//- |

स्वाक्षरित/-
उपआयुक्त (प्र)
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रश्न क्र. १६७ :** मा. श्री जयवंत ओक, नगरसेवक
(प्राप्त दि. १८-०८-२००३)
शहराच्या मुळ विकास आराखडयात महापालिकेने खालील बाबींवर किती आरक्षण ठेवले? त्यांत सुधारीत आरखडयांत काय बदल करण्यात आले? त्यांत कोणतया बाबी वगळण्यात आल्या? आज रोजी सदर आरखडयाची काय अवस्था आहे? महापालिकेने सदर आराखडयातील किती कामे विकसीत केली?

| अ.क्र | विवरण | मुळ आराखडा (संख्या) | सुधारीत आराखडा (संख्या) | आजची स्थिती (संख्या) | शेरा विकसीत झालेले |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | | | | |
| २ | दुकाने व केंद्र | | | | |
| ३ | खुली जागा | | | | |
| ४ | आरोग्य केंद्र | | | | |
| ५ | पार्क | | | | |
| ६ | गार्डन | | | | |
| ७ | स्माशनभुमी | | | | |
| ८ | कम्युनिटी सेंटर | | | | |
| ९ | धोबीघाट | | | | |
| १० | पाण्याच्या टाक्या | | | | |
| ११ | भाजी मार्केट | | | | |
| १२ | वाचनालय | | | | |
| १३ | माध्यमिक शाळा | | | | |
| १४ | स्टेडीयम | | | | |
| १५ | मटन मार्केट | | | | |
| १६ | पोहण्याचा तलात | | | | |
| १७ | पार्कींग | | | | |

**सहाय्यक संचालक नगररचना**
**उत्तर क्र. १६७ :**

**मुळ विकास योजना व सुधारीत विकास योजना आरक्षणाबाबत तपशील**

| अ.क्र | विवरण | मुळ आराखडा (संख्या) | सुधारीत आराखडा (संख्या) | आजची स्थिती (संख्या) | शेरा विकसीत झालेले |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शाळा व क्रिडागण (खेळाचे मैदान) | ५२ | १२० | १२० | १३ |
| २ | दुकाने व केंद्र | १३ | २४ | २४ | ०४ |
| ३ | खुली जागा | ४५ | -- | -- | -- |
| ४ | आरोग्य केंद्र | १५ | १२ | १२ | ०२ |
| ५ | पार्क | | उदयान/पार्क/खुलीजागा | | |
| ६ | गार्डन | २० | ६५ | ६५ | ०९ |
| ७ | स्मशानभुमी | ०३ | ०३ | ०३ | ०२ |
| ८ | कम्युनिटी सेंटर | ०४ | ०५ | ०५ | ०२ |
| ९ | धोणीघाट | ०३ | ०१ | ०१ | ०१ |
| १० | पाण्याच्या टाक्या (जलकुंभ) | ०१ | ०१ | -- | -- |
| ११ | भाजी मार्केट | ०४ | ०८ | ०८ | ०२ |
| १२ | वाचनालय | ११ | १२ | १२ | ०१ |
| १३ | माध्यमिक शाळा | १५ | २१ | २१ | ०५ |
| १४ | स्टेडीयम | -- | ०१ | ०१ | -- |
| १५ | मटन मार्केट | ०२ | ०१ | ०१ | ०१ |
| १६ | पोहण्याचा तलाव | -- | -- | -- | -- |
| १७ | पार्कींग | ०४ | १६ | १६ | ०१ |

स्वाक्षरित/-
नगरसचीव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## नगररचना विभागातील प्राप्त खरेदी सुचना प्रकरणातील चौकशी समितीचा अहवाल

मा. सर्वसाधारण सभा दि. २०-८-२००३ अन्वये मा. महापौरांच्या अधिपत्याखाली उपायुक्त (अ.) सहाय्यक संचालक नगररचना यांची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५२ नुसार खरेदी सुचना दिलेल्या विहीत मुदत संपल्यानंतर सहाय्यक संचालक नगररचना यांना अशा प्रकरणांमध्ये स्थगित असलेले, ठराव मुदत संपण्याच्या आधी शासनाकडे पाठविण्याचे अधिकार असतांनाही त्यांनी अशी कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही, म्हणून चौकशी समिती नेमण्यात आली असून, येत्या १५ दिवसांत अहवाल सादर करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी व रेखांकनाला १५ दिवसांसाठी स्थगिती देण्यात आली आहे.

उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने चौकशी समितीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

औरंगाबाद शहराची (वाढीव क्षेत्राची) विकास योजना ही महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. टीपीएस/३०३८/४५४/सी/आर/५९/८८ नवि-१२ दि. १५ ऑक्टोबंर १९९१ अन्वये मंजूर असून, ती १९ नोव्हेबंर १९९१ पासून अंमलात आली

आहे. सदर विकास योजना अंमलात येवून दि. १८ नोव्हेंबर २००१ रोजी दहा वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे.

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार मौजे ईटखेडा येथील सर्व्हे क्रमांक ८४ व ८६ मिळकती "स्टाफ क्वार्टर", पार्कींग "अग्निशामाक दल" व ६० मीटर रुंद रस्त्याने बाधीत आहे.

तथापी, "अग्निशामक दल" व ६० मी. रुंद रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही महानगरपालिका मा. जिल्हाधिकारी मार्फत विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे सुरु आहे. तर "गव्हर्नमेंट स्टाफ क्वॉर्टर" या आरक्षणाखालील जागा संपादन करण्यासाठी उक्त विकास योजना अहवालानुसार सार्वजनिक बांधकाम खाते हे संपादन संस्था (समुचित प्राधीकरण) आहे. त्यामुळे सदर आरक्षणाखालील जमिन संपादन करणे बाबत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम खाते, औरंगाबाद यांना नगररचना विभागाने (महानगरपालिका) पत्र जावक क्र./मनपा/नरवि/१३३/२००३ दि. २४-१-२००३ नुसार कळविण्याचे संचिकेत दिसून येते.

आरक्षण क्रमांक डी/जी/वन पार्कींग क्षेत्र ०.८६ हेक्टर (वि. यो. अहवालानुसार अक्षमासे क्षेत्र) पैकीचे अदमासे ७०% क्षेत्र हे सर्व्हे क्र. ८६ मौजे ईटखेडा पैकीचे आहे. ज्याचे भूसंपादनबाबत महानगरपालीकेने कार्यवाही सुरु केली नसल्यामूळे उक्त अधिनियमाचे कलम १२७ अन्वये सुचनांदणे अनुज्ञेय ठरते. उक्त पार्कींग या आरक्षणाखालील अंदाजे ०.८६ हेक्टर (सर्व्हे क्र. ८५,६६ मौजे ईटखेडा) यांचे मिळून क्षेत्रासाठी विकास योजना अहवालानूसार भूसंपादन खर्च अंदाजे रुपये १४३.९३ लक्ष दर्शविलेले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार विकास योजना अंमलात येवून दहा वर्ष उलटल्यास उक्त विकास योजनेमध्ये जी जागा आरक्षित असेल आणि वरील दहा वर्षाचे मुदतीत ती जागा करारद्वारे संपादीत करण्यात आली नसेल किंवा भूसंपादन कायदा, १९८४ नुसार भुसंपादनची कार्यवाही सुरु करण्यात आली नसेल तर, संबंधित जमिन मालक किंवा हितसंबंधी व्यक्ती उक्त अधिनियमाचे कलम १२७ अन्वये नियोजन प्राधिकरण विकास प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरण जो को संबंधित असेल, त्यास वरील प्रमरणे भुसंपादनाची कार्यवाही करणसाठी खरेदी सूचना बजावू शकतो. अशा प्रकारची खरेदी सूचना संबंधित प्राधिकरणास प्राप्त झाल्याचे दिनांकापासून सहा महिन्याचे आत संबंधित प्राधिकरणाने कराराद्वारे (खाजगी वाटाघाटीने) भुसंपादन केले नाही किंवा भुसंपादन कायदा १८१९ अन्वये भुसंपादनाची कार्यवाही सुरु केली नाही तर, उक्त विकास योजनेतील उक्त आरक्षण व्यपगत (lapse) होते व लगतच्या वापराप्रमाणे उक्त जमिनीस वापर अनुज्ञेय ठरतो.

औरंगाबाद शहराच्या (वाढीव व क्षेत्राची) विकास योजनेतील मौजे ईटवेडा मधील सर्व्हे क्र. ८४ व ८६ बाबत अर्जदार श्रीमती निर्मलाबाई विजयदत्त त्रिवेदी व इतर दोन नक्षत्रवाडी, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक २१-१०-२००२ रोजीचे अर्जाद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये सूचना आरक्षण क्रमांक डी./जी/१ "पार्कींग फायर ब्रिगेड" ३० मी. रुंद रस्त्याखालील व स्टाफ क्वार्टर खालील आरक्षणाने बाधीत भागासाठी मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे नावे बजावलेली आहे. सदरील खरेदी सूचना दि. २२-१०-२००२ रोजी महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहे. तथापी सदरील दि. २१-१०-२००२ रोजीची व महानगरपालिकेस दि. २२-१०-२००२ रोजी प्राप्त झालेली खरेदी सूचना हे एवढी महत्वाची नोटीस असुन सुध्दा त्यावर महानगरपालिकेचे प्रशासकीय प्रमुख म्हणून असलेले "मा. आयुक्त" यांची खरेदी सूचना प्राप्त झाल्याची स्वाक्षरी दिसून येत नाही.

सदरील प्रकरणात सहा महिन्याचा विहीत कालावधी दि. २१-०४-२००३ रोजी पूर्ण होतो. तेव्हा मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे दि. २१-०४-२००३ अखेर रोजी पर्यंत भूसंपादन प्रस्ताव दाखल होणे आवश्यक असते. या ठिकाणी असेही दिसून येते की, दि. २२-१०-२००२ रोजी प्राप्त उक्त सुचनेवर "सहाय्यक संचालक, नगररचना यांचीही स्वाक्षरी कोठेही दिसून येत नाही. सदरील खरेदी सूचनेवर श्री. अफसर सिध्दीकी (उपअभियंता, नगररचना-२) यांची दि. २३-१०-२००२ रोजीची दिनांकीत स्वाक्षरी दिसून येते. त्यांनी सदरील प्रकरण श्री. काळेले व श्री. गायकवाड यांना मार्क केल्याचे दिसून येते. सदरील प्रकरण हे दि. २८-१०-२००२ रोजी श्री डी. डी. काळेले (शा.अ.) यांना प्राप्त झाले असल्याचे आवक क्र. २३७८, २३७९ दि. २२-१०-२००२ वरुन दिसून येते.

प्रकरणात श्री. एस. एस गायकवाड (दुय्यम आवेक्षक) यांनी सादरीकरण दि. २६-११-२००२ रोजी प्रथमच केलेले आहे. तथापी, सदरील प्रकरण श्री गायकवाड यांना नेमके कोणत्या तारखेस प्राप्त झाले हे संचिकेतून दिसून येत नाही. त्यांचे सादरीकरणातील परिच्छेद (२) नुसार सदर खरेदी सुचनेवर बाधीत क्षेत्राचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रशासकीय ठराव (सर्वसाधारण सभेचा) घेवून खरेदी सूचना दिलेल्या तारखेपासून (६) महिन्याच्या आत पाठविणे आवश्यक असते. नसता बाधीत मिळकत विकास योजनेच्या आरक्षणातून मुक्त होते असे नमूद आहे. तसेच त्यांचे परिच्छेद क्र. (३) नुसार अर्जादारने दिनांक २१-१०-२००२ रोजी खरेदी सूचना मनपास दिली असल्याने ६ (सहा) महिन्याच्या आत म्हणजे दि. २०-४-२००३ पर्यंत भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारीकडे पाठविणे आवश्यक आहे असे नमूद आहे.

श्री एस. एस. गायकवाड (दुय्यम आवेक्षक) यांचे दि. २६-११-२००२ रोजीचे सादरी करणानंतर श्री. डी. डी. काढेले (शाखा अभियंता) यांची दिनांक १६-१२-२००२ रोजीची दिनांकीत स्वाक्षरी नोटशीट करुन दिसून येते. त्यानंतर श्री निकम (उपअभियंता नगररचना-१) यांची दि. २१-१-२००३ रोजीची दिनांकीत स्वाक्षरी दिसून येते. त्यानंतर श्री. संजय आढाव, सहाय्यक संचालक, नगररचना यांनी दि. २२-१-२००३ रोजीची दिनांकीत स्वाक्षरी नोटशीटवरुन दिसून येते.

त्यानंतर मनपा नगररचना विभागाचे जावक क्र ./११८ दि. ३१-१-२००३ अन्वये सदरील संचिका मा. आयुक्त यांचेकडे क्रमांक स.आ/स्वीस/५६७ दिनांक क. ३१-१-२००३ रोजी प्राप्त झाली असून सदरील संपूर्ण प्रकरणांत म्हणजेच दि. २१-१०-२००२ पासून) पहिल्यांदाच मा. आयुक्त यांनी दिनांक २-२-२००३ रोजी दिनांकीत स्वाक्षरी आली. असल्याचे संचिकेतून दिसून येते. त्यानुसार प्रकरणात जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवावयाचा भुसंपादन प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास मान्यता दि. २-२-२००३ रोजी देण्यात आली आहे.

मा. आयुक्त यांचेकडून संचिका नगररचना विभागाकडील आवक क्र. ४३ दि. ३-२-२००३ अन्वये प्राप्त झाली असून, श्री एस. एस. गायकवाड (दुय्यम आवेक्षक) यांनी मा. आयुक्तांचे मंजूरी नुसार भूसंपादन प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यासाठी भूसंपादन ठराव मसुदा मान्यतेस्तव त्यांचे दि. ३-२-२००३ रोजीचे स्वाक्षरी करणाद्वारे सादर केले आहे. त्यावर श्री. डी. डी. कालेले (शाखा अभियंता) यांनी दि. ३-२-२००३ रोजीची दिनांकीत स्वाक्षरी केली आहे. त्यानंतर श्री निकम (उ. अ. न. २/१) यांनी दि. ५-२-२००३ रोजीची दिनांकित स्वाक्षरी केली आहे. त्यानंतर श्री. संजय आढाव स. स. न. न. यांनी दि. ५-२-२००३ रोजीची दिनांकित स्वाक्षरी केली आहे. त्यानंतर नगररचना विभागाचे जावक क्र. १४७ दि. ६-२-२००३ अन्वये संचिका नगर सचीव यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आली असून,

नगरसचिव कार्यालयाकडील आवक क्र./मनपा/न.स/१८ दि. ६-२-२००३ अन्वये संचिका स्विकारण्यात आली आहे.

नगरसचीव यांनी नोट शीट क्र. एन-३ वर येत्या सर्वसाधारण सभेत ठेवणे योग्य असे नमूद करुन दि. ९-२-२००३ रोजीची दिनांकित स्वाक्षरी केली असल्याचे दिसून येते. रोजीची दिनांकित स्वाक्षरी केली असल्याचे दिसून येते.

त्यानंतर मा. महापौर यांचे कार्यालयातील आवक क्र.२०६ दिनांक ६-२-२००३ अन्वये संचिका स्विकारण्यात आलेली आहे. त्यानंतर मा. महापौर यांची मान्यता होवून त्यांचेकडील जावक क्रमांक. महापौर/संचिका-३४ दि. ११-३-२००३ अन्वये संचिकागनर सचिव कार्यालयास पाठविण्यात आली असून, सचिव यांचेकडील आवक क्र./मनपा/नस/४७/दि. ११-३-२००३ अन्वये संचिका स्विकारण्यात आली आहे. त्यानंतर नगरसचिव यांचेकडील जावक क्र./नस/२८/०३ दि. १५-३-२००३ अन्वये संचिका महानगरपालिकेतील नगररचना विभागाकडे पाठविण्यात आली असल्याचे नोट शीट क्र. एना ३ वरुन दिसून येते. नगररचना विभागाकडील आवक क्र./नरवि/७८/०३ दि. १५-३-२००३ अन्वये संचिका स्विकारण्यात आली असल्याचे दिसून येते.

सदरील संचिका श्री. गायकवाड यांनी दि. ८-४-२००३ रोजी स्विकारल्याचे नोट शीट क्र./एन-३ वरील त्यांच्या दिनांकात स्वाक्षरीवरुन दिसून येते. तथापी नगररचना विभागातील आवक बारामशीचे अवलोकन केले असता, श्री गायकवाड यांनी सदरील संचिका द. १७-३-२००३ रोजी स्विकारल्याचे त्याची दिनांकित स्वाक्षरीवरुन दिसून येते.

त्यानंतर श्री. एस. एस. गायकवाड (दुय्यम आवेक्षक) यांनी दि. १०-४-२००३ रोजी नोट शीट क्र./एन-३ व एन ३ व एन-४ वर सादरीकरण केले असून यामध्ये असे नमूद आहे की, विषयांकित भूसंपादर प्रकरणी ठराव मंजूरीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यासाठी नगरसचीव यांचेकडे दि. ६-२-२००३ रोजी पाठविले परंतू माहे-२००३ च्या सर्वसाधारण सभे चर्चा घेवून प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला आहे. सबब माहे एप्रिल २००३ मध्ये होणाऱ्या सर्वसाधारण सभेत विकास योजना भाग नकाशा सादर करण्यात येवून सदर जागा खुली आहे व सध्या शेती वापर सुरु आहे.

(तथापी दि. १२-४-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व संचिकेचे बारकाईने अवलोकन केले असता, उक्त सर्वसाधारण सभेत विकास योजना भाग नकाशा व इतर उपरोक्त माहिती सादर केल्याचे दिसून येत नाही.)

तथापी प्रकरणांत कालमर्यादा लक्षात घेता, भूसंपादन प्रस्ताव कलम १२७ खरेदी सुचनेनुसार दि. २०-४-२००३ पूर्वी मा. जिल्हाधिकारी यार्चे पाठविणे आवश्यक आहे.

करीता म.प्रा.व न. र. अधि १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या खरेदी सूचनेप्रमाणे कालमर्यादेत भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेस्तव भूसंपादन प्रस्ताव स्वाक्षरीस्तव सादर.

उपरोक्त श्री एस. एस. गायकवाड यांचे दि. १०-४-२००३ रोजीचे सादरीकरणावर श्री. डी. डी. कालेले (शाखा अभियंता) यांची दि. १०-४-२००३ रोजीची दिनांकीत स्वाक्षरी दिसून येते. त्यानंतर श्री. अफसर सिध्दीकी (३ अ न. र. /२) यांची दि. १९-४-२००३ रोजीची दिनांकित स्वाक्षरी दिसून येते. प्रकरण येथेच थांबले आहे.

अशा प्रकारे दि. २१-८-२००३ ही भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास दाखल करण्याची शेवटची मुदत असतांना सुध्दा सदरील भूसंपादन प्रस्ताव दि. १९-८-२००३ रोजी उपअभियंता नगररचना-२ यांची स्वाक्षरी झाल्यानंतर त्याच स्तरावर थांबल्याचे दिसून येते. पुढे संचिका हल्याचे दिसून येत नाही.

**निष्कर्श :**

१) प्रशासकीय प्रमूख या नात्याने सदरील दि. २१-१०-२००२ रोजीची उक्त सुचना "मा. आयुक्त" यांचे तसेच सहाय्यक संचालक नगर रचना यांचे (दि. २२-१-२००३ व पर्यंत अनुक्रमे २-२-२००३ पर्यंत अनुक्रमे) निर्दशनास आणाव्यात आले नाही. तसेच प्राप्त झालेल्या कोणत्याच खरेदी सूचना पत्र याच्या प्रतीवर मा. आयुक्त व सहाय्यक संचालक नगररचना यांची स्वाक्षरी दिसून येत नाही.

२) सदरील प्रकरण दि. २८-१०-२००२ ते दि. २६-११-२००२ हा एक महिन्याच्या कालावधीपर्यंत तसेच दि. १७-३-२००३ ते दि. ८-४-२००३ हे तेवीस दिवस असा एकूण जवळ जवळ दोन महिने श्री. एस. एस. गायकवाडा (दुय्यम आवेक्षक यांचे स्तरावर प्रलंबित ठेवल्याचे संचिकेतील नीट शिटवरुन दिसून येते.

३) सदरील प्रकरण श्री. डी. डी. काळेले (शाखा अभियंता) यांचे स्तरावर दि. २६-११-२००२ ते दि. १६-११-२००२ असे एकूण बावीस दिवस प्रलंबित ठेवण्यात आल्याचे दिसून येते.

४) सदरील प्रकरण श्री. निकम (उपअभियंता नगररचना-१) यांचे स्तरावर दि. १६-१२-२००२ ते दि. २१-१-२००३ असे एकूण एक महिना सात दिवस प्रलंबित ठेवण्यात आल्याचे दिसून येते.

५) सदरील प्रकरण श्री अफसर सिध्दीकी (उ.अ.न.र/२) यांचे स्तरावर दि. १९-४-२००३ रोजी संचिका थांबविण्याचे दिसून येते. तेव्हा सदरील प्रकरणात मा. आयुकत यांची भूसंपादन प्रस्तावावर स्वाक्षरी होवून दि. २१-४-२००३ रोजी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करणे फारसे कठीण काम होते असे दिसून येत नाही.

सबब औरंगाबाद शहराच्या (वाढीव क्षेत्राीच) मंजूर विकास योजनेतील मौजे ईटखेडा मधील सर्व्हे क्र. ८४ व ८६ बाबत अर्जदार श्रीमती निर्मलाबाई विजचदत्त त्रिवेदी व इतर दोन रा. नक्षत्रवाडी, औरंगाबाद यांनी त्यांचे दि. २१-१०-२००२ रोजीची अर्जाद्वारे म.प्र.व.न.र. अधि, १९६६ चे कलम १२७ अन्वये दि. २२-१०-२००२ रोजी महानगरपालिका, औरंगाबादला बजावलेली सूचना व्यपगत (lapse) होण्यामागे निष्कर्षातील अनुक्रमांक २ ते ५ वरील कर्मचारी / अधिकारी कारणीभूत असल्याचे दिसून येते.

सहा महिन्यांचे विहित मुदतीत जिल्हाधिकारी कार्यालयास भूसंपादन प्रस्ताव दाखल न केल्यामुळे आरक्षण क्र. डी-जी-१ पार्कींग खालील अर्जदाराच्या जागेवरील आरक्षण व्यपगत झाले असल्याचे दिसून येते.

तरी वरीलप्रममाणे "चौकशी समितीचा अहवाल" योग्य त्या पुढील कार्यवाहीस्तव सादर.

या बरोबरच जन गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०६-१०-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**सोमवार दिनांक ०६-१०-२००३ रोजी मा. महापौर, सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी १२.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | स. सदस्य |
| २) स. स. श्री. भाऊसाहेब ताठे | -//- |
| ३) स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ४) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहेमद | -//- |
| ५) स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ६) स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| ७) स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| ८) स. स. श्री. शिंदे रुख्मिणी राधाकिसन | -//- |
| ९) स. स. सौ. कचराबाई उत्तराव लोखंडे | -//- |
| १०) स. स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| ११) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| १२) स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| १३) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| १४) स. स. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| १५) स. स. श्री. जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| १६) स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| १७) स. स. श्री. डॉ. कराड भगवान किसनराव | -//- |
| १८) स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| १९) स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान | -//- |
| २०) स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| २१) स. स. श्री. नासेरखान सरदारखान | -//- |
| २२) स. स. श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक | -//- |
| २३) स. स. श्री. मोहन मेधावाले | -//- |
| २४) स. स. सौ खरात कुसूमबाई दौलत | -//- |
| २५) स. स. सौ. नुसरत बानो फिरोजखान | -//- |
| २६) स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव | -//- |
| २७) स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| २८) स. स. श्री. प्रशांत सुभाष देसरडा | -//- |
| २९) स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | -//- |
| ३०) स. स. सौ. संगिता बाळू मैंद | -//- |
| ३१) स. स. श्री. नासेरखान अ. रहेमान खान कुरेशी | -//- |

३२) स. स. सौ. शाहीन जफर व महेमुद जफर -//-
३३) स. स. श्री. ओक जयवंत केशवराव -//-
३४) स. स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान -//-
३५) स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालात अली -//-
३६) स. स. सौ सिद्यीकी नईम सुलताना -//-
३७) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
३८) स. स. श्री. शेक्ष मुनाफ शेख यासीन -//-
३९) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
४०) स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
४१) स. स. सौ. बबिता सुभाष कागडा -//-
४२) स. स. श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी -//-
४३) स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज -//-
४४) स. स. सौ. निखत परवीन ऐजाज अली. -//-

**स्विकृत सदस्य :**

१) स. स. श्री. भगवान देविदास घडामोडे.
२) स. स. श्री. सुरजितसिंग खुंगर

**संवाद :**

श्री सुरजितसिंग खुंगर : कोरम नाही. सभेला सुरुवात करु नये.

डॉ. भागवत कराड : कोरम अभावी ०५ मिनिटासाठी सभा तहकुब करावी.

श्री अविनाश कुमावत : आजची बैठक महत्वाच्या विषयावर असतांना मा. आयुक्त सभेला उपस्थित नाही. संबंधित विभागाचे अधिकारी नाही. आजची बैठक तहकुब करण्यात यावी.

श्री नासेरखान सरदारखान : नगररचना विभागाच्या संबंधित प्रस्ताव असतांना त्या विभागाचे अधिकारी उपस्थित नाही. मा. आयुक्त सुध्दा नाही. विचारलेल्या प्रश्नाचा सभागृहात कोणते अधिकारी खुलासा करणार आहे.

श्री मीर हिदायत अली : संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित नाही. महत्वाची बैठक आहे. सभा तहकुब करण्यात यावी.

मा. महापौर : सर्वांना दिपावली निमित्त हार्दीक शुभेच्छा सभागृहाच्या संमतीने आजची सभा तहकुब करण्यात येत आहे. उदया सकाळी ११.३० वा. सभा घेण्यात येईल.

या बरोबरच आजची सभा तहकुब केल्याचे मा. महापौर यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०७-१०-२००३ (दि. ०६-१०-२००३ ची तहकुब सभा) संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**मंगळवार दिनांक ०७-१०-२००३ रोजी मा. महापौर, सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी १२.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी, मा. आयुक्त यांचेसह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | स.सभासद |
| २) स. स. श्री. भाऊसाहेब ताठे | -//- |
| ३) स. स. श्री. राधाकृष्ण गायकवाड | -//- |
| ४) स. स. श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ५) स. स. श्री. वाणी ठकूजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहेमद | -//- |
| ८) स. स. श्री. शे. इतिलयास किमाणी शे. ऊमर | -//- |
| ९) स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| १०) स. स. श्री. इंगळे शंकुतला सांडूजी | -//- |
| ११) स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १२) स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १३) स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १४) स. स. सौ. लिलावती बाळसाहेब घायलिक | -//- |
| १५) स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १६) स. स. श्री. शिंदे रुख्मिणी राधाकिसन | -//- |
| १७) स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १८) स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १९) स. स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २०) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| २१) स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २२) स. स. सौ. साधना गणेश सुरडकर | -//- |
| २३) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २४) स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २५) स. स. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २६) स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २७) स. स. श्री. घोडेले नंदकुमार दाधाकिसन | -//- |
| २८) स. स. श्री. नजर हमीद अ. गफूर | -//- |
| २९) स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३०) स. स. श्री. डॉ. कराड भगवान किसनराव | -//- |

३१) स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३२) स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान -//-
३३) स. स. श्री. मगरे सुनील यादवराव -//-
३४) स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब -//-
३५) स. स. श्री. रतनकुमार पंडगळे -//-
३६) स. स. श्री. नासेरखान सरदारखान -//-
३७) स. स. श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक -//-
३८) स. स. सौ खरात कुसूमबाई दौलत -//-
३९) स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव -//-
४०) स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ -//-
४१) स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४२) स. स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय -//-
४३) स. स. श्री. पारे सोपान भाऊराव -//-
४४) स. स. श्री. प्रशांत सुभाष देसरडा -//-
४५) स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर -//-
४६) स. स. श्री. अशरफ मोतीवाला -//-
४७) स. स. सौ. संगिता बाळू मैंद -//-
४८) स. स. श्री. नासेरखान अ. रहेमान खान कुरेशी -//-
४९) स. स. सौ. शाहीन जफर व महेमुद जफर -//-
५०) स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
५१) स. स. सौ चंद्रभागाबाई दाणे -//-
५२) स. स. श्री. ओक जयवंत केशवराव -//-
५३) स. स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान -//-
५४) स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालात अली -//-
५५) स. स. सौ सिद्यीकी नईम सुलताना -//-
५६) स. स. सौ. सुलताना बेगम चाँदखा -//-
५७) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
५८) स. स. श्री. शेख मुनाफ शेख यासीन -//-
५९) स. स. श्री. सलीम, पटेल समशेर पटेल -//-
६०) स. स. श्री. कैसरखान बद्रोद्यीन खान -//-
६१) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
६२) स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
६३) स. स. सौ. बबिता सुभाष कागडा -//-
६४) स. स. श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी -//-
६५) स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज -//-
६६) स. स. सौ. निखत परवीन ऐजाज अली. -//-

**स्विकृत सदस्य :**

१) स. स. श्री सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स. स. श्री भगवान देविदास घडामोडे.
३) स. स. श्री. सुरजितसिंग खुंगर

**संवाद :**

श्री काशीनाथ कोकाटे : या महानगरपालिकेत अधिकारी/कर्मचारी यांचे किती संघटना कार्यरत आहे. त्या संघटनेच्या वतीने महापालिका इमारतीवर तसेच गेटवर काही बोर्ड/फलक लावण्यात आलेले आहे. किती संघटनांना बोर्ड/फलक लावण्याची परवानगी दिलेली आहे. महापालिकेचे नियम काय आहेत. कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आम्ही सर्व पाठीशी आहेत. कुणावर अन्याय होऊ नये. परंतू जे फलक लावण्यात आले ते नियमाने बरोबर आहे का? प्रशासनाने खुलासा करावा.

श्री प्रशांत देसरडा : संघटनेला बोर्ड/फलक जे काही लावण्याची गरज होती. त्यांनी महापालिकेच्या प्रवेशद्वारा बाहेर लावणे योग्य होऊ शकते. भविष्यात कुणी येईल असे इमारतीवर फलक लावेत हे योग्य नाही. याबाबत प्रशासनानेच मनाई करावयास पाहिजे होती.

श्री काशीनाथ कोकाटे : शिस्त पाळायला पैसा लागत नाही. प्रशासनाकडून खुलासा व्हावा.

मा. महापौर : जे बॅनर लावले ते काढण्यात यावे.

श्री काशीनाथ कोकाटे : संघटना किती कार्यरत आहे, महापालिकेने किती संघटनांना मान्यता दिलेली आहे. नियम काय आहेत. हे सर्व होत असतांना स. सदस्यांनीच प्रशासनाच्या निर्दशनास आणून द्यायचे का? राजकारण कुणी करु नये येथे शिस्तीचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

मा. महापौर : प्रशासनाने खुलासा करावा.

उप आयुक्त (प्र.) : महानगरपालिकेमध्ये ४ संघटना वेगवेगळया नावाने कार्यरत आहे परंतू, एकही संघटनेला महापालिकेची मान्यता नाही. रजिस्टर्ड असू शकते. परंतू, मान्यता प्राप्त एकही नाही.

श्री स. अली मिरा सलामी : हि विशेष सभा आहे हा विषय येथे यायला नको. कोणत्याही संघटनेस त्यांना जे करायचे आहे ते कार्यालयाच्या आवाराच्या बाहेर करावयास पाहिजे या सभागृहाच्या वतीने चतुर्थश्रेणी कामगारांना सेवेत कायम करण्यासाठी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा होत आहे. जे फलक लावण्यात आले, त्यामध्ये फक्त शासनाचे व मंत्री महोद्याचे नांवे आलेली आहे. सभागृहाला कोणतेही श्रेय दिलेले नाही. ज्या संघटनेला मान्यता नाही, रजिस्टर्ड नाही, ऑडीट होत नाही. आशा संघटनेला प्रशासकीय इमारतीच्या मध्ये प्रर्दशन करण्याचा अधिकार आहे का? व त्यांचे निवेदन स्विकारण्याचा प्रशासनास अधिकार आहे का? जी संघटना रजिष्टर्ड आहे, ऑडीट होते, मान्यता प्राप्त असते. आशा संघटनेशी पदाधिकाऱ्यांनी जाऊन चर्चा करणे योग्य होईल. अशा संघटनेला मान्यता दिली पाहिजे. कोणी २ ते ५ लोक घेतात आम्ही संघटनेचे नेते आहे म्हणून दाखवितात. आसपास भांडणे होत आहे. आमचीच संघटना कर्मचाऱ्यांच्या बाजून आहे, असे दाखविण्याचा प्रयत्न येथे होत आहे. याचे सर्व श्रेय खऱ्या अर्थाने सभागृहास द्यावयास पाहिजे. संघटना आम्हीही चालवितो ती एकतेसाठी आपसात संघर्षासाठी नाही.

उप आयुक्त (प्र.) : महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारची संघटना अधिकृत नाही. जे बॅनर्स लावण्यात आलेले आहे, त्यासाठी परवानगी दिलेली नाही. काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री. स. अली. सलीमी : मान्यता देण्यासाठी संघटनेला काय करावे, लागेल याचा खुलासा करावा.

श्री मधुकर सावंत : बॅनर्स लावण्यांबाबत मालमत्ता विभागाने परवानगी दिलेली नाही. महापालिकेच्या इमारतीमध्ये बॅनर्स लावण्यात आले. नियमाचा भंग झालेला आहे. महापालिका प्रशासनाने काय कार्यवाही करणार आहे.

श्री प्रकाश निकाळजे : यावर जास्त चर्चा न होता, जे फलक लावण्यात आले ते तात्काळ काढण्यात यावे.

मा. महापौर : ताबडतोब बॅनर्स काढण्यांत यावे.

**विषय क्र. १५०/१ :** दिनांक २०-१२-२००२ च्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ९-३ अन्वये हेरीटेज नियमावली बाबतचा प्रस्ताव शहर सुधार समितीमार्फत सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा, अशी शिफारस केली आहे. त्यानुषंगाने दिनांक ०४-०१-२००३ च्या शहर सुधार समितीपुढे विषय क्र. ७/२ आणि दिनांक १५-०१-२००३ च्या शहर सुधर समितीपुढे ठेवण्यांत आला होता. सदर प्रस्ताव पुनह दि. १६-०८-२००३ च्या शहर सुधार समितीच्या सभेपूढे ठवण्यात आला असता, सदर प्रस्तावास शहर सुधार समितीने परिशिष्ट यु. चे नियम क्र. २८ पोट नियम ६, हस्तांतरणीय विकास हक्क लागू झाल्यानंतर अंमलबजावणी करण्यात येईल, या अटीसह मंजूरी देऊन दि. २०-०८-२००३ रोजी संपन्न होणाऱ्या सर्वसाधासरण सभेत ठेवण्यांस शिफारस केलेली आहे. त्यानुषगाने हेरीटेज नियमावली बाबतच्या प्रस्ताव दिनांक २०-०८-२००३ रोजीच्या सर्वसाधारण सभेपूढें ठेवण्यांत आला नसता, प्रस्ताव क्र. ११६-७ अन्वये विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करुन निर्णय घेण्यांत येईल, असा निर्णय झालेला आहे, त्यानुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील प्रस्ताव क्रमांक टीपीएल २४००-३६७/प्र.क्र./२४/नवि/९ दिनांक ३० सप्टेंबर २००० अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियक १९६६ चे कलम ३७ (१) खाली महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हेरिटेज नियमावली व ऐतिहासीक दृष्टया आणि वास्तुशास्त्रीय दृष्टया जतर करावयाच्या वास्तुंची यादी सामाविष्ट करावी, म्हणून आदेश दिलेले आहेत. त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबद्दल करणे आवश्यक आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत खालील दर्शविल्यानुसार नविन नियम क्र. २८ म्हणून प्रस्तावति करण्यात येत आहे. त्यांचे २८ (६) चे नियमन ॲपेडींक्स यु (U) म्हणून प्रस्तावित केले असून, वास्तुशास्त्रीय व ऐतिहासीक दृष्टया जतन करावयाच्या वास्तूंची यादी समाविष्ट करण्याचे दुरुस्ती करण्यास प्रस्तावित करण्यांत येत आहे.

करीता, सोबत जोडलेल्या नियम क्र. २८ साठीचे शेडयुल्ल व अपेंडीक्स यु (U) प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीत दुरुस्ती करणेस व यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबद्दल करणेस मंजूरी होणेस्तव व सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर कलम ३७ ची कार्यवाही करण्याचे व शासनास प्रस्ताव सादर करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्याचे मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री आनंद तांदुळवाडीकर : हेरीटेज नियमावली संदर्भात प्रस्ताव सभागृहासमोर सादर झालेला आहे. हेरीटेज नियमावली कायदा काय आहे. हे प्रशासनाने सभागृहाला सविस्तर माहिती द्यावी. विकास आराखडा समोर ठेवावा.

डॉ. भागवत कराड : जी यादी सोबत दिली आहे की, कोणी तयार केलेली आहे. ज्या वेळेस वार्डास सर्व्हे करण्यात आला त्यावेळी त्या त्या प्रभागाचे स. सदस्य यांना विश्वासात घ्यावयास पाहिजे होते.

श्री राधाकृष्ण गायकवाड : हेरिटेज नियमावली काय आहे हे सभागृहाला प्रथमतः समजावून सांगावे. ज्या ज्या वार्डात वास्तूंचा सर्व्हे झालेले आहे, त्या ठिकाणच्या स. सदस्यांना विश्वासात घेतलेले आहेत का? याबाबतीत नियमाप्रमाणे सर्व खुलासा मा. आयुक्तांनी करावा.

श्री जयवंत ओक : १५६ वास्तुचा सर्वे केलेला आहे. प्रस्तावात तसे दिलेले आहे. हेरिटेज नियमावली काय आहे, सविस्तर खुलासा करावा. यात जी माहिती दिली अंगुरीबाग आहे.नारळीबाग आहे, खडकेश्वर, मोंढानाका, या मजीद, मंदिर आहे. पाणचक्की आहे. दमडीमहल आहे. सोनेरी महल आहे, बिबिचा मकबरा आहे. सध्या त्या इमारती चांगल्या अवस्थेत आहेत का, केंद्रशासनाने हा कायदा लागू केला तर, शासन यासाठी विकास करण्यांस निधी देणार आहे का? सविस्तर या विषयावर खुलासा करावा. नंतरच सविस्तर चर्चा होऊन निर्णय घेण्यांत यावा.

श्री तकीहसनखान : हेरिटेज नियमावली काय आहे. यात फायदा किती व नुकसान किती तसेच जी यादी देण्यात आलेली आहे, यात ८०% चुकीचे वाटते.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी सविस्तर खुलासा करावा.

मा. आयुक्त : हेरिटेज नियमावली ही विशिष्ट कामासाठी स्वतंत्र नियमावली केलेली नसून, महापालिकेमध्ये जे विकास कार्य नियमावली आहे. जे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ खाली दुरुस्तीसाठी ठेवली आहे. दुरुस्ती नंतर अंमलात येईल. किरकोळ फरेबद्दल करण्याच्या धर्तीवर कलम ३७ ची गौणफरेबद्दल (मायनर बॉडीफिकेशन) करण्याची जी कार्यवाही आहे, त्या धर्तीवर हेरिटेज नियमावलीचा अंमल व्हावा, अशा सन २००० पासून राज्यातील सर्व महापालिकेस सूचना आहेत. औरंगाबाद शहराचे ऐतिहासीक दृष्टया, वास्तुशास्त्रीय दृष्टया तसेच सामाजिक दृष्टया जे ज्या काही महत्वाच्या वास्तु आहेत. त्यांची यादरी करावी व महापालिका ही नियोजन प्राधिकरण आहे आणि कायदयाने कलम ३७ खाली या सस्थेला अशा नियमावलीत सुधारणा सुचविण्याचे अधिकार असल्याने राज्य शासनाने महापालिकेला गेल्या दोन ते तीन वर्षापासून विनंती केलेली आहे. त्यानुसार महापलिकेने दाखल घेतलेली आहे. माणिक वर्षात हा प्रस्ताव शहर सुधार समितीकडे पाठविण्याचा निर्णय या सभागृहाने घेतलेला होता, त्यानुसार शहर सुधार समितीसमोर ठेवून त्यावर विचार विनिमय केला काही समितीच्या सदस्यांनी वास्तूची पाहणी सुध्दा केलेली आहे. शहर सुधार समितीने विचार विनिमय करुन व प्रस्ताव मंजूर करुन या सभेपूढे पाठविण्याची शिफारस केलेली आहे. थोडक्यात असे की, आजच्या बैठकीत या विषयावर चर्चेअंती जो काही निष्कर्ष निघेल. त्याची नक्कीच प्रशासन दखल घेईल. नियम २८ हा नियमावलीमध्ये नव्यान समाविष्ट करावा

लागणार आहे. नियम २८ खाली ऐतिहासिक दृष्टया, वास्तुशास्त्रीय दृष्टया ज्या वास्तु या पुढील कालावधीसाठी जतन करणे आवश्यक आहे. हा सर्व प्रकरचा वारसा टिकविण्यासाठी त्या वास्तूचा परिस्र व ज्या वास्तू मोडकळीस आलेल्या असतील, तर त्यांचा विकास करण्यासाठी हा जो नियम २८ राज्यातल्या देशातल्या प्रमुख महानगरपालिका, अंमलात आणीत आहे. देशात परदेशात या महानगरपालिकेबद्दल निश्चित माहिती आहे. मी ३००० मैलावर गेलो होतो. तेथे सुध्दा या शहरातील दोन व तीन वास्तू बद्दल माहिती आहे. सर्व जगात जर माहिती आहे तर, अशा शहरातील ज्या वास्त आहे त्या जतन करणे त्यांचे सौदर्यीकरण करणे, तेथील परिसर निर्मळ ठेवणे, या बाबतीत महापालिकेने पुढाकर घ्यावा. अशी शासनाची अपेक्षा आहे. हा प्रस्ताव जेव्हा नियम २८ खाली आणण्यात आलेला आहे जो की, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाखालील गौण फसरबद्दल स्वरुपात आणलेला आहे. नियम २८ अंमल करतांना व नेमके काय करायचे आहे ते, समोर ठेवले आहे. याबद्दल थोडक्यात माहिती या विभागाचे विभाग प्रमुख देतील ही, नियमावली जेव्हा तेव्हा लागू घेतील या हेरीटेज नियमावलीच्या संदर्भात जी कमीटी असेल, त्यांना सल्ला देण्याचे मार्गदर्शन करण्याचे अधिकार असेल व ज्या वास्तुची आपण निवड करणार आहोत, तेथे विकास कामे, दुरुस्ती, संवर्धन करावयाचे झाल्यास आयुक्तांना करता येईल. म्हणून ज्या वास्तूच्या संदर्भात हे सभागृह अंतिम करेल त्या वास्तूच्या विकासावर नियंत्रण आणण्यात येईल आणि हे नियंत्रण मुख्यतः हेरीटेज कमीटी मार्फत आयुक्त आणू शकतील. एखादया ठिकाणी एखादया वास्तूच्या बाबत असे नियंत्रण आणणे अत्यंत आवश्यक आहे. असे राज्य शासनास वाटले तर, आशा प्रकराची वास्तू या नियमाखाली आणण्याचे स्वतंत्र अधिकार आहे. यापेक्षा जास्त माहिती सहा. संचालक नगररचना हे देतील.

सहा. संचालक (नगररचना) : औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्यासाठी हेरीटेज नियमावली लागू करण्याबाबत तसेच शहरातील शिल्प यांचे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय महत्व पाहता त्याचप्रमाणे इतिहास वारसा जतन करण्याच्या दृष्टीने या शहरासाठी ऐतिहासिक वास्तू जतन करण्यासाठी हेरीटेज नियमावली लागू करणे अत्यंत गरजेचे आहे. प्राथमिकतः शहरातील १५६ वास्तूंची यादी तयार आहे. त्यापैकी जवळपास ३० वास्तू जीर्न झालेल्या असून, पाडावयास आलेल्या आहेत. ५२ दरवाजेपैकी फक्त ३६ दरवाजे शिल्लक आहे. ३६ दरवाजे पैकी १३ दरवाजे यांचे प्रथमतः संरक्षण करणे गरजेचे आहे. त्यामध्ये दिल्ली गेट, कला दरवाजा, भडकलगेट, नौबत दरवाजा, रंगीन दरवाजा, नवखंडा पॅलेस, बारापुल्ला, मकाईगेट, महमुद गेट, पानचक्की जवळील गेट, पैठणगेट, रोषणगेट, कटकट गेट इ. समावेश आहे हे करीता असतांना महानगरपालिकेने करावयाचे १ हेरीटेज कमीटी कायम करणे. २ ज्या इमारतींचा ताबा घेणे शक्य आहे. आशा इमारतीच्या ताबा घेऊन हेरीटेज नियमावलीच्या खाली त्याची देखरेख दुरीस्ती करणे व हेरीटेज नियमावयलीसाठी वास्तुविशारद यांची नियुक्ती करणे, सदरील नियमावली शहरासाठी लागू झाल्यानंतर विविध संस्थाच्या मदतीने या या वास्तुचे जतन करता येईल. या वास्तुचे जतन करण्यासाठी वास्तु विशारद यांचे मार्फत

प्रत्यक्ष आजची स्थिती बाबत फिजकिल व्हेरीफिकेशन करुन प्रधान्यक्रम ठरवावा लागेल. सदर वास्तुचे जतन करुन सभोवतालचा परिसर निश्चित करता येईल. सदर प्रकरणी महानगरपालिकेस अत्यल्प खर्च असून वास्तू जतन करण्या संबंधिचा खर्च राज्य शासन, केंद्र शासन, विविध संस्था, खासदार, आमदार निधी उपलब्ध करुन करावयाचा आहे. मोडकळीस आलेल्या वास्तू यात आहे. १५ वास्तू अशा आहेत की, वक्फबोर्ड, शासनाच्या अंतर्गत येतात.

श्री काशीनाथ कोकाटे : किती वास्तू दुरस्त करु शकतो. अस्तित्वात आहेत का.

श्री जयवंत ओक : जी यादी वाचून दाखविली त्याची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावीत. कोणत्या भागात कोठे वास्तू आहे हे समजेल.

श्री किशनचंद तनवाणी : खाजगी मालमत्तेवर किती वास्तू सद्यस्थितीत आहेत. त्याचा खुलासा करण्यात यावा.

सहा. संचालक (नगररचना) : हेरीटेज नियमावलीसाठी औरंगाबाद शहरातील ऐतिहासीक वास्तू, कलाकृती व शिल्प व परिसर याची यादी. या यादीमध्ये पुरातत्व, स्मारक, भावनीक, सौदयीक, वास्तुशास्त्रीय, ऐतिहासिक, पर्यटनदृष्टी, धार्मीक याबाबतीत जे महत्व आहे त्या वास्तू यात आहेत. सुमारे १२५ वास्तू अस्तित्वात आहेत.

श्री किशनचंद तनवाणी : वास्तुची यादी कुणी तयार केली, मागील रेकॉर्डनुसार केली की, स्थळ पाहणी करुन केलेली आहे.

मा. महापौर : इतिहास तज्ञ डॉ. मोरवंचीकर या ठिकाणी उपस्थित आहे ते सविस्तर माहिती देतील.

श्री तकीहसन खान : सादर केलेल्या यादीत चुकीचे दिलेले आहे. एक एक स्मारकाचे नावं घेऊन त्यावर योग्य ती चर्चा करुन दुरुस्ती करण्यांत यावी.

श्री किशनचंद तनवाणी : सादर केलेल्या यादीमध्ये क्र. ७८ वरील गुलमंडी ही वास्तू गुलमंडी भागात कोठे आहे. अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

श्री नंदकुमार घोडेले : हेरीटेज नियमावली लागू करणे भाग असले तरी, काही वास्तू खाजगी मालमत्तेवर आहे का? टायटल कुणाच्या नावाने आहे, खुलासा करावा.

मा. महापौर : एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे.

सहा. संचालक न.र. : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास कार्य नियमावलीमध्ये नियम २८ अंतरभूत करीत आहोत. कलम ३७ अन्वेय कार्यवाही करत असतांना हा प्राथमिक ठराव होईल. यानंतर सूचना हरकती मागविणार आहोत. हरकती सूचना प्राप्त झाल्यानंतर यात पुन्हा बदल करता येऊ शकेल.

श्री. नंदकुमार घोडेले : ज्याच्या मालकीची जागा त्याचे संम्मती लागेल. ती केव्हा घेणार आहोत.

मा. महापौर : मा. आयुक्तांनी सविस्तर खुलासा करावा.

मा. आयुक्त : नियम २८ लागू करतांना आपण विकासाच्या संदर्भात अशी वास्तू नियमानुसार अंतिम केली तर त्याचे विकासावर बंधन आणतो. बंधन आणतांना ते आपल्या ताब्यात असले पाहिजे. टायटल आले पाहिजे हे यात अंतर्भूत नाही. खाजगी जागेवर घर बांधतांना परवानगीची मागणी केली जाते. या यादीत ही शासकीय, निमशासकीय, खाजगी मालकीचा प्रश्न

नाही. विकासावर बंधन राहणे आवश्यक आहे. जोपर्यंतन स्थानिक प्राधिकरण परवानगी देत नाही. तो पर्यंत बांधकाम, दुरुस्ती किंवा विकास करुच शकत नाही. अशाप्रकारे याही यादीमध्ये ज्या खाजगी जागा असतील, ट्रस्टच्या असतील, सरकारी असेल, केंद्र सरकारच्या असतील, निमसरकारी असतील, मालकीच्या विषय आज नाही. त्या वास्तुच्या विकासावर बंधन येणार आहे. दुसरा भाग असा की, ज्या वास्तू अस्तित्वातच नाही. लोकेशन बरोबर नाही. पण जतन करावी वाटते. त्यांचे क्षेत्र, लोकेशन ई. माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे. सभागृहाला विचार विनिमय करता येईल. यावर आणखी काही शंका निर्माण होत असतील तर, त्याचा खुलासा सह. संचालक नगररचना तसेच डॉ. मोरवंचीकर साहेब येथे आलेले आहे ते करतील. त्यांनतर योग्य तो निर्णय सभागृहाने घ्यावा.

श्री नंदकुमार घोडेले : कमीटी स्थापन करावी. नगरसेवकांच्या त्यात समावेश असावा.

श्री किशनचंद तनवाणी : जी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आलेली आहे. संबंधित अधिकारी यांना या विषयी काहीही माहिती नाही, असे त्यांचे बोलण्यावरुन दिसते. गुलमंडी कॉम्प्लेक्स गुलमंडीवर कोठे आहे का. खुलासा होत नाही. संपूर्ण माहिती डॉ. मोरवंचीकरांकडे आहे. त्यांनी तशीच ठेवली आहे.

श्री भगवान घडामोडे : या संबंधी शासनाने कायदा तयार केला म्हणून कार्यवाही करावीच लागेल. प्रस्ताव चुकीच्या पध्दतीत मांडलेला आहे असे माझे वैयक्तीक मत आहे. ठराव पास करुन जनतेच्या सूचना/हजकती यावयास पाहिजे होत्या सूची तयार केली त्यात कोणते निकष वापरण्यांत आले. यादीत दिलेल्या वास्तु अस्तित्वात आहेत की, समितीमध्ये कोण होते. त्यांचा सुध्दा खुलासा व्हावा. यादीमध्ये खाजगी मालमत्तेवर काही वास्तू आहेत. त्या संबंधित मालकाचे म्हणणे काय त्यांची समंती घेतलेली आहेत का. टीडीआरच्या माध्यमातून सवलत देणार आहोत असे या ठरावात नमूद आहे. आतापर्यंत टीडीआर लागू केलेला नाही. टीडीआरचा कायदा घेण्यास मालकांनी नकार दिला व आर्थिक मागणी केल्यास प्रशासन काय भूमिका घेणार आहेत. याचा खुलासा व्हावा. एखादी वास्तुच्या बाजुला झालेल्या १० इमारती त्या पाडणार आहात का. किंवा एखादया इमारतीचेच बांधकाम राहिले असेल, तर परवानगी देणार आहात का. जी समिती स्थापन करणार ती अस्थायी असणार कि, स्थायी राहणार आहे व त्या समितीचे काम काय राहणार आहे. याचा कुठेही उल्लेख नाही, विकास करण्यासाठी शासनाकडे फिक्स असे बजेट येणार आहेत का. हाही खुलासा व्हावा. महापालिकेवर बोजा पडणार काय असे करुन, शासनाचे पुरातत्व खाते बंद पडणार आहेत का? अशा अनेक वास्तू आहेत ज्या तेथील नागरीक तसेच नगरसेवक यांना त्या वास्तु माहीत नाही. तेथील वास्तुच्या परिसरातील नागरीकांच्या सुचना हरकती काय आहेत या सर्व बाबींचा विचार होऊन हा मंजूर करावा.

श्री प्रकाश निकाळजे : ऐतिहासीक वास्तु जतन करण्याचा प्रस्ताव आहे. सर्व बाबी व्यवहारीक दृष्टया पाहता, ऐतिहासिक वास्तू जतन करायच्या आहेत. हे शहर जगामध्ये विशिष्ट नावाने ओळखले. जाते जगातील पर्यटक हे शहर पाहण्यासाठी येतात. म्हणून जपान सरकारने मागील वेळेसे वेरुळ आणि अंजिठा या स्थळांचा विकास करण्यासाठी ७०० कोटी रुपयाची मदत केलेली आहे. ज्या ऐतिहासिक वास्तू आहे त्या जतर करण्याची आज गरज आहे.

काही वास्तू सद्य:स्थितीत नसतील तो भाग वेगळा आहे. परंतू प्रत्येकवेळी नकरात्मक निर्णय घेऊन या शहराचा ऐतिहासिक वारसा नष्ट करण्याचे काम होऊ नये. यात काही १८५७ च्या वास्तू आहे. डायनासोर नामशेष झाला. इतिहास समजला पाहिजे. भावी पिढीला व सर्वसामान्यांना ऐतिहासीक वास्तुची माहिती असणे आवश्यक आहे. पूर्वीच्या कलाकुसरी वेगळया पध्द्तीने होत होत्या शिक्षण नसतांना कलाकृती केलेल्या आहेत. अजिंठा लेणीचे रंगकाम झालेले आहे. या सर्व बांबीचा विचार करुन ऐतिहासिक वास्तुला जतन करण्याचा प्रयत्न व्हावा. यात कुणाही नकारात्मक भूमिका घेऊ नये.

श्री भगवान रगडे : नकारात्मक भूमिका कुणीही मांडलेली नाही. या ऐतिहासिक वास्तू जतन होण्यास आमची समंती आहे. आम्ही या संस्कृतीमध्ये वावरलेलो आहेत. परंतु ज्या अडचणी निर्माण होत आहे जी सूची काढली ती नागरिकांपर्यंत सुध्दा गेली पाहिजे. आताच स. सदस्य श्री. किशनचंद तनवाणी यांनी प्रश्न केला गुलमंडी कॉम्पलेक्स कुठे आहे हे त्यांना माहीत नाही.

श्री जयवंत ओक : यामध्ये १५६ ऐतिहासीक वास्तूचा समावेश आहे. ३० वास्तू मोडकळीस आहेत. हेरीटेज नियमावली लागू करण्यात आमचा विरोध नाही. ठराव झाल्यानंतर सर्व नियम दाखविले जातील. शहरातील जनतेचे मत जाणून घ्यावे. सूचना/हरकती मागवून घ्याव्यात. जनतेचे मत जाणून घेवून, यावर योग्य तो निर्णय घेता येईल. ज्या ३० वास्तू अत्तित्वात नाही. त्याचा सुध्दा यात समावेश होणार आहे का. त्याचा सुध्दा खुलासा करण्यांत यावा.

डॉ. मोरवचीवर : आताच जी चर्चा झाली ती माझ्या कानावर आलेली आहे. दोन तीन गोष्टीच्या बाबतीत स. सदस्यांचा अपसमज झालेला आहे. अशी शक्यता आहे. जी यादी सादर केली ती अंतिम नाही. उदाहरणार्थ दाखल आहे. यामध्ये इमारती कमीही होऊ शकतात. वाढवूही शकतात. ही यादी त्या इमारतीचे वय, इमारतीला असणारी ऐतिहासिक पार्श्वभूमी, इमारतीचे परुतत्वीय महत्व, इमारतीचे सौंदर्य आणि ऐतिहासिक दृष्टीकोनातून ही इमारत किंवा ही वास्तू, हे उद्यान, हे स्थळ ही कबर, हे थडगे आपल्या माहितीसाठी बोलतो आहे की, नंतर इतर विषयावर चर्चा करता येईल. येत्या सोमवारी जगातील पहिली ओडीसि डेक्कन ओडीसि ही ९६ प्रवाशांना घेऊन येत आहे. एका तिकिटाची किंमत १ लक्ष रुपये आहे. हे लोक ०८ दिवस महाराष्ट्रात आहे त्यापैकी दोन दिवस औरंगाबाद येथे आहेत. या शहरात पर्यटकांना आपण काय दाखवू शकतो, याबाबतीत गेल्यावर्षी चर्चा झाली. तेव्हा या शहरात पर्यटकांना ०८ तास ठेवून ही स्थळे दाखवू शकतो. अशी मी, कबुली दिली आहे. ती त्यांनी मान्य केलेली आहे. म्हणजे औरंगाबाद हे शहर एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील ठिकाण आहे. ९६ प्रवासी हे दोन दिवस औरंगाबादला राहू शकतात. येथील पर्यटन तर वाढावेच त्याच बरोबर रोजगार ही वाढवा हा दृष्टीकोन त्या मागचा आहे. प्रोसिजन प्रमाणे हे प्रारुप आहे. उदाहरणा दाखवु आहे. यामध्ये काही मुद्रांक दोष असतील. काही स्थळीक दोष असतील आपल्या भावनांशी मी समरुप होऊ शकतो. ही यादी १९९८ साली केलेली आहे. ज्यावेळेस जयसिंगरावाची हवेली थोडीफार शिल्लक होती. हे आपले व्यासपीठ आहे. आपण्फ मला उदा अंतकरणाने ०५ मिनिटे बोलण्याची संधी देत आहात, आपणांस किती धन्यवाद द्यावे.

माझ्याकडे शब्द नाही. शिवाजीने उतरविलेली जागा आपण आज संरक्षित करु शकत नाही. संभाजीने उतरविलेली जागा आग्रयाला संरक्षित होऊ शकते. हे परस्पर आपण बघु शकता, येथे भावांचे भांडण नाही. या शहरात तोडक्या मोडक्या अवस्थेत ३६ दरवाजे आहे, ५२ नाही. फक्त १३ दरवाजे चांगल्या अवस्थेत आहे. सर्वच एकाच वेळी दुरस्त होणार नाही. हा ही त्यातला महत्वाचा भाग आहे. असे ५२ दरवाजे असणार शहर दक्षिण भारतात नाही. आशियामध्ये नाही. युरोपमध्ये सुध्दा नाही. असेल तर, कुणी सांगावे म्हणून इतिहासकार या नाल्याने व मी औरंगाबाद याचा इतिहासकार आहे असा भाग नाही. जागतिक पातळीवरील पुष्कळशा परिषदेला मी जाऊन आलोलो आहे. आपले सजेशन घ्या. हा कायदा सप्टेंबर २००० मध्ये लागू झालेला आहे. ही यादी १९९८ ला शासनाकडे दिली आहे. ही अंतिम यादी नाही. यात आपण बदल करु शकता. ही यादी प्रसिध्द करुन नागरिकांचे मदत घ्यावी. त्यानंतर पुन्हा सभेत ती यादी येईल व आपल्या मंजूरीनुसारच ती यादी शासनाकडे पाठविली जाईल.

आम्ही ०५ वर्ष पाठपुरावा केला. वेरुळ, अंजिठा जाणारे पर्यटक औरंगाबादला येतात. औरंगाबादचे पाणी पितात, रस्ते औरंगाबादचे वापरतात. नंतर वेरुळ अंजिठा येथे जातात. म्हणून औरंगाबाद हे शहरही त्यामध्ये घेतले पाहिजे. TDICD ने ७ वर्षाचा प्रोग्राम आखलेला आहे. महानगरपालिकेने त्यांना माहिती पुरवावयाची आहे. आम्ही शासनाचा पाठपुरावा करुन सप्टेंबर २००० मध्ये महानगरपालिकांना त्यांचे अंतर्गत येणाऱ्या वास्तूंना संरक्षण करण्याचा कायदा करुन घेतला त्या कादयानुसार या महापालिकेत ही विनंती केलेली आहे व आर्थिक झळ महानगरपालिकेला पोहचणार नाही. आपल्याकडील बिबिचा मकबरा तसेच दौलताबादचा किल्ला या दोन वास्तू पुढील वर्षी जागतिक होणार आहे. हे होत असतांना केवढा अभिमान आपल्याला पाहिजे माझे असे मत आहे की, हेरीटेज कायदा लागू करावा एक महिन्यामध्ये सुचना हरकती मागवावे. आपण जी यादी मान्य कराल ती पुढील बैठकीत ठेवावी. वा शासनाकडे मंजूर करुन पाठवावी. मला येथे येऊन बोलण्याची संधी दिल्याबद्दल मा. महापौर, तसेच सभागृहाचे आभार व्यक्त करतो.

श्री स. अली मिरा सलामी : आताच इतिहासकार तज्ञ डॉ. मोरवंचीकर यांनी खुलासा केलेला आहे. त्यांना सर्व परिस्थितीत माहीत आहे. यातून काही वास्तू गायब आहे. असे त्यांचे बोलण्यावरून दिसून येते. १५६ वास्तूची यादी सादर केली पूर्वीचवी इतिहास नुसार केली की, प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करुन यादी केलेली आहे. त्या वास्तू अस्तित्वात आहेत का, एक दरवाजा त्याचा पत्ता दुसऱ्या ठिकाणी दाखविण्यात आला एक मजीद आहे. पत्ता दुसऱ्या रस्त्यावर दिला, जे ऐतिहासिक नांवे देण्यात आलेली होती, त्यातही तफावत केलेली दिसून येते. आताच सांगण्यात आले १५६ वास्तू आहे. १३ दरवाजे सद्यःस्थितीत चांगले आहे. उर्वरीत आहे किंवा नाही. कमीटी होईल, लोकांचे सजेशन, ऑब्जेक्शन मागविणार वेळ लागेल. त्यासाठी ज्या वास्तू अस्तित्वात आहे, त्यासाठी महानगरपालिकेची एक कमीटी नियुक्त करावी. कोणती वास्तू कोठे आहे. बरोबर पत्ता आहे का. सत्य परिस्थिती समोर यावी तरच या प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी. रोशनगेट, पैठणगेट, कटकटगेट

मोडकळीस आले. त्या संदर्भात तक्रारी दिलेल्या आहे कार्यवाही होत नाही. अरब खिडीकचा उल्लेख नाही. आज जे अस्तित्वात आहे. त्यांचे जतन करावयाचे आहे. हेरीटेज कमीटी झालेली आहे का. बिबिचा मकबराच्या आसपास विटभट्टया चालू आहे. या जुन्या वास्तूच घाण लागते आहे. दुर्गंधी झालेली आहे. पर्यटक येतात, परंतू तेथे तशी स्वच्छता नाही. नगरसेवक व अधिकाऱ्यांपैकी एक कमीटी करा. यादी खऱ्या अर्थाने तयार झाल्यानंतर सभागृहापुढे ठेवावी. हेरीटेज कमीटी पूर्वी एक सब कमीटी करुन सर्व्हेक्षण करण्यात यावे. नंतर मंजूरी द्यावी.

श्री राधाकृष्ण गायकवाड : आताच खुलासा झाला ही, अंतीम यादी नाही. या नियमावलीला आमचा विरोध नाही. माझे असे मत आहे. ५२ दरवाजे ३६ खिडक्या बिबिकाचा मकबरा, पाणचक्की यास या नियमावलीमध्ये घेऊन आताच सांगण्यांत आले की, किती तरी ठिकाणी वास्तू अस्तित्वातच नाही. म्हणून, या सभागृहात एक कमीटी नियुक्त करावी. त्यात नगरसेवक अधिकाऱ्यांचा समावेश करावा. एक महिन्यात सर्वे करतील तो सर्वे झाल्यानंतर सर्वांचे समाधान होईल. पुन्हा ही नियमावली सभागृहासमोर आणावी मान्यता दिली जाईल.

मा. महापौर : सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन हेरीटेज नियमावली संबंधी समिती नेमून समितीचा अहवाल येईपर्यंत सदरील प्रस्ताव मान्य करता येत नाही. या कमीटीमध्ये ज्या ज्या सदस्यांची काम करण्याची इच्छा आहे, त्यांनी नांवे द्यावी.

श्री मीर हिदायत अली : आघाडीच्या वतीने स. सदस्य श्री स. अली सलामी, श्री तकीहसन खान तसेच श्री. किशोर तुळषीबागवाले यांच्या नावाचा या कमीटीत समोवश करावा.

मा. महापौर : ठिक आहे, नांवे द्यावी.

**ठराव क्र १५०/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हेरीटेज नियमावली संबंधी वास्तूंची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी एक समिती गठण करण्यास मान्यता देण्यात येते. ज्या सदस्यांना या कमीटीत काम करण्याची इच्छा आहे. त्यांनी आपली नांवे मा. महापौर यांचेकडे द्यावी. सदर समितीने प्रत्यक्ष पाहणी करून त्यांना अहवाल आल्यानंतर या बाबतीत योग्य निर्णय घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक ०७-१०-२००३ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**मंगळवार दिनांक ०७-१०-२००३ रोजी मा. महापौर, सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची "विशेष सर्वसाधारण सभा" महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी ०२.३५ वाजता सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी, मा. आयुक्त यांचेसह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | स. सभासद |
| २) स. स. श्री. भाऊसाहेब ताठे | -//- |
| ३) स. स. श्री. राधाकृष्ण गायकवाड | -//- |
| ४) स. स. श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ५) स. स. श्री. वाणी ठकूजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहेमद | -//- |
| ८) स. स. श्री. शे. इलियास किमाणी शे. ऊमर | -//- |
| ९) स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| १०) स. स. श्री. इंगळे शंकुतला सांडूजी | -//- |
| ११) स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १२) स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १३) स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १४) स. स. सौ. लिलावती बाळसाहेब घायलिक | -//- |
| १५) स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १६) स. स. श्री. शिंदे रुख्मिणी राधाकिसन | -//- |
| १७) स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १८) स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १९) स. स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २०) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| २१) स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २२) स. स. सौ. साधना गणेश सुरडकर | -//- |
| २३) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २४) स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २५) स. स. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २६) स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २७) स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २८) स. स. श्री. नजर हमीद अ. गफूर | -//- |
| २९) स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३०) स. स. श्री. डॉ. कराड भगवान किसनराव | -//- |

३१) स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३२) स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान -//-
३३) स. स. श्री. मगरे सुनील यादवराव -//-
३४) स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब -//-
३५) स. स. श्री. रतनकुमार पंडगळे -//-
३६) स. स. श्री. नासेरखान सरदारखान -//-
३७) स. स. श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक -//-
३८) स. स. सौ खरात कुसूमबाई दौलत -//-
३९) स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव -//-
४०) स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ -//-
४१) स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४२) स. स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय -//-
४३) स. स. श्री. पारे सोपान भाऊराव -//-
४४) स. स. श्री. प्रशांत सुभाष देसरडा -//-
४५) स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर -//-
४६) स. स. श्री. अशरफ मोतीवाला -//-
४७) स. स. सौ. संगिता बाळू मैंद -//-
४८) स. स. श्री. नासेरखान अ. रहेमान खान कुरेशी -//-
४९) स. स. सौ. शाहीन जफर व महेमुद जफर -//-
५०) स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
५१) स. स. सौ चंद्रभागाबाई दाणे -//-
५२) स. स. श्री. ओक जयवंत केशवराव -//-
५३) स. स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान -//-
५४) स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालात अली -//-
५५) स. स. सौ सिद्यीकी नईम सुलताना -//-
५६) स. स. सौ. सुलताना बेगम चाँदखा -//-
५७) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
५८) स. स. श्री. शेख मुनाफ शेख यासीन -//-
५९) स. स. श्री. सलीम, पटेल समशेर पटेल -//-
६०) स. स. श्री. कैसरखान बद्रोद्यीन खान -//-
६१) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
६२) स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
६३) स. स. सौ. बबिता सुभाष कागडा -//-
६४) स. स. श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी -//-
६५) स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज -//-
६६) स. स. सौ. निखत परवीन ऐजाज अली. -//-

**स्विकृत सदस्य :**

१) स. स. श्री सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स. स. श्री भगवान देविदास घडामोडे.
४) स. स. श्री. सुरजितसिंग खुंगर

**विषय क्र. १५१/१ :** औरंगाबाद शहर विकास योजना अंमलबजावणी व विकास परवानगी संबंधी आढावा घेणे.

**संवाद :**

श्री जयवंत ओक : विकास आरखडयानुसार काही योजना हाती घेणार काय जसे ४०,५०,८०,१०० फुटाचे रस्ते रुंद करण्यासाठी त्याचा विकास करण्यासाठी त्यास लागणारी रक्कम बजेट मध्ये आहे का? मोठ मोठे रस्ते विकास करण्यसासाठी हाती घेणार आहात का? इतर कोणती कामे या विकास आरखडयानुसार हाती घेणार आहेत. याबाबत खुलासा व्हावा. भूसंपादनासाठी ०७ कोटी रुपये ठेवण्यात आले होते. ते यात खर्च करणार आहेत का? सुशोभी करण करणार आहात का. नविन काही योजना घेणार आहात का? खुलासा करावा.

श्री स. अली मिरा सलामी यापूर्वीच्या बैठकीत असा निर्णय झाला होता की, नगररचना विभागातील जो कार्यभार चालू आहे त्या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यासाठी सभा बोलविण्यांत येईल असे ठरले होते. तो विषय बाजूला ठेऊन दुसराच विषय टाकण्यात आलेला आहे. ले/आऊट संदर्भात घोळ झाला, भूखंडाचे जे विषय समोर आले होते, डेव्हलमेंट प्लॅनच्या बाबतीत मुद्दे उपस्थित झाले होते. ७५-२५ प्रमाणे ज्या जागा विकास करण्यासाठी दिल्या असे विविध प्रश्नाचा खुलासा घेण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यांत यावे. अशी मागणी असतांना विषय पत्रिकेवर वेगळा विषय दिला विषयांतर झाले. औरंगाबाद विकास आरखडा संदर्भात बैठक ठेवली की, नगररचना विभागाच्या चुकीच्या कारभाराविषयी चर्चा करण्यसाठी बैठक आयोजिक केली. याचा अगोदर खुलासा करावा नगररचना विभागाच्या भूखंडाविषयी जे प्रश्न स. सदस्यांनी मांडले होते, त्यावर चर्चा करण्यसाठी सभा घेण्यात येईल असे आपले रुलींग आहे, परंतू विषय पत्रिकेवर वेगळा विषय आलेला आहे. नगरगरचना विभागात जे गैरव्यवहार चालू आहे. त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. नगररचना विभागाकडून महापालिकेला आर्थीक झळ पोहचत आहे. विषयांतर करुन संबंधित विभागाकडून हा विषय झाला असेल तर सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रकार आहे.

श्री जयवंत ओक : औरंगाबाद शहर विकास योजना अंमलबजावणी व विकास परवानगी संबंधी आढावा घेणे असा विषय आहे. टीडीआर चा प्रस्ताव आहे. कोणता विकास करणझर आहे. विषयाचा अर्थ कळेना खुलासा करावा. टीडीआर लागू होत असेल तो मुद्दा चर्चेला घ्यावा.

श्री जगदीश सिध्द : शहर विकास संबंधी महापालिकेस किती फायदे आतापर्यंत झाले, किती ले-आऊट मंजूर केले. परवानगी किती दिल्या, प्रलंबित किती, बेटरमेंट चार्जेस किती भरण्यात आले, आरक्षित जागेचे भूसंपादनाचे प्रकरणे किती, प्रलंबित आहेत. किती निवाडे जाहीर झालेले आहेत. पैसे भरणा केलेले आहे. पण जागा महापालिकेच्या ताब्यात नाही. टीडीआर मुळे सर्व विकास होणार असून, टिडीआरचा प्रश्न का प्रलंबित आहे. शहर सुधार समितीमध्ये प्रस्ताव आलेला होतो. ६ महिने झाले, अद्याप या सभे समोर आलेला नाही.

श्री मीर हिदायत अली : शहर विकास आरखडा या विषयावर दोन दिवस स्थायी समिती सभेत चर्चा झाली. एकूण खर्च ९१६ कोटी लागणार आहे. हा निर्णय

सर्वसाधारण सभेने घ्यावा, निर्णय झाला असतांना उद्याप प्रस्ताव या सभागृहासमोर सादर झालेला नाही.

श्री. स. अली सलामी : महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे सर्वांचे प्रयत्न असावेत. नुकसान करण्यासाठी येथे पाठविले नाही. नगररचना विभागातर्फे चुकीच्या पध्दतीने कामे होत आहे. भूखंड तसेच परवानगीच्या संदर्भात काही प्रकरणे उघडीस येत आहे. त्या संदर्भात चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करणार होते. त्यावरच चर्चा व्हावी. विकास आरखडयावर नंतर चर्चा करावी.

सहा. संचालक न.र. : विषय पत्रिकेवरील विषय सह.संचालक यांचे विभागांमार्फत प्रस्तावित केलेला नाही. स. सदस्यांनी मागील सभेत मागणी केल्यानुसार ठेवलेला आहे.

श्री प्रशांत देसरडा : टिडीआरच्या प्रस्ताव आला नाही जो प्रस्ताव ठेवला, तो सदस्यांच्या मागणी नुसार ठेवला. अडीअडचणीच्या वेळी असे प्रस्ताव ठेवून शहराच्या विकास करण्याचे काम प्रशासनाचे असतांना सदस्यांच्या मागणीमुळे प्रस्ताव ठेवला. खऱ्या अर्थाने त्या सदस्यांचे या सभागृहात अभिनंदन केले पाहिजे.

श्री शे. इलियास किरमाणी : या विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सर्रासपणे बदल्या कराव्या. सर्व संचिका तुंबलेल्या आहे. १५-१५ दिवस संचिका एका टेबलवर असते. सुचना-पत्र देवूनही कामे होत नाही.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : नागेश्वरवाडी येथील सायली प्रकरणांतील पुलाचे संदर्भात संचिका मंजूर झाली. जागा महापालिकेच्या मालकीची आहे तरी सुध्दा काम सुरु केले नाही.

श्री मीर हिदायत अली : ९१६ कोटी रुपये खर्च येणारा विकास आराखडा स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन सर्वसाधारण सभेत या विषयावर चर्चा घेतली जाईल व निर्णय होईल. बराच कालावधी गेला. का विकास आराखडयाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर आलेला नाही. खुलासा द्यावा.

सहा. संचालक न.र. : स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार विकास आराखडयाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडावयास पाहिजे होता.

श्री भगवान घडामोडे : स. सदस्यांच्या मागणीनुसार विषय सादर झाला. परंतु महापालिकेच्या फायद्याचाच आहे. ईटखेडा येथील प्लॉटला स्थगिती सामना वृत्तपत्रात आले. ६८,६९ ला स्थगिती दिली. ८०,८४ च्या अनुषंगाने चर्चा होऊन हया विभागावर एक विशेष बैठक ठेवावी. म्हणून स. सदस्यांची मागणी होती. हा चांगला विषय असून, नगररचना विभागास सुध्दा काय अडीअडचणी असतील, सभागृहाकडून काही अपेक्षा असेल त्याचा सुध्दा खुलासा व्हावा. आतापर्यंत वर्षभरात किती रेखांकनास मंजूरी दिली किती संचिका दाखल झाल्या. किती वादग्रस्त रेखांकनास मंजूरी दिली किंवा मंजूरी देवून स्थगिती दिली याची माहिती सुध्दा सभागृहासमोर येणे गरजेचे आहे. तसेच भूसंपादनाच्या किती संचीका प्रलंबित असून, बजेट ठेवण्यात आले असून, आतापर्यंत किती जागा भूसंपादन करुन रक्कमा देण्यात आलेल्या आहेत. निकष काय लावण्यात आले तसेच बांधकाम परवानगी साठी स. सदस्यांना चकरा माराव्या लागत असेल व काम वेळीच होत नाही म्हणून सभागृहात सदस्य प्रश्न उपस्थित करतात यासारखे दुर्दैव नाही. हा विभाग नेहमी वादाच्या भोवऱ्यात आहे. ही सभा विशेष असून, नगररचना विभागाच्या काय अडचणी असतील त्या समोर येवू द्याव्या सर्वसामान्य

नागरीकांना त्यांचे काम करुन घेण्यासाठी त्रास होत आहे. याची जाणीव ठेवावी. बजेट उपलब्ध आहेत का? किती कामे प्रलंबित आहे. माझ्या माहितीप्रमाणे नगररचना विभागातील कर्मचारी भूसंपादनाची कामे करतात. परवानगी देतात आणखी काही कामे करीत असतील कामाच्या जास्त बोजा न देता जनतेची वेळेवर कामे होईल. या दृष्टीने कर्मचाऱ्यांकडे कामे द्यावी. त्यासाठी इतर महापालिकेमध्ये चाकशी करावी कोणत्या विभागात कोणते कर्मचारी काय काम कशा पध्दतीने व किती प्रकारचे काम करतात. ही चर्चा करुन माहिती घेवून महापालिका बदनाम होणार नाही तो विभाग बदनाम होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. म्हणून ही बैठक आयोजीत केली. असे असतांना जर जबाबदार अधिकारी हे पदाधिकाऱ्यांनी बैठक आयोजित केली असे म्हणत असेल तर चुकीचे ठरेल. या विभागाने स्वतःहून बैठक बोलवण्यास पाहिजे होती. किती परवानगी दिली, किती जागा भूसंपादन केल्या किती वयाग्रस्त आहेत. याची माहिती देणे आवश्यक आहे. माझ्या माहितीप्रमाणे पूणे महानगरपालिकेने वन-डे परवानगी देण्याची पध्द्त सुरु केली ते योग्य की अयोग्य जनतेच्या फायद्याचे होवू शकते का? माहिती घेवून यादी महापालिकेमध्ये ती पध्दत सुरु करावी. टी.डी.आर चा बऱ्याच वेळा विषय समोर आला या पासून फायदा आहे. परंतू प्रस्ताव सभागृहाच्या समोर येत नाही. तसेच गुंठेवारी संदर्भात काय कार्यवाही केली. मा. प्रधान सचिव यांनी गुंठेवारीची अमंलबजावणी करावी व काय अडचणी असतील त्या शासनात कळवाव्या असे म्हटले होते. त्या विषयावर चर्चा करावी. निर्णय घेता येईल. तसेच रस्त्याचा विकास बाकी आहे. आताच म्हटले नाल्यावर पुल करता येत नाही. परंतू बऱ्याच नाल्यावर आतापर्यंत परवानगी दिलेल्या आहे. नगररचना विभागासंबंधी विविध प्रश्नावर चर्चा करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री सुनिल मगरे : मागील दोन-तीन बैठकीत स. सदस्यांनी नगररचना विभागात जो काही सावळा गोंधळ चालू आहे तो थांबविला पाहिजे किंवा त्या विभागात कोणत्या पध्दतीने काम चालते त्यावर विशेष अशी चर्चा करण्यासाठी सभा आयोजित करावी. अशी मागणी सभागृहाची होती. त्या अनुषंगानेच ही सभा आयोजित केलेली आहे. त्याबद्दल मा. महापौरांचे अभिनंदन करु इच्छितो. मागील गेलया १ वर्षापासून महानगरपालिकेचा नगररचना विभाग वृत्तपत्रामध्ये गाजलेला विषय बनला आहे. त्या विभागाविषयी वेगवेगळया प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रात छापून येतात. त्याची दखल तेथील अधिकारी/कर्मचारी शिवाय प्रशासनाने सुध्दा घेतलेली दिसून येत नाही. प्रत्येक आठवडयात एक प्रकरण उघडकीस येत आहे. स. स. श्री किरमाणी यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांचे भावनाशी मी अत्यंत सहमत आहे. एखादा शासकीय कर्मचारी असेल तो नोकरी करतो. त्याचे कामासाठी कागदपत्र दाखल करतो सर्व प्रोसीजर पूर्ण असते तरी त्यांचकडून चिरीमीरी घेतल्याशिवाय काम केले जात नाही. ही वस्तूस्थिती आहे. त्या विभागात अनेक वर्षापासून जे कर्मचारी करतात. त्यांच्या त्वरीत बदल्या करण्या संदर्भातही यापूर्वीच आम्ही चार ते पाच वेळेस मागणी केलेली आहे. अद्याप कार्यवाही झालेली नाही. ज्या खुल्या जागा आहे. त्या भूखंडाचे आरक्षण उठविण्याचे काम या विभागाकडून होत आहे. यात महापालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. आशिया

खंडात हे शहर वाढत शहर असून, अनेक गोरगरीब जनता या शहरात आकर्षीत होत आहे. या शहरात मोठमोठया योजना राबविल्या जात आहे. कारखानदारी वाढत आहे. मोठमोठया घरकुल योजना राबविण्यासाठी किती बिल्डरांनी महापालिकेकडून आतापर्यंत परवानगी घेतलेली आहे. परवानगी नुसार किती बिल्डरांनी बांधकाम केले, किती बिल्डरांनी बांधकाम पूर्नत्वाचे प्रमाणपत्र घेतले. याचा सुध्दा खुलासा सभागृहाचा देणे आवश्यक आहे. ज्यांनी पुर्नत्वाचे प्रमाणपत्र घेतले नाही. बांधकाम करुन प्लॅट विक्री केले असेल तर, प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो. नंदनवन कॉलनी भागात घरकुल योजना म्हणून इमारत तयार केली. प्रमाणपत्र न घेता, घरे विक्री केले, असे अनाधिकृतपणे जर कुणी बिल्डर कार्यवाही करीत असेल तर, प्रशासन कार्यवाही करीत नाही. परंतू एखादा गरीब नागरीक घर बांधीत असेल तर आपले कर्मचारी तेथे जावून बांधकाम साहित्य घेऊन येतात. ही वस्तुस्थिती आहे. मोठमोठया बिल्डरांना पाठीशी घालण्याचे काम नगर रचना विभाग करीत आहे. ज्या दोन मुदयावर प्रश्न मांडला त्याबाबत खुलासा व्हावा. नसता महापालिकेच्या इमारती समोर आमरण उपोषणास बसेल.

श्री सुरजितसिंग खुंगर : महापालिकेच्या मालकीचे शहरात एकूण ४१८ भूखंड आहेत. पाहणी केली का? जागेची सद्यःस्थिती काय आहे. काही लोकांनी स्वतःच्या नावाने महापालिकेच्या जागेचे पी.आर.कार्ड काढले. याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री स. अली मिरा सलामी : अधिकाऱ्यांनी केलेला खुलासा योग्य नाही. नररचना विभागाच्या संदर्भात विषय होता, सर्व माहितीसह तयारीने सभागृहात यावे. सभागृहातील चर्चा अधिकाऱ्यांनी समजेना. टाईमपास होण्याचा हा प्रकार अधिकाऱ्यांना वाटतो. भूखंडाचा विषय बाजूला ठेवून, दुसऱ्या विषयावरच चर्चा होत आहे. बांधकाम किती दिल्या, ले-आऊट किती मंजूर केले बांधकाम परवानगीच्या या विभागाच्या काही संचिका गायब आहे. तत्कालीन आयुक्त मा. बदलदेव सिंग यांनी संबंधितांवर गुन्हा दाखल केला होता. त्यानुसार कार्यवाही केली का? सुराणा कॉम्प्लेक्स औरंगपुरा यांची संचिका गायब झालेली असून, आजपर्यंत ५० स. सदस्यांनी त्या संदर्भात माहिती विचारली असेल, दिली नाही. या विभागात मोठमोठे गफले होतात समजू देत नाही, संचिका गायब झाल्यास जबाबदार कोण? वेळोवेळी सभागृहात प्रश्न उपस्थित होतात उत्तर दिले जात नाही. त्यामुळे सत्य परिस्थिती जनतेसमोर आणता येत नाही. प्रश्न एक खुलासा दुसरा करतात. ज्या जागा १९७५ मध्ये महापालिकेने भूसंपादित केल्या त्यांचे पी. आर. कार्ड आजपर्यंत तयार नाही. भूषण अग्रवाल यांची जमीन महापालिकेने १९७४ ला भूसंपादीत केली. १९८६ ला मोबदला दिला पुन्हा १९९६ ला मोबदला देण्यात आला. आज पर्यंत त्या जागेचे पी.आर.कार्ड. केलेले नाही. अशी परिस्थिती आहे. त्या संदर्भात मी पत्र दिले, सर्व कागदपत्र दिले. परंतु कार्यवाही झालेली नाही. पी. आर. कार्ड तयार केलेले नाही. स्वतःच्या मालकीची जागा असल्यास पी. आर. कार्ड तयार होते. महापालिकेची मालमत्ता आपली स्वतःची समजून पी.आर.कार्ड तयार करावे. करणार नसेल तर यास जबाबदार कोण वेळेला महत्व द्यावे. १९८२ ला महापालिका स्थापन झालेली असून तेव्हा पासून

१०० संचिका गायब आहेत. पैठकगेट येथे सनी कॉर्नरला बांधकाम परवानगी दिली कोणत्या बेसवर दिली. पत्र दिले, संचिका सापडत नाही. असे सांगतात संबंधित बिल्डरने एक-एक करुन ५० दुकाने विक्री केले. जबाबदार कोणास धरणार, असा प्रश्न निर्माण होतो. रु. १०० च्या बॉन्ड पेपरवर बांधकाम परवानगी दिली. त्या ठिकाणचा आजू बाजूचा रस्ता विकसित होणार आहे. चुकीच्या पध्दतीने परवानगी दिली जाते. यांचा खुलासा देण्यास विभाग तयार नाही. असा प्रकार किती दिवस चालणार यास जबाबदार कोण? २५-७५ प्रमाणे ४ प्रकरणांत विकास करण्यासाठी जागा दिली अद्याप महापालिकेने महापालिकेचा हिस्सा ताब्यात घेतला नाही. निराळा बाजार एस.बी. कॉलेज समोर २५-७५ विकास करण्यास परवानगी दिली. समोरचा भाग संबंधित मालकाने घेतला. ज्याला महत्वे, किंमत नाही. कमर्शियल होवू शकत नाही. असा मागील भाग महापालिकेस देणार करारनामा करतांना कशा पध्दतीने केलेला आहे. त्यानुसार कार्यवाही केली पाहिजे. योग्य पध्द्तीने करारनामा केला जात नाही. नंतर बदल होतात. असाच प्रकार दिसतो. जागावर २५-७५ प्रमाणे विकास करण्यास दिले होते. जागा हस्तांतर केलेल्या आहेत का. कोण जबाबदार आहे. अशी सभा घेऊन याचा जबाब अधिकाऱ्याकडून घ्यावा. जे यात दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. तसा निर्णय घ्यावा वचक राहील.

श्री जयवंत ओक : वेगवेगळे विषय घेऊन सदस्य चर्चा करीत आहे. सादर केलेला विषय कुणी ठेवला नगर सचिव यांनी खुलासा करावा. शहर विकास योजना अंमलबजावणी याचा अर्थ समजला नाही. भूखंडा बाबत चौकशी, परवानगी दिली त्याबाबत चौकशी नेमकी कोणत्या विषयावर चर्चा करायची असा प्रश्न निर्माण झालेला आहे. चिरीमीरी घेऊन कामे होतात ती चौकशी करणार आहात का? औरंगाबाद शळर विकास योजने अंतर्गत काही कामे हाती घेणार आहात का? स्थायी समितीमध्ये विकास आराखडया संदर्भात चर्चा झाली. विषय अद्याप आलेला नाही. हा प्रस्ताव कोणी ठेवला सचिव यांनी खुलासा करावा. नसता सर्वच बाबतीत या विभागासंबंधी चर्चा करावी.

श्री सुनिल मगरे : जी चर्चा आतापर्यंत झाली ती विषयाला अनुसरुन आहे. स. स. श्री किरमाणी, स. स. श्री खुंगर यांनी जी चर्चा केली ती या विषया संबंधत येते.

नगरसचिव : औरंगाबाद शहर विकास योजना अंमलबजावणी व विकास परवानगी संबंधी आढावा घेणे. म्हणजे औरंगाबाद शहरासाठी ज्या ज्या विकास योजना अंमलात आहेत. त्या संबंधीची सर्व कामे म्हणजेच आरक्षणांचे, भूसंपादन, किरकोळ फरेबदल विकास योजनेची अंमलबजावणी करणे समुचित आरक्षणाच्या माध्यमातून विकास (अकोमोडेशन, रिझर्वेशन) टी. डी. आर. ई विकास परवानगी म्हणजे डेव्हलपमेंट परमीशन म्हणजे बांधकाम परवानगी रेखांकना परवानगी, पोट विभागणी, ना हरकत प्रमाणपत्र अकृषी परवानगी ही सर्वच यात अंतरभूत आहे. हा विषय स. सदस्यांच्या लक्षात आला नसेल, विकास योजना अंमलबजावणी म्हणजे जेवढे काही डेव्हलपमेंट प्लॅनच्या निगडीत बाबी आहेत. ते सर्व त्यात मोडतात. विकास योजनेत गौण फेरबदल बांधकाम परवानगी, लेआऊट, ना हरकत प्रमाणपत्र, भूसंपादनाची

सर्व कार्यवाही, पोट विभागणी, व विकास परवानगीसाठी अर्ज करावा लागतो. ती सर्व कामे यात अंतर्भूत होतात.

श्री मीर हिदायत अली : एक खिडकी योजना लागू केली किती दिवसात परवानगी दिली जाते. सर्वसामान्य नागरिकांचा काय फायदा होतो.

श्री भरत लकडे : एखादया सदस्यांनी मुद्दा मांडला. त्याचे उत्तर जो पर्यंत मिळत नाही. त्या सदस्यांचे समाधान होत नाही. तो पर्यंत दुसरा मुद्यावर चर्चा होवू नये.

श्री प्रशांत देसरडाः नगररचना विभागाच्या संबंधित सर्वच मुद्यावर स. सदस्यांनी चर्चा घडवून आणावी. भूसंपादनाचा प्रश्न उपस्थित झाला. बजेट विचारात घेता, सर्वच जागा भूसंपादीत करुन शकत नाही. टीडीआरचा निर्णय घेण्यात यावा. एक आठवडयात या संदर्भात बैठक घ्यावी. महपालिकेस मोठया प्रमाणात फायदा होऊ शकतो. टीडीआरमूळे जे रस्त्याचे रुंदीकरण करायचे तेही कामे मार्गी लागतील. उदा. द्यायचे झाल्यास न्यायालयात उड्डाण पुलाच्या संदर्भात प्रकरण चालू आहे. महापालिकेस न्यायालयाने विचारणा केली की, उड्डाण पुला संबंधी जालना रोडला पॅरलल रोड कोणता. याचे उत्तर महापालिकेकडे नाही. कारण जालना रोडला पॅरलल रोड हा कैलासनगर स्मशान भूमी मार्गे एम.जी.एम. हॉस्पीटल पर्यंत जाणारा हा रस्ता आहे. निधी अभावी तो ओपन विकसित करु शकत नाही. टीडीआर सारखे धाडसी निर्णय महापौरांनी घेतले तर नागरीक प्रशंसा करतील. महापालिकेचा सुध्दा यात आर्थिक फायदा आहे. २५%, ७५% प्रमाणे काही जागा विकास करण्यासाठी शहरातील बिल्डरांची मागणी असते. त्याला वेळ न लागता ताबडतोब परवानगी दिल्यास मोठमोठया योजना महापालिकेस हाती घेता येतील. डॉ. भागवत कराड, तसेच श्री. विकास जैन महापौर असतांना महापौर बंगल्याजवळ तसेच वसंत भवन येथे व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय झाला. वसंत भवन ही इमारत महापालिकेच्या नावाचे पी.आर.कार्ड नसल्याचे उशीरा लक्षात आले. नसता आज बोल्ड पध्दतीने व्यापारी संकुल झाले असते. पी.आर.कार्ड महापालिकेच्या नावाने झाले की, नाही. अद्याप कल्पना नाही. पूणे महापालिकेमध्ये वन-डे परवानगी देण्याचे सुरु केले. त्याप्रमाणे याही महापालिकेने कार्यवाही केल्यास महापालिकेचा फायदा व विकास होईल. पूर्ण महापालिकेने आजूबाजूच्या ग्रामपंचायती या निवासी भागात ठेवल्या. पुढील १० वर्षाचा त्यांचा हा प्लॅन आज सुरु होतो. त्याप्रमाणे या महापालिकेकडे असा काही प्लॅन आहे का? शहरात ओपन जागा किती निवासी म्हणून ठेवण्याबाबत काही योजना करता येऊ शकते का? नगररचना विभागाचे अधिकारी यांना अधिकारी द्यावे. लहान मोइया परवानगीसाठी सुध्दा संचिका आयुक्तांकडे जाते यात वेळ जातो. नागरिकांचे काम होत नाही. शहर विकासा संदर्भात आमदार श्री जोशी साहेब यांनी निधी संदर्भात पत्र दिले. फक्त महापालिकेची एन.ओ.सी. पाहिजे. गेल्या दोन महिन्यापासून मी स्वतः एन.ओ.सी. साठी पाठपुरावा करतो आहे. दिली जात नाही. हे सुध्दा अधिकार आयुक्त पर्यंत ठेवलेले आहे. म्हणून लहान कामासाठी संबंधित विभागाचे अधिकारी यांनी किंवा उप-आयुक्त पर्यंत अधिकार दिल्यास काम वेळेवर होतील.

श्री राधाकृष्ण गायकवाड : नगररचना विभागात जो घोळ चालू आहे. चुकीच्या पध्द्तीने कामे केली जातात. त्यात भूखंडाच्या बाबतीत असो की, बांधकाम परवानगी असो

यासाठी विशेष सभा घेऊन सविस्तर चर्चा करुन खुलासा घेतला जाईल. असे ठरले होते. त्यानुसार चर्चा होवून खुलासा झाला पाहिजे. आता महत्वाच्या विषयावर चर्चा होत आहे. शहराचा विकास झाला पाहिजे. सदस्यांनी मत मांडली ती योग्य आहे. आशिया खंडात हे शहर जलद विकास होणारे म्हणून पहिला क्रमांक लागतो. असे असतांना सुध्दा एका वर्षात किती बांधकाम परवानगी दिल्या गेल्या वर्षात किती दिल्या. झपाटयाने शहर वाढत आहे. परवानगी दिल्याची संख्या बघितली तर यात मोठी तफावत दिसून येते. या विभागाकडून जो विकास या शहराचा व्हावयास पाहिजे, तो सुटलेला आहे. असे काही बिल्डर आहेत की, रितसर परवानगी घेतात. परंतू बांधकाम त्यानुसार होत नाही. राजाबाजार येथे कुंवारफल्ली भागात एका बिल्डरने तील कॉम्प्लेक्स विकसित केले. तीन कॉम्लेक्स मध्ये जे नियमाप्रमाणे सामासिक अंतर पाहिजे ते सोडलेले नाही. पार्कींगच्या खालील जागेत दुकाने काढून विक्री केलेली आहे. कॉम्प्लेक्स मधील सर्व प्लॅट विक्री केले. शिवाय एकही प्लॅटला टॅक्स आकरणी नाही. अशा किती तरी इमारती आहेत की, बांधकाम परवानगी घेतल्या, इमारती तयार झाल्या संबंधिताने विक्री केलया परंतू त्या इमारतीला मालमत्ता कर आकारलेला नाही. तर संबंधित विभागाचे कर्मचारी काय कामे करतात. नगररचना विभागचे नाही. तर एक विभाग असा नाही की, चिरीमीरी घेतलयाशिवाय काम होत नाही. उदाहरण देतो. नगररचना विभागातील एका शिपायाची बदली माझ्या विभागात झाली. माहिती घेतली असता, त्याला येथे काही मिळत नाही म्हणून रुजू होत नाही. असे व्यवहार विभागात होतात बरेच अधिकारी ठेकेदारीच्या हिश्याचे मालक आहे. म्हणून जनता दरबार भरवावा ज्यांच्या परवानगी देणे बाकी आहे, त्यांना एका दिवसात देण्यात याव्यात. एक खिडकी योजनेची अंमलबजावणी होत नाही. योजनेद्वारे जनतेची कामे त्वरीत झाली पाहिजे. तरच यात महत्व प्राप्त होवू शकते. नगररचना विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे बदल्या झाल्या पाहिजे. तर कामे होतील. इतर सदस्यांनी जे मुद्दे मांडले त्याचा खुलासा होवून सविस्तर चर्चा करुन अधिकारी/कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याचा निर्णय घ्यावा. नगरसेवक पाच वर्षासाठी असतात. अधिकारी हे वर्षानुवर्ष येथेच असतात. प्रधान सविच यांनी सुध्दा गुठेंवारीच्या संदर्भात नगरसेवकांची चुक नाही. अधिकारी जबाबदार आहे. असे म्हटले होते.

सहा. संचालक न.र. : विकास योजनेची अंमलबजावणी याबाबत वर्ष २००३-२००४ च्या आराखडयामध्ये मौजे ईटखेडा भागात क्र. १ वर अग्निशमन दलाचे कार्यालयासाठी जागा संपादित करणे असे आहे.

श्री रतनकुमार पंडगळे : विकास आराखडयाच्या संदर्भात दोन दिवस स्थायी समिती मध्ये चर्चा झाली तो प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवून सविस्तर चर्चा करुन मंजूर करणार होतो. अद्याप का प्रस्ताव सादर केलेला नाही. आताच मुद्दा उपस्थित केला. ऐक खिडकी योजना राबविल्या जाते का? त्याचे निकष काय व संचिका दाखल केल्यानंतर पुन्हा केव्हा मिळते. तसेच चिरीमिरी घेवून कामे होतात. याचा सुध्दा खुलासा झाला पाहिजे. विकास आराखडयासाठी ९१६ कोटी रुपये लागणार त्यात रस्ता रुंदीकरण जागेचे

प्रश्न आहे. अद्याप प्रस्ताव या सभागृहासमोर का सादर केला नाही. तोही खुलासा करण्यांत यावा.

श्री संजय शिरसाठ : माजी सभापती श्री. पंडागळे यांनी केलेल्या प्रश्नांचा खुलासा करण्यात यावा.

मा. आयुक्त : नगररचना विभागाच्या कामकाजाबाबत मागील काही सभामध्ये चर्चा झालेली होती. त्या चर्चे अंती असा निर्ष्कष निघाला होता की, वास्तविक सचिवाचे हे काम आहे. इतिवृत्तातून वाचून दाखविणे कि, अशा प्रकारची विशेष सभा या विषयावर घ्यायला हवी. विशेषत: बांधकाम परवानगी वैयक्तिक असतील गृहनिर्माण हौसींगच्या असतील. ले-आऊट रेखांकन मंजूरी, भूसंपादनाच्या असतील. नगररचना संबंधात कायद्याच्या अंतर्गत ज्या ज्या कार्यवाही महापालिकेस विकास प्राधिकरण किंवा नियोजन प्राधिकरण म्हणून कराव्या लागतात. हे जे काम महापालिकेच्या नगररचना विभागात चालते. त्याची सर्व माहिती सभागृहाला अपेक्षित होती. माझी स्वत:ची सुध्दा भावना आहे की, त्यासाठी ही सभा बोलाविलेली आहे. मी प्रशिक्षणावरुन झाल्यानंतर अशा प्रकारची बैठक आयोजित केली. हे जेव्हा मला कळाले. तेव्हा सर्व माहिती मी संकलीत केलेली आहे. तशा सूचना नगररचना अधिकारी यांना दिल्या होत्या. त्यांचेकडे एप्रिल २००२ पासून सर्व माहिती सोबत आणलेली आहे. त्यांना त्याचा खुलासा करु द्यावा. त्यानंतर आपल्याला मते मांडता येतील. त्याचा आढावा घेणे हा मुद्दा महत्वाचा आहे. आताच मुद्दा उपस्थित केला की, उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने या विभागाकडून काय होवू शकते. त्या संबंधीचे विशिष्ट टारगेट अंदाजपत्रकात दिलेले आहे. प्रत्येक बाबीवर किती वसुली झाली. ती वसुली योग्य व समाधानकारक आहेत का? यावरही चर्चा करता येईल काही माहितीद्वारे ठोस अशा सूचना प्रशासनाला देता येतील.

सहा. संचालक न.र. : औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना अंमलबजावणी अहवाल स्थायी समितीने मंजूर केलेला असून, सर्वसाधारण सभेपूढो येण्यासाठी नगरसचिव यांनी ठेवावयास हवा होता. विकास परवानगी बाबत जो आढावा माझ्याकडे, आहे तो वाचून दाखविण्यात येतो.

श्री. स. अली मिरा सलामी : संबंधित विभाग प्रमुख म्हणून सह. संचालक नगररचना यांनी प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी आहे.

सह. संचालक न. र. : विकास परवानगी संदर्भात खुलासा करु इच्छितो की, दि. ०१-०४-२००३ ते ३१-०१-२००३ पर्यंतची माहिती माझ्याकडे आहे. यात बांधकाम परवानगी संचिका ३३० मंजूर प्रकरणे १५१, कार्यवाहीस्तव अंतर्गत ३४ ज्यांना पूर्तता करण्यसाठी नोटीसा दिल्या ती प्रकरणे ९४ नामंजूर ३२ प्रलंबित १९ प्रकरणे आहेत. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी प्राप्त प्रकरणे २४, मंजूर ०१, कार्यवाही अंतर्गत ०१ पूर्तता करण्यासाठी नोटीस दिलेले १९ प्रलंबित ०३ प्रकरणे, रेखाकंना परवानगीसाठी २२ प्रकरणे मंजूर एकही नाही. कार्यवाही अंतर्गत १२ प्रकरणे पूर्तता करण्यसाठी नोटीस दिलेली ०३ प्रकरणे नामंजूर प्रकरणे, ०३ प्रलंबित प्रकरणे ०४ आहेत. सब डिव्हीजनची एकूण प्रकरणे १५, मंजूर ०४ कार्यवाहीस्तव ०६, पूर्ततेसाठी नाटीस दिलेले ०२, नामंजूर ०२ प्रलंबित प्रकरणे ०१ अशी स्थिती असून, १-४-२००२ ते ३१-३-२००३ पर्यंत प्राप्त एकूण प्रकरणे ७५८ त्यातील निकाली काढलेली

५५७ उर्वरीत निकाली काढले जातील. सप्टेंबर अखेर या विभागाची वसुली रु. १.२९ कोटी झालेली आहे.

श्री भगवान रगडे : आताच जे वाचून दाखविण्यात आले. त्याची एक प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.

श्री जगदीश सिध्द : ज्यांना विकास करण्यसाठी जागा दिल्या होत्या. त्यातील हिस्सा महापालिकेने ताब्यात घेतलेला नाही अशी किती प्रकरण आहे. तसेच काही जागा भूसंपादन केल्या त्याचा मोबदला दिला नाही. ज्यांना पैसे दिले अशा मालकाच्या किती जागा महापालिकेने ताब्यात घेतलेल्या नाही.

श्री मीर हिदायत अली : एक खिडकी योजने अंतर्गत संचिका दाखल केल्यास किती दिवसात परवानगी मिळावयास पाहिजे खुलासा द्यावा.

सहा.संचालक न.र : नियमाप्रमाणे ६० दिवसाच्या आत परवानगी दिली पाहिजे. जास्तीत जास्त २ महिन्यापेक्षा कालावधी नको. पूर्ततेसाठी काही संचिका कागदपत्राच्या पूर्ततेसाठी असतात.

श्री संजय शिरसाठ : नगररचना विभागाच्या संबंधित विषयावर चर्चा चालू आहे, इतर अधिकारी येथे आहे. त्याचे संबंधित हा विषय नाही. त्यांना विभागामध्ये कामे करण्यसाठी जावू द्यावे. जनतेची कामे थांबून आहे.

श्री आनंद तांदुळवाडीकर : आताच खुलासा झाला. ३३० अर्ज बांधकाम परवानगीसाठी आले होते. १५१ प्रकरणांस परवानगी दिली. याचा अर्थ ५०% प्रकरणे मंजूर केले. त्यापैकी भोगवटा प्रमाणपत्रासाठी फक्त २४ लोकांनी अर्ज केला. याचा अर्थ १२५-१२६ लोकांनी अर्जच केलेले नाही. सद्य:स्थितीत संपूर्ण शहराचा जर सर्व्हे केला तर, ९०% लोकांनी इमारत भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. असे दिसून येईल, या विभागाचे काम चांगल्या पध्दतीने त्वरेने व्हावे जनतेला तात्काळ बांधकाम परवानगी कशी उपलब्ध करुन देता येईल. यासाठी प्रयत्न असावे. ज्यांनी भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही. त्यांचेवर तात्काळ कायवाही व्हावी. महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे. विकास कामे झाली पाहिजे. उत्पन्न कमी आहे. विकास कामे कशी करावीत. यानंतरचा तोच विषय समोर चर्चेला येतो आहे. वसूली जास्तीत जास्त होण्याच्या दृष्टीने मा. आयुक्त यांनी लक्ष देवून योग्य पावले उचलावित.

श्री किशोर तुळशीबागवाले : नगररचना विभागात स्थायी स्वरुपाचे अधिकारी गेल्या ३ ते ४ वर्षापासून नव्हते. म्हणून सर्व कामे थांबून होती. आता स्थायी स्वरुपी अधिकारी कार्यरत आहे. कामे होतील एकदम टोकाची भूमिका घेणे बरोबर नाही. अशी सभागृहाला विनंती करतो.

श्री स. अली सलामी : नगररचना विभागात काही अधिकारी/कर्मचारी ८ ते १० वर्षापासून कार्यरत आहेत. जनरल बदल्या करण्यात याव्यात. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी जे कुणी येत नसतील. त्यांचेवर कार्यवाही करावी.

सौ खरात कुसूमबाई : नगररचना विभागातून कामे होत नाही. तेथील कर्मचाऱ्यांच्या बदल्या कराव्यात.

श्री संजय शिरसाठ : गंभीर विषयावर बैठक आयोजित केली त्याचे काही तरी फलीत झाले पाहिजे. या विभागातून संचिका गहाळ होतात. शोध लागत नाही. माझे मा. आयुक्त यांना आव्हान आहे की, साजेद नावाच्या बिल्डरच्या संचिका गहाळ झाल्या. न्यायालयात प्रकरणे गेले तेथे सुध्दा या संचिका सापडत नाही. असे स्टेटमेंट केलेले आहेत. तो व्यक्ती ज्यांच्या कस्टडीत होता. मृत्यू झाला

जातांना संचिका घेवून गेला नसेल याची खात्री आहे. म्हणून मा. आयुक्त यांनी त्या संचिका शोधून काढल्या तर आजच्या बैठकीचे फलीत होईल. पुढील बैठकीत याची माहिती द्यावी. एकूणा ६ संचिका आहेत. जी आकडेवारी अधिकारी यांनी वाचून माहिती द्यावी. एकूण ६ संचका आहेत. जी आकडेवारी अधिकारी यांनी वाचू दाखविली. त्याची एक प्रत स. सदस्यांना देणे गरजेचे होते. तसेच जे जे प्रश्न उपस्थित झाले. त्या सर्वांचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री सुनिल मगरे : नगररचना विभागाच्या संदर्भात सविस्तर अशी चर्चा झालेली असून, बऱ्याच सदस्यांचे आपआपले मत मांडलेले आहे. आताच सांगितले गेले. ६ संचिका गायब आहे. या संबंधाने कर्मचाऱ्यांच्या बदल्या करुन भागणार नाही. तर योग्य अशी चौकशी समिती करुन जे कर्मचारी/अधिकारी यात गुंतलेले असतील, अहवाल सभागृहासमोर यावा. त्यावर चर्चा होवून योग्य ती कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात यावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : शहराबाजार येथील कामाच्या संदर्भात ज्या संचिका गायब आहे, त्या बिल्डराला काळया यादीत घ्यावे व कार्यवाही करावी. त्या बिल्डराने राजाबाजार येथील प्लॅट समोरच्या पार्टीला विकले. त्यावर फायनांन्स केले. सर्व प्रॉपर्टी पविल्स बँकेला गहाण ठेवलेली होती. ६ संचिका नसून जेथे जेथे त्या बिल्डर्सने बांधकाम केले. त्या सर्व संचिका महापालिकेकडे नाही. म्हणूंन कार्यवाही केल्यास पोलीस कोठडी शिवाय त्या बिल्डरला शिक्षाच नाही. म्हणून काळया यादीत नांव टाकावे व यापुढे एकही परवानगी देवू नये. असे माझे मत आहे.

श्री संजय शिरसाठ : तत्कालीन मा. आयुक्त बलदेवसिंग असतांना ४७ संचिका पुण्याला संबंधित विभागकडे चौकशीसाठी पाठविण्यात आल्या होत्या. त्या संबंधी काय निर्णय घेतलेला आहे. कळायला मार्ग नाही. शंका निर्माण होण्याचा प्रकार समोर येतो. आताच चर्चा झाली चिरीमिरी घेतल्या शिवाय कामे होत नाही. सदर संचिका पुण्याला कशासाठी पाठविल्या होत्या. त्या आयुक्तांकडून चुकून पाठविल्या गेल्या का? त्या संबंधिाचा अहवाल सुध्दा आतापर्यंत सभागृहात सादर झालेला नाही. अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करा व चौकशी करण्यांत याव्यात.

श्री जगदिश सिध्द : प्रश्न देवून विचारण केलेली आहे. भूसंपादनाचे प्रकरण किती प्रलंबित आहे, किती लोकांना पैसे दिले किती जागा भूसंपादन झाल्या. किती करावयाच्या व महापालिकेने ताब्यात घेतलेल्या जमिनी किती? हे प्रकरण आयुक्तांनी हाताळावे, अशी अपेक्षा आहे. शासनाने १९९७-९८ ला फिस भरण्याबाबत प्रलंबित आहे. तो का प्रलंबित आहे. आयुक्तांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा करावी. आम्ही विचारलेल्या प्रश्नांना वेळेवर उत्तर दिले जात नाही. एफ.एस.आय. वाढविण्याचा प्रस्ताव सुध्दा का सभागृहासमोर आणलेला नाही. टीडीआरचा प्रस्ताव का प्रलंबित ठेवलेला आहे. मा आयुक्त यांनी आव्हान स्विकारावे ही विनंती.

श्री स. अली मिरा सलामी : नगररचना विभागावर बरेच मुद्दे उपस्थित झाले. या विभागातील काही कामाच्या संदर्भात सी. आय.डी. चौकशी चालू आहे. कोणत्या प्रकरणाची चौकशी चालू आहे. सभागृहाला माहित करावे.

मा. महापौर : नगररचना विभागाच्या सदंर्भात जी काही चर्चा आताच झाली. त्याची जाणीव ठेवून जे दोषी अधिकारी असतील, चौकशी करुन, बदल्या करण्यांत याव्यात. यापूर्वी चौकशी समिती नेमून त्यांचे मार्फत चौकशी चालू आहे.

श्री सुनिल मगरे : चौकशी मा. आयुक्त यांनीच करावी.

मा. आयुक्त : आताच मा. महापौर यांनी रुलींग दिले त्यानंतर बोलणे बरोबर नाही तरी, दोन वाक्य खुलासा करतो. या चर्चेमधुन आणखी मुद्दा विचारत घ्यावा की, मी आल्यानंतर लक्षात आहे की, सहा संचालक नगररचना विभागाचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे होता. सहा. संचालक नगररचना हे पद प्रभारी स्वरुपात होते. मी रुजू झाल्यानंतर राज्याच्या नगरविकास खात्याला व संचालक नगररचना यांना माझ्या सहीने नावाने पत्र लिहिलेले होते की, महापालिकेच्या विकास आरखडयाचा व्याप, आरक्षण व इतर जो काही कामाचा व्याप आहे. आपण मघापासून चर्चा करीत आहे त्याची व्याप्ती, आर्थिक व्याप्ती सुध्दा फार मोठी आहे. किमान उपसंचालक दर्जाला अधिकारी या विभागाला असणे आवश्यक आहे. मी पत्र दिल्यानंतर खूप आग्रह केल्यानंतर सहा संचालक नगररचना म्हणून श्री राठोड यांची नेमणूक केली आहे. असूनही शासनाकडे मागणी आहे. आपण चर्चा करतांना हे लक्षात घ्यावे की, त्याचे दर्जाचे व त्यांच्या बरोबर काम करणारे अधिकारी किती दर्जाचे आहे. आपण बदल्याचा प्रश्न उपस्थित केला. मी ही २२-२३ वर्ष सेवा करीत आलो. या दर्जाचे किती अधिकारी महापालिकेत आहे. तेथील ४ अधिकारी काढून तीन घ्यायचे असेल तर, ऑर्डर देता येतील. कृपा करुन विचार करावा एक रात्रीत चांगला प्रयोग घडत असेल तर त्याचे स्वागत करु. तसेच आताच चर्चा झाली. संचिका सापडत नसतील काही कारणामुळे समोर आपल्या जात नसतील. गैरव्यवहार असेल किंवा इतर कारणे असतील. ज्या ६-७ संचिकेचा विषय निघाला त्या प्रशासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांने माझ्याकडे सादर केलेल्या नाही. एक अध्यीपानाची टिप्पणी सादर केली असती तर उपयोगी पडले असते. संचिका न सापडणे किंवा अशा प्रकारची जी मागणी इतिवृत्तांत नोंद झालेली आहे. मी इतिवृत्त वाचतो. आजच्या मुद्दयाची इतिवृत्तांत नोंद असावी. आयुक्त म्हणून निश्चितच गांभीर्याने घेण्यात येईल. या बद्दल शंका नसावी. या विभागाबद्दलच्या अशा भावना का झाल्या. तेथे सक्षम तांत्रिक अधिकारीच नव्हता. यापूर्वी नव्हते. उपसंचालक, सह-संचालक दर्जाच्या अधिकाऱ्या बरोबरच सहा. संचालक म्हणून १-२ अधिकारी बाहेरील येते आणणे आवश्यक आहे. कारण त्याची जबाबदारी वेगळी आहे. एखदा कनिष्ट लिपिक, दुय्यम आवेक्षक, अनुरेखांकांला चौकशीसाठी पाठवायचे झाल्यास त्योच पद, अनुभव, त्याची पात्रता विचारात घेवूनच काम सांगावे लागते. या विभागाचा कामाचा जो व्याप मी आल्यापासून पाहतो आहे. वाढलेली असून वेळोवेळी आपण प्रश्न मांडलेली आहे. सभागृहात ही मांडले, काहीची दखल घेतली असेल, काहीची घेतली नसेल या सर्वांचा सारांश हाच आहे की, अशा प्रकारच्या दैनंदिन कामावर सक्षम अधिकाऱ्यांचे पर्यवेक्षक पाहिजे. महसूल उत्पन्न वाढविण्याचा विषय जबाबदारी या विभागावर ठेवलेली आहे. ४.५० कोटीचे बजेट दिले. २१ एप्रिल ते ३० सप्टेंबर पर्यंत एक कोटी वसुल झाले असते. तरी मानले असते. ०१ कोटी जास्त वसुल झाले. फार आनंद झाला असा

भाग नाही. कमी वसुल होत असेल तर त्यास गती देणे आपले काम आहे. संचिका न सापडणे, गहाळ होणे यांची दखल घेतली जाईल. सभागृहाने दिलेल्या सुचनांचा अर्थातच अंमल होईल यास शंका नाही. यानंतरही या विभागावर चर्चा होईलच. आपल्याला कल्पना नसेल किमान २-३ सक्षम अधिकारी या विभागासाठी आवश्यक आहे. मी हा प्रयत्न करेल. यासाठी सभागृहाने त्यांचे स्तरावर प्रयत्न करावे. आताच आपण एक वर्षाचा आढावा घेतला. फारसे समाधानी आपण आहात नाही, आहे अशातला भाग नाही. आढावा सुध्दा समोर येत नसे अशी स्थिती होती. एक खिडकी योजना बाबत मुद्दा उपस्थित केला त्याचे असे की, सर्वसामान्य व्यक्तीने तेथे जावे उभे रहावे. त्याचे काय म्हणणे आहे, ऐकावे तो आनंदी असेल तर ठिक आहे नसता, त्यावर चर्चा करणे अर्थ नाही. कारण तो व्यक्ती येतो. त्याला किती रिस्पॉक्स मिळाला यावर अवलंबून आहे. जी संचिका शोधण्याची गरज पडते. त्यात कागदपत्राची पूर्तता नसते. आताच स. सदस्य श्री देसरडा यांनी प्रश्न उपस्थित केला ७५% २५% चे अधिकार माझ्याकडे आहे. इतर सर्व त्या संबंधित विभागाला दिलेले आहे. ७५% २५% संदर्भात व काही प्रकरणे आयुक्तांकडे, समुह गृह योजना सोडले तर, प्रकरणे येत नाही. आर्थिक बाबीच्या संदर्भात स्थायी समिती समोर प्रस्ताव आणावा लागतो. सर्वसामन्य व्यक्तीची जी कामे असतात. त्यात बांधकाम परवानगी, एन.ओ.सी., ले-आऊट, विकासाच्या बांधकामाला मंजूरी देणे. हे सर्व अंतिम मंजूरीसाठी नगररचना विभागाकडे ठेवलेले आहे. माझ्याकडे अपेक्षित नाही. माझ्या कार्यकाळात २ संचिका आलेल्या आहे. एका ले-आऊटला मंजूरी दिलेली आहे. एका संदर्भात देता आले नाही. समूह गृह योजना हा सर्वसामान्यांचा नसतो. पारदर्शकतेने निर्णय घेवू शकले तर, सुधारले असे म्हणता येईल. या संदर्भात नगररचना विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांना माझ्या चेंबर मध्ये बोलावून सभा घेतलेली आहे. माझ्या भाषेत मी त्यांना सूचना दिल्या. त्यांनीही नम्रपणे मान्य केलेले आहे की, सामान्य व्यक्तीच्या बांधकाम परवानग्या वैयक्तिक आणि ले-आऊट मधील प्लॅटच्या बांधकाम परवानगीस दिरंगाई होणार नाही. नगररचना विभागाने जी यादी वाचून दिली. ती आपण तपासून घेवू शकता प्रत्ये प्रकरणाची नांवे त्यात आहे. त्यातही काही ठिकाणाच्या बाबतीत अनावश्यक दिरंगाई झालेली आहे. त्यात नेमकी चौकशी करता येईल. म्हणून जे रुलींग दिले त्याबद्दल चौकशीचे मुद्दे ठरवून घ्यावे. चौकशी करण्यास हरकत नसून, अधिकारी वर्ग मर्यादित असून, त्यांच्या बदल्या करण्यास आयुक्तांना किती वाव मिळेल. याचाही विचार व्हावा.

श्री संजय शिरसाठ : नगररचना विभागाकडून ६ संचिका गहाळ झालेल्या आहेत. त्याची चौकशी करुन येत्या सर्वसाधारण सभेत अहवाल द्यावा.

मा. आयुक्त : आताच सांगितले त्याची दखल घेतली जाईल. इतिवृत्तांताच्या नोंदी वरुन पुढच्या सभेत मी खुलासा करेल.

श्री स. अली मिरा सलामी : ज्या मोकळया जागा आहे, महापालिकेच्या नावाने पी. आर. कार्ड तयार नाही. त्याबाबत खुलासा झालेला नाही.

मा. आयुक्त : पी. आर. कार्ड संदर्भात तसेच खुल्या जागे संदर्भात माहिती घेतली त्याची यादी बनवली. मा. महापौरांना दाखविलेली आहे. प्रशासन विसलेले नाही.

या संदर्भात उपआयुक्त (म.) यांचे अध्यक्षतेखाली एक समिती काम करत आहे. त्या समितीचे काम आजच्या तारखेत काय झाले. त्याची माहिती उपआयुक्त (म.) देतील.

श्री जगदिश सिध्द : टीडीआर संदर्भात आज पर्यंत प्रस्ताव का आलेला नाही.

मा. आयुक्त : टीडीआर हा स्वतंत्र विषय आहे. मा. महापौर यांचेसह चर्चा केली आहे.

श्री सुनिल मगरे : चौकशी समितीचे अध्यक्ष मा. आयुक्तांना ठेवावे.

मा. महापौर : चौकशी समिती नेमलेली आहे.

श्री काशीनाथ कोकाटे : मा. महापौर यांनी रुलींग दिलेले आहे. विषय संपलेला आहे. चर्चा करु नये.

**ठराव क्र. १५१/१ :** सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, नगररचना विभागातील जे दोषी अधिकारी असतील त्यांची बदली करुन चौकशी करण्यात यावी व पालिका सदस्यांनी केलेल्या सूचनांची दखल घेण्यात यावी. यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२/२ :** सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पातील विविध विकास कामाचा आढावा घेणे प्रकरणांवर विचार विनीमय करणे.

**संवाद :**

श्री भगवान रगडे : प्रत्येक वर्षी अर्थसंकल्प तयार होतो. वेगवेगळया कामासाठी निधी ठेवला जातो. सन २०००-२००१ च्या अर्थसंकल्पात मी दिलेली कामे नारेगांव येथील शाळेला संरक्षित भिंत, ब्रिजवाडी येथे वाचनालय, बालवाडी काढणे. नारेगांव येथील कब्रस्तानला, नाला भरती देणे. तसेच ब्रिजवाडी येथील गार्डन करीता ०३ लक्ष ठेवण्यांत आले. ही कामे २०००-२००१ च्या अर्थ संकल्पात होती. ४ वर्ष उलटले कामास सुरुवात नाही. निविदा काढल्या नाही. एजन्सी फिक्स नाही. कामे का करण्यांत आली नाही. २००१-२००२, २००३-२००४ चे अर्थसंकल्पात तेच काम का होत नाही. खुलासा द्यावा. कोण जबाबदार.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी या संदर्भात खुलासा करावा.

शहर अभियंता : स. सदस्यांनी सांगितलेली कामे सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात आहे. परंतू या वर्षीचे स्पील ओव्हरची कामे ०८ कोटीची गृहीत धरली होती. ते १५ कोटी पर्यंत गेलेली आहे. ०७ कोटी वाढ झालेली आहे.

श्री भगवान रगडे : सन २०००-२००१ च्या बजेटमधील ही कामे होती. ती आतापर्यंत का झाली नाही. याचा खुलासा करावा. ०८ कोटीची कामे १५ कोटीवर गेली हा मुद्दा चालू वर्षाचा आहे. हे उत्तर देवू नये.

मा. आयुक्त : खऱ्या अर्थाने हे माझे काम नाही परंतु, मागील ०३ दिवस मी स्वत: बसून व माझे स्वीय सहाय्यक आम्ही कामाचा आढावा घेतला. यात काही चूक होत असेल तर, विभाग प्रमुखांनी दुरुस्ती करावी. हे काम ०७ ऑगस्ट पासून शिक्षणाधिकाऱ्यांकडे आहे. याचा खुलासा करावा.

श्री भगवान रगडे : विचारणा केली असता, संचिका पाठविण्यात आली. एवढेच उत्तर अधिकाऱ्याकडून नेहमी मिळते. तात्कालीन आयुक्त श्री गजभिये साहेब असतांना मी उपोषण सुध्दा केले होते.

शहर अभियंता : या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. ज्या ज्या विभागाची मंजूरी पाहिजे ती मंजूरी झाल्यानंतरच हे काम या विभागाकडून होवू शकते.

श्री राधाकृष्ण गायकवाड : मा. आयुक्त यांनी यात लक्ष देवून काम तात्काळ करण्याबाबत कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : सुरुवातीसच मी म्हटले वास्तविक हे काम माझे नव्हते. परंतू ०३ दिवस बसून मी माझ्या स्वीय सहाय्यकास सोबत घेवून कामाचा आढावा घेतलेला आहे. विशिष्ट कामामध्ये उदा. ही संचिका माझ्या रेकॉर्ड नुसार ०७ ऑगस्ट पासून शिक्षणाधिकारी यांचेकडे आहे. विभाग प्रमुख म्हणून हे काम शहर अभियंता यांचेकडे आहे. शहर अभियंता यांचेकडून हे काम आवश्यक म्हणून आले. आयुक्त किंवा आयुक्तांचे स्वीय सहाय्यक यांचेकडून संचिका उशिरा दिली जाते. असे नाही ही, प्रशासनाची काम करण्याची पध्द्त असते. प्रत्ये कामाचा मी आढावा घेतला माझ्याकडे बैठक आयोजीत होते. तेव्हा विभागप्रमुख बैठकीस येतात. परंतू जेव्हा विशिष्ट स्वरुपाचे काम का झाले नाही चर्चा होते.

श्री भगवान रगडे : या संदर्भात मी स्वतः मा. आयुक्त यांची भेट घेतली. मार्ग निघेल खुलासा मिळाला सन २०००-२००१ च्या अर्थसंकल्पातील हे काम आहे. ही कामे दलित वस्त्यात होणार आहे. गरीब लोक राहतात. हेतु पुरस्कार अशी कामे अडविली जातात. असा आरोप आहे. ज्यांच्या कडून कामात दिरंगाई झाली. त्यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करेल.

मा. आयुक्त : संचिका माझ्याकडे आल्यास मंजूरी दिल्या जाईल. जी कामे माझ्याकडे येतात. त्यांचे आकडेवारी सुध्दा माझ्याकडे आहे. मुळ उद्देश असा की, २-३ कामे बजेटमध्ये आले. ती झाली नाही. ती या वर्षी होतील. मागील काळात काय व का झाले नाही. याचे उत्तर नाही.

श्री राधाकृष्ण गायकवाड : स. सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्या. त्यांचे वार्डात ०३ वर्षात कामे होत नाही. टेंडर काढावे कामास सुरुवात करावी. आयुक्तांनी स्वतः दखल घ्यावी. खुलासा करुन श्री सोनी साहेबांना आदेशित करावे.

श्री भगवान रगडे : ०५ कामे आहेत.

सौ. रुख्मिणी शिंदे : नावानिशी बजेट ठेवले जाते. आमच्या वार्डात कामे होत नाही.

मा. आयुक्त : पानझडे सोहबाकडील काम मंजूर झाले आहे.

श्री भगवान रगडे : किती दिवसात या कामाच्या निविदा काढणार खुलासा द्यावा. आपल्या कार्यकाळात एका नगरसेवकाला कामे होत नाही म्हणून, एवढा मोठा संघर्ष करावा लागतो. सर्वसामान्य व्यक्तीचे काय हाल असतील.

श्री काशीनाथ कोकाटे : कोणत्या वार्डातील किती कामे चालू आहे, किती बाकी आहे. याची माहिती द्यावी. स. स. श्री रगडे यांनी ज्या कामाचा समावेश करण्यात सांगितले होते, त्यातील किती कामे घेण्यात आलेली आहे. किती होणार आहे. दिरंगाई का होत आहे. याचा खुलासा द्यावा. या वर्षीच्या बजेट मध्ये होणार असतील तर, त्या विषयावर चर्चा करु नये. सर्व सदस्यांच्या वार्डात कोणती कामे झाली. कोठे झाली, केव्हा झाली त्याचा आढावा घ्यावा. यावर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा.

शहर अभियंता : या कामाचे अंदाजपत्रक तयार आहे. ते लेखा विभागात जाईल. शिक्षणाधिकारी यांनी आवश्यक असल्याचे नमुद केल्यानंतरच मा. आयुक्त मंजूरी देतील. त्यानंतर टेंडर वगैरे निघेल.

मा. आयुक्त : या विषयावर जास्त चर्चा न होता, बजेट आहेत की, नाही याचा खलासा मुख्यलेखाधिकारी करतील.

श्री प्रशांत देसरडा : स्पील ओव्हेरची ८ कोटीची कामे १५ कोटीपर्यंत कशी गेली. याचा खुलासा द्यावा. पुढील वर्षात स्पील ओव्हर राहू नये. यासाठी काय प्रयत्न करणार आहे.

श्री घोडेले नंदकुमार :मुख्यलेखाधिकारी यांनी स्थायी समितीच्या बैठकित ५३३ कामे झालेली आहे व त्यावर २२ कोटी रुपये खर्च मंजूर झाले. परंतू त्यातील फक्त २८० कमाच्या निविदा काढणे एजन्सी फिक्स करणे इ. कार्यवाही झाली. या कामावर फक्त ५.५० कोटी खर्च झालेला आहे. उर्वरीत कामे केव्हा होणार आहे. २५० कामे आणखी प्रलंबीत आहे. नावानिशी बजेट आहे. सर्वांना वाटले कामे होतील.

मा. महापौर : मुख्यलेखाधिकारी यांनी या विषयासंदर्भात सविस्तर खुलसा करावा.

मुख्यलेखाधिकारी : सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पानुसार जी कामे नमूद असतात. ती ०४ कार्यकारी अभियंता यांचेकडील ९२७ कामे प्रस्तावित करण्यांत आलेले आहे. सप्टेंबर अखेर लेखा विभागातून ५३३ कामांना मान्यता देण्यात आलेली असून, यावर २२,२३,६०२ ०००/- निधी बुक करण्यात आलेला आहे. तसेच फटकळ स्वरुपाची अे-१ ची कामे ९२८ असून त्यावर २,१८,८७,०००/- खर्च झालेला आहे. तसेच रेटलिस्टची १४२५ कामे मंजूर केली. त्यावर ४९ लक्ष बुक झालेले आहे. नगरसेवक स्वेच्छा निधीतून अे-१ ची ३४४ कामे मंजूर केली त्यासाठी ८३-८४ लक्षची कामे मंजूर झालेली आहे. सर्व अे-१च्या कामाचा विचार केल्यास १२७० कामे झालेली आहे. १४२५ रेटलिस्ट त्यास २१८+८३ = ३ कोटी आणि अे-१ साठी ५० लक्ष बुक झालेले आहे. अंदाजपत्रक सादर करुन विविध लेखा शिर्षाखाली ५३३ कामे प्रस्तावित केलेली आहे. या कामावर साधारण २२.२३ कोटी बुक झाले. गत वर्षीचे ८ कोटीची स्पील ओव्हरची कामे केली असता व एप्रिल नंतर आढावा घेतला असता, ती कामे १५.८७ कोटीवर गेलेली असून, यात जवळपास ८ कोटी रुपये वाढ झालेली आहे. तयार होणारे अंदाजपत्रक हे फेब्रुवारी, मार्च महिन्यातच तयार केले जाते. यात अंदाजित रक्कमा घेतो. स्पील ओव्हरची ८ कोटीची कामे वाढल्यामुळे नविन कामे कमी करण्याच्या दृष्टीनेच जुलै महिन्यानंतर स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केलेला होता. कालच्या स्थायी समिती बैठकीतच त्यावर सविस्तर चर्चा झाली व कोणतेही काम कमी करण्यास नकार दिली. प्रशासनाची अडचण अशी आहे की, बजेट १४९ कोटीचे असून, त्या धरतीवरच २२.३३ कोटीच्या कामाला आतापर्यंत मान्यता देण्यात आली. २२.३३ कोटी व स्पील ओव्हरची १५.८७ कोटीच्या कामांना म्हणजेच ३८ कोटीच्या कामंना आजच मंजूरी झालेली आहे. या वर्षीच्या कामास ४४ कोटी रुपये विविध कामासाठी ठेवलेले असून आज रोजी फक्त ६.५१ कोटीचीच कामे विविध लेखा शिर्षकातील करता येतील. बरेच लेखा शिर्षक जेस रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, अशा एकूण २८ लेखा शिर्षकातील तरतुद संपलेली आहे. स्पील ओव्हरची कामांची रक्कम वाढल्यामुळे जसे नविन इमारत, बॅडमिंटन हॉल, वाचनालय अशा कामास तुर्त स्थगती दिलेली होती जे की, स्थायी समितीमध्ये प्रस्ता दिलेला होता व अशा इमारतीसाठी लागणाऱ्या रक्कमा इतर हेडमध्ये घेवून विकास कामे करु असे अपेक्षित होते. अर्थसंकल्प १४९ कोटीचा असून, त्याप्रमाणेच कामांना मान्यता देत आहे. त्यापेक्षा जास्त बजेट विचारात घेवून, कामास

मान्यता देता येणार नाही. स्थायी समिती समोर हा प्रस्ताव ठेवला होता. त्यावर सविस्तर चर्चा झाली. स्थायी समिती मार्फत तो प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर येणारच आहे. नविन जी कामे प्रस्तावित केलेली आहे. ती कामे कमी करावी लागणार आहे. संपूर्णतः कामे होणार नाही. जी कामे करणे आवश्यक होते ती कामे प्राधान्याने मंजूर करुन त्यावर २२.३३ कोटी रुपये बुक झालेले आहे. स्पली ओव्हरचे १५.८७ कोटी असे एकूण ३८ कोटी रुपयाची कामे मंजूर झालेली आहेत. उर्वरीत ६ कोटींचा जो निधी उपलब्ध आहे ती कामे करता येतील. परंतू नविन कामासाठी ज्या लेखा शिर्षकातील निधी संपलेला आहेत. तो कामे या आर्थिक वर्षात करता येणार नाही. हीच भूमिका प्रशासनाची राहणार असून, स्पील ओव्हर वाढण्याचे कारण म्हणजे गेल्या आर्थिक वर्षात १२८ कोटीचा अर्थसंकल्प होता. १०५ कोटी हा सुधारित करण्यांत आला. ९९.८७ कोटी वसुली झाली. यात जवळपास २८ कोटीची तुट निर्माण झालेली होती. अर्थसंकल्प १२८ कोटीचा होता त्यास अनुसरुन विकास कामे टाकण्यात आलेली होती. २८ कोटी तूट आल्यामुळे अपेक्षीत वसुली न झाल्यामुहे १६ कोटीची कामे स्पील ओव्हरमध्ये आलेली होती. त्यावेळी जकातीचे खाजगीकरण अपेक्षीत होते. तसेच शासनाकडून विशेष अनुदान प्राप्त होणार होते ते सुध्दा प्राप्त झालेले नाही. १०० कोटीवर गतवर्षीचे बजेट आला व त्यावेळेस जी कामे करणे प्राधान्याने गरजेचे होते त्यास मान्यता दिली. म्हणून १६ कोटीचे स्पील ओव्हर वाढलेले आहे. ज्यावेळेस अर्थसंकल्प तयार होतो, त्यावेळेस शासनाचे ३१ मार्च पर्यंत काही तरी प्रमाणात अनुदान प्राप्त होईल, अपेक्षित असते. कुटूंब कल्याण नियोजनचे अनुदान शासनाने ४ वर्षापून दिलेले नाही. ते येण्याचे अपेक्षित होते. त्यामुळे ८ कोटीची कामे ठेवलेली होती. अनुदान प्राप्त न झाल्यामुळे ८ कोटीची स्पील ओव्हरची कामे वाढलेली आहे. बऱ्याचशा कामाचे पेमेंट एप्रिल-मे महिन्यातच करावे लागले. ८ कोटीचे स्पील ओव्हरचे कामात रक्कमा वाढणार असे माहिती असते. तर निश्चितच नविन कामे ८ कोटीचे नमुद केले नसते. जून अखेर आढावा घेतला असता, सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वीच हे लक्षात आल्यानंतर ४ जुलै २००३ रोजीच तसा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. त्यावर चर्चा होवून कामे कमी करता येणार नाही. असा निर्णय झाला. परंतू प्रशासनास सुध्दा १४९ कोटीचे अर्थसंकल्प गृहीत धरुनच मान्यता देता येईल. यापेक्षा जास्तीच्या कामांना, मंजूरी देता येणार नाही.

श्री भगवान रगडे : माझ्या प्रभागातील इमार लेखा शिर्षाखालील कामे थांबवून ठेवलेली होती. श्री विकास जैन यांच्या वार्डात बहुउद्देशीय हॉलचे इमारतीचे काय झाले, माझ्या वार्डात का झाले नाही. श्री विकास जैन यांचे वार्डातील कामही त्या अर्थसंकल्पात होते. ते कसे झाले. आमचे का होत नाही. दोन्ही कामे का नाही. आमच्या वेळेसच कायदा त्यांना कायदा लागू नाही.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : काही नगर सेवकांच्या वार्डात २-३ कोटीपर्यंत कामे झालेली आहे. माझ्या वार्डात काम मंजूर झालेले नाही.

मुख्यलेखाधिकारी : या आर्थिक वर्षात इमारतीच्या बांधकामासा एकही निधी उपलब्ध करुन दिला नाही.

मा. महापौर : स. स. श्री भगवान रगडे यांचे वार्डातील कामे लवकर करण्यात यावे.

श्री भगवान रगडे : कामे होण्यासाठी मी आमरण उपोषण, आंदोलन केले. दलित वस्त्यात जाणून बुजून कामे होत नाही. हा माझा आरोप आहे. हे बरोबर नाही. सन २०००-२००१ च्या अर्थसंकल्पात माझ्या वार्डातील कामा बरोबरच श्री विकास जैन यांचेही वार्डातील इमारतीची कामे समावेश होती. त्यांचे वार्डातील कामे कशी करण्यात आली व माझ्या वार्डातील का प्रलंबित राहिले.

मुख्यलेखाधिकारी : ज्या लेखा शिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. मा. आयुक्तांकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. अद्याप झालेली नाही.

श्री घोडेले नंदकुमार : एकूण ५३३ कामांना मान्यता दिली. निविदा फक्त २८० कामाच्या निघालेल्या आहे. उर्वरित कामाची काय स्थिती आहे, त्याचा खुलासा करण्यात यावा.

मा. आयुक्त : स. स. श्री रगडे यांचे वार्डातील जी कामे करावयाची बाकी आहे, तरतुद उपलब्ध असेल तर संचिका तपासून तात्काळ मान्यता देण्यात येईल. आपण स्वतः माझ्याकडे यावे.

सौ निखत परविन : माझ्या वार्डातील कामे बजेटमध्ये झालेली आहे. सन २००० च्या अर्थसंकल्पातील कामे यात आहे. माझा वार्ड पूर्ण कमर्शियल आहे. त्यामुळे रस्ता रुंदीकरण होत नाही. रस्ता रुंदीकरणाची संचिका मंजूर होत नाही. दवाखाना नाही, शाळा नाही. रोड वायडींग संचिका दरवर्षी मंजूरीस जाते. बजेट नाही. म्हणून परत येते. सदर रस्ता ५० फुटाचा असून सध्या २० फुटाचा आहे. या संदर्भात मा. आयुक्त यांना पत्र दिलेले आहे.

मा. आयुक्त : आपण जी चर्चा करता त्या संचिके बाबत आपणांस प्रशासनाने उत्तर दिलेल आहे. तेच आपले उत्तर आहे. सभागृहात तेच बोलावे. केवळ माझ्याकडे आले म्हणून पून्हा तपासणी करावयास सांगितलेले आहे.

सौ. निखत परवीन : स्पील ओव्हरची कामे फक्त पुरुष पालिका सदस्यांच्या वार्डात होत आहे. महिला पालिका सदस्यांच्या वस्तीत होत नाही.

मुख्यलेखाधिकारी : बजेट संपलेले आहे. जी कामे अदांजपत्रकात आहे, परंतू बजेट संपले असेल तर, ती कामे करता येणार नाही. अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध नसतांना मला शिफारस करता येणार नाही. एकूण २८ लेखा शिर्षकातील रक्कमा संपलेल्या आहे. त्यात या रस्ता रुंदीकरण काम येत असेल तर करणे शक्य नाही. जे काम अंदाजपत्रकात आले. त्यास तरतुद नसतांना मंजूरी देणे योग्य होणार नाही.

सौ निखत परवीन : महिला बाल कल्याण समितीचे बजेटमध्ये तरतुद केलेली खर्च करण्यांत आलेली नाही. कोणतीही कामे केली नाही. संचिकेच्या बाबतीत माहिती विचारल्यास बरोबर उत्तर मिळत नाही. २ वर्षापूर्वी किती खर्च झाला, चालू वर्षाचा किती करण्यांत आला. खुलासा द्यावा.

मुख्यलेखाधिकारी : महिला बाल कल्याण समितीच्या निधीच्या संदर्भातील जेवढी प्रकरणे माझ्याकडे आलेली आहेत. त्यास मान्यता दिलेली आहे. आता एकही प्रलंबित नाही.

मा. आयुक्तः महिला व बाल कल्याण समितीचे वेगळे आहे. श्री जावरे पाहतात. सभेची तारीख ठरवून घ्या. मी स्वतः पुढील बैठकीत उपस्थित राहील. ती चर्चा येथे नको. महिला बाल कल्याण समितीचा जो निधी आहे, तो किती खर्च झाला ते प्रकल्प संचालक यांना महिती आहे.

सौ सिद्यीकी नईम सुलताना : ठराविक भागातच कामे होत आहे. असे मला दिसून येते. रोषण गेटच्या कामासाठी बजेट ठेवण्यात आले. रोषणगेट येथील कामासंदर्भात ५ वर्षापासून एक संचिका या विभागातून दुसऱ्या विभागात जाते. एन. ओ. सी. साठी मला स्वत: जावे लागले. विधी सल्लागार यांचेकडे संचिका थांबून आहे. मजीदच्या बाजूला ड्रेनेज लाईनचे पाणी वाहते. कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. तसेच या वार्डातील शाळेतील मुलांना बसण्यासाठी पट्टया नाही. रोषणगेट ते कटकट गेट पर्यंत रस्त्यांचे काम झाले नाही. या संदर्भात अनेक वेळा पत्र दिले. शाळेत इतर व्यवस्था नाही. पत्रानुसार कार्यवाही झालेली नाही. खुलासा पाहिजे.

मा. आयुक्त : संबंधित अधिकारी यांनी वरील कामाचे संदर्भात बजेट तरतुद उपलब्ध असेल तर तात्काळ काम होण्याबाबत कार्यवाही करावी.

सौ खरात कुसूमबाई : सन ०१-०२ सिध्दार्थनगर भागात एका रस्त्याचे काम चालू केले, टेंडर निघाले एका ठेकेदारस काम दिले गेले. रस्ते खोदून ठेवले. वृत्तपत्रात सुध्दा बदनामी कारक बातमी आलेली होती. माझ्या घरासमोर येवून पाणी साचते मोठमोठे खड्डे करुन ठेवले लहान मुले पडतात. जखमी झाले. अद्याप रस्त्याचे काम का थांबून आहे. सिध्दार्थनगर भागात या पाण्यामुळे अनेक गरीब नागरीकांच्या घरांना धोका असून जीवीत व वित्त हानी होवू शकते. ५०-५० घरे बसणार, लोक मरतील. या संदर्भात वारंवार १ वर्षापासून संचिका लेखा विभागात जाते. यास जबाबदार कोण? अधिकाऱ्यांकडे विचारणा केल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. अशी व्यवस्था महाराष्ट्रात कोठेचे नसेल. इतर वार्डात ५ लक्षची कामे केली माझ्या वार्डात एकही काम केलेले नाही. ५ वर्षापासून कामगारांची मागणी करत आहे. अधिकाऱ्याच्या घरी कामगार जास्तीचे दिले जातात. परंतु जनतेच्या कामासाठी कर्मचारी दिले जात नाही. एक मजूर गटार काढतो, गाडी ओढतो. घाण घेवून जातो. अद्याप मजूर कर्मचारी दिलेले नाही. एक मजूर संपूर्ण वार्डाची घाण काढू शकेल का? कर्मचारी नाहीत का? या सर्व बाबतीत खुलासा करावा. बजेट नाही असे सांगण्यात येते. अरेतुरेची भाषा अधिकारी वापरतात. कामे तर होत नाही.

मा. महापौर : कोणते अधिकारी अरेतुरेची भाषा केली. खुलासा करावा. तसे त्यांना ताकीद देता येईल.

मुख्यलेखाधिकारी : आताच स. स. सौ खरात यांनी अधिकाऱ्यांच्या बाबत बोलते. त्या संदर्भात खुलासा करतो की, स. स. सौ. खरात व त्यांचे पती माझ्या दालनात आले होते. तरतुद उपलब्ध नाही. असे उत्तर दिल्यापतींना बोलण्याचा अधिकार नाही. तसे जी. आर आहे.

श्री काशीनाथ कोकाटे : स. सदस्या सौ. खरात यांचेकडील रस्त्याचे काम कधी करणार?. बजेटमध्ये सामाविष्ट करण्याबाबत कार्यवाही करावी.

शहर अभियंता : पावसाळयाचे दिवस होते. म्हणून हे काम होवू शकले नाही. आता सुरु करुन दोन ते अडीच महिन्यात काम पूर्ण होईल. दिवाळीनंतर सुरु करु. गटाराचे कामात बजेटमुळे अडचण निर्माण झाली.

सौ. खरात कुसूमबाई : गटारीचे काम व्हावे. २०-२५ वर्षापासूनची गटार आहे. लोकांच्या घरात पाणी मुरते घरांच्या भिंती पडण्याची शक्यता आहे.

मा. आयुक्त : जेव्हढी कामे करता येतील ती घेण्यात येईल. अधिकाऱ्यांना सूचना करतो. स. स. श्री सूचना केल्याप्रमाणे ती कामे विचारात घ्यावा.

श्री संजय शिरसाठ : मागील स्थायी समिती सभेच्या बैठकीत मुख्यलेखाधिकारी यांनी कामच्या संदर्भात यादी वाचून दाखविली त्यामध्ये असे म्हटले की, ०८ कोटीची स्पील ओव्हरची कामे १५ कोटीपर्यंत गेली. यादी वाचत असतांना मा. आयुक्तांना धक्का बसला की, अशी कामे या महापालिकेत होतात. त्यावर मा. आयुक्तांनी जबाबदारीने असा खुलासा केला की, रेटलिस्ट ए-१ च्या कामामध्ये कुठेतरी लिकिजेस आहे असा समज आहे. म्हणून मा. आयुक्तांचे मी अभिनंदन करतो की, खरेखुरे बोलणारे आयुक्त या महापालिकेस मिळाले. मा. आयुक्तांनी स्टेटमेंट केले. परंतू कार्यवाही करण्याची जबाबदारी सुध्दा त्याचीच आहे. हे विसरुन चालणार नाही. आताच मुख्यलेखाधिकारी यांनी सांगितले की, ए-१ ची ९२५ तर रेटलिस्टची १४२५ इतकी कामे झालेली आहे. एकूण २४०० कामे झालेली असून, एकूण वार्ड ८३ आहे. सरासरी प्रमाण काढल्यात एका वार्डात जवळपास ३० कामे झालेली आहे. असे म्हणणे योग्य होईल. माझ्या माहितीप्रमाणे सिडको हडकोतील वार्डात फक्त पाणी पुरवठया संबंधीची कामे होतात. एकूण वार्डातून १६ वार्ड वजा केल्यास ६५ वार्ड राहतात. यातूनही अनाधिकृत वस्त्यात कामे होत नाही. असे वार्ड वगळल्यास ४५ ते ५० वार्ड येतील. या वार्डात विकास कामे होत आहे. यावर खर्च ३.५० कोटी झालेला आहे. २४०० कामाच्या संचिका एक गठ्ठा केलयास किती मोठा ढेर होईल. २४०० विकास कामे ६ महिन्यात केली. कोणत्या वार्डात केली याबद्दलचा काहीही खुलासा प्रशासनाकडे नाही. माझ्या माहितीप्रमाणे एक-एक वार्डामध्ये ही बोगस कामे फक्स बिल रेकॉर्ड केलेले आहे. कामे झालेली नाही. आजही माझ्या वार्डात ए-१ ची कोणतीही कामे केलेली नाही. अधिकाऱ्यांनी उठून सांगावे. झालेली २४०० कामे नेमकी कोणत्या वार्डात झाली. याचा खुलासा पाहिजे. आताच सांगण्यात आले की, बजेटमध्ये ०८ कोटी कमी (करटेल) करावे लागेल. सर्व कार्यकारी अभियंता यांचे विभागाची कामे त्यात समाविष्ट आहे. परवाच मला माहिती हाती आली की, कदाचित ती चुक ही असू शकते. याबद्दल मा. आयुक्तांना जास्त माहित असेल, एका इंजिनिअरने बोगस कामे केले म्हणून त्यांचे विभाग प्रमुख कार्यकारी अभियंता यांनी मा. आयुक्तांकडे त्यांना निलंबीत करावे म्हणून अहवाल दिला आहे. एवढे गंभीर प्रकरण होत असतांना सभागृहासमोर कामे कमी करण्यांबाबत प्रस्तावित होते. एकीकडे अर्थसंकल्पातील कामे करण्याबाबत स. सदस्यांनी सभागृहात मुद्दा उपस्थित करुन कामे करण्याचा प्रयत्न करायचा चार-सहा महिने झाले त्यांनतर कामे कमी करण्याचा प्रस्ताव येतो. त्यामुळे स. सदस्य नाराज होतात. कामे होत नाही म्हणून, त्याची नाराजी आहे. म्हणून मा. आयुक्तांना विनंती की, जी ३.५० कोटीची कामे झालेली आहे. कोणत्या विभागाची कोणत्या वार्डात ए-१ रेटलिस्ट किती कामे झालेली आहे. याची सर्व माहिती सर्वसाधारण सभेत यावी. एका-एका वार्डात ए-१ ची २०० चे वर कामे झालेली असेल, भ्रष्टाचार होत असेल. वसुलीचा विचार केल्यास आतापर्यंत ४७ कोटी वसुल झालेले आहे. ६० कोटी पाणीपट्टी, मालमत्ता कराच्या माध्मातून वसुल करावयाचे होते. फक्त १३ कोटीच वसुल झाले. विनंती कि,

ए-१ व रेटलिस्ट ची कामे कोणत्या वार्डात झाली. असे आदेश काढून संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करुन येत्या सर्वसाधारण सभेत सविस्तर माहिती ठेवण्यात यावी.

मा. आयुक्त : मी स्थायी समितीच्या बैठकीत असे विधान केले होते की, कामाची संख्या व आकडेवारी कारण खर्च कुठे झाला. याचा तपशील कोणत्याही सभागृहात मागविला जातो. म्हणून मोठया कामांची संख्या व रक्कम पाहता त्याचे परिक्षण होण्याची गरज आहे, असे माझे वाक्य आहे. स. सदस्य यांनी सूचना केली. तसे माझे पत्र त्या त्या विभागास आजच पाठविण्यात आलेले आहे.

श्री सुरजितसिंग खुंगर : आतापर्यंत कोणतेही अंदाजपत्रक झालेले नाही. एका कामाच्या निकृष्ट दर्जा बाबत कार्यकारी अभियंता श्री. पानझडे यांनी चौकशी केली, कामे होतात की, नाही या बाबतीत नेहमी नेहमी विचारायची गरज नसावी. एक ड्रेनेजचे काम होते, त्या कामासंबंधी मा. पालकमंत्री यांनी भेट दिली होती. दोन्ही कामे पाहिली होती. एकही काम झालेली नाही. टाळाटाळी होत आहे.

मा. आयुक्त : माझ्या माहितीप्रमाणे एक काम झालेले आहे. संबंधित अधिकारी यांनी स. सदस्य श्री खुंगर यांचा मुद्दा लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

श्री रतनकुमार पंडगळे : आताच ए-१, रेटलिस्ट कामाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित झाला. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सभागृहातच खुलासा घ्यावा.

श्री संजय शिरसाठ : अत्यंत जबाबदारीने मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. ए-१, रेटलिस्टच्या समावेश करुन एकूण २४०० कामे झाली. ३.५० कोटी रुपये खर्च झाले. सदर कामे अनाधिकृत वार्डात झालेली नाही. तसेच सिडको हडको भागातील १६ वार्डात सुध्दा नाही. या वार्डात काम न होता, २४०० कामाची यादी होते. कशी हा मुद्दया महत्वाचा आहे. कोणत्या वार्डात किती कामे झाली व कोणती कामे झाले याची माहिती सर्व सदस्यांना असावयास पाहिजे. तरच कुणीही आरोप करणार नाही. कोणत्या वार्डात किती ए-१, रेटलिस्ट कामे झाली. याची सविस्तर माहिती सभागृहासमोर द्यावी. बोगस कामे होण्याच्या प्रकारास आला बसेल. कोणत्या वार्डात किती कामे झाली. हे जनतेसमोर जाऊ द्यावे. यादी प्रसिध्द होऊ द्या.

मा. महापौर : स. सदस्य श्री. खुंगर यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करावा.

कार्य अभियंता : साईनगर येथील कामाचे अंदाजपत्रक झालेले आहे. जे काम स. सदस्य श्री खुंगर यांनी दाखविलेले आहे, ते अंदाजपत्रकाच्या व्यतिरिक्त असल्यामुळे मोजमाप घेवून अंदाजपत्रक तयार करुन संचिका मान्यतेसाठी पाठविण्यात आलेली आहे. सध्या संचिका कुठे आहे. हे मला सांगता येणार नाही.

श्री सुरजितसिंग खुंगर : विनंती मा. महापौरंनी पूर्ण संचिका पाहावी. चुकीची माहिती देण्यात येत आहे. पहिल्यांदा मी जे काम न करण्याबाबत आक्षेप घेतला होता, तरी सुध्दा नाल्यामध्ये संरक्षित भिंत करुन नाला अरुंद केला.

मा. आयुक्त : अशी कामे मागे रहायला नको. संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातील.

सौ लिलावती घायतिलक : वार्ड क्र. १२ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाचे बाजूचे एक वॉल कंपाऊडंचे काम २००१ मध्ये सुरु केले. ग्रिल बसविण्यांत आले. आता फक्त गेट बसवायचे बाकी आहे. अर्धवट कामे माझ्या वार्डात

होतात, गेट बसविल्यास वृक्षोरोपनासारखा कार्यक्रम राबविता येईल. गेल्या वर्षी सुध्दा कार्यक्रम घेता आला नाही. या गेटसाठी जास्त खर्च येणार नाही. तसेच माझ्या वार्डात यापूर्वी मी २० मजूर कामासाठी मागवून घेतलेले होते. फक्त १२ इतर मजूर काम करतात. कचरा वाहून नेण्याची गाडी सुध्दा मागणी केलेली होती. एकच वेळेस गाडी येत उर्वरित कचरा दुसऱ्या दिवसापर्यंत पडलेला असतो. स्वच्छता होण्याच्या दृष्टीने कचरा वाहून नेण्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यांत यावी. तसेच चिकलठाणा विमान तळापासून संजयनगर, जालना रोड या भागात काही प्रमाणात सौदंर्यीकरण करण्यांत यावे. तसेच माझ्या वार्डात राष्ट्रमाता स्व. इंदिरा गांधी यांचा पुतळा बसविलेला आहे. याची फारच दुर्दशा झोलेली आहे. सदर पुतळयाचे तांड उत्तर दिशेकडे दर्शविलेले आहे. ते पूर्व दिशेकडे करण्यांत यावे. म्हणून ठराव पास केला. मंजूर होऊनही कार्यवाही होत नाही. या संदर्भात प्रशासनाने जातीने लक्ष घालावे अशी सूचना आहे.

श्री. स. अली मिरा सलामी : पहिल्यांदा असे होत आहे की, बजेटवर तीन-तीन वेळेस चर्चा करण्याची वेळ येत आहे. आणखी रिवाईज बजेट पुन्हा समोर येणारच आहे. यात शंका नाही. ज्यांच्या वार्डात कामे झाले नाही. त्यांनी मुद्दा उपस्थित करुन मत मांडलेले आहे. तरतुद नाही, म्हणून आता कामे करता येत नाही. असे प्रशासनातर्फे सांगण्यात येत आहे. आतच मुख्यलेखाधिकारी यांनी ए-१ च्या कामच्या संदर्भात खुलासा केला व त्यावर स. सदस्यं श्री शिरसाठ यांनी टिप्पणी केली. त्यासाठी मी सहमत आहे. ए-१ तसेच रेटलिस्ट मिळून एका वार्डात २०० कामे होत आहे. काही वार्डात एकही काम नाही. म्हणून कोणत्या वार्डात कोणती कामे झाली. याची माहितीचा अहवाल देणे आवश्यक आहे. विकास कामे होण्यासाठी पक्षपाती पणाचे धोरण अवलंबविले आहे. असे वाटते. काही वार्डाचा विकास झाला काही वार्डातील थांबून ठेवला. म्हणून जी कामे अर्थसंकल्पात नमूद केलेली आहेत. ती कामे करणे गरजेचे आहे. बंधनकारक आहे. यास सभागृह जबाबदार प्रशासन आहे. विकास कामे होण्याच्या दृष्टीने चर्चा झाली. वसुलीच्या संदर्भात कुणीही आवाज उठविला नाही. जे उद्दीष्ट ठरवून दिले जाते. ते पूर्ण का होत नाही. वारंवार का त्या संबंधी चर्चा घडवून आणखी लागते. स्थानिक वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या की, महापालिकेला शासनाने ५ कोटी रुपये अनुदान दिले. सदर अनुदान रक्कमेतून एम.एस.ई.बी. चे जे थकीत बील महापालिकेकडे आहे. ते यातून देण्यात यावे असे शासनाचे निर्देश आहे. जर विकास कामासाठी पैसा कमी पडत असेल तर यातील २ ते २.५० कोटी रक्कम विकास कामासाठी घ्यावी. तसेच कर निर्धारणासाठी मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी १.५० ते २ कोटी रुपये खर्च करुन खाजगी संस्थेकडून सर्वेक्षणाचे काम करणार आहे. विकास कामासाठी पैसा नसेल तर सर्वेक्षण करण्याची गरज नाही. अगोदर विकास करावा. महापालिकेस अधिकारी घटना कामाला लावावे. खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षणाचे काम न करता महानगरपालिकतर्फे करण्यांत यावे. कामाच्या संदर्भात तरतुद करणे, विकास काम करणे, तरतुद उपलब्ध करण्यासाठी काय उपाययोजना करण्यात ही जबाबदारी प्रशासनाची आहे. बजेट मध्ये नमुद केलेली सर्व कामे झाली पाहिजे. नसता तरतुद उपलब्ध होत नाही. विकास कामे करु शकत नाही.

बजेट कोलॅप्स झाले असे घोषित करावे. काम होत नाही, याची जबाबदारी सभागृह व सदस्यांवर ठेवू नये.

श्री काशीनाथ कोकाटे : अर्थसंकल्पामध्ये हेडवाईज बजेट ठेवण्यात आलेले आहे. यातूनही काही वार्डात खर्च करण्यात आलेला आहे. काही वार्डात झालेला नाही. म्हणून चारही कार्यकारी अभियंता यांना प्रशासनाने आदेशित करुन कोणत्या वार्डात किती व कोणती कामे झालेली आहे. याची माहिती घ्यावी. जेणेकरुन रिवाईज बजेट सादर झाल्यास त्यात सुधारणा करुन ज्या वार्डात कामे झालेली नसतील तेथे करता येतील. आताचे अधिकाऱ्यांनी खुलासा केला की, स्पील ओव्हरची ८ कोटीची कामे १५ कोटीपर्यंत गेली यावर्षी स्पील ओव्हरची कामे कमी कशी करता येईल. यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. येणारे पूढील वर्ष हे निवडणुकीचे आहे. या वर्षीचे जे १४८ कोटीचे बजेट ठेवण्यांत आले तेवढी वसुली होणे शक्य नाही. प्रशासनाने १०.०० टक्के इतके कमी बजेट स्थायी समितीसमोर सुचविलेले होते. यापेक्षा जास्तही कपात करावी लागली तरी, चालेले परंतू सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन स्पील ओव्हरची कामे भविष्यात कमी कसे करता येतील. याकडे लक्ष द्यावे. तसेच जनतेसाठी करावी लागणारी जी कामे आहे ती पदाधिकाऱ्यांना करावी लागतात. अशा वेळी ज्या सुखसुविधा पुरविल्या जातात त्या अपूर्ण असेल तर त्या देण्यात याव्यात विरोधी पक्ष नेता यांचे वाहन खराब झालेले आहे. नवीन वाहन देण्यात यावे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : ज्या पध्दतीने स. सदस्यांनी भावना व्यक्त केली. किती कामे झाली, त्याची यादी द्यावी. विरोधी पक्षनेता यांच्या गाडीसाठी तरतुद ठेवावी.

मा. महापौर : कोणत्या वार्डात किती कामे झालेली आहे. त्या संबंधीची खर्च यादी त्यात ए-१ रेटलिस्टची कामे किती ती नमुद करावी. कामाची यादी सभागृहासमोर ठेवावी. मा. आयुक्तांनी चौकशी करावी तसेच विरोधी पक्षनेता यांचे वाहन खराब झालेले आहे. त्यांना नवीन वाहन देण्यात यावे.

**ठराव क्र. १५२/२ :** सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रभागनिहाय ए-१ रेटलिस्टची जी कामे झालेली आहेत. त्याची माहिती सभागृहास देण्यास आणि या संदर्भात पालिका आयुक्तांनी चौकशी करण्यास व महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेता यांना नविन वाहन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०-१०-२००३ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**मंगळवार दिनांक २०-१०-२००३ रोजी मा. महापौर, सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची "विशेष सर्वसाधारण सभा" महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी १२.२० "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त, संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | -//- |
| २) स. स. श्री. भाऊसाहेब ताठे | -//- |
| ३) स. स. श्री. राधाकृष्ण गायकवाड | -//- |
| ४) स. स. श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ५) स. स. श्री. वाणी ठकूजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहेमद | -//- |
| ८) स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| ९) स. स. श्री. इंगळे शंकुतला सांडूजी | -//- |
| १०) स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ११) स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १२) स. स. सौ. लिलावती बाळसाहेब घायलिक | -//- |
| १३) स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १४) स. स. श्री. शिंदे रुख्मिणी राधाकिसन | -//- |
| १५) स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १६) स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १७) स. स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १८) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| १९) स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २०) स. स. सौ. साधना गणेश सुरडकर | -//- |
| २१) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २२) स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २३) स. स. श्री जांबिदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २४) स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २५) स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २६) स. स. श्री. जैन विकास रतनलाल | -//- |
| २७) स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २८) स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| २९) स. स. श्री. डॉ. कराड भगवान किसनराव | -//- |
| ३०) स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३१) स. स. श्री. मगरे सुनील यादवराव | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३२) | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| ३३) | स. स. श्री. रतनकुमार पंडगळे | -//- |
| ३४) | स. स. श्री. नासेरखान सरदारखान | -//- |
| ३५) | स. स. श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक | -//- |
| ३६) | स. स. श्री मोहन मेघावाले | -//- |
| ३७) | स. स. सौ खरात कुसूमबाई दौलत | -//- |
| ३८) | स. स. सौ नुसरत बानो फिरोजखान | -//- |
| ३९) | स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव | -//- |
| ४०) | स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | -//- |
| ४१) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| ४२) | स. स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय | -//- |
| ४३) | स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| ४४) | स. स. श्री. प्रशांत सुभाष देसरडा | -//- |
| ४५) | स. स. श्री अ. कादीर मौलाना सय्यद | -//- |
| ४६) | स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | -//- |
| ४७) | स. स. सौ. संगिता बाळू मैंद | -//- |
| ४८) | स. स. सौ. शाहीन जफर व महेमुद जफर | -//- |
| ४९) | स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण | -//- |
| ५०) | स. स. सौ चंद्रभागाबाई दाणे | -//- |
| ५१) | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| ५२) | स. स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान | -//- |
| ५३) | स. स. श्री. गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहेमद | -//- |
| ५४) | स. स. श्री. मीर हिदाय अली मीर बसालत अली | -//- |
| ५५) | स. स. सौ सिद्यीकी नईम सुलताना | -//- |
| ५६) | स. स. सौ. सुलताना बेगम चाँदखा | -//- |
| ५७) | स. स. श्री सलिम पटेल समशेर पटेल | -//- |
| ५८) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५९) | स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | -//- |
| ६०) | स. स. सौ. बबिता सुभाष कागडा | -//- |
| ६१) | स. स. श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी | -//- |
| ६२) | स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज | -//- |
| ६३) | स. स. सौ. निखत परवीन ऐजाज अली. | -//- |

**स्विकृत सदस्य :**

१) स. स. श्री सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स. स. श्री भगवान देविदास घडामोडे.
३) स. स. श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स. स. श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन
५) स. स. सौ. सलमा बानो मीर मो. अली.

**संवाद :**

श्री राधाकृष्ण गायकवाड : कालच खडकेश्वर भागात बॉम्बस्फोट झाला. असा प्रकार शहरात होणे बरोबर नाही. पोलीस विभागाने या बाबत ताबडतोब शोध घ्यावा व संबंधित जे कुणी यात गुन्हेगार असतील, त्यांचेवर कडक कार्यवाही करावी या घटनेचा निषेध करण्यांत येतो.

डॉ. भागवत कराड : कालच या शहरात बॉम्बस्फोट घडवून आणला ऐन दिवाळीच्या वेळेस अशी घटना होणे बरोबर नाही. यापूर्वी एक वेळेस असा प्रकार झालेला होता. स. स. श्री राधाकृष्ण गायकवाड यांनी या घटनेचा निषेध केलेला आहे. त्यास माझे अनुमोदन आहे व जे कुणी यातील गुन्हेगार असतील, त्यांना त्वरील अटक झाली पाहिजे.

श्री जयवंत ओक : निषेधास माझे अनुमोदन आहे. निषेध करतो. निषेध शासनास व पोलीस विभागास कळवावा.

श्री पांडूरंग तायडे : काल जो बॉम्बस्फोट घडवून आणला. या शहराला काळीमा फसणारी ही घटना आहे. या शहरात सर्व धर्माचे लोक अत्यंत सलोख्याच्या वातावरणात राहत असतांना काही असंतोषी लोकांनी हेतू पुरस्कार या शहराचे वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यांनी घटना घडवून आपली त्यांचे या सभागृहाच्या तसेच माझ्या पक्षाच्या वतील जाहीर निषेध करतो. जे यात गुन्हेगार असतील त्यांना शासनाने तातडीने शोध घेवून त्यांचेवर कडक कार्यवाही करावी.

श्री नंदकुमार घोडेले : काल झालेल्या बॉम्बस्फोटच्या घटनेचा मी निषेध करतो. विनंती की, या बॉम्बस्फोट प्रकरणांमुळे शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रत्यक्ष ज्या ठिकाणी घटना घडली तेथे धरणे, आंदोलनाचा कार्यक्रम घेणार आहोत. म्हणून सर्व सदस्यांना जाणे गरजेचे आहे. म्हणून आजची सभा तहकूब करावी.

श्री राधाकृष्ण गायकवाड : स. सदस्य श्री घोडेले यांनी जी मागणी केली, त्यानुसार आजची सभा तहकुब करावी.

श्री रतनकुमार पंडगळे : सभागृहाला विनंती करतो. कामगांराचा यात बोनसचा प्रश्न आहे. नेमकी ४ दिवसांवर दिवाळी आलेली असून, कामगांरानी या शहराची चांगल्याप्रकारे स्वच्छता ठेवल्याबद्दल शासनाकडून बक्षीस मिळविलेले आहे, म्हणून अशा कामगारांना बोनस देणे अत्यंत आवश्यक आहे. बोनस बाबत चर्चा करावी. नंतर सभा तहकुब करावी.

मा. महापौर : ऐन दिवाळीच्या सणामध्ये या शहरात बॉम्बस्फोट घडवून आणला. त्या बाबतचा हे सभागृह निषेध करीत आहे. बोनस बाबत मा. आयुक्त यांनी सभागृहाला खुलासा द्यावा.

मा. आयुक्त : स. सदस्यांनी बोनस किंवा सानुग्रह अनुदान याबद्दल मुद्दा उपस्थित केलेला आहे. याबाबत कायदेशीर वस्तुस्थिती यापूर्वीचे सभागृहाला पाठविण्यात आलेली आहे. मुख्यलेखाधिकारी यांनी याबाबतची वस्तुस्थिती सभागृहासमोर विशद करावी.

श्री राधाकृष्ण गायकवाड : नियमानुसार आयुक्तांनीच खुलासा देणे योग्य आहे. इतर अधिकाऱ्यांनी देवू नये.

श्री काशीनाथ कोकाटे : बोनसचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या अनुषंगाचा ठराव चर्चेसाठी विषय पत्रिकेवर आहे. त्यापूर्वीच जे विषयपत्रिकेवर आहे, त्यावर चर्चा व्हावी. नंतरच हा विषय घेण्यात यावा.

श्री रतनकुमार पंडागळे : महापौरांनी आदेश दिलेले आहे. मा. आयुक्तांची याबद्दल काय भूमिका आहे, त्यानंतर सभागृहाचे मत जाणवून यावर योग्य तो निर्णय घेतला पाहिजे.

**विषय क्र १५२ अ/१० :** आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सन २००२-२००३ या आर्थिक वर्षाचा बोनस-सानुग्रह अनुदार अदा करण्यांत यावा. अशी मागणी विविध कामगार संघटनांनी केलेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या औरंगबाद खंडपीठाने मागील वर्षी दि. ०१-११-२००२ व ११-१२-२००२ रोजी आदेश दिले आहे की, बोनस वाटपाचा निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या परवानगी शिवाय घेता येणार नाही. तसेच औरंगाबाद महानगरपालिक्चे सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात स्थायी समितीने रु. २०.०० लक्षची तरतुद मा. न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून टोकन रक्कम म्हणून केलेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार यावर्षी बोनस वाटपाबाबत निर्णय घेता येइल का? याबाबत कायदेशिर मत घेतले असता, न्यायालयाचे गतवर्षीचे आदेश असल्याने त्यावर निर्णय घेता येणार नाही. असे विधी सल्लागार यांनी मत नोंदविले आहे. करीता सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद**

मा. आयुक्त : यापूर्वीच या सभागृहासमोर या संबंधीची वस्तुस्थिती पाठविलेली आहे. औरंगाबाद महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना सन २००२-२००३ या आर्थिक वर्षासाठी बोनस किंवा सानुग्रह अनुदान द्यावे. म्हणून विविध कर्मचारी संघटनेच्या मागण्या आहेत. औरंगाबाद खंडपीठाने मागील वर्षी १ नोंव्हेंबर २००२ व ११ नोव्हेंबर २००२ रोजीचे प्रकरण या संदर्भात न्यायालयात दाखल केलेले आहे. न्यायालयाच्या निर्णया शिवाय बोनस वाटपाचा निर्णय घेता येणार नाही. सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात बोनससाठी न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून २० लक्षची टोकन रक्कम म्हणून ठेवलेली आहे. या वर्षीच्या बोनस वाटपाबाबत कायदेशीर मत घेतले असता. न्यायालयाचे गतवर्षीचे आदेश असल्याने त्यावर निर्णय घेता येणार नाही, असे कायदेशीर मत आलेले आहे. ही वस्तुस्थिती आहे.

श्री पंडागळे : विनंती करतो की, न्यायालयाने त्यांचे आदेशात कर्मचाऱ्यांना कुठल्याही प्रकारचे बोनस देवू नये, म्हणून उल्लेखित नाही. दुसरी बाब अशी की, मुंबई महापालिकेचे न्यायालयात अशाच प्रकारचे प्रकरण चालू असतांना मुंबई महापालिकेने सुध्दा सानुग्रह अनुदान म्हणून जाहीरात केलेले आहे. म्हणून ज्या कामगारांनी या शहराची साफसफाई चांगल्या रितीने केल्याने बक्षीस मिळविले. एक प्रकारचे नांव उज्वल केले. अशा कायमस्वरुपी कामगार यांना ४०००/- रुपये व दैनिक वेतनावरील कामगार यांना २०००/- रुपये सानुग्रह अनुदान जाहीर करावे. कर्मचाऱ्यांनी चांगल्या प्रकारे कामे केलेली आहे. नयायालयाने कर्मचाऱ्यांना बोनस, सानुग्रह अनुदान देवू नये. असे उल्लेख केलेला नाही. न्यायालयाची आधार घेवून कामगारावर अनयाय होवू देवू नये.

मा. महापौर : बोनस देण्या बाबतची चर्चा झाली. या संदर्भात प्रशासन व संबंधित अधिकारी यांचेशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री रतनकुमार पंडागळे : चर्चेसाठी वेळ लागेल दिवाळी चार दिवसापर्यंत येत आहे. केव्हा निर्णय घेणार देणार केव्हा, श्री विकास जैन महापौर असतांना सभागृहातच

निर्णय घेतलेला होता. अगोदर आपण निर्णय घ्यावा, आयुक्तांना जो निर्णय घ्यायचा तो घेतील.

मा. महापौर : या संदर्भात उद्याच चर्चा करुन निर्णय घेवू.

पांडूरंग तायडे : हा विषय प्रशासकीय आहे. मा. आयुक्त, मुख्यलेखाधिकारी संयुक्त बैठक घेवून काय जो निर्णय घ्यायचा तो घेतील. सभागृहाने हस्तक्षेप करणे योग्य वाटत नाही. हा विषय प्रशासकीय आहे, त्यावर प्रशासनाने विचार विनिमय करुन योगय तो निर्णय अद्याप घेण्यात यावा.

**ठराव क्र १५२ अ/१० :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महापौर व प्रशासनातील संबंधित अधिकारी यांचेत चर्चा होवून योग्य तो निर्णय घ्यावा. असे सर्वानुमते ठरले.

मा. महापौर : सभागृहाच्या समंतीने आजची सभा तहकुब करण्यांत येते.

स्वाक्षरित/-<br>नगरसचिव,<br>महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-<br>मा. महापौर,<br>महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९-११-२००३ (दि. २०-१०-२००३ ची तहकुब सभा)**
**रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**बुधवार दिनांक १९-११-२००३ (दि. २०-१०-२००३ ची तहकुब सभा) रोजी मा. महापौर, सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची "विशेष सर्वसाधारण सभा" महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी १२.१५ वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | स. सभासद |
| २) स. स. श्री. भाऊसाहेब ताठे | -//- |
| ३) स. स. श्री. राधाकृष्ण गायकवाड | -//- |
| ४) स. स. श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ५) स. स. श्री. वाणी ठकूजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. श्री शेख इलियास किरमाणी शेख उमर | -//- |
| ८) स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| ९) स. स. श्री. इंगळे शंकुतला सांडूजी | -//- |
| १०) स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ११) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १२) स. स. सौ पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १३) स. स. सौ. लिलावती बाळसाहेब घायलिक | -//- |
| १४) स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १५) स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १६) स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १७) स.स. श्री निमगांवकर प्रल्हाद गणपतराव | -//- |
| १८) स. स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १९) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहान | -//- |
| २०) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २१) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २२) स. स. सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २३) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २४) स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २५) स. स. श्री शेख खाजा शरफोद्दीन | -//- |
| २६) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |
| २७) स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २८) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| २९) स. स. श्री डॉ. कराड भागवत किसनराव | -//- |
| ३०) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३१) स. स. श्री. मगरे सुनील यादवराव | -//- |

३२) स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब -//-
३३) स. स. श्री अब्दुल कादीर अब्दुल हफीज -//-
३४) स. स. श्री नासेरखान सरदारखान -//-
३५) स. स. श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक -//-
३६) स. स. श्री मोहन मेघावाले -//-
३७) स. स. सौ खरात कुसूमबाई दौलत -//-
३८) स. स. सौ नुसरत बानो फिरोजखान -//-
३९) स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव -//-
४०) स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ -//-
४१) स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४२) स. स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय -//-
४३) स. स. श्री. पारे सोपान भाऊराव -//-
४४) स. स. श्री. प्रशांत सुभाष देसरडा -//-
४५) स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर -//-
४६) स. स. श्री. अशरफ मोतीवाला -//-
४७) स. स. सौ. संगिता बाळू मैंद -//-
४८) स. स. श्री. रणधिरसिंग होलिये -//-
४९) स. स. श्री. नासेरखान अ. रहेमानखान कुरैशी -//-
५०) स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर -//-
५१) स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
५२) स. स. सौ चंद्रभागाबाई दाणे -//-
५३) स. स. श्री. ओक जयवंत केशवराव -//-
५४) स. स. श्री. स. सलीम स. युसूफ -//-
५५) स. स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान -//-
५६) स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली -//-
५७) स. स. सौ सिद्यीकी नईम सुलताना -//-
५८) स. स. श्री. अजीजखान गणीखान -//-
५९) स. स. श्री. अफसर खान यासीन खान -//-
६०) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
६१) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
६२) स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
६३) स. स. श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी -//-
६४) स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज -//-
६५) स. स. सौ. निखत परवीन ऐजाज अली. -//-

**स्विकृत सदस्य :**

१) स. स. श्री सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स. स. श्री भगवान देविदास घडामोडे.
३) स. स. श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स. स. श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन

**संवाद :**

सौ निखत परविन : १९ नोंव्हेबर हा दिवस माजी पंतप्रधार स्व. श्रीमती इंदिरा गांधी यांचा जन्मदिवस ता. ११ वर्ष भारताचे पंतप्रधान राहिलेल्या आहेत. त्यांची जयंती साजरी करण्यांत आलेली नाही, ज्या महिला होत्या म्हणून त्याकडे दुर्लक्ष झाले काय? जयंती का साजरी करण्यांत आली नाही, खुलासा करण्यांत यावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : आताच स. सदस्या यांनी स्व. इंदिरा गांधी यांची जयंती साजरी करण्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला, त्यांची जयंती साजरी करण्यांत यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री काशीनाथ कोकाटे : या महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी जे थोर महापुरुष झाले, त्यांच्या पुण्यतिथी निमित्त, जयंती निमित्त शहरातील पुतळयांना हार वगैरे टाकून कार्यक्रम घेत असतो. म्हणून स्व. इंदिरा गांधी माजी पंतप्रधान यांची आज जयंती आहे. सभागृहातर्फे आदरांजली वाहण्यात यावी.

उप. आयुक्त (प्र.) : केंद्र शासन व राज्य शासन शासकीय परिपत्रकानुसार ज्या थोर पुरुषांच्या जयंत्या साजरा करावयाच्या आहेत, त्यामध्ये स्व. इंदिरा गांधी यांचे नावांचा उल्लेख नसल्यामुळे जयंती साजरी करण्याचा कार्यक्रम घेतलेला नाही.

श्री अफसरखान : परिपत्रक सभागृहात वाचून दाखवावे.

श्री भागवत कराड : शासनाच्या परिपत्रकानुसार स्व. इंदिरा गांधी यांची प्रशासनातर्फे साजरी करण्यांत आली नाही. परंतू जयंती साजरी करण्यांत यावी. सभागृहात त्यांचा फोटो आणावा, मा. महापौर व प्रशासनातर्फे हार घालावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : डॉ. भागवत कराड यांनी जी सूचना मांडली त्यास माझे अनुमोदन असून ताबडतोब स्व. इंदिरा गांधी यांची प्रशासनातर्फे जयंती साजरी करण्यांत यावी. तसेच नुकत्याच चार प्रभागातील पोट निवडणूका होवून नवनिर्वाचिक स. सदस्य या सभागृहात उपस्थित आहे. त्यांचे मा. महापौरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे.

यावेळी मा. महापौर यांनी वार्ड क्र. १७ गारखेडा येथून निवडूण आलेले स. सभासद श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव, वार्ड क्र. ३० बनेवाडी स. स. श्री शेख खाजा शरफोद्यीन, वार्ड क्र. ३९ भडकलगेट स. स. श्री अ. कादर अ. हफिज, वार्ड क्र. ७१ शरीफ कॉलनी किराडपुरा श्री अजीजखान गणीखॉन या नवनिर्वाचित स. सभासदांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

श्री. जयवंत ओक : नवनिर्वाचित स. सभासद यांचे वार्डातील स्वेच्छा निधी ताबडतोब उपलब्ध करुन द्यावा. त्यांचे वार्डातील उर्वरीत अपूर्ण कामे पूर्ण होतील. नागरिकांना रोड, ड्रेनेज पाणी या सोयी सुविधा देणे आवश्यक असते.

श्री भागवत कराड : जे चार वार्डातील पोट निवडणूका झालेल्या आहेत, स्वेच्छा निधी डिसेंबर पर्यंत खर्च करण्याचा प्रस्ताव द्यावा लागतो. प्रशासनाने त्यांना जादा वेळ उपलब्ध करुन द्यावा. त्यामुळे वार्डातील विकास कामे होण्यास मदत होईल. अर्धवट कामे राहीली असेल ती सुध्दा पूर्ण करण्यांत येतील.

श्री सुनिल मगरे : नवनिर्वाचित स. सभासदांचे आताच स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने २-३ मे २००१ रोजी अध्यादेश काढलेला आहे, त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, ज्यांनी जातीच्या प्रमाणपत्राआधारे वेगवेगळया सवलती घेतल्या त्यांनी त्यांचे जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी समितीकडून

पडताळणी करुन घेणे अनिवार्य आहे. मागच्या निवडणूकास जे निवडूण आले व ज्यांची जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समिती कडून अवैध होवून आले. त्या स. सभासदांचे सभासदत्व रद्द झालेले आहेत व आजही प्रक्रीया पूर्ण झालेली आहे. म्हणून ४ वर्षापासून ज्या ज्या स. सभासदांनी जास्तीचे बोनस प्रमाणपत्र सादर करुन शासनाची फसवणूक केली व जे काही फायदे, सवलती, घेतल्या त्या संदर्भात शासन जी. आर. नुसार प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे. (जी. आर.) मधील इंग्रजी भाषेतील संवाद वाचून दाखवितात. या सभागृहाच्या वतीने मा. आयुक्त यांना विनंती की, ज्यांची ज्यांची जात पडताळणी समितीने जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविले व त्यांनी जे आर्थिक फायदे, सवलती घेतल्या. तो खर्च वसुल करावा. असे आदेशात म्हटले आहे. म्हणून सभागृहाच्या वतीने प्रशासनास विनंती की, अशा प्रवृत्तींना रोखण्यासाठी, प्रतिबंध करण्यासाठी या शासन आदेशानुसार मा. आयुक्त कोणत्या प्रकारची व केव्हा कार्यवाही करणार आहेत. याबाबत मा. आयुक्तांनी खुलासा करावा. या आदेशात असे दिले की, अशा लोकांवर क्रीमीनल केसेस दाखल करव्यात. तसेच मागील २-३ बैठकीत मी मुद्दा उपस्थित केला होता. या महानगरपालिकेत बऱ्याच अधिकारी/कर्मचारी यांचे जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी समितीने अवैध ठरविले, त्या कर्मचाऱ्यांनी आर्थिक फायदे सवलती, प्रमोरान घेतलेले आहेत. त्या संदर्भात ही प्रशासनाने आतापर्यंत काहीही कार्यवाही केलेली नाही. या संदर्भात सुध्दा खुलासा करण्यांत यावा. शासनाने हा कायदा तयार केला. त्यानुसार कार्यवाही झाली पाहिजे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : स. सदस्य श्री. मगरे यांनी नगरसेवकांच्या जातीच्या दाव्या संदर्भात बोलले. परंतू या महानगरपालिकेत अधिकाऱ्यांच्या बोगस जात प्रमाणपत्राच्या संदभात बऱ्याच वेळा मोठमोठया बातम्या छापून येतात. ज्याचे ज्याचे जात प्रमाणपत्र तपासणीसाठी पाठविले. त्याची ताबडतोब माहिती द्यावी व ज्यांचे जात प्रमाणपत्र अवैध होवून आले. अशा अधिकारी/कर्मचारी यांचेवर तात्काळ कार्यवाही करावी.

श्री. स. अली सलामी : आज होत असलेली सभा तहकुब सभा आहे. अशा प्रकारची चर्चा येथे करता येते का? विषय पत्रिका अगोदरन घेण्यात यावी. नंतर चर्चेसाठी वेळ द्यावा.

श्री सुनिल मगरे : ४ वार्डाच्या पोटनिवडणूका झाल्या. जातप्रमाणपत्र जात पडताळणी समितीने अवैध ठरविल्यामुळे निवडणूका घेण्यात वेळ आलेली आहे. बोगस प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री. स. अली सलामी : स. सदस्यांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. मी ही त्यास संमती देतो, परंतू आजची होत असलेली सभा तहकुब सभा असून या महिन्याची सभा उदया आयोजित केलेली असून उद्याच्या सभेत सुरुवातीस चर्चा घेवून हा विषय घ्यावा. नंतर विषय पत्रिका घेण्यात यावी. आजच्या सभेत अगोदर विषय पत्रिका घ्यावी. चर्चेत वेळ जाईल. जे मुद्दाच बोलायचे ती चर्चा बाजूला राहील असे होवू नये.

मा. आयुक्त : मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

श्री. स. अली मिरा सलामी : ज्या सदस्यांचे जात प्रमाणपत्र रद्द झाले. अशा सदस्यांनी किती, कोणते व किती फायदे घेतले, सवलती घेतल्या जात माजी महापौरांचा सुध्दपा समावेश आहे, सविस्तर माहिती आयुक्त उद्या सादर करतील.

श्रीमती पार्वती मानकापे : ही सर्वसाधारण सभा असून प्रत्येक सदस्यांना कोणताही प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे, म्हणून चर्चा होवू द्यावी. कार्यवाही झाली पाहिजे.

श्री सुनिल मगरे : बोगस जात प्रमाणपत्र सादर करणाऱ्याच्या अशा प्रकारच्या प्रवृत्तीच्या लोकांना साथ देवू नये, नियमाने कार्यवाही झाली पाहिजे.

श्री पांडूरंग तायडे : स. सदस्य श्री सुनिल मगरे यांनी जो प्रश्न विचारला त्याबद्दल खुलासा व्हावा.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी याबाबत खुलासा द्यावा.

मा. आयुक्त : अस्तित्वातील कायदयाची स. सदस्य यांनी जाणीव करुन दिल्याबद्दल आभारी आहे. मी महापालिकेत रुजू झाल्यानंतर माहिती घेतली होती. मा.उच्च न्यायालय-तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात प्रकरणे चालू होती. आयुक्त म्हणून या संदर्भात मी येण्याच्या अगोदर किती पाठपुरावा झाला ते सांगू शकणार नाही. परंतू माझ्या कामकाजाच्या पध्द्तीनुसार मी पाठपुरावा केलेला आहे. निर्णय झालेले आहेत. त्यानुसार शक्य तितक्या लवकर पोट निवडणूका घेण्याची कार्यवाही झालेली आहे. महापालिकेकडून जे आर्थिक लाभ मिळविले ते वसुल करण्याची तरतुद कायदयाने आहे. त्यानुसार या पूर्वीच मी प्रशासन व विधी सल्लागार यांना सूचना दिलेल्या आहेत. सद्यस्थिती ते सांगतील. आयुक्त म्हणून वेगळे सांगण्याचा प्रश्न येत नाही. जे काही आहे ते कायदयाचे तरतुदीतच दिले आहे. आयुक्त म्हणून जेवढा पाठपुरावा या चार महिन्यात झाला. त्यापूर्वी इतका झाला नसावा. दुसरी बाब अधिकारी/कर्मचारी यांचे संदर्भात समितीकडे माझा पाठपुरावा चालू आहे. ४-५ पत्र पाठविलेले आहे, त्यावर निर्णय घ्यावेत. म्हणून त्या त्या समितीकडे जावून लवकरात लवकर महानगरपालिकेच्या प्रकरणात निर्णय द्यावेत. म्हणून सूचना दिलेल्या आहेत. अनुसूचित जातीच्या संदर्भात समिती वेगळी आहेत. त्याची सुध्दा यादी केली. त्याचाही पाठपुरावा चालू आहे. अवैध ठरविली असेल व त्यांनी काही फायदे, लाभ मिळविला असेल, तो काढून घेण्याच्या सूचने देण्यात आलेल्या आहेत. पदोन्नती दिल्या नंतर किंवा इतर फायदे दिल्यावर त्या त्या कालावधीत किती रक्कमा त्यांना दिलेल्या आहेत, याची सुध्दा नोंद आपणांस मिळेल. आयुक्त म्हणून सभागृहात सांगू इच्छितो की, माझी भूमिका स्वच्छ आहे. कोणत्याही जाती जमातीच्या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची वैधता सिध्दच झालेली नाही. तसेच ज्यांची कोर्ट प्रकरणे चालू नाही, त्यांना कोणत्याही प्रकारचे अभय प्रशासन देणार नाही. किंबहूना मी दिलेल्या सुचनांचे पालन झाले नाही, तर तो प्रकार सहन करुन घेतला जाणार नाही.

श्री सुनिल मगरे : मा. आयुक्त साहेबांकडून असा खुलासा अपेक्षित आहे की, नुकत्याच ४ प्रभागतल्या पोट निवडणूका झालेल्या आहेत. जी काही तरतुद करण्यांत आली या संदर्भात विधी विभागची चर्चा करणे अयोग्य होणार नाही. नुकत्याच चार प्रभागातल्या निवडणूका संबंधीची माहिती घेता येईल. परंतु

जेव्हा सन २००० ला सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर श्री वसंत नरवडे पाटील यांचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने अवैध ठरविले. त्यानंतर ज्या प्रभागाची पोट निवडणूक झाली. स. स. श्री चंद्रशेखर जैस्वाल सदस्य झाले. त्यानंतर पुन्हा ४ प्रभागातील स. सदस्यांची जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने अवैध ठरविली. त्याही वार्डात पोट निवडणूका होवून चार स. सदस्य निवडून आलेले आहे. नुकत्याच पून्हा चार वार्डाच्या पोट निवडणूका झाल्या याबाबतची कार्यवाही करता येईल. परंतू जे सुरुवातीच्या वेळेस सार्वत्रिक निवडणूकीनंतर दीड वर्षांनी तसेच पून्हा चार प्रभागातील पोट निवडणूका या दोन ते अडीच वर्षापूर्वीच झाल्या. त्या वार्डाचे पूर्वीचे सदस्य यांचेवर या शासन जी. आर नुसार काय कार्यवाही केलेली आहे. असे विधी विभागाचे मंद गतीने काम चालत असेल तर बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूका लढविणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाईल. विधी विभागाचे जे प्रमुख असतील त्यांनी श्री. नरवडे पाटील यांचे संदर्भात व त्यांनतर झालेल्या वार्डातील पोट निवडणूकांत ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविण्यांत आले. अशा स. सदस्यांच्या संदर्भात काय कार्यवाही केली. तसेच आणखीन काही स. सदस्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले. त्या संदर्भात काय कार्यवाही झाली, खुलासा द्यावा.

मा. आयुक्त : मागील कालावधीत काय झाले, याचा खुलासा विधी सल्लागार करतील.

श्री सुनिल मगरे : नियुक्त्यांच्या संदर्भात असे आलेले आहे की, त्यांनी ३ महिन्यांच्या आत जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कडून तपासणी करुन घ्यावी.

मा. महापौर : विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : जात पडताळणी समितीच्या जात पडताळणी संबंधी जो नविन नियम महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेला आहे, त्या जात पडताळणी अधिनियम २००१ च्या तरतुदीनुसार स. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो योग्य आहे. ज्या ज्या स. सदस्यांची जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीचे अवैध ठरविलेली आहे. त्या प्रभागातल्या पोट निवडणूका घेण्यात आलेल्या आहे. काही प्रकरण न्यायप्रविष्ट आहेत.

श्री सुनिल मगरे : सभागृहाची दिशाभूल करु नये. ज्या स. सदस्यांचे जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले. त्या सदस्यांनी अवैधतेपासून जे जे फायदे, सवलती, लाभ घेतले त्या संदर्भात या जी. आर. नुसार प्रशासनाने काय कार्यवाही केली.

विधी सल्लागार : ज्या ज्या प्रकरणांत जात पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र अवैध होवून आल्यानंतर निवडणूक विभागाला कळविण्यात आलेले आहे. स. सदस्य यांनी केलेली सूचना बरोबर आहे. परंतू मा. आयुक्त यांनी या संबंधी निवडणूक विभागाकडून कार्यवाही करण्याचे अधिकार दिले आहे.

श्री. काशीनाथ कोकाटे : विधी सल्लागार चुकीच्या दिशेने खुलासा करीत आहे. ज्या अधिकाऱ्यांचे, नगरसेवकांचे जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले. त्यातील काही लोक न्यायालयात गेले. न्यायालयाने स्पष्ट म्हटले की, निवडणूक आयोगामार्फत मार्गदर्शन घेऊन ही कार्यवाही करायची होती. ही कार्यवाही आयुक्तांना करावयाची आहे. असे स्पष्ट आदेशात दिले आहे. त्यानुसार कार्यवाही करणे योग्यच होईल.

श्री सुनिल मगरे : निवडणूक आयोग यांनी घ्याव्यात. इतपर्यंत मान्यता दिलेली आहेत. पुढील कार्यवाही ही शासनाच्या निर्देशाप्रमाणे, प्रशासनास करायची होती. ती कार्यवाही का केलेली नाही. सभागृहाची दिशाभूल होईल असे उत्तर अपेक्षीत नाही. योग्य तो खुलासा करण्यात यावा.

विधी सल्लागार : महापालिकेच्या निवडणूक विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. निवडणूक विभागाकडून पत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत.

उप आयुक्त (प्र.) ज्या नगरसेवकांचे प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेले आहे व काही प्रकरणात पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केलेला आहे व त्या सदस्यांनी आतापर्यंत कोणकोणत्या सुखसुविधा व आर्थिक फायदे घेतले, त्याची माहिति घेत आहेत.

श्री सुनिल मगरे : कोणत्या नगरसेवकांच्या बाबतीत माहिती घेतलेली आहे, एक उदाहरण द्यावे. सभागृहात दिशाभूल करु नये व चुकीचा खुलासा करु नये. कोणत्या नगरसेवकांना नोटीस देवून अमुक फायदे घेतले म्हणून पत्र दिले ते दाखवावे.

उप आयुक्त (प्र.) : माहिती मागविलेली आहे.

श्री सुनिल मगरे : कोणत्या नगरसेवकांना पत्र दिले, खर्च वसुल करण्याबाबत ते दाखवावे. माझ्या प्रश्नाचा बरोबर खुलासा व्हावा. समाधान होत नाही, तो पर्यंत मी गप्प बसणार नाही.

उप आयुक्त (प्र.) : याबाबत संबंधित विभागाकडून माहिती मागविलेली आहे. कोणत्या नगरसेवकांनी किती लाभ, फायदे, सवलती घेतल्या माहिती घेतलेली आहे.

श्री सुनिल मगरे : खर्च वसुल करण्याची कार्यवाही करणे हे प्रशासनाचे काम आहे. अशा पध्द्तीने काम चालत असेल तर, योग्य बसून कायदयाची अंमलबजावणी होत नसेल तर, ही बाब योग्य नाही. विधी विभागाचे कामांचा अनुभव वाईट आहे. कायदा झालेल आहे. कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा. महापौर : प्रशासनाने ०७ दिवसाच्या आत या संदर्भात माहिती देण्यात यावी.

श्री सुनिल मगरे : ज्यांनी ज्यांनी बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे जे जे फायदे, सवलती घेतल्या. लाभ घेतला, किती खर्चा पर्यंत घेतला ते सुध्दा देणाऱ्या माहितीमध्ये नमुद करावे.

श्री जयवंत ओक : या शहरात डेंग्यूचा आजार झाल, दोन मुलांना हा आजार आहे. म्हणून वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या. नारळीबाग येथील बालकांना डेंग्यूचा आजार झाला. छायाचित्रे वृत्तपत्रात आलेली होती. खरोखरच डेग्यूंचा आजार त्या मुलंना झालेला होता का? या संदर्भात सविस्तर खुलासा व्हावा.

मा. महापौर : आरोग्य अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : मागील महिन्यामध्ये महाराष्ट्रामध्ये इतर विभागात साथीच्या लग्नांची वाढ झाली. काही भागामध्ये डेंग्यूच्या आजाराचे रुग्ण ही आढळून आले. औरंगाबाद शहरामध्ये साथीच्या रुग्णांच्या संख्येत थोडया प्रमाणीत वाढ झाली. त्यातील काही रुग्ण खाजगी/सरकारी दवाखान्यात दाखल झाले. नारळीबाग या भागातील दोन्ही रुग्ण संजविनी हॉस्पीटलमध्ये भरती झाले होते. संपूर्ण चाचण्या केल्या फक्त हिवताप आहे. संशयित डेंग्यूचा रुग्ण म्हणून जाहीर केला. त्या संबंधीच्या ज्या चाचण्या केल्या या चाचण्या पॉझीटयुव आलेल्या नाही. फक्त तापाचा रुग्णाच्या लक्षणावरुन त्यांनी डेग्यूंचा सदृश्य रुग्ण जाहीर केली. ज्या चाचण्या केल्या जातात. त्या

पॉझीटयूव झालेल्या नाही. संजीवनी हॉस्पीटलने त्या रक्ताचे नमुने पुणे येथे पाठविले नव्हते. महापालिकेतर्फे ५ नमुने पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल आ. जी. जी. आ. सी. एम. हे निगोटयुव आल्यामुळे डेग्यूंचा रुग्ण म्हणू शकत नाही. सिडकोच्या विभाग महापालिकेत येत नाही. परंतू मा. आयुक्तांनी आदेश दिल्यानुसार कार्यवाही केलेली आहे. नाला सफाई करण्या संदर्भात भर दिला. डास उत्पत्तीत नष्ट करण्यावर भर दिल्यामुळे आजपर्यंत शरातील रक्त तपासण्या झाल्या रक्त चाचण्यामध्ये डेंग्यूचा रोगी आढळून आलेला नाही.

श्री जयवंत ओक : यावरुन डेंग्यूचा रुग्ण नाही असे दिसते. एखादी बातमी वृत्तपत्रात देतांना पत्रकारांनी विचार करावा. खरी बातमी असेल तर लावावी. डेग्यूंचा आजार सर्वच शहरात होईल असे मत व्यक्त केले जात होते. महाराष्ट्रात डेग्यूंचे रुग्ण असतील, परंतू त्या बरोबर या शहरात सुध्दा रुग्ण आहे असे जाहीर केले, ज्या डॉक्टरांनी वर्तमानपत्रात व दूरचित्रवाणी वरुन वेगळे चित्र दाखविले. त्यामुळे महानगरपालिकेची बदनामी झाल्याशिवाय त्या दोन्ही मुलांना शाळेत वेगळया जागेवर बसविण्यात आले. मुलांना त्रास झाल. आपण हे छापून आणावे. संबंधित हॉस्पीटलवर नेमकी काय कार्यवाही करणार आहात. हा माझा प्रथम प्रश्न आहे. खाजगी डॉक्टरांनी बोलतांना फार विचारपूर्वक माहिती दिली पाहिजे. खरोखरच तसा आजार नसतांना का अशा प्रकारच्या बातम्या छापण्यास मदत केली. त्या हॉस्पीटलवर कार्यवाही करावी. यामुळे महापालिका बदनाम झालेली आहे. डॉ. बिनवडे, डॉ. भागवत कराड या बाबत मत व्यक्त करतीलच त्यांच्या भावना घ्याव्या. माझ्या भावनेचा विचार करावा. महापालिका दर मंगळवार सोमवार व इतर दिवशी फवारशी करते. वृत्तपत्रात बातमी आल्यामुळे त्या मुलांना जी वागणूक दिल्या गेली ती गैर आहेत. त्या मुलांच्या आई, वडिलांना मानसिक त्रास झाला, म्हणून संबंधित हॉस्पीटलच्या डॉक्टरवर कडक कार्यवाही व्हावी.

श्री भागवत कराड : संबंधित हॉस्पीटलने डेग्यूंचे रुग्ण आहे असे म्हटले नाही. पुढील तपासणी महापालिकेमार्फत झाली. जो पर्यंत आजार तपासणी होत नाही, तो पर्यंत कोणता आजार होईल. हे सांगता येत नाही. म्हणून डॉक्टरांनी जी तपासणी करुन भविष्यात यामुळे हा आजार होवू शकते असे म्हटले असेल तर त्यात काही चुक आहे. असे वाटत नाही. म्हणून संबंधित संजीवणी हॉस्पीटलचे डॉक्टर यांनी तपासणी केली. महापालिकेस जागृत केले. महापालिकेच्या विभागामार्फत कार्यवाही झालेली आहे. त्यामुळे या हॉस्पीटलवर कार्यवाही करण्याची गरज नाही. डासांचे प्रमाण शहरात वाढलेले आहे. ते कमी व्हावे म्हणून, आरोग्य विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. आय. जी. जी. आय. सी. एम ही चाचणी आहे.

श्री जयवंत ओक : डॉक्टरांनी इलाम केला. त्याबद्दल धन्यवाद. परंतू सर्वच वृत्तपत्रात या शहरात डेग्यूंचा आजार झाला म्हणून छापून आले. दुरदर्शन ई.टी.व्ही, झी. टी. व्ही या चॅनलवर अशा प्रकारे रोग झाल्यास डॉक्टरांना बोलण्याचा काय अधिकार आहे. काही डॉक्टरांची नांव सुध्दा नमुद केलेली आहे. यामुळे महापालिकेची बदनामी झालेली आहे. त्या डॉक्टरांनी जागृत केले, असा प्रश्न येत नाही. महापालिकेच्या संबंधित विभागाचे का लक्ष नाही. ज्या

मुलांना शाळेत बसतांना वेगळया प्रकारची वागणूक देण्यात आली. म्हणून ज्या डॉक्टरांनी वृत्तपत्रात जाहीर केले. ज्या हॉस्पीटलवर काय कार्यवाही होणार आहे. खाजगी डॉक्टरांनी बोलतांना जबाबदारपणे बोलेले पाहिजे. यामुळे महपालिका बदनाम होते. शहरातील जनता हैराण होते. यापूढ असे वृत्तपत्रात बातम्या येणे बरोबर होणार नाही. याची दखल घेण्यात यावी.

सौ. सिद्यीकी नईम सुलताना : रोशणगेट भागातील मुजीब कॉलनी आणि मक्सुद कॉलनीतही डेंग्यूचे रुग्ण आहे. आजही ते रुग्ण वरद हॉस्पीटलमध्ये आहे. प्रशासनाने माहिती घ्यावी. दिसून येईल ते रुग्ण डेंग्यूच्या आजाराचेच आहे.

श्री भागवत कराड : रुग्ण दवाखान्यात दाखल झाल्यानंतर त्या रुग्णात कोणता आजार आहे, डॉक्टर तीन-चार आजार असण्याची संभावना असल्याचे अंदाज व्यक्त करतात. मलेरिया असेल, डेंग्यु असेल इतर आणखी आजार असू शकेल. म्हणून रुग्णाचे रक्त तपासण्याची गरज होती. म्हणून महानगरपालिकेने पुढील कार्यवाही करण्याची गरज होती. संबंधित हॉस्पीटलच्या डॉक्टरांचे काहीही चुकलेले नाही. त्याचेवर काही कार्यवाही होवू नये. महापालिकेस जागृत केले. त्याप्रमाणे महापालिकेच्या संबंधित विभागामार्फत कार्यवाही व्हावी. महापालिकेने डेंग्यूचा आजार नाही. असे जाहीर केले, परंतू पुन्हा सर्व जनतेसमोर जाहीर करावे. असे आजार होवू नये. औषध फवारणी करावी जनतेच्या आरोग्याची काळजी घ्यावी.

श्री आनंद तांदुळवाडीकर : डेंग्यू सारख्या भयंकर अशा आजारा संबंधी या सभागृहात चर्चा चालू आहे. महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी आताच खुलासा केला डेंग्यूच्या आजाराचे रुग्ण नाही. चांगली बाब आहे. परंतू या शहरात डेंग्यूचे रुग्ण आहे, असे जाहीर झाले? येणाऱ्या पुढील काळातील एके ते दीड महिन्यात औषध फवारणी करावी. हे ऐतिहासिक शहर आहे. अशा बातम्या प्रसिध्द झाल्यास पर्यटकांची संख्या कमी होवू शकते. हे शहर स्वच्छ ठेवण्याबाबत कार्यवाही महापालिकेमार्फत करावी. औषधी फवारणी होते. परंतु त्या औषधांचा डासावर परिणाम होतो का हेही पाहण्यात यावे. नुसती फवारणी करुन उपयोग नाही. फवारणी केल्यानंतर डासांचा मृत्यू झाला पाहिजे. असे औषध खरेदी करुन कार्यवाही व्हावी व हे शहर निरोगी ठेवावे.

सौ. निखत परविन : शहरात डासांचे प्रमाण वाढलेले असून, संध्याकाळाच्या वेळेस बाहेर कामानिमित्त जाणे अवघड होते. बऱ्याच ठिकाणचा कचरा वेळेवर उचलला जात नाही. ज्या ठिकाणचा कचरा उचलला जात होता. त्या जागेवर यापूर्वी जंतु, डांसांचे प्रमाणात वाढ होवू नये म्हणून पावडर टाकली जात असे, परंतू मी स्वतः कचरा उचलणाचा कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली असता ३-४ महिन्यापासून टी. टी चे पावडर टाकले जात नाही. महापालिकेकडे त्या प्रकारेच औषधी उपलब्ध आहे की, नाही याचा खुलासा व्हावा. जेणे करुन ते पावडर टाकल्यानंतर डांसाचे प्रमाणात वाढ होणार नाही.

श्री राधाकृष्ण गायकवाड : मागील अधिवेशनामध्ये महाराष्ट्र शासनाने सुध्दा महाराष्ट्र राज्यातील कोणत्याच शहरात किंवा इतर ठिकाणी डेंग्यूचा रुग्ण किंवा तो आजार होवू नये. म्हणून महापालिका व जिल्हा परिषद यांना शासनाच्या सुचना आहे. या संदर्भात आमदार मा. श्री विलासजी अवचट यांनी सुध्दा दुरध्वनी वरुन कळविले की, शासनाने हा आजार होवून नये. म्हणून मोठया प्रमाणात निधी उचलेला आहे. या शहरात कचरा, घाणीचे साम्राज्य वाढलेले

आहे. मागील बैठकीत यावर ४ तास चर्चा झालेली असून, संत गाडगे बाबा स्वच्छता अभियाना राबविण्यातउ आले. पहिला टप्पा झालेला असून, दुसऱ्या टप्प्यास सुरुवात झालेली आहे. एवढे सर्व असतांना अस्वच्छता दिसून येते. स. सदस्य सभागृहात वेळोवेळी सूचना करतात. तसेच कचरा उचल्यानंतर जे जंतूनाशक औषधी, पावडर टाकण्यांत येत नाही. ते झोन कार्यालय किंवा संबंधित विभागाकडे उपलब्ध होत नाही का? स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे सकाळ/संध्याकाळच्या वेळेस डासांचे प्रमाण किती आहे हे दिसून येते. रस्त्याने चालणे कठीण होते. अशी परिस्थिती आहे व ते डासांनी चावा घेतल्यानंतर त्रास होतो. यापासून आरोग्य धोक्यत येवू शकत डेंग्यू या रोगाचा प्रसार झाला काय रुग्ण आहेत का. या बाबतचा खुलासा पुन्हा आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी करावा. तसेच त्या मुलांना शाळेत वेगळया जागेवर बसविण्यात आले का? त्याबाबतीतही स्पष्टीकरण करावे. तसेच शहरात फोंगीग मशीनद्वारे औषध फवारणी होत होती ती होते का? डासांचे प्रमाण कमीत कमी कसे होईल यासाठी प्रयत्न व्हावे. डेंग्यू आजरा सारखे आजार शहरात उठविल्यास भयानक परिस्थिती निर्माण होईल ते होवू नये. म्हणून प्रशासनाने डास मुक्त करण्या संदर्भात कार्यवाही करावी.

श्री काशीनाथ कोकाटे : शहरात डेंग्यूचे रुग्ण नाही. आताच खुलासा केला. परंतू वृत्तपत्रात पत्रकारांनी बातम्या प्रसिध्द केल्या. त्या चुकीच्या असू शकत नाही. एन-७ सिडको भागात तारीक नावाच्या एक मुलास डेंग्यूचा आजार आहे. चाचण्या घेण्यात आल्या, चाचण्या पॉझीटयूव आहे. याची सर्व कल्पना आरोग्य अधिकाऱ्यांना आहे. असे माझे स्वत:चे मत आहे. पुन्हा त्यांनी डेग्यूंचे रुग्ण नाही. असा खुलासा करावा. एखादा एरिया वसाहत महापालिका हद्दीत नसेल, परंतु बाजूची वस्ती आहे. तेथे रुग्ण आढळून आल्यास त्यासाठी सुध्दा तो आजार इतर भागातील जनतेला होवू नये. म्हणून काळजी घ्यावी लागेल. तशा सूचना संबंधित विभागाला देण्यात याव्यात.

श्री आनंद तांदुळवाडीकर : महापालिकेमार्फत जी औषध फवारणी होते. डासांवर त्याचा काही प्रभाव पडतो का? डासांची संख्या कमी होते का? यांचा खुलासा दयावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : हिवताप व डास जन्मांच्या नियंत्रणासाठी शहरात औषधी फवारणी करण्यांत येते. त्यात एम.ओ.एल. मलेरिया बीटेक्स तसेच अबेट हे वापरण्यात येते. पॉयरीन, लिंगफॉन तसेच के. ओ. थ्री ही औषधी सुध्दा वापरण्यात येते. ही (लेटस) सध्या वापरात येणारी असून, ही औषधी पाण्यामध्ये मिसळून चांगल्याप्रकारे फवारणी करता येते. त्यामुळे डासांचे प्रमाणात वाढ झालेली नाही. गेल्या ८ दिवसात सिडको भागात डासांचे प्रमाण वाढले त्यामुळे मा. उपायुक्त यांनी अशा सूचना या विभागाला दिल्या की, सिडको भाग महापालिका हद्दीत येत नसेल तरी, डासांचे प्रमाण वाढून रोगांचचा फैलाव होवू नये, म्हणून सिडको भागात सुध्दा महापालिकेचे पथके पाठवून औषध फवारणी करुन काळजी घ्यावी. मलेरिया विभागातील १०० कर्मचारी/अधिकारी काम करतात. त्या भागात जावून माहिती घेवून सिडको येथील कामगारांच्या तेथील पर्यवेक्षकांच्या समवेत बैठका घेतलेल्या आहेत. औषध फवारणी मुळे डासांचे सिडको भागातील प्रमाण कमी होत आहे.

श्री काशीनाथ कोकाटे : मी आताच सुचना केल्याप्रमाणे ज्या बालकास डेग्यूंचा आजार झालेला आहे किंवा नाही खुलासा करावा.

श्री भागवत कराड : या शहरात डेग्यूंचा आजार आहे किंवा नाही यावर चर्चा चालू आहे. या संदर्भात त्या रुग्णांचे रक्त तपासणी करावी. डासांचे प्रमाण वाढत आहे. फवारणी करीत असलेले औषधी याचा परिणाम त्यांचेवर कमी प्रमाणात होतो काय? प्रथम त्या रुग्णांचा रक्त तपासणीत आय. जी. जी. आय. जी. एफ. चा रिपोर्ट आपणांकडे आलेला आहेत का. ते पॉझीटयुव आहेत का. तो खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : स्थानिक प्रयोग शाळेकडून जे रिपोर्ट आलेले आहे. त्यामध्ये एकही रिपोर्ट मध्ये आय. जी. जी. आय. जी. एफ चे प्रमाण पॉझीटयूव आलेले नाही. काही प्रमाणामध्ये जे सर्वसाधारण व्यक्तीमध्ये आय. जी. जी. आय. जी. एम चे प्रमाण ७० ते ८०% तो कुठलाही रुग्ण असो. त्यामध्ये पॉझीटयूव असतेच. प्रयोग शाळेच्या चाचण्यचा वरुन आय. जी. एम. दाखविण्यात आलेला आहे. प्रमाणही दाखविलेले नाही. ते आय. जी. एम. नसल्यामुळे व ऑथराईज पुणे येथील संस्थेकडे नमुने पाठविले नाही. डेंग्यूचा रुग्ण औरंगाबाद शहरात आढळून आलेला नाही.

श्री काशीनाथ कोकाटे : प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : प्रशासनातर्फे विभाग प्रमुख म्हणून वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच डॉ. कराड सदस्य तसेच उत्तर सदस्यांनी खुलासा करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला. आरोग्य विभागास दोन सूचना देवू इच्छितो की, पहिल्या वेळेस कोणताही डॉक्टर प्राथमिक तपासणीनंतर असा सल्ला देतच असतात आणि ते देणे हे डॉक्टरांचे कामच आहे. त्यानुसार डेंग्युचा आजार आहे की, दुसरा आजार आहे. हा नुसता अंदाज असतो. वृत्तपत्रात आले म्हणून, आरोग्य अधिकारी यांनी भिती बाळगण्याचे कारण नाही. सभागृहात स. सदस्यांनी सूचना केल्यानुसास संबंधित रुग्णांची प्रत्यक्ष भेट घेवून व आजूबाजूच्या परिसरातील पाहणी करुन त्याचा अहवाल असणे आवश्यक आहे. अशी सूचना आरोग्य विभागास देण्यात येत आहे. तसेच डेग्यूंचा रुग्ण नाही. हे सुध्दा प्रसिध्द करावे लागेल. जेणे करुन शहरातील परिसरात त्याबाबत गैरसमज राहणार नाही. दुसरी सूचना अशी की, जी चार प्रकारची औषधी फवारणी होते. त्याची मात्रा त्यामुळे डासांवर होणार परिणाम काय होतो. याबाबत सभागृहात तपशिल दिला आहे. त्याप्रमाणे औषध फवारणी चालू असेल, परंतू ज्या प्रकारे डासांची उत्पत्ती होते व त्या डासांना जिवंत राहण्याची संधी मिळते व त्या डासांपासून जी उत्पत्ती होते जी की, मलेरिया व अन्य रोग होवू शकतात. त्या डासांचा नायनाट करण्यासाठी आवश्यक त्या क्षमतेची औषधी आहेत का. हा सभागृहाचा प्रश्न आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : डासांची उत्पत्ती व नष्ट होण्याची औषधी फवारणी होते.

मा. महापौर : असे असेल तर, शहरातील डासांचे प्रमाण कमी का होत नाही.

श्री नंदकुमार घोडेले : औषधी फवारल्याने नष्ट होतात. अशी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी म्हटले तसेच, डासांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेले नाही. असेही म्हटलेले आहे. परंतू डासांचे प्रमाण वाढलेले आहे. हे अधिकाऱ्यांनी मान्य करावे. आरोग्य समितीच्या बैठकीत डॉ. सुखसे यांनी असा खुलासा केलेला

होता की, जी औषधी फवारणी होते, यामुळे डासांवर फारसा परिणाम होत नाही. नविन औषधी खरेदीच्या प्रस्ताव सुध्दा समितीच्या बैठकीत होता. त्यास प्राधान्य द्यावे. आज खुलासा होतो, डास नष्ट होतात. असे असतांना डासांची संख्या का वाढते असा प्रश्न सभागृहाच्या आहे.

श्री जयवंत ओक : डेंग्यूंचा रुग्ण एकही या शहरात नाही जाहीर करावे व डासांची उत्पत्ती होवून संख्या वाढू नये. असे औषध फवारणी करावे. उदयापासून पुढील ८ दिवसांत संपूर्ण शहरात फवारणी करावी. हे शहर स्वच्छ राहील निरोगी राहील. याची दखल घ्यावी. स्वच्छता मोहीम राबविली तशी डासमुक्त मोहीम राबवावी.

श्री मोतीलाल जगताप : माझ्या वार्डात औषध फवारणी केली मी स्वत: बघितले फवारणी करतांना डास हवेत उघडतात. तात्पुरते जातात. दुसऱ्या दिवशी दिसून येतात. जिवंत राहतात. असे दिसून येते. औषध फवारणी केल्यानंतर डासांचा मृत्यू झाला पाहिजे असे औषध फवारणी करावे.

मा. महापौर : सभागृहात स. सदस्य यांनी या शहरात डेंग्यूची साथ होण्याची संभावना आहे. अशा भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्या भावनांचा विचार करुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी या शहरात डासा पासून कोणताही आजार उधभवणार नाही. याची काळजी घ्यावी व औषधी फवारणी केल्यानंतर मच्छर/डासांचा नायनाट होईल. अशींच औषधी संपूर्ण भागात फवारणी करावी. चांगल्या प्रतीची औषधी वापरावी. डासमुक्त शहर करावे. शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही. याची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

**विषय क्र. १५३/१ :** दिनांक १९-०९-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री काशीनाथ कोकाटे : इतिवृत्तातील पान क्र. ८ वर सर्वे नंबर ६८,६९ च्या संदर्भात चौकशी समिती तपासणी करीत आहे. अद्यापपर्यात सर्व्हे नं. ६८,६९ बाबतीत खुलासा झालेला नाही. चौकशीचे काम कुठपर्यंत आले याचा खुलासा द्यावा.

श्री भगवान घडमोडे : सर्वे क्र. ८४,८६ व ६८,६९ अशी गफलत होते. दोन्ही प्रकरणांबाबत खुलासा व्हावा. अशी विनंती आहे. प्रत्येक बैठकीत या संदर्भात चर्चा होते.

सहा. संचालक (न.र.) : गट क्र. ६८,६९ ईटखेडा येथील ले-आऊटच्या संदर्भात अहवाल नंतर सादर करण्यात येईल.

श्री सुनिल मगरे : गेल्या दोन-तीन बैठकी पासून या संदर्भात सभागृहात विचारणा होते. प्रत्येक बैठकीत नंतर अहवाल देण्यात येईल. असे बालेले जाते, योग्य नाही.

मा. महापौर : किती दिवसात अहवाल सादर करणार आहे.

सह. संचालक (न.र.) : सात दिवसात अहवाल सादर करण्यात येईल.

श्री काशीनाथ कोकाटे : मा. महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांनी आदेशित केलेले होते. अहवाल आलेला नाही. वेळेचे भान अधिकारी ठेवत नसतील, तर हे सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने संयुक्तीक वाटत नाही. त्या विभागात जेव्हढे कर्मचारी/अधिकारी आहे. त्यांना या संदर्भात सर्व परिस्थिती माहित आहे. ६८,६९ सर्व्हे मधील ले-आऊट मंजूर करतांना किती कोर्टाचा कर्जाचा बोजा आहे. कर्जाचा बोजा असतांना ले-आऊट मंजूर करता येतो का? सर्व

नियमात तरतुदी केलेल्या आहे. अधिकाऱ्यांनी सविस्तर खुलासा केला पाहिजे.

सहा. संचालक (न.र.) : या संदर्भात दि. १९-०९-२००३ च्या सभेत खुलासा देण्यात आलेला आहे. त्या ले-आऊटवर ३९.९४ कोटीचा बोजा आहे. तात्पुरती ले-आऊट मंजूरी देतांना असे नमूद केलेले आहेत की, या संबंधात वाद निर्माण झाल्यास अर्जदारंनी परस्पर दुर करावा.

श्री काशीनाथ कोकाटे : या संदर्भात सभागृहात सविस्तर चर्चा झालेली आहे. चर्चेत सर्वांनीच भाग घेतलेला होता. प्रश्न असा आहे की, ले-आऊटवर कर्जाचा बोजा असतांना तात्पुरती मंजूरी देवू शकतो का? एखादया मालमत्तेवर कर्जाचा बोजा असेल तर, दुसरी बँक त्यास तारण ठेऊ शकते का?

श्री तकीहसन खान : कोणत्या नियमाने मंजूरी दिली, कुठे दिली हा भाग वेगळा आहे. टी. डी. आर चा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही. टी. डी. आर लागू केला असता तर हे प्रश्न उपस्थित झाले नसते का. कार्यवाही होत नाही.

श्री प्रशांत देसरडा : ज्या जागेवर ३-४ कोटीचे तारण असतांना त्या जागेस ले-आऊटला तात्पुरती मंजूरी कशी दिली. त्याचा अहवाल येणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत अहवाल देणार होते. प्रत्येक बैठकीत वेळ मागितला जातो. हे प्रशासनाचे धोरण बरोबर वाटत नाही. एक महिन्याचा कालावधी गेला. १ महिन्यात अहवाल तयार होत नसेल तर योग्य नाही. सर्व विभागास विषयपत्रिका दिली जाते. मा. आयुक्त बैठक आयोजित केल्यानंतर त्या बैठकीत मागील सर्वसाधारण सभेत कोणते मुद्दे उपस्थित झालेले होते. त्या संबंधी आढावा बैठक विभाग प्रमुखासमवेत घेतात. सर्व तयारी होत असतांना अधिकारी नकारार्थीचे उत्तर नेहमी देतात. याचा अर्थ काय? सभा होईल चर्चा करतील स. सदस्य जेवण घेतील, सभा संपन्न होईल उर्वरीत दिवस आपलेच असा समज अधिकारी करतात. मा. आयुक्त, मा. महापौर वेळोवेळी सभा घेतात. अहवाल देण्यासंबंधी वेळ दिला जातो. एक अहवाल देवू शकत नसतील तर, योगय नाही. स. सदस्य श्री मीर हिदायत अली व मी मागील महिन्यात एका परवानगीसाठी नगररचना विभागात गेलो असता, नगररचना विभागाने ज्या घराची परवानगीची संचिका होती. त्यांच्या लगतच्या घराचा टॅक्स भरुन घेतला. त्याचे कारण आपलं कमीशन आर्कीटेक्टची प्रकरण दाखल केले. त्यांचेवर कार्यवाही करु शकतो का? आताच अधिकाऱ्यांनी वेळ मागितला काहीही करणार नाही. नोटीस देणार संबंधित परवानगी धारक न्यायालयात जाणार स्थगिती आदेश घेवून येतील. असे होवू नये म्हणून काहींना काही उपाय योजना आपल्या विभागाकडे आहेत का? एक-दोन अधिकाऱ्यांना निलंबीत करीत नाही. तोपर्यंत असा प्रकार बंद होणार नाही. हा एकमेव पर्याय दिसतो. ६८,६९ ला परवानगी दिली कशी कोणत्या नियमाने दिली. त्यावेळी प्रशासन झोपलेले असते का? नियमाने कामे करण्याचे वेतन अधिकाऱ्यांना दिले जाते. संचिका दाखल करणे ती तपासणी करुन परवानगी देणे हे अधिकाऱ्यांचे काम असते. एक विषय समोर आला म्हणून चर्चा होते. अशा प्रकारे किती तरी प्रकरणांत असे झालेले असेल. नगररचना विभाग परवानगी न देताच चलन भरुन घेतात. परवानगी देत नाही. त्या विभागात गेल्यास बाहेर ५-१० नागरिक असतात ते सांगतात

चलन भरुन घेतले परवानगी दिली नाही. सर्व बारीक सारीक बघायचे व एखाद्या मोठया जागेचा ले-आऊट मंजूर करतांना काळजी घेतली जात नाही.

मा. आयुक्त : मागील सभेत सभागृहाने या ले-आऊटला तात्पूरती स्थगिती दिलेली होती. त्यानंतर ही संचिका आयुक्त म्हणून मी मागविलेला होती. त्या संबंधीची डिटेल टिप्पणी माझ्याकडे सादर झालेली होती. त्यात माझ्या अशा सूचना होत्या की, एखादया मालमत्तेवर कर्ज असल्यानंतर त्या मालमत्तेचे मालमत्ता कार्ड असेल. ज्या वेगवेगळया कर्ज देणाऱ्या संस्था असतील त्यांना मिळतात. गहाण म्हणून किंवा लिजने देण्याची शक्यता आहे हे तपासून पाहण्याच्या सूचना दिलेल्या होत्या, दूसर असे की, मालमत्ता कार्ड असेल किंवा सातबारा असेल, गहान किंवा तारण ठेवले असेल तर त्या आर्थिक सहाय्य देणाऱ्या संस्थेने ताबा घेतला असेल नंतर कर्ज दिले असेल त्यांचे नांव कब्जेदार म्हणून आहे का. ती तपासणी करावी. जमिनीवर कायदेशीर कर्जाचा बोजा असतांना देण्यात आलेली परवानगी महापालिकेच्या नियमानुसार आहेत का? कारण डेव्हलपमेंट कंट्रोल रुल्स प्रमाणेच बांधकाम परवानगी दिल्या जातात. त्याप्रमाणे आहे का? मुळ मालक आर्थिक अडचणीमुळे जागा विकसित करु शकत नाही. म्हणून जो कुणी डेव्हलपरला मुख्यत्यारपत्र लिहून देतो. डेव्हलपरने सुध्दा असे कर्ज उचलून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. तो हा तपशील द्यावी. अशा प्रकारच्या सूचना मी नगररचना विभागास दिलेल्या आहेत. या संदर्भात उदया राज्य शासनाने सुनावणीसाठी बोलविण्यात आलेले आहे. सहा. संचालक नगररचना यांना बोलविण्यात आलेले आहे.

श्री भगवान घडामोडे : कर्जाचा बोजा असतांना ते ले-आऊट मंजूर करता येतो का? हा आमचा प्रश्न आहे.

श्री सुनिल मगरे : चूकीने दिलेला असेल तर, त्या अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही होणार आहे.

मा. आयुक्त : विकास कार्य नियंत्रण नियामवलीत तरतुद दाखविली तर, करता येईल. तात्पुरती ले-आऊट मंजूरी देणे बंद करावी. यासंबंधी स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवलेला आहे. ही पध्द्त बंद करण्यात येईल.

श्री भगवान घडामोडे : स्थायी समितीमध्ये अशी ले-आऊट मंजूर करु नये, असा निर्णय झालेला असेल तर त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. ज्यांनी आदेश पाळले नाही. त्यांचेवर कडक कार्यवाही करण्यात यावी. तसेच ८४ व ८६ च्या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे. या संदर्भात काही चार्जेस लावण्यात आले व शेवटच्या वाक्यात असे म्हटले की, ०६ महिन्याच्या विहीत मुदतीत मा. जिल्हाधिकारी कार्यालयास भूसंपादनाच्या संदर्भात दाखल न केल्यामूळे आरक्षण वगळण्यात येते. चौकशी समितीचा अहवाल आला व कार्यवाहीसाठी सभागृहावर सोपविले. परंतू प्रशासकीय पातळीवर या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे. याचा खुलासा करण्यात यावा. प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने आरक्षण वगळले गेले तर कार्यवाही करायची नाही. परंतू स. सदस्यांनी एखादा प्रस्ताव ठेवला तर त्याची चौकशी सी. बी. आय. कडे द्यायची. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आरक्षण वगळण्यात आल्यावर त्या अधिकाऱ्यावर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

उपआयुक्त (प्र.) : सव्हे क्र. ८४ व ८६ च्या संदर्भात मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली जी चौकशी समिती स्थापन झालेली होती. त्या समितीचा अहवाल सादर झालेला आहे. प्रशासनाकडेही सादर झालेला आहे. त्या विभागाकडील संबंधित असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येवून त्यांची चौकशी चालू आहे. कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांना चौकशी अधिकारी म्हणन नेमणूक दिलेली आहे.

श्री भगवान घडामोडे : चौकशी समिती नियुक्त झाली. कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या ते अधिकारी/कर्मचारी या महापालिका सेवेत कायम आहेत. ते कागदपत्राची हेराफेरी करु शकतील. कागदपत्रात बदल करतील त्यानंतर चौकशी होवून काय साध्य होणार आहे. यापूर्वी काय कार्यवाही झालेली आहे. ती कागदपत्रे कुणाच्या ताब्यात दिलेत का? विभाग प्रमुख म्हणून मा. आयुक्तांवर ही जबाबदारी येते का. खुलासा द्यावा?

श्री माणिक साळवे : सदरील अधिकारी/कर्मचारी महापालिकेच्या सेवेत असल्यामुळे कागदपत्राची हेराफेरी होवू शकेल. म्हणून अशा अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे नसता निलंबित करावे.

उपआयुक्त (प्र.) : या चौकशीसाठी स्वतंत्र चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे.

श्री प्रशांत देसरडा : महापालिका नगररचना विभागाच्या बी. पी. एम. सी. ॲक्ट नुसार कार्यवाही होत आहे का? अधिकारी दोषी आहे हे समोर असतांना यात यापुढे काय चौकशी होणार आहे.

उपआयुक्त (प्र.) : चौकशी समितीचा अहवाल आल्यावर दोषी असणाऱ्यांवर काय शिक्षा करावी हे ठरविण्यासाठी बी. पी. एल. सी ॲक्ट नुसार चौकशी होणे आवश्यक आहे.

श्री प्रशांत देसरडा : ज्या प्रकरणांत चौकशी सिध्द होत नाही. अशा प्रकरणांत चौकशी अधिकारी नियुक्त केले जातात. एखादया प्रकरणात चुक झालेली आहे हे सिध्द होत असेल तर, त्यानंतरची काय चौकशी करणार आहे. चौकशीची गरज नाही. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री नंदकुमार घोडेले : चौकशी अधिकारी म्हणून श्री. पानझडे यांना नियुक्त केलेले आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर कार्यवाही करु या प्रकरणांतच हट्ट का?

श्री प्रशांत देसरडा : येथे हट्टाचा प्रश्न येत नाही. जनता टॅक्स भरते. जनतेने आपणांस कामासाठी पाठविले याचा विचार व्हावा. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे. जनतेच्या करातूनच अधिकाऱ्यांचे वेतन होते. याचा विचार करावा. जनतेच्या न्यायासाठी भांडतो आहे.

श्री भगवान घडामोडे : या सभागृहात स. सदस्यांनी दिशाभूल करण्यात येत आहे. चौकशीचा अहवाल प्रत्यक्ष सभागृहात सादर झालेला असतांना त्यानुसार आता अधिकारी/कर्मचारी यांचेवर काय कार्यवाही करायची सभागृहाला विचारणा होत असले तर योग्य नाही. जे अधिकारी/कर्मचारी दोषी आहेत ते अनेक वर्षानुवर्षापासून त्या विभागात काम करतात, त्यांचा तेथे प्रभाव पडलेला आहे. म्हणून कागदपत्रांची हेराफेरी करु शकतील म्हणून शंका व्यक्त करण्यात आलेली असून, प्रशासन म्हणून काय कार्यवाही होणार आहे. याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : श्री प्रशांत देसरडा यांनी जी मागणी केलेली आहे, ती बरोबर आहे. चौकशी अधिकारी नियुक्त केले. परंतू कोणताही चौकशीचा अहवाल

सभागृहासमोर येत नाही. तो पर्यंत निर्णय घेता येणार नाही. ०७ दिवसात अहवाल देण्याबाबत ओदशित करावे. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करण्यांत यावी. असे माझे मत आहे.

श्री सुनिल मगरे : चौकशी अहवाल समोर आला असतांना पुन्हा चौकशी अधिकारी का नियुक्त करण्याची गरज पडते. याचा खुलासा द्यावा.

मा. आयुक्त : या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. कृपा करुन समजून घ्यावे. समिती नेमणे समितीने प्राथमिक चौकशी करुन अहवाल देणे, कायद्याप्रमाणे १-२-, ३ नोटीसा ज्यांना द्याव्याच लागतात. प्रपत्र क्र. १ ज्ञापन असते. २ मध्ये त्यांचा खुलासा, ३ मध्ये कोणते कागदपत्रे पुरण्यासाठी आहेत. त्यांची यादी, प्रपत्र ४ मध्ये कोणते साक्षीदार राहतील त्यांची यादी. ही प्रशासनाची कार्यवाही पूर्ण झाल्याचे उपआयुकत (प्र.) यांनी सांगितले. हेराफेरी झाली का, त्यासाठी प्राथमिक चौकशी आवश्यक असल्याची शिफारस करु शकतात. हा अहवाल सभागृहात आहे. त्यावर एकदम कार्यवाही होत नसते. याशिवाय हे सांगू इच्छितो की, पदाधिकारी किंवा सभागृहाचे स. सभासद जेव्हा प्राथमिक चौकशीचा शिफारस करु शकतात. नैसर्गिक न्याय तत्वानुसार न्याय मिळायला पाहिजे. त्यासाठी चाकोरीतून जायलाच पाहिजे. चौकशी जास्त काळ चालली तर त्यातील गांभीर्य कमी होते.

श्री प्रशांत देसरडा : डॉ. देशपांडे यांची चौकशी चालू होती. अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

मा. आयुक्त : डॉ. देशपांडे यांची चौकशी निपक्षपातीपणे व्हावी म्हणून, बाहेरचे न्यायाधिश नियुक्त केले आहे. मा. उच्च न्यायालयाने त्यांना मुदतवाढ दिलेली आहे.

मा. महापौर : लवकरात लवकर चौकशी अहवाल या सभागृहासमोर सादर करावा.

**ठराव क्र. १५३/१ :** दिनांक १९-०९-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. १५४/२ :** सर्वसाधारण सभा दि. १९-०९-२००३ विषय क्र. १४५-३ अन्वये स्थगित ठेवलेला प्रस्ताव पूढील सभेत ठेवण्यात यावा. असा निर्णय झालेला असल्याने दि. १९-०९-२००३ रोजीच्या सर्वसाधासरण सभेत ठेवलेला विषय पून्हा सादर करण्यात येत आहे.

सर्वसाधारण सभा विषय क्र. ३७-२ दिनांक १९-०३-२००३ अन्वये नगररचना विभागाकडील प्रस्ताव शहर सुधार समिती सभेकडे पाठविण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार शहर सुधार समिती सभा दि. १६-०८-२००३ (दि. ०५-०७-२००३ रोजी तहकुब झालेली सभा)

विषय क्र. ४-२ अन्वये ठेवण्यात आले असता, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये प्राप्त होणाऱ्या सूचनेवर विहीत मुदतीत कार्यवाही पूर्ण करणे प्रथम शहर सुधार समिती व समितीच्या शिफारीसह सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे या सूचनासह प्रस्तावास मंजूरी देवून सर्वससाधारण सभेपूढे ठेवण्यात शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार १२ व टर (४० फुट) रुंद रस्ता हर्षनगर ते लेबर कॉलनी या रस्त्याने न. भू. क्र. ६८७४ व ६८७५ हया मिळकती बाधित आहे. उक्त मिळकत धारकाने बाधित क्षेत्र संपादर करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिनांक २८-०८-२००२ रोजी दिलेली आहे. प्रकरणांत १२७ ची खरेदी सूचना असल्याने

भूसंपादन प्रस्ताव खरेदी सूचना दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत म्हणजे दिनांक २७-०२-२००३ पूर्वी मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

उक्त रस्त्याने वरील मिळकती बाधित असून, बाधित क्षेत्र अंदाजे अनुक्रमे २५२ चौ. की. व २४१ चौ. मी. असे एकूण ४९३ चौ. मी. आहे. शिघ्र सिध्द गणक दर रु. ३०००/- प्रति चौ. मी. आहे. करीता भूसंपादनासाठी सुमारे १५ लाख रु. खर्च अपेक्षित आहे.

प्रकरणात मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिली असल्याने बाधित क्षेत्र संपादन करणे आवश्यक आहे.

सबब उक्त मिळकतीचे वरील बाधित क्षेत्र संपादन करण्यासाठी व त्यास लागणारा वरीलप्रमाणे भूंसंपादन खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री नंदकुमार घोडेल : प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कलम १२७ ची खरेदी सूचनेची नोटीस दि. २७-०२-२००३ पुर्वी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक होते. वारंवार सभागृहात मागणी होते की, जेव्हा मिळकत धारक १२७ ची नोटीस देतो. प्रकरणात उशीर झाला. १५ लक्ष अदा करण्याबाबत प्रस्ताव आलेला आहे. त्या मिळकतीच्या नकाशा सभागृहात ठेवण्याची गरज आहे. काही ठिकाणी भाडेकरु असतांना काही जागेवर अतिक्रमण झालेले असते. ही बाब प्रस्तावात नमुद नसते. तसेच महत्वाचा लेखाविभाग त्याचा सुध्दा अभिप्राय असणे महत्वाचे आहे. मा. आयुक्तांना वाटाघाटी करण्याचे अधिकार आहे. कारण एखादया जागेची किंमत रेडीरेक्नर प्रमाणे २०० रु. स्कवे. फुट तर बानुलाच रु. १००/- स्ववे. फुट असते व २०० रु. किमंतीनुसार महापालिकेस पैसे द्यावे लागतात. कलम १२७ ची नोटीस १० वर्षानंतर द्यावी लागते. प्रत्येक प्रस्ताव सर्वसाधार सभेपुढे येतो. एकवेळ अशी येईल की, कर्मचाऱ्यांचे पगार व विकास कामासाठी पैसा राहणार नाही. संपूर्ण वर्ष भरातील उत्पन्न मिळकत धारकांना द्यावे लागतील. याबाबतीत एक धोरण महापालिकेस ठरवावे लागतील. मा. आयुक्त, पदाधिकारी यांनी एकत्रित बसून, अशा प्रस्तावाच्या अनुषगाने जागेच्या संबंधिचे रक्कमा देण्याबाबतचे धोरण ठरवावे व यासाठी समिती गठीत करावी.

श्री माणिक साळवे : मागील वेळेस हर्षनगर येथील नागरिकांनी या रस्त्याच्या कार्यवाही करण्यासंबंधी उपोषण केलेले होते. हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री भागवत कराड : रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव आहे. रस्ते असावेत म्हणून हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री तकीहसन खान : पहिल्यादांच ठराव आलेला होता. त्याला स्थगिती दिलेली होती. त्याचे कारण काय? आताच स. सदस्यांनी सूचना केली नकाशा वगैरे असावेत. आज शंका निर्माण होते की, कोणता रस्ता आहे. कोठे जातो. किती मीटर आहे, काही बोध होत नाही. खुलासा घ्यावा. १२७ च्या नोटीस देणाऱ्यांची अशी किती प्रकरणे आहेत. टी. डी. आर. लागू होत नाही. अन्यथा हा प्रश्नच उद्‌भवणार नाही. टी. डी. आर का लागू होत नाही.

(याचवेळी संबंधित अधिकारी नकाशा दाखवितातद्य)

मा. आयुक्त : कलम १२७ च्या संदर्भातील विषय यापूर्वीच सभागृहात झालेला होता. माझे निवेदन आहे की, १२७ नोटीस दिल्यानंतर ६ महिने व १ वर्ष संपल्याचे अशा जागाची यादी द्यावी. त्याची यादी सहा. संचालक नगररचना यांनी मा.

महापौर व माझ्याकडे दिलेली आहे. चालू वर्षात कोणत्या प्रस्तावाची मुदत संपणार आहे. याची माहिती घेतलेली आहे. परंतू इमारती जागेची तरतुद वेगळी करता येणार नाही. विकास योजना आराखडयात जी आरक्षणे आहेत. ती जास्तीत जास्त १० वर्ष राहू शकते. १० वर्षात कुठलीच कार्यवाही भुसंपादनाची केली नाही व १२७ ची नोटीस दिली व मुदतीत भूसंपादन प्रस्ताव पाठविला नाही, तर आरक्षण रद्द होते. म्हणून महापालिकेस पुढील भविष्यासाठी आरक्षणे विकसित करणे जेव्हढे आवश्यक आहे, तेव्हढेच त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. इतर महापालिकेत सुध्दा हीच परिस्थती थोडयाफार प्रमाणात दिसून येईल. या वर्षी महापालिकेने जागा भूसंपादनासाठी ७.२५ कोटी तरतुद केली. पुढील वर्षी जास्तीत जास्त १०-१५ कोटी ठेवू शकतो. यापेक्षा जास्त निधी भूसंपादनासाठी ठेवू शकत असतात. तर मा. महापौर, पदधिकारी व जे इच्छुक असे स. सदस्य यांनी एकत्रित बसून असे विषय घेतले पाहिजे. या शहरातील त्या त्या भागातील जी आरक्षणे महापालिकेच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची वाटतात. त्याबाबत प्रधान्यक्रम देवून यादी बनवली. मा. उच्च न्यायालयात यादी सादर केलेली आहे. १० वर्ष गेल्यानंतर पुन्हा रिझर्व्हेशन ठेवावे लागेल. मोठया प्रमाणात नुकासान भरपाई भरावी लागेल. प्रसंगी जास्त निधी ठेवल्यास १२७ च्या नोटीस नुसार प्रकरणे हाताळण्यास अडचणींचे होईल. संबंधित मिळकत धारक न्यायालयातही जातील. त्यामुळे बऱ्याच वेळा जागा भूसंपादन करीत नाही. म्हणून न्यायालयात पैसे भरण्याची वेळ येत आहे. ती येवू नये. महापालिकेस भूसंपादनासाठी शासन अनुदान देत नाही. अन्य विभागात अनुदान मिळण्याची तरतुद आहे. भूसंपादनाचा हा किचकट विषय आहे. पूढील १० वर्षाचे जे नियोजन समोर ठेवून पुढील १० वर्षासाठी निधी उपलब्धतेसाठी रोख, बॉंड इ. उपाय योजनेसाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. अधून मधून परिस्थितीत बदल होत रहील.

श्री आनंद तांदुळवाडीकर : संपूर्ण विकास आराखडा मंजूर करण्यासाठी १०० कोटी रुपये लागतील अशी परिस्थिती आहे. इतर महापालिकेत सुध्दा आहे. यामुळे महाराष्ट्र शासनाने समुचित आरक्षणाच्या माध्यमातून विकास करण्यासाठी योजना काढलेला आहे. त्यानुसार २५% महापालिका व ७५% मुळ मालाकाने विकसित करावयाचे असे आहे. इतर महानगरपालिका प्रभावीपणे अमंलबजावणी करते. आपण का नाही यावर विचार व्हावा.

मा. आयुक्त : सुचना विधायक आहे. जेथे आरक्षण आहे तेथे ७५%, २५% प्रमाणे जागा विकसित करण्यासाठी देता येईल. परंतु रस्त्यासाठी जागा संपादित करावी लागेल. त्यासाठी या जी. आर. चा आधार घेवूनच कार्यवाही करावी लागते. हा एक भाग झाला महानगरपालिकेने १९९७ साली ७५%, २५% प्रमाणे ४ प्रकरणे मंजूर केलेली प्रकरणे मंजूर केलेली होती. प्रत्यक्षात त्या ठिकाणाची परिस्थिती पाहता आता ३ प्रकरणात आहे. त्याच स्थितीत ताबा घेण्या शिवाय पर्याय नाही. जो भाग महापालिकेस घ्यावयाचा होता तो मिळाला नाही. त्यास उशीर९झालेला आहेत. त्या जागा ताब्यात घेण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आलेल्या आहे. यात जे कुणी दोषी असतील त्याचेवर कार्यवाही करण्यात येईल. ७५%, २५% जागा विकसित करण्याचे विधायक धोरण अवलंबवावे. टी. डी. आर. हा विषय सुध्दा १९९४, ९५

पासून चर्चेला आहे. यावर मी अभ्यास केला १९९७ मध्ये सुध्दा प्रस्ताव आलेला होता. शहर सुधार समितीत हा विषय आलेला होता. त्यानंतर हे प्रकरण नगररचना विभागाकडे आहे. त्यांचेकडून पूढील कार्यवाही अपेक्षित आहे. त्या काही दुरुस्त्या होवून सर्वसाधारण सभेत तो प्रस्ताव येईल. त्यास ८ दिवस लागतील. त्यावर किमान ४-५ तास चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

श्री भागवत कराड : महत्वाचा विषय असल्याने विशेष सभा घ्यावी व सविस्तर चर्चा घडवून आणावी. काही ठिकाणी रिझर्वेशन डिलीट होवून त्या ठिकाणच्या जागा भूसंपादन करण्याची गरज असतांना व टी. डी. आर. प्रस्तावास मान्यता मिळाल्यास व लागू केल्यास भूसंपादनाची रक्कम द्यावी लागणार नाही. त्या संदर्भात तात्काळ बैठक आयोजीत करावी.

श्री प्रकाश निकाळजे : या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित मिळकत धारकोन १२७ ची नोटीस दिलेली आहे. रस्त्यामधील जागेस नगररचना विभागाने दिली. त्या ठिकाणच्या लोकांचा रस्ता बंद झाला. त्यामुळे त्यांनी आंदोलन केले. निर्दशने केली, उपोषणही केलेले आहे. या दोन्ही बाबी लक्षात घ्याव्यात. जी परवानगी देण्यात आली चौकशी व्हावी. तसेच तेथील नागरिकांना रस्ता उपलब्ध करुन द्यावा. विकास योजनेप्रमाणे हा रस्ता मोठा असून त्या लोकांना जागा मिळवून देण्यात यावी. चर्चेच्या वेळी मिळकत धारक २० फुट जागा सोडायला तयार होते, चर्चा करुन प्रश्न सोडवला येत असेल तर ते ही पाहण्यात यावे.

श्री स. अली मिरा सलामी : विकास आराखडयात ती जागा रस्त्यासाठी होती तर परवानगी कोणत्या नियमाने दिली. खर्चेसाठी बोलावून रक्कम देण्याचा प्रश्नच येत नाही. सविस्तर खुलासा द्यावा.

सहा. संचालक न. र. : हर्षनगर येथील सि. स. नं. ६८७४, ६८७५ दोन्ही जागा या खुल्याच आहेत. ती फक्त भूखंडाचे संरक्षण करण्यासाठी तारफिटंगची दिलेली आहे. बांधकाम परवानगी दिलेली नाही.

श्री राधाकृष्ण गायकवाड : प्रस्ताव क्र. २ वर चर्चा चालू असून, संबंधित पार्टीला १५ लक्ष रु. देण्याचा आहे. तसेच प्रस्ताव क्र. ३ सुध्दा त्याप्रमाणे जागेचा मोबदला देण्याबाबतचा आहे. मा. आयुक्त यांनी या संदर्भात सविस्तर असा खुलासा केलेला आहे. या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा. अधिकारी/पदाधिकारी यांची एक कमीटी नियुक्त करावी. दोन्ही ठराव सारखेच आहे ते स्थगित ठेवावे. १२७ चे नोटीसचे खूप प्रकरण आहे. टी. डी. आर. लवकरात लवकर लागू होईल. त्यासाठी कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : प्रस्ताव क्र. २ व ३ च्या संदर्भात अधिकारी/पदाधिकारी यांची कमीटी नियुक्त करुन निर्णय घेता येईल. तो पर्यंत दोन्ही प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १५४/२ :** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कलम १२७ अन्वये नोटीस प्राप्त झालेल्या प्रकरणातील आरक्षित जागा संपादन करण्याकरीता धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने महापालिका अधिकारी, पदाधिकारी यांची एक कमीटी नियुक्त करुन निर्णय घेण्यात यावा. तोपर्यंत प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५५/३ :** सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे सातारा येथील सर्व्हे क्रमांक ५७ पैकी मिळकत धारक श्री शोधन यशवंत जोशी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिनांक १८-०४-२००३ रोजी दिलेली आहे.

उक्त मिळकत धारकांची जमीन मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार २४ मीटर व १.५ मीटर रुंद रस्त्याने बाधित असून, बाधित क्षेत्र सुमोर ५१८३.३८ चौ. मी. आहे. उक्त बाधित क्षेत्र संपादनप करण्यासाठी अंदाजे मोबदला रक्कम रु. १ कोटी (रुपये एक कोटी) अपेक्षित आहे.

मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेली खरेदी सुचना दिनांक १८-०४-२००३ पासून सहा महिन्याचे आत म्हणजे दिनांक १७-१०-२००३ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. नसता विकास योजनेतुन उक्त मिळकत मुप्त होवू शकते.

करीता, उक्त मिळकत धारकाने दिलेल्या सूचनेप्रमाणे भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/१९०५-२००३ दिनांक २३-०९-२००३ अन्वये पाठविण्यात आलेला आहे.

सबब प्रकरणात पूढील कार्यवाही होण्यासाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवून प्रकरणांत भूसंपादनास लागणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. १५५/३ :** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कलम १२७ अन्वये नोटीस प्राप्त झालेल्या प्रकरणातील आरक्षित जागा भूसंपादन करण्याकरीता धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने महापालिका अधिकारी, पदधिकारी यांची एक कमीटी नियुक्त करुन निर्णय घेण्यात यावा. तो पर्यंत प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५६/४ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला मिलकॉर्नर ते बारापूल्ला गेट ते लिटल फ्लॉवर स्कुल पर्यंत २४ मी. रुंद रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता अ. प. २९,०५,०००/- चे तयार करण्यांत आले असून, सदरील कामाची दरसूची सा. बा. विभागाच्या दरसूची २००२-२००३ नुसार अं. प. तयार करण्यात आले आहे.

सदरील काम नविन डांबरीकरण सन २००३-२००३ मधून प्रस्तावित केलेले आहे. मा. आयुक्तांनी दि. २६-०९-२००३ ला प्रशासकिय मंजूर दिलेली आहे. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा. महापौर : विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १५६/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिल कॉर्नर ते बारापूल्ला गेट ते लिटल फ्लॉवर स्कुल पर्यंत २४ मी. रुंद रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रु. २९,०५,०००/- चे अंदाजपत्रकात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७/५६ :** कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पहाडसिंगपूरा व लगतच्या विकासासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी जलकुंभ बांधण्यात येवून वितरण व्यवस्था करण्यासाठी विविध व्यासाच्या जलवाहिन्या टाकाव्या लागणार आहे.सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००२-२००३ च्या दरसूची नूसार रक्कम रु. ६६,००,०००/- एवढयाचे अदांजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास

मा. आयुक्त यांनी दिनांक २६-०९-२००३ रोजी मान्यता दिली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे (पा. पु.) या लेखा शिर्षकामधून करण्यात येणार आहे. रु. ६६,००,०००/- या अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी रु. १५,००,०००/- एवढया रक्कमेचे काम या आर्थिक वर्षात (२००३-२००४) करण्यात येईल व उर्वरित काम पूढील आर्थिक वर्षात करण्यात येईल.

करीता, अदांजपत्रक रक्कम रु. ६६,००,०००/- एवढयाचे विचारार्थ व मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

मा. महापौर : विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १५७/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पहाडसिंगपूरा व लगतच्या परिसरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी जलकुंभ बांधण्यात येवून वितरण व्यवस्था करण्यासाठी विविध व्यासाच्या जलवाहिन्या टाकाव्या लागणार आहे. सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००२-२००३ च्या दरसूची नूसार रक्कम रु. ६६,००,०००/- एवढयाचे अदांजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दिनांक २६-०९-२००३ रोजी मान्यता दिली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे (पा. पु.) या लेखा शिर्षकामधून करण्यात येणार आहे. रु. ६६,००,०००/- या अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी रु. १५,००,०००/- एवढया रक्कमेचे काम या आर्थिक वर्षात (२००३-२००४) करण्यात येईल व उर्वरित काम पूढील आर्थिक वर्षात करण्यात यावे, यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५८/६ :** कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या वार्षिक क्लोरीन गॅसच्या पुरवठयासाठी अदांजपत्रक रु. २१,२८,१००/- चे तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त महादेय यांनी दिनांक ८-९-२००३ रोजी मंजूरी दिली आहे.

वर्ष २००३-२००४ करीता, वार्षिक क्लोरीन गॅस खरेदीसाठी अंदाजपत्रक रुपये २१,२८,१००/- चे सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे.

मा. महापौर : विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १५८/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक क्लोरीन गॅसच्या पुरवठयासाठी रु. २१,२८,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/७ :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-५ पाण्याची टाकी ते बजरंग चौक पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाच्या अदांजपत्रक रक्कम रुपये २१,८३,८८८/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसूची २००२-२००३ नुसार तयार केले असून, सदरचा खर्च भांडवली कामे या लेखाशिर्षका अंतर्गत प्रस्तावित आहे.

या भागातील स. नगरसेवक श्री. नंदकुामार फुलारी यांनी पत्र देवून विनंती केल्यावरुन त्यांच्या वार्डातील कामासाठी ठेवलेल्या आर्थिक तरतुदीपैकी दोन कामे रद्द करुन (अर्थ संकल्पाचे पुस्तक पृष्ठ क्र. १५३, अ. क्र. ७५ व पृष्ठ क्र. १५२, अ.क्र. ४८) त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १८,००,०००/- व पृष्ठ क्र. १५१, अ. क्र. ४० मधील रुपये २८,००,०००/- या तरतुदी मधून (Block Budget) रुपये ३,८३,८८८/- असे एकूण रु.

२१,८३,८८८/- ऐवढी तरतुद एकत्रीत करुन, एन-५ जलकुंभ ते बजरंग चौक पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची सा. आय. जलवाहिनी टाकणे बाबत अदांजपत्रक तयार केले आहे. सदरचे काम अति आवश्यक असून, त्यामुळे पाणी पुरवठयाच्या वेळेत बचत होणार आहे.

सदर कामाचा समोवश अर्थसंकल्पीय पुस्तीकेत नावनिशी नसल्यामुळे त्यास सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे. तरी अदांजपत्रक रक्क्म रुपये २१,८३,८८८/- ला कृपया मान्यता द्यावी. तसेच अर्थसंकल्पीय पुस्तीकेत या कामाची नोंद नसल्यामुळे वरील परिच्छेदात उल्लेख केलेली कामे रद्द करण्यास व या रुपये २१,८३,८८८/- रक्कमेच्या कामाचा समावेश या वर्षीच्या अर्थसंकल्पात करावा असा प्रस्ताव आहे.

प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव क्र. १५९/७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स. नगरसेवक श्री. नंदकुमार फुलारी यांनी पत्र देवून विनंती केल्यावरुन त्यांच्या वार्डातील कामासाठी ठेवलेल्या आर्थिक तरतुदीपैकी दोन कामे रद्द करुन (अर्थ संकल्पाचे पुस्तक पृष्ठ क्र. १५३, अ. क्र. ७५ व पृष्ठ क्र. १५२, अ.क्र. ४८) त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १८,००,०००/- व पृष्ठ क्र. १५१, अ. क्र. ४० मधील रुपये २८,००,०००/- या तरतुदी मधून (Block Budget) रुपये ३,८३,८८८/- असे एकूण रु. २१,८३,८८८/- ऐवढी तरतुद एकत्रीत करुन, एन-५ जलकुंभ ते बजरंग चौक पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची सा. आय. जलवाहिनी टाकणे बाबत अदांजपत्रक तयार केले आहे. सदरचे काम अति आवश्यक असल्यामुळे अदांजपत्रक रक्क्म रुपये २१,८३,८८८/- ला मान्यता देण्यात येते. तसेच वरील उल्लेख केलेली दोन कामे रद्द करण्यास व या रुपये २१,८३,८८८/- रक्कमेच्या कामाचा समावेश या वर्षीच्या अर्थसंकल्पात करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६०/८ :** शिक्षणाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव दिली आहे की, डॉ. प्रफुल्ल गिरजगांवकर, अध्यक्ष रोटरी क्लब, औरंगाबाद, यांनी पत्र देवून कळविले आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतील शाळा मधून पुरवठा होत असलेले पाणी विद्यार्थ्यांना शुध्द पाणी मिळत नाही. सर्वेक्षण करुन त्यांनी अनुमान काढले की, बहुतेक मुलांना अशुध्द पाणी पिण्यामुळे विविध आजार होतात.

पेय जल प्रकल्पाद्वारे शहरातील ३०० शाळांना पुरवठा करण्याचे रोटरी क्लबने ठरविले आहे. त्यापैकी ६६ मनपाच्या शाळेची निवड केलेली आहे.

प्रत्येक शाळेसाठी ३०,०००/- खर्च अपेक्षित आहे. ६६ शाळांना एकूण खर्च ३०,००० x६६ = १९,८०,०००/- रु आहे. रोटेरी क्लब ५०% खर्च करावयाचा आहे. महानगरपालिकेस ९,९०,०००/- रु. खर्च येणार आहे. हा खर्च दोन वर्षात करावयाचा आहे. या वर्षी २००३-२००४ मध्ये ४,९५,०००/- खर्च येणार आहे.

सदरील प्रकल्प अत्यंत चांगला असून, शाळेतील विद्यार्थ्यांची शुध्द पाण्याची सोय होईल. रु. ४,९५,०००/- खर्च मनपास करावा लागणार आहे.

**संवाद :**

श्री भागवत कराड : महापालिका संपूर्ण शहराला पाणी पुरवठा करते. महापालिकेच्या शाळांना पाणी पुरवठा करण्यासाठी विकत घेण्याची गरज नाही. ज्या ज्या महापालिकेच्या शाळा असतील. तेथे नळ कनेक्श्न देण्याबाबत त्वरित आदेश द्यावेत व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था करावी. परंतु अशा रोटरी क्लब मार्फत कंपनीचे पाणी विकत घेवू पाणी पुरवठा करण्यात येवू नये.

श्री भगवान घडामोडे : चुकीचा प्रस्ताव सादर झालेला असून, महानगरपालिका जो पाणी पुरवठा करते, त्यावर शिक्षणाधिकारी यांनी या प्रस्तावाच्या माध्यमातून अविश्वास दाखवून दिला. पूरविण्यात येणारे पाणी अशुध्दा आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. एक प्रकारचे प्रमाणपत्रच सादर झाले. प्रस्ताव ठेवतांना विचारपूर्वक ठेवला पाहिजे. काळजी घ्यावी. यापूढे असे प्रस्ताव समोर येवू नये. महानगरपालिका पुरवठा करीत असलेले पाणी शुध्द आहे, त्यामळे प्रस्ताव नामंजूर करावे व संपूर्ण शाळेवर महानगरपालिकाच्या मार्फत पाण्याची व्यवस्था करावी.

श्री नंदकुमार घोडेले : कुणाच्या सांगण्यावरुन पाणी अशुध्द आहे व अशा प्रकारचा प्रस्ताव ठेवणे ही पध्द्त अत्यंत चुकीची आहे. संपूर्ण शहराला महानगरपालिका पाणी पुरवठा करते आणि महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांना पाणी विकत घेण्याचा प्रस्ताव येतो. या सारखे दुर्देव नाही. या शाळांना महानगरपालिका पाणी पुरवठा करु शकत नाही का? मुलांना मोफत वहया, पुस्तके वाटप करते. गणवेश देण्यात येतात. इतर ही सुविधा आहेत. पाणी देऊ शकत नाही का? प्रस्ताव रद्द करावा. शिक्षणाधिकारी यांना ताकीद द्यावी. शहरातील सर्व महापालिकेचया शाळेवर पाणी पुरवठा करण्याबाबत कार्यवाहीचे आदेश द्यावे. हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री जयवंत ओक : याबाबत सविस्तर खुलासा व्हावा. प्रस्ताव ठेवण्याचा हेतू काय?

श्री प्रशांत देसरडा : प्रस्ताव ठेवतांना बरोबर ठेवलेला नाही. रोटेरी क्लब शाळेवर हौद वगैरे बांधकाम करणार आणि महापालिकेस राहणार असे वाटते. जे बांधकाम करुन देणार त्यावरील ५०% खर्च द्यायचा का?

शिक्षणाधिकारी : महापालिकेच्या शाळेवर महापालिकेमार्फत पाणी पुरवठा केला जातो. फक्त ७ ते ८ शाळांवर नळ कनेक्श्न नाही. इतर सर्व शाळेवर नळ कनेक्श्न आहेत. वारंवार नळ फुटल्याचे प्रकार होऊन दुरुस्त करण्यात वेळ लागतो. तसेच नळाला कमी प्रमाणात पाणी पुरवठा होतो. अशाही तक्रारी शाळेच्या मुख्यध्यापाकांच्या आलेल्या आहेत. या संस्थेचा शहरातील ३०० शाळांना शुध्द पेय पुरविण्याचा प्रकल्प आहे. महापालिकेच्या ८३ शाळा आहे. त्यापैकी ६६ शाळांवर शुध्द पाणी पुरवठा करण्याची या संस्थेचे ध्येय आहे. त्यातही संस्था हौद वगैरे बांधून देणार. महापालिकेचे पाणी टाकणार पाणी सोडविल्यानंतर त्यावर शुध्द करण्याची प्रक्रिया केली जाईल. तशी योजना करुन नळाद्वारे मुलांना पिण्यासाठी पाणी दिले जाईल. प्रत्येक शाळेसाठी ३०,०००/- खर्च येणार आहे. अशा ६६ शाळेसाठी १९.८० लक्ष खर्च अपेक्षित आहे. यातील ५०% खर्च ही संस्था करणार आहेत. ५०% महापालिका करणार आहे. हा खर्च दोन वार्षीक द्यावयाच्या आहे.

श्री जयवंत ओक : शाळेतील मुलांना पाणी मिळलेच पाहिजे. ६५ शाळांना पाणीच देत नाही. यात ५०% खर्च सदर संस्था करणार आहे. पाणी विका घेणार का? आपलंच पाणी असेल व सदर संस्था हौद वैगेरे बांधकाम करुन देणार असेल व त्याबाबत ५०% खर्चाची मागणी असेल तर, प्रस्ताव मंजूर करण्यात हरकत नसावी. याचा सर्व्हे व्हावा. मुलांचा प्रश्न आहे. मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री नंदकुमार घोडेले : महापालिकेचे पाणी शुध्दच आहे. त्याचे शुध्दीकरण करण्याची गरज नाही. राहिला प्रश्न पाणी साठविण्याचा पुष्कळ कंपीनच्या किंवा सिनटॅक्स कंपनीच्या टाक्या सध्या बाजारात उलब्ध आहेत. पाणी साठविण्यासाठी हौद

बांधण्याची गरज नाही. सर्वच जेथे हौद नसेल त्या शाळांना सिनटॅक्स टाकी देण्यात यावी व पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा अधिकारी यांना आदेशीत करावे हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : वृत्तपत्रात बातम्या येतात. महापालिकेच्या शाळेत मुलांना बसविण्यासाठी जागा नाही. विद्यार्थी उघडयावर, फरशीवर बसतात असे चित्र आहे. या पाण्यासाठी दोन वर्षात महापालिका ९-१० लक्ष द्यावे लागणार ४-६ दिवसापूर्वी आपण स्वत: पदाधिकारी तसेच संबंधित अधिकारी यांनी पाणी पुरवठा योजने संबंधी भेट दिली असून, प्रत्यक्ष पाणी येण्याच्या जागेपासून ते नळाला घरापर्यंत पाणी येते इथ पर्यंत किती प्रक्रिया केली जाते. याचा प्रत्यक्ष अनुभव घेताल. मोठ मोठया कंपन्यांना सुध्दा महापालिकेमार्फत पाणी दिले जाते. म्हणून असा प्रस्ताव ठेवणे चुकीचे वाटते. यात दर्शविलयानुसार ६६ शाळांना शुध्द पाणी व इतर शाळा व शहराला व शहराला अशुध्द पाणी मिळते का? असा गैरसमज जनतेमध्ये होईल, हा प्रस्ताव नामंजूर करावा व महापालिकेने सर्व शाळेवर पाण्याची व्यवस्था करावी.

श्री भागवत कराड : रोटरी क्लब हे शाहेला शुध्द पाणी देण्याी इच्छा असेल, पाण्यास प्रक्रिया करुन फिल्टर झालेले पाणी देणार आहे. किती शाळेवर व्यवस्था करणार उर्वरित शाळेवर महापालिकेच्या खर्चाने करण्यांत यावे. तसेच ज्या ५-७ शाहेमध्ये नळ कनेक्श्न नाही ते देण्यात यावे. त्वरीत व्यवस्था करण्यात यावी.

श्री जयवंत ओक : पाहणी करावी, कोणत्या शाळेवर पाण्याची व्यवस्था नाही. इतर मोठमोठया रक्कमेचे प्रस्ताव मंजूर होतात, लहान मुलांना पिण्याचे पाणी मिळत नाही. विचारात घ्यावे. ५०% रक्कम द्यावी लागणार आहे. पाहणी करुन निर्णय करावा. इतर अधिकारी/पदाधिकारी यांनी शाळेला भेटी दिल्या का? असा प्रश्न आहे. पाहणी करुन निर्णय घ्यावा. प्रस्ताव स्थगित करावा. जेथे पाणी नसेल तेथे पाणी द्यावे. वृत्तपत्रात मोठमोठया बातम्या प्रसिध्द होतात. २५% पाणी गळतीमुळे वाया जाते. एकीकडे महापालिकेच्या शाळेतील मुलांना पिण्याचे पाणी नाही. सर्व शाळेत पाणी पुरवठा झाला पाहिजे. गरीबांची मुले शिक्षण घेतात. योग्य तो निर्णय व्हावा.

मा. महापौर : सदर विषय तुर्त स्थगित ठेवण्यात येत असून, शाळेवर पाणी करुन निर्णय घेतला जाईल.

श्री स. अली मिरा सलामी : प्रस्तावात शुध्द पाणी असा शब्द आला. शहराला अशुध्द पाणी येते का? चुकीच्या पध्दतीने मांडलेला आहे. गैरसमज करु घेवू नये. ५०% सवलत खर्चाने मिळत आहे. गरीबांचे मुले शाळेत येतात. याचा विचार व्हावा. योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. आयुक्त : संबंधित संस्था एका शाळेवर प्रस्तावानुसार शुध्द पाणी देण्या संबंधीची उपाययोजना करतील. तेथे पाहणी करावी. म्हणजे इतर शाळांना त्याप्रमाणे चाचणी घ्यायची किंवा काय याचा निर्णय घेता येईल.

सौ. दाणे चंद्रभागाबाई : काही शाळांची परिस्थिती वाईट आहे. मुलांना शौच्छालय नाही. घाण साठलेली आहे. मा. आयुक्त व मा. महापौर यांनी शाळेला भेटी द्याव्या.

मा. महापौर : शाळांची पाहणी करुन निर्णय घेण्यात येईल. स्थगित करण्यात येतो.

**ठराव क्र. १६०/८ :** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महापालिका शाळांची पाहणी करुन निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १६१/९ :** कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरात विविधि ठिकाणी जुन्या जलवाहिन्या काढून त्या ठिकाणी नविन C. I./D.I. जलवाहिन्या टाकणे करीता, तसेच दाट दाट लोकवस्तीतील जुन्या खराब झालेल्या व पाण्याच्या दुषील होणाऱ्या तक्रारी ज्या भागातून जास्त येत आहेत. अशा ठिकाणी C. I./D.I. (Ductile Iron) जलवाहिन्या टाकण्याच्या विविध कामांना मा. आयुक्त यांनी प्रशासकीय मंजूरी दिली आहे. अशी एकूण सुमोर ३३ कामे आहेत. या कामांना लागणारे C. I./D.I. पाईप व इतर साहित्य उदा. C. I. Specials, Bends, Tees C. I. Valves इ. एकत्रित खरेदी करुन खात्यामार्फत कंत्राटदारास पुरवठा करुन कामे करण्याचे ठरले आहे.

उपरोक्त उल्लेखलेल्या काही कामाच्या निविदा बोलाविल्या असता, कंत्राटदारांनी या निविदा १५ ते २०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने भरल्याचे दिसून आले. या निविदा पुन्हा बोलविल्या असता, साधारणपणे हेच दर पुन्हा प्राप्त झाल्याने निविदांच्या वाटाघाटी करतांना मा. आयुक्त, मुख्यलेखाधिकारी व कार्यकारी अभियंता (पा. पु.) यांनी असा निर्णय घेतला की. C.I./D.I. पाईपची व साहित्यांची एकत्रित यादी करुन निविदा काढून उत्पादकांकडून अथवा त्यांच्या अधिकृत वितरकांकडून दर मागवावेत जेणे करुन, त्यात मनपा चे आर्थिक नुकसान होणार नाही. उत्पादक अथवा त्यांचे अधिकृत वितरकांकडून दर मागविल्यास दर कमी येतील व मनपा चा आर्थिक फायदा होईल.

त्यानुसार सर्व कामांची एकत्रित यादी करुन, त्यातील साहित्यांचे दरानुसास अंदाजपत्रकीय रक्कम काढली असता ती रु. १,५२,५९,२२७/- एवढी येते. (५% Contengencies सह)

तरी प्रस्तावास मान्यता मिळाल्यास थेट फक्त उत्पादकांकडून किंवा त्यांच्या अधिकृत विक्रेत्याकडून जाहीर निविदा काढून दर मागविण्यात येतील.

तरी रु. १,५२,५९,२२७/- चे साहित्यांची (पाईप व इतर साहित्य) खरेदी करणाऱ्या प्रस्तावास कृपया मंजूरी मिळावी. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री स. अली मिरा सलामी : C.I./D.I. पाईप खरेदीचा प्रस्ताव आहे. यात फायदा होणार असे दर्शविण्यात आले. यापैकी कोणता पाईप टिकाऊ आहेत. याचा सुध्दा खुलासा व्हावा. सिमेंट पाईप वारंवार चेकअप होत आहे. नागरिकांच्या तक्रारी येतात. मुंबई, पुणे यासारख्या महापालिकेमध्ये लोखंडी पाईप वापरला जातो. अमरावती व इतर महापालिकेमध्ये डांबरी रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे होत आहे. लोखंडी पाईप टाकतात. जास्त कालावधी पर्यंत पाईप टिकावे याचा विचार केला जातो. हा प्रस्ताव रद्द करावा पूर्वीचा प्रस्तावानुसार कार्यवाही व्हावी. लोखडी पाईपचा प्रस्ताव मंजूर करावा.

सौ विजया रहाटकर : मा. आयुक्त यांनी विकास कामे करतांना कामे ही होतील व महापालिकेचा आर्थिक फायदाही होईल या हेतूने प्रस्ताव सादर केलेला आहे. ३३ कामे होणार आहे. ३३ कामांची यादी सभागृहात ठेवावी. मंजूरी करण्यात यावा.

श्री पांडूरंग तायडे : प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे. महानगरपालिकेचे हित पाहून मंजूर द्यावी.

श्री सुनिल मगरे : प्रस्ताव समोर आला. पैशाची बचत होईल व विकास कामे ही होतील परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नियमानुसार प्रस्ताव ठेवलेला आहेत का? शासनाचे निर्देश काय? प्रस्ताव ठेवण्याचा हेतू काय?

कार्यकारी अभियंता : या प्रस्तावानुसार कोणत्या वार्डात कामे होणार आहेत. प्रथमतः यादी वाचून दाखविण्यात येत आहे. नारेगांव ते बिंजवाडी, जिन्सी मुख्य रस्त्यावर १००,१५०,२०० चे सी. आय. पाईप लाईन टाकणे, सराफा छावणी मोहल्ला येथे १०० मी. मी. व्यासाचे सी. आय. टाकणे. गवळीपूरा येथे सी. आय लाईन टाकणे. टिळकपथ बेगमपूरा विद्यानिकेतन कॉलनी, जयसिंगपूरा, रहेमानिया कॉलनी, शहाबाजार, जालाना रोड ते गादीया पार्क, इंदिरानगर, बायजीपूरा, प्रभाग क्र. ४० जयभिमनगर, घाटी, पद्मवीर सोसायटी गारखेडा, राहुलनगर, बौध्दविहारच्या मागील बाजूस शिवाजी नगर ते सेव्हन हिल, जाफरगेट मेनरोड, बंजारा कॉलनी वार्ड क्र. ५८, वार्ड क्र. ७७, गुलमंडी तसेच एन-१ ते बजरंग चौक येथे सी. आय. पाईप लाईन टाकणे, एन-६ आविष्कार चौक ते नाका पर्यंत ही हार्डअप सिटी आहे. जुन्या आर.सी.सी. पाईप लाईन टाकलेल्या आहे. ए. सी. सुध्दा आहेत. या पाईप लाईनचे फुटण्याचे प्रमाण, तसेच पाणी प्रदुषिक होण्याचे प्रमाण जास्त आहे. नागरिकांच्या तक्रारी आहे. लहान गल्या आहेत. त्यामध्ये ड्रेनेज लाईन असते. त्याच बाजूला पाण्याची लाईन असते. तू पूर्वीच्या २५-३० वर्षापासून आर. सी. सी. एसी. पाईप टाकलेल्या आहेत. त्याच चालू असून जुन्या झालेल्या आहे. नवीन पाईप टाकल्यास पून्हा पून्हा रस्ते खोदण्याची गरज पडणार नाही. तक्ररी येतात. त्या एकदम कमी होतील. नागरी सुविधांसाठी सिमेंटचे पाईप वापरु नये. शासनाचे निर्देश आहे. परंतु ज्या वस्त्यामध्ये रस्ते अरुंद आहे, त्यासाठी हा निर्णय घेतलेला आहे. स्थायी समितीच्या बैठकीत मागे चर्चा झालेली होती. आर. सी. सी., अे. सी. पाईप न वापरता, यानंतर सी. आय. पाईप वापरावे. यात ३६ कामाचा समावेश असून, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता झालेली आहे. टेंडर सुध्दा कॉल केलेले होते. त्यात १५% ते २०% अबाऊ टेंडर भरुन आलेले होते. यात महापालिकेचे नुकसान होणार होते म्हणून सर्व कामासाठी लागणारे मटेरियल यांची किंमत एकत्रीत केली व संबंधित उत्पादकांकडून जे अधिकृत विक्रता आहेत. त्यांचेकडून मटेरियल डायरेक्ट मागविल्या बाबतचे टेंडर काढणार आहेत. यामुळे महापालिकेचे ५-१०% सहजरित्या सेव्हिंग होणार आहे. ए. सी. पाईप जुन्या असून अनेकवेळा दुरुस्ती करावी लागते. यात रस्ते खराब होतात, पाणी लिकिजेस होते. या गोष्टी टाळण्यासाठी हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा अशी प्रशासनाची विनंती आहेत.

मा. आयुक्त : डायरेक्ट उत्पादकांकडून मटेरियल घेतल्यास योग्य होईल. यात महापालिकेचा फायदाच होणार आहे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : प्रस्ताव मंजूर करण्यात हरकत नाही. ही माहिती प्रस्तावा सोबत जोडली असती व अगोदर खुलासा झाला. असता तर योग्यच झाले असते. प्रस्ताव क्र. ८ स्थगित ठेवला. त्याप्रमाणे हा प्रस्ताव पाहणी करुनच मंजूर

करावा कोठे कोठे कामे करावयाची नगरसेवक व पदाधिकारी त्या त्या वार्डात प्रत्यक्ष पाहणी करतील नंतर निर्णय घेण्यात यावा. स्थगित ठेवावा.

मा. आयुक्त : माझ्या बोलण्याचा अर्थ असा होता की, निविदा मागविलेली व १०% ते १५% निविदेपेक्षा जास्तर दर भरु झालेले निविदा धारकांना वाटाघाटीसाठी माझ्याकडे बोलविण्यात आले. ३३ प्रकरणे असे आलेली आहेत की, त्यात निविदा धारक दर कमी करण्यात तयार नाही.

श्री राधाकृष्ण गायकवाड : प्रस्तावास विरोध केलेला नाही. पाहणी करुन पुढील बैठकीत निर्णय घेण्यात यावा. सविस्तर माहिती प्रस्तवा सोबत का दिली नाही. चर्चा झाली नसती.

श्री पांडूरंग तायडे : पाणी प्रश्न हा जनतेचा जीवन मरणाचा प्रश्न आहे. प्रस्ताव मान्य करावा राजकारण नाही.

श्री भागवत कराड : पाणी पुरवठयाचा विषय आहे. प्रस्तव महापालिकेच्या फायद्याच्या असून सर्वानुमते मंजूरी द्यावी. पाणी लिकेजेस होणार नाही. रस्ते खराब होणार नाही. पुन्हा त्याच त्या विषयावर चर्चा करणे योग्य नाही.

श्री राधाकृष्ण गायकवाड : क्र. ८ प्रस्तावही मंजूर करावा. या प्रस्तावास माझा विरोध नाही. परंतू पाहणी करुन निर्णय घ्यावा.

सौ निखत परवीन : प्रस्ताव मंजूर करावा जनतेच्या पाण्याचा प्रश्न आहे.

श्री सुनिल मगरे : प्रस्ताव आला महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने ठेवला चांगली बाब आहे. जनतेच्या तक्रारी येणार नाही. जनतेचा फायदा व महापालिकेचे आर्थिक हित लक्षता घेता, हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : प्रस्ताव ८ सुध्दा मंजूर करावा. मुलांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे.

श्री मीर हिदायत अली : प्रशासनाने प्रस्ताव ठेवला अभिनंदन केले पाहिजे. महापाहिकेच्या हिताचा प्रस्ताव आहे. त्याचवेळी विषय क्र. ३ मंजूर करण्यासाठी स. सभासद मा. महापौर डायस समोर जावून मागणी करतात. मोठमोठयाने बोलतात.

मा. महापौर : विषय क्र. ९ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १६१/९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध ठिकाणी टाकण्यांत येणाऱ्या जलवाहिन्यांसाठी सी. आय (Cast Iron) / डी. आय. (Ductile Iron) प्रकारच्या विविध व्यासांच्या पाईपांची व अनुषंगिक इतर साहित्यांची खरेदी करण्याची रक्कम रुपये १,५२,५९,२२७/- चे एकत्रित अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. निविदा मागवितांना व्यासनिहाय (Ductile Iron) डी. आय आणि (Cast Iron) सी. आय. या दोन्ही प्रकारच्या पाईप करीता अधिकृत पुरवठा धारकांकडून/उत्पादकांकडून जाहीर निविदा काढून दर मागवावेत. दोन्ही प्रकारच्या पाईपांच्या दरांची तुलना करुन महानगरपालिकाच्या आर्थिक हितांचा विचार करुन योग्य त्या पाईपांची व साहित्यांची खेरेदी करावी. प्रस्तवास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय*

**विषय क्र. १६३/१ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी औरंगाबाद महानगरपालिकातर्फे राज्यस्तरीय महापौर चषक कराटे स्पर्धा घेण्यात याव्यात. सदरील स्पर्धासाठी अर्थसंकल्पात राखीव असलेल्या तरतुदीमधुन निधी खर्च करण्यात यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री नंदकुमार माधवराव फुलारी
अनुमोदक : श्री रणधीरसिंग हेलिये,
श्री राधाकृष्ण गायकवाड.

**ठराव क्र. १६३/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे राज्यस्तरीय महापौर चषक कराटे स्पर्धा घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/२ :** औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे दरवर्षी मराठवाडा पातळीवर पंजा लढाव ही स्पर्धा नावारुपाला आली असून, यावर्षीही महापौर चषक क्रिडा स्पर्धे अंतर्गत पंजा लढाव स्पर्धेचे आयोजन व्हावे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर

सूचक : श्री राधाकृष्ण गायकवाड.
अनुमोदक : श्री रणधीरसिंग हेलिये.

**ठराव क्र. १६४/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दरवर्षीप्रमाणे मराठवाडा पातळीवर पंजा लढाव महापौर चषक क्रिडा स्पर्धा यावर्षीही घेण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/३ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यावर्षी औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघ व औरंगाबाद जर्नलिस्ट ऑरगनायझेशन तर्फे पत्रकार महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवासाठी महानगरपालिकेतील सर्व सदस्यांनी आपल्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी दोन हजार रुपये देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधरण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री पांडूरंग तायडे, श्री नासेरखान
अनुमोदक : श्री भगवान रगडे, श्री प्रकाश निकाळजे,
श्री भाऊसाहेब साठे.

मा. महापौर : सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.
**ठराव क्र. १६५/३ :** सदर प्रस्ताव नामंजूर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. १६६/४ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, १ चेलीपुरा एस. टी. कॉलनी भागातील पूर्ण रस्त्याचे पूर्ण डांबरीकरण करणे या कामासाठी अर्थसंकल्पात अ. क्र. २ पान क्र. १३५ प्रमाणे रु. ५.०० लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आली होती. त्यापैकी फक्त ३ लाख खर्च झालेला असून उर्वरित २ लाख व २ फाजलपुरा येथे जलनि:सारण वाहिनी टाकणे या कामासाठी अ. क्र. १७ पान क्र. १६७ प्रमाणे रु. ३,५०,०००/- आर्थिक तरुद करण्यात आलेली आहे. त्याऐवजी वार्ड क्र. ४२ येथील फाजलपूरा एस. टी कॉलनी येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे या कामासाठी वरीलप्रमाणे ५.५० लाखाच्या कामाचे प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री मोहम्मद जावेद कुरैशी
अनुमोदक : श्री मीर हिदायत अली, श्री अश्ररफ मोतीवाला.

मा. महापौर : सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. १६६/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चेलीपूरा, एस. टी कॉलनी भागातील डांबरीकरणाच्या कामातून झालेली बचत रु. २ लक्ष व फाजलपूरा येथे जलनिःसारण वाहिनीसाठी ठेवलेली तरतुद रु. ३.५० लाख या कामाऐवजी व बचतीच्या रक्कमेतून फाजलपूरा एस. टी कॉलनी नाल्यास संरक्षक भिंत बांधण्याचे काम करण्यात व त्यासाठी तयार केलेले रु. ५.५० लाखाचे अंदाजपत्रकात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६७/५ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रमांक ४९ सिडको येथील एन-७ जुने शॉपींग सेटंर समोरील जागेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री काशीनाथ कोकाटे
अनुमोदक : श्री पांडूरंग तायडे, श्री भाऊसाहेब ताठे, श्री अविनाश कुमावत, श्री जयवंत ओक, श्री नंदकुमार फुलारी, श्री भरत लकडे.

**ठराव क्र. १६७/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक ४९ सिडको येथील एन-७ जुने शॉपींग सेटंर समोरील जागेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६८/६ :** प्रभाग क्र. १६ अलांकार कॉलनी, अंतर्गत अलंकार हौसिंग सोसायटी सर्व्हे नं. ८ सि. स. नं. १५२९८ येथील खुल्या जागेत व परिसरात पोलीस चौकी नसल्यामुळे गुन्हेगारी वाढत चाललेली आहे. मनपाच्या हाया खुल्या जागेत पोलीस चौकीसाठी १५ x २० ची जागा देणेबाबत नागरिकांची मागणी असून ती रास्त आहे. कारण हया ठिकाणी पोलीस चौकी झाल्यास गुन्हेगारी व चोरीचे प्रमाण वाढणार नाही.

करीता, उपरोक्त ठिकाणी १५ x २० ची पोलीस चौकीसाठी जागा देणेचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री कचराबाई लोखंडे,
अनुमोदक : श्री राधाकृष्ण गायकवाड.

सहा. संचालक (न. र.) : अलंकर सह. गृहनिर्माण संस्थेच्या मंजूर रेखांकनाच्या खुल्या जागेपैकी असेल तर विकास नियंत्रण नियमावली नुसार पोलीस चौकीचा वापर अनुज्ञेय होणार नाही. रेखांकनाच्या खुल्या जागेपैकी नसेल तर देण्यात यावे.

मा. महापौर : खुल्या जागेपैकी असेल तर, पर्यायी जागा देण्यात येईल.

**ठराव क्र. १६८/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. १६ अलांकार कॉलनी, अंतर्गत अलंकार हौसिंग सोसायटी सर्व्हे नं. ८ सि. स. नं. १५२९८ येथील खुल्या जागेत पोलीस चौकीसाठी १५ x २० ची जागा देणेस प्रस्तावित केलेले आहे. विकास नियंत्रण नियमावली

नुसार रेखांकनातील खुल्या जागेत पोलीस चौकीचा वापर अनुज्ञेय होत नाही. रेखांकनाच्या जागेपैकी असल्यास पर्यायी जागा देण्याची कार्यवाही व्हावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १६९/७ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, या महानगरपालिकेमार्फत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयात विविध दालन उभारण्यात आलेले असून यापूर्वी या दालनात श्री. रमेश मोतीलाल रुणवाल यांनी ५५१ प्राचीन दुर्मिळ नाणी वस्तु संग्रहालयासाठी दिलेली आहे. त्यानुसार दि. ०५-११-२००१ रोजी त्यांचेशी करार करुन करारातील अटी व शर्तीप्रमणाणे नाणी हस्तांतरीत झालेल्या आहे. त्याचप्रमाणे श्री. पुरवार यांचेकडून देखील प्राचीन वस्तु व नाणी वस्तु संग्रहालयासाठी घेण्यात आलेली असून त्यांचेशी देखील करारनामा करुन त्यांना प्रतिमहा रु. ५०००/- व त्यांचे मुलाला रु. ५०००/- प्रतिमहा मानधन देण्यात येत आहे.

श्री रमेश रुणवाल यांचेकडे अद्यापही प्राचीन, दुर्मीळ, मौल्यवान सुमारे ६५१ वस्तु व नाणी आहेत. सदर नाणी व मौल्यवान वस्तू या वस्तू संग्रहालयासाठी उपयुक्त ठरेल. तरी श्री. रमेश रुणवाल यांचेकडून करारनामा करुन सदर वस्तू व नाणी प्राप्त करुन घ्याव्यात व श्री पुरवार यांना ज्या धर्तीवर रु. ५०००/- मानधन प्रतिमहा देण्यात येते. त्याच धर्तीवर श्री रुणवाल यांचे कडून करारनामा करुन त्यांना देखील रु. ५०००/- मानधन प्रतिमहा देण्यांस प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री राधाकृष्ण गायकवाड.
अनुमोदक : श्री नंदकुमार घोडेले, श्री भगवान रगडे, श्री जयवंत ओक, श्री चंद्रशेखर जैस्वाल, श्री पांडूरंग तायडे.

**संवाद :**

श्री भगवान घडामोडे : महापालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. प्रत्येक महिन्याला ५०००/- मानधन देणे परवडणारे नाही. महापालिकेचे हित लक्षात घेवून त्यांना द्यायचे असेल तर एकदमच काय जी रक्कम द्यायची ती देण्यात यावी.

श्री भगवत कराड :ज्या दुर्मिळ नाणी दिल्या त्यांची काय किंमत असेल ती देण्यांत यावी ५०००/- रु महिना देणे बरोबर आहे का? हा प्रस्ताव नामंजूर करावा.

श्री नंदकुमार घोडेले : ज्या वस्तुची किमंतच करु शकत नाही अशा (नाणी) वस्तू त्यांनी दिलेल्या आहेत. राजकारण कुणीही करु नये मंजूरी घ्यावी.

मा. महापौर : विषय क्र ७ मंजूर करण्यात येत आहे. प्रशासन जो निर्णय घ्यायचा तो घेईल.

श्री. भगवान घडामोडे : प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

( याचवेळी मा. महापौर डायस समोर स. सभासद जमा होतात, मोठमोठयाने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

श्री भागवत कराड : शासनाचे नियम काय आहेत. माहिती द्यावी.

श्री राधाकृष्ण गायकवाड : भारतीय जनता पक्षाचे स. सभासद छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तू संग्राहालयात ज्यांनी साहित्य ठेवण्याची तयारी दर्शविली त्यास विरोध करता म्हणून, जनतेला कळू द्या? विरोध करणे बरोबर नाही. मतदान घेण्यास तयार आहोत. जे कुणी या प्रस्तावास विरोध करतील त्याचा मी निषेध करतो.

श्री भगवान घडामोडे : नियमाने देता येते का? द्यायचे असेल तर मंजूर करावा.

श्री नंदकुमार घोडेले : प्रस्ताव मंजूर केलेला आहे. चर्चा नको.

श्री प्रकाश निकाळजे : छत्रपती शिवाजी महाराज हे या महाराष्ट्राचे दैवत आहेत. सर्वांच्या मनात त्याच्यांबद्दल आदर आहे. हे केंद्र यासाठी स्थापन केले की, शिवाजी महाराज यांचे आठवणी त्यांचे कार्याची ओळख भावी पिढीला व्हावी. त्यांचा आदर्श येणाऱ्या पिढीला व्हावा. त्यांचे कार्याला मानतो आहोत. त्यांचे कृतज्ञतेने दबलेलो आहोत. ज्या लोकांनी जुन्या नाणी दिल्या त्याचा गौरव महापालिकेने केलेला आहे. अभिनंदन केलेले आहे. त्या दुर्मिळ वस्तू असून, त्या दिल्याबद्दल त्यांचा सत्कार सुध्दा केलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात कुणी व्यक्ती शिवाजी महाराजाविरुध्द वाईट बोलत असेल असे वाटत नाही. ज्या व्यक्तीने त्या दुर्मिळ वस्तू दिल्या. त्यास वेढीस न धरता ५०००/- दरमहा देण्याऐवजी त्याची जी मागणी असेल त्या संदर्भात प्रशासन पाच पदाधिकारी यांनी एकत्र बसून, निर्णय घ्यावा. ५-१० मिनिटासाठी सभा तहकुब करावी. तत्वासाठी विरोध नाही. सभागृह आपणा सर्वांना चालवायचे आहेत.

श्री आनंद तांदुळवाडीकर : रमेश रुणवाल यांना प्रतिमहा ५०००/- देण्यात येते. ज्या जुन्या नाणी असून, त्यांची किंमत करु शकत नाही. त्यांनी मोफत दिलेले आहे. ५०००/- मानधन प्रतिमहाचा प्रस्ताव आहे. मान्यता द्यावी.

श्री भगवान घडामोडे : ठरावाला विरोध नाही. छत्रपती शिवाजी महाराज महान आहे. त्यांचा आदर्श घ्यावा, तितका कमी आहे. दुर्मीळ नाणी घेतो आहोत, प्रशासनाने खुलासा करावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : दुर्मिळ वस्तू आहे. त्यांची किमंत लावू शकत नाही. परंतू एक सामाजिक कार्यकर्ता आहे. ठिकठिकाणी मदत करीत असतो. ५०००/- घेवून त्यांचे कुटूंब निर्वाह करणार नाही. सामाजिक कामास खर्च करले. सभागृहाला माहित नसेल संबंधित व्यक्तीचे मोठमोठे व्यवसाय आहे. महापालिकेच्या पैशावर थांबून नाही.

श्री स. अली मिरा सलामी : छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे दैवत आहे. गरीब जनतेचा राजा होते. त्यांचे नांव घेवून काम होत असेल तर, त्यास थांबविणे बरोबर आहे. उदया कुणी तलवार घेवून येतील त्याचे ५०००/- मानधन मागतील.

श्री काशीनाथ कोकाटे : महानगरपालिकेने ३ महत्वाचे वास्तू बांधलेल्या असून, करोडो रुपये खर्च केला. यापूर्वीच या संग्रहालयात दुर्मिळ वस्तु ठेवल्या गेल्या. प्रशासनानेच प्रस्ताव सादर केला. ५०००/- मानधन दिले जाते. एकाच कुटूंबातील प्रत्येक व्यक्ती एक-एक वस्तू देईल व त्यासाठी प्रत्येकास ५०००/- दरमहा द्यावयाचे महपुरषांची बदनामी आहे. असे माझे मत आहे. एका व्यक्तीला दिले म्हणून त्याचेच कुटूंबातील व्यक्तीला पुन्हा मानधन देणे कितपत योग्य वाटते. शिवाजी महाराज यांचे बद्दल कुणाच्या वाईट भावना नाही व विरोध करीत नाही. प्रस्ताव येतांना तो चुकीच्या पध्द्तीने मांडलेला आहे. महापुरुषांची बदनामी होवू नये. पदाधिकारी यांनी बसून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री प्रकाश निकाळजे : सभागृहाने अर्थ वेगळा धरला छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तू संग्राहालयात पुराण (दुर्मिळ) वस्तू घ्यावयाच्या आहेत. त्या शिवाजी महाराजांच्या वस्तू नाहीत. त्या वस्तू संग्राहालयात ठेवावयाचे आहे.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर.

**ठराव क्र. १६९/७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्राहालयासाठी उपयुक्त ठरणाऱ्या प्राचीन, दुर्मिळ, मौल्यवान, सुमारे ६५१ वस्तू व नाणी श्री रमेश मोतीवाला रुणवाल यांचेकडून घेण्यास आणि योग्य तो करारनामा करुन रु. ५०००/- प्रतिमहा मानधन देण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०/८ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, २००३-२००४ चालू अर्थसंकल्पात माझ्या वार्डातील काम डांबरीकरण करणे या शिर्षकाखाली मंजूर झाले. कुंवारफल्ली, कादरवालीया दर्गा परिसरात डांबरीकरण करणे असे कामाचे नांव असून, त्या ठिकाणी डांबरीकरण पुढील वर्षी केले तरी चालते. परंतू त्या भागातील गल्ल्यामध्ये कॉंक्रीट करणे अत्यंत गरजेचे आहे.

कारण की, वरील ठिकाण नाल्या शेजारील भाग असून, त्या ठिकाणी चिखल असतो. त्या करीता, त्या भागाती कॉंक्रीट करणे राहील. परंतु, डांबरीकरण नावाखाली मंजूर झालेले काम रद्द करुन त्याच कामाच्या रक्कमेमध्ये वरील भागात कॉंक्रीट करावे. तरी मेहरबान साहेबांनी सर्वसाधारण सभेमध्ये ठराव घेवून, वरील अनुमती द्यावी.

सूचक : श्री किशोर तुलशीबागवाले
अनुमोदक : श्री भरत लकडे

मा. महापौर : विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १७०/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, २००३-२००४ चालू अर्थसंकल्पातील डांबरीकरण या लेखाशिर्षाखाली मंजूर झालेले कुंवारफल्ली, कादरवालीया दर्गा या परिसरातील डांबरीकरणाचे काम रद्द करुन, त्याऐवजी लेखाशिर्ष बदलून त्याच भागातील गल्ल्यामध्ये कॉंक्रीट करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/९ :** प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात पान क्र. ११८ वर सुराणानगर वार्डात जिम्नॅशियम/व्यायमशाळा बांधणे व विकसित करणे. अशी दुरुस्ती करणेस व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याकरीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री प्रशांत देसरडा.
अनुमोदक : श्री भरत लकडे

वाचनालय बांधणे व विकसित करणे असे छपाई करण्यात आले आहे. त्यात दुरुस्ती करुन सुराणानगर वार्डात.

मा. महापौर : विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १७१/९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन. २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात पान क्र. ११८ वर सुराणानगर वार्डात वाचनालय बांधणे व विकसित करणे याऐवजी त्यात दुरुस्ती करुन जिम्नॅशियम/व्यायमशाळा बांधणे व विकसित करणे. अशी दुरुस्ती करणेस, सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२/१० :** महानगरपालिका अर्थसंकल्प २००३-२००४ मध्ये गरवारे क्रिडा संकुल येथे जलतरण तलाव बांधण्याकरीता आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. राज्य शासनाने

गरावारे क्रिडा संकुल हे विभागीय संकुल होणार आहे. असे घोषित केल्यामुळे सदरील जलतरण तलाव बांधण्याकरीता, विभागील स्तरावर प्रयत्न चालू आहे.

करीता, गरवारे क्रिडा संकुल येथे जलतरणे तलाव बांधण्याकरीता अर्थसंकल्प २००३-२००४ मध्ये आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. ती आर्थिक तरतुद ज्योतीनगर येथे जलतरण तलाव बांधण्याकरीता वळती करण्यात यावी. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

सूचक : सौ. विजया किशोर रहाटकर.
अनुमोदक : डॉ. भागवत कराड, श्री नंदकुमार घोडेले,
सौ. सुवर्णा चंद्रात्रे, श्री सुनिल मगरे,
श्री. प्रशांत देसरडा, श्री भगवान घडामोडे,
श्री भाऊसाहेब ताठे.

**संवाद :**

श्री भगवान रगडे : हा प्रस्ताव वार्डातील आहे. जी तरतुद केली ती त्याच ठिकाणी वापरण्यात यावी. मला विश्वासात घेतल्या शिवाय प्रस्ताव मंजूर करु नये. तुर्त स्थगित करावा. माझ्या वार्डातील प्रस्ताव इतर सदस्य ठेवत असतील तर, योग्य नाही. महापालिकेने असा निर्णय घेतला. त्याप्रमाणे कामे व्हावीत. या प्रस्तावास स्थगिती देण्यात यावी.

श्री भागवत कराड : मी महापौर असतांना या जलतरण तलावासाठी ५० लक्ष तरुतद ठेवलेली होती.

मा. महापौर : प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र. १७२/१० :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. १७३/११ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री मिलिंद बाळासाहेब घायतिलक हे पाणी पुरवठा विभागात महापालिका झोन क्र. ३ येथे कार्यरत होते. दि. ०३ जानेवारी २००३ रोजी त्यांचा ऱ्हदय विकाराने मृत्यू झाला असून, त्यांचे पश्चात त्यांचे पत्नी व तिन लहान मुले यांचेवर उपासमारीची वेळ आली आहे. दै. वेतनावर कार्यरत असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा लाभ (आर्थिक) मिळालेला नाही. त्यांना महापालिकेची १०-१२ वर्षे सेवा केली. त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांचे कुटूंबियांना महापालिकेतर्फे योग्य ती आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच त्यांचे पत्नीस महापालिकेस सेवा करण्याची संधी द्यावी. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री राजू शिंदे
अनुमोदक : श्री चंद्रभागाबाई दाणे.

**ठराव क्र. १७३/११ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री मिलिंद बाळासाहेब घायतिलक हे पाणी पुरवठा विभागात महापालिका झोन क्र. ३ येथे दैनिक वेतनावर कार्यरत होते. त्यांचा ऱ्हदय विकाराने मृत्यू झाल्यामुळे त्यांचे कुटूंबियांना योग्य ती आर्थिक मदत देण्यास तसेच त्यांचे पत्नीस महापालिकेत सेवा करण्याची संधी देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/१२ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रोषण गेट, शहाबाजार आणि चेलीपुरा प्रभागातील कित्येक मालमत्ता धारकांच्या नळांना सहा महिन्यापासून, तर काही मालमत्ता धारकांच्या नळांना सुमारे दोन वर्षापासून पाणी पुरवठाच झालेला नाही. म.न.पा. तर्फे ज्या गतीने पाणीपट्टी वसुली केली जाते. त्या गतीने पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी पावले उचलेले जात नाही. क. अभियंता ते कार्यकारी अभियंत्यापर्यंत सर्वांना कित्येकदा

तक्रारी करण्यात आल्या, परंतू दाखल घेण्यात आली नाही. करीता, पाणी पुरवठा न होणाऱ्या नळांचे सर्वेक्षण करुन पाणी पुरवठा न होणाऱ्या नागरिकांची नळपट्टी माफ करण्यांत यावी. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सूचक : सौ. सिद्यीकी नईम सुलताना,
श्री मीर हिदायत अली.
अनुमोदक : श्री मो. जावेद कुरैशी.

मा. महापौर : सदर प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र. १७४/१२ :** सदर प्रस्ताव रद्द. सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १७५/१३ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. ४२ मध्ये जलवाहिनी टाकणे या कामासाठी अर्थसंकल्पात अनु-६५ पान क्र. १५२ नुसार क्र. २ लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आली आहे.

तरी, त्या कामाऐवजी आता त्याच रक्कमेतून वार्ड क्र. ४२ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे असे मंजूर करण्यात यावे.

सूचक : श्री. मो. जावेद कुरैशी
अनुमोदक : श्री मीर हिदायत अली,
श्री अशरफ मोतीवाला.

**ठराव क्र. १७५/१३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४२ मध्ये जलवाहिनी टाकणे या कामासाठी अर्थसंकल्पात अनु-६५ पान क्र. १५२ नुसार क्र. २ लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आली असून, त्या कामाऐवजी त्याच रक्कमेतून वार्ड क्र. ४२ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/१४ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, फाजलपुरा एस. टी. कॉलनी भागातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे या कामासाठी अर्थसंकल्पात अनु-२० क्र. १५४ नुसार रक्कम रु. १ लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. तरी त्या कामाऐवजी आता वार्ड क्र. ४२ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. असे मंजूर करावे.

सूचक : श्री. मो. जावेद कुरैशी
अनुमोदक : श्री मीर हिदायत अली,
श्री अशरफ मोतीवाला.

**ठराव क्र. १७६/१४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फाजलपूरा एस. टी. कॉलनी भागातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे या कामासाठी अर्थसंकल्पात अनु-२० पान क्र. १५४ नुसार रक्कम रु. १ लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. तरी त्या कामा ऐवजी वार्ड क्र. ४२ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्याची कामे करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७७/१५ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की. हिदंवी स्वराज्य स्थापन करण्यासाठी संस्थापक श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बरोबर जिवा महाले शिवसैनिक होता. अफजलखानच्या भेटीच्या वेळी शिवाजी महाराजांचे प्राण वाचविण्यात जिवा महाले यांची

महत्वाची कामगिरी होती. म्हणून होता जिवा म्हणून वाचला शिवा असे तत्कालीन इतिहासात नोंद आहे.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत जळगांव टी. पॉईटंवर पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी ठराव पास करावा.

सूचक : श्री जयवंत केशवराव ओक, श्री भाऊसाहेब ताठे, श्री रावसाहेब औताडे.

अनुमोदक : श्री सोपान पारे.

**संवाद :**

श्री रावसाहेब औताडे : हर्सूल टी पॉईंट अशी दुरुस्ती करावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री रावसाहेब औताडे, श्री भाऊसाहेब ताठे यांचे नांव सूचक म्हणून या प्रस्तावात घेण्यात यावे.

श्री अशरफ मोतीवाला : या चौकाला यापूर्वी पै. आमानुल्ला मोतीवाला नांव दिलेले आहे. माहिती घेण्यात यावी. स्थगित करण्यात येतो.

**ठराव क्र. १७७/१५ :** सदरील प्रस्ताव स्थगित करण्यात सर्वानुमते मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १७८/१६ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझे वार्ड क्र. एक मधील मिटमिटा गावठाण भागामध्ये महानगरपालिकेची इयत्ता १ ते ७ पर्यंत शाळा आहे. या शाळेत सुमारे ३५० विद्यार्थी असून, या शाळेला क्रिडांगण नाही. विद्यार्थी मैदानी खेळापासून वंचीत आहेत. याच शाळेच्या काही अंतरावरच गट नं. ३०७ मिटमिटा ही सरकारी गायरान जमीन असून, सध्या ती खुलीच आहे व पाई चालण्याच्या अंतरावरच आहे. क्रिडांगणासाठी सरकारी गायरान जमीन महसूल मुक्त व मोफत मिळते.

औरंगाबाद मनपा वर ती संपादनाचा आर्थिक बोजा पडणार नाही. करीता, गट नं. ३०७ मिटमिटा या सरकारी गायरान जमिनीपैकी किमान ५ एकर जमिन मनपास हस्तांतर करुन घेण्याची कार्यवाही करण व सरकारी जमिनीचा आगाऊ ताबा घेण्याची तातडीने कार्यवाही करुन क्रिडांगण विकसित करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री. ठकूजी रामसिंग वाणी.

अनुमोदक : डॉ. आशा बिनवडे, श्री भाऊसाहेब ताठे, सौ. साधना सुरडकर.

**ठराव क्र. १७८/१६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १ मधील मिटमिटा गावठाण भागामध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या शाळेकरीता शाळेच्या काही अंतरावरच असेलेल्या खुल्या सरकारी गट नं. ३०७ मिटमिटा गायरान जमीनीपैकी. ०५ एकर जमीन शाळेच्या विद्यार्थ्याकरीता क्रिडांगण विकसित करण्यासाठी हस्तांतर करुन आगाऊ ताबा घेण्याची तातडीने कार्यवाही करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/१७ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझे वार्ड क्र. १ पडेगांव मधील स्मशानभूमी खोलगट भागात नाल्याचे बाजूस आहे. नाल्यास पूर आला तर संपूर्ण पाणी स्मशानभूमीत जाते. त्यामुळे दहन स्टँड पर्यंत पाणी जाते. अत्यंविधी करता येत नाही. करीता ही स्मशानभूमीची उंची वाढवून घ्यावी व रोड उंच करावे. सदरील स्मशानभूमीची उंची वाढवितांना स्मशानभूमीच्या मागील बाजूस सरकावून घ्यावी. भविष्यात मुंबई महामार्ग वाढविण्यात आला तर, स्मशानभूमी तूटणार नाही.

स्मशानभूमीचा औरंगाबाद मनपामध्ये उल्लेखच नसल्याने येथे स्मशानजोगी सुध्दा नाही. अत्यंविधीस आलेल्या नागरिकांना अत्यंविधीस पाणी सुध्दा मिळत नाही. करीता, येथे हातपंपाची व्यवस्था व्हावी. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री ठकुजी रामसिंग वाणी
अनुमोदक : डॉ. आशा बिनवडे, श्री भाऊसाहेब ताठे.

**ठराव क्र. १७९/१७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १ पडेगांव येथील स्मशानभूमी येथे हातपंप, स्मशानजोगी यांचे व्यवस्थेसह सदर स्मशानभूमी नाल्याच्या बाजूस खोलगट भागात असल्यामुळे या स्मशानभूमीची आणि रोडची उंची वाढविण्यास आणि स्मशानभूमी मागील बाजूस सरकावून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८०/१८ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुं. प्रा. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) अन्वये गठीत करण्यात आलेले प्रभाग समिती "अ" सभापतीचे कार्यालय व सभागृह नेहरुभवन येथे निश्चित करण्यात आले आहे. परंतू प्रभाग समिती "अ" सभेच्या आयोजना करीता, नेहरुभवन येथे सभागृहाच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने त्या ठिकाणी प्रभाग समिती "अ" सभेचे आयोजन करणे कठीण जात आहे. करीता, प्रभाग समिती "अ" सभेच्या आयोजनासाठी मुख्य कार्यालयात असलेल्या कोणत्याही एका सभागृहात (मलिक अंबर सभागृह/सरदार करमसिंग सभागृह) येथे नेहरुभवन येथील सभागृह अदयावत होईपर्यंत प्रभाग समिती "अ" ची सभा आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर.

सूचक : सौ. निखत परविन एजाज जैदी
अनुमोदक : श्री राधाकृष्ण गायकवाड

या बरोबरच ' जण गण मन ' या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक २०-११-२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**गुरुवार दिनांक २०-११-२००३ रोजी मा. महापौर, सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी १२.१० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त तसेच संबंधित अधिकारी व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | स. सभासद |
| २) स. स. श्री. भाऊसाहेब ताठे | -//- |
| ३) स. स. श्री. राधाकृष्ण गायकवाड | -//- |
| ४) स. स. श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ५) स. स. श्री. वाणी ठकूजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. श्री साजेदा बेगम विखार अहेमद | -//- |
| ८) स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| ९) स. स. श्री. इंगळे शंकुतला सांडूजी | -//- |
| १०) स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ११) स. स. श्री. शिंदे राजू रामराव | -//- |
| १२) स. स. श्री. कावडे साहेबराव रणूबा | -//- |
| १३) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १४) स. स. सौ पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १५) स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १६) स. स. सौ शिंदे रुख्मिणी राधाकिसन | -//- |
| १७) स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १८) स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १९) स. स. श्री निमगांवकर प्रल्हाद गणपतराव | -//- |
| २०) स. स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २१) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहान | -//- |
| २२) स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २३) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २४) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २५) स. स. सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २६) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २७) स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २८) स. स. श्री. नजर हमीद अ. गफूर | -//- |
| २९) स. स. श्री शेख खाजा शरफोद्दीन | -//- |
| ३०) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |
| ३१) स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| ३२) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३३) स. स. श्री डॉ. कराड भागवत किसनराव | -//- |

३४) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३५) स. स. सौ रशिदा बेगम गफ्फार यारखान -//-
३६) स. स. श्री. मगरे सुनील यादवराव -//-
३७) स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब -//-
३८) स. स. श्री अब्दुल कादीर अब्दुल हफीज -//-
३९) स. स. श्री नासेरखान सरदारखान -//-
४०) स. स. श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक -//-
४१) स. स. श्री मोहन मेघावाले -//-
४२) स. स. सौ खरात कुसूमबाई दौलत -//-
४३) स. स. सौ नुसरत बानो फिरोजखान -//-
४४) स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव -//-
४५) स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ -//-
४६) स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४७) स. स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय -//-
४८) स. स. श्री. पारे सोपान भाऊराव -//-
४९) स. स. श्री. प्रशांत सुभाष देसरडा -//-
५०) स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर -//-
५१) स. स. श्री. अशरफ मोतीवाला -//-
५२) स. स. सौ. संगिता बाळू मैंद -//-
५३) स. स. श्री. रणधिरसिंग होलिये -//-
५४) स. स. श्री. नासेरखान अ. रहेमानखान कुरैशी -//-
५५) स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर -//-
५६) स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
५७) स. स. सौ चंद्रभागाबाई दाणे -//-
५८) स. स. श्री. ओक जयवंत केशवराव -//-
५९) स. स. श्री. स. सलीम स. युसूफ -//-
६०) स. स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान -//-
६१) स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली -//-
६२) स. स. सौ सिद्यीकी नईम सुलताना -//-
६३) स. स. श्री. अजीजखान गणीखान -//-
६४) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
६५) स. स. श्री. सलिम पटेल समशेर पटेल -//-
६६) स. स. श्री. कैसरखान बद्रोद्यीनखान -//-
६७) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
६८) स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
६९) स. स. सौ. बबीता सुभाष कागडा -//-
७०) स. स. श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी -//-
७१) स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज -//-
७२) स. स. सौ. निखत परवीन ऐजाज अली. -//-

**(नामनिर्देशन पालिका सदस्य )**

१) स. स. श्री सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह

२) स. स. श्री भगवान देविदास घडामोडे.
३) स. स. श्री. सुरजितसिंग खुंगर
४) स. स. श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन

**संवाद :**

मा. महापौर : विषयपत्रिका अगोदर घेण्यात येत आहे. चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

श्री अविनाश कुमावत : महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. वृत्तपत्रात बातम्या छापून आलेल्या आहे. सविस्तर खुलासा व्हावा, यामुळे महापालिकेची बदनामी होत आहे.

श्री भगवान रगडे : महानगरपालिकेची जागा विक्री करुन गिळकृत केल्या. चर्चा करावी. त्यांनतर विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री सलीम पटेल : अगोदर चर्चा घेण्यात यावी, विषयपत्रिका नंतर घेण्यात यावी. नंतर चर्चेला वेळ दिला जात नाही.

श्री तकीहसन खान : विषयपत्रिका घेतल्यानंतर राष्ट्रगित होवून सभा संपविली जाते. चर्चा करण्यात येत नाही.

मा. महापौर : चर्चेला वेळ दिला जाईल. विषयपत्रिकेला सुरुवात करीत आहे.

**विषय क्र. १८१/१ :** दिनांक ६-१०-२००३ ची विशेष सर्वसाधारण सभा, दिनांक ७-१०-२००३ (दि. ६-१०-२००३ ची तहकुब सभा) कार्यक्रम पत्रिका क्र. (१८) आणि दि. ७-१०-२००३ (कार्यक्रम पत्रिका क्र. १९) प्रमाणे संपन्न झालेली विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. महापौर : मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १८१/१ :** दिनांक ६-१०-२००३ ची विशेष सर्वसाधारण सभा, दिनांक ७-१०-२००३ (दि. ६-१०-२००३ ची तहकुब सभा) कार्यक्रम पत्रिका क्र. (१८) आणि दि. ७-१०-२००३ (कार्यक्रम पत्रिका क्र. १९) प्रमाणे संपन्न झालेली विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. १८२/२ :** उप-आयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रोजगार व स्वंयरोजगार विभागाचे शासन निर्णय क्र. रोस्वरो/२००२/प्र.क्र. २६७/रोस्वरो १ दि. १७-०८-२००२ च्या शासना निर्णयानुसार बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना व लोकसेवा केंद्रांना विविध सवलती देऊन, अशा संस्थांना आर्थिक दृष्टया बळकट करण्यांकरीता सवलती द्यावेत. अशा सूचना आहेत.

१. अनामत रक्कम भरण्यापासून सूट देणे बाबत शासकीय कार्यालयामध्ये किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायालयामध्ये तसेच शासन अंगिकृत उपक्रमामार्फत वस्तू व मालाची खरेदी किंवा संस्थेच्या पुरवठया करीता निविदा भरतांना अनामत रक्कम भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थान/लोकसेवा केंद्रांना सुट देण्यात यावी.

२. व्यापारी संकुलात बेरोजगारांच्या सहकारी संस्था व लोकसेवा केंद्रांना जागा राखून ठेवणे. संकुले दुकाने विक्रीची ठिकाणे बांधण्यात येत आहेत. त्यापैकी किमान १० टक्के दुकाने (समक्षत्राचे) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थेसाठी राखील ठेवण्यात यावे. सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे योग्य. प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे योग्य.

**ठराव क्र. १८२/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १७-०८-२००२ च्या शासन निर्णयानुसार बेरोजगारांच्या पंजीकृत सेवा सहकारी संस्थाना व लोकसेवा केंद्राना शासकीय निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात शासन अंगीकृत उपक्रमामार्फत वस्तू व मालाची खरेदी किंवा संस्थेच्या पुरवठयाकरीता निविदा भरतांना अनामत रक्कमेत सुट देणे व त्यांचेसाठी व्यापारी संकुलात स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका क्षेत्रात व्यापारी संकुल इ. पैकी १०% दुकाने राखीव ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८३/३ :** प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासनपत्रक क्र. मनअ ३/२००३/प्र.क्र./०३-सं.क्र. नगरविकास मंत्रालय दिनांक ०७ मार्च २००३ नुसार नागरी सुविधांशी संबंधित एखादा अभिनव प्रकल्प निवडून त्याची यशस्वीरित्या अंमलबजावणी करावी असे कळविण्यात आले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे सावर्जनिक स्वच्छतेबाबत तसेच महिलांच्या विकासा संदर्भात पूढीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी :

★ **उद्देश :** आर्थिक दृष्टया कमकुवत घटकातील महिलांना स्वावलंबी बनविणे. त्यांच्यातील क्षमतेची त्यांना जाणीव करुन देणे व त्यांना कार्यप्रवण करण्यासाठी प्रोत्साहन देणे. हे करीत असतांना महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करणे.

★ **लाभार्थी :** झोपडपट्टयातील महिला मंडळे, बचतगट, महिलांचे व्यवसाय गट, बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थेचे सदस्य.

★ **उपक्रम :** झोपडपट्टयातील महिलांनी तयार केलेल्या खालील वस्तुंची/उत्पादनांची महानगरपालिकेने खरेदी करणे अपेक्षित आहे.

१) शालेय गणवेष, ज्या कर्मचाऱ्यांना मनपातर्फे गणवेश परिधान करणे बंधनकारक आहे. असे कर्मचारी उदा. स्वच्छता निरिक्षक, जकात निरिक्षक, अग्निशमन दलातील कर्मचारी, आरोग्य विभागातील कर्मचारी.

२) कागदी पाकीटे, ३) फाईल टॅम्स, ४) फाईल कव्हर्स, ५) नोटींग शिट्स, ६) रिफिल्स, ७) लेटर हेड्स, ८) खडू, ९) वहया, १०) रजिस्टर्स, ११) सेमिनार फोल्डर्स, १२) डिंक, १३) फिनाईल, १४) झाडू, खराटे, १५) शाळांमधील सकस आहार-खिचडी, १६) निमंत्रण पत्रिका, १७) स्क्रीन प्रिटेंड मटेरियल.

★ **कार्यपध्द्ती :** मनपातर्फे वरील साहित्य खरेदीसाठी जाहीर निविदा मागविण्यात याव्यात व जे दर मंजूर करण्यात येतील त्या दरात ( दर्जा तपासून निविदा भरणाऱ्या महिला गटांना निविदेत दर काहीही नमुद केलेले असले तरीही ) ५०% वस्तु-उत्पादने पुरविण्याचे आदेश देण्यात यावे. दर्जा तपासण्याची जबाबदारी तांत्रिक कक्षावर सोपविण्यात येईल. महिला मंडळ, महिलांचा बचत गट, व्यवसाय गट, झोपडपट्टयामधील असल्याबाबत खात्री झाल्यावरच काम देणे योग्य राहील. निविदेतील पुढील अटी उदा. आयकर भरल्याचा पुरावा, दुकान नोंदणी प्रमाणपत्र आणि निविदा अनामत रक्कम भरण्यापासून अशा महिला गटांना, महिला मंडळांना सुट देण्यात यावी.

★ **विक्री व्यवस्थापन :** विक्री वाढविण्यासाठी सायकल अथवा यांत्रिक वाहन ज्यांच्याकडे आहे. अशा बेरोजगार युवक/युवती अथवा बचत गटातील सदस्य महिला देखील घरोघरी, कायालयामध्ये जावून कमिशन तत्वावर उत्पादनाची विक्री करु शकतील. शासन निर्णयानुसार महिलासाठी मनपाच्या शाळांमध्ये ३०% आरक्षण देण्याची तरतुद आहे. त्यांची

अंमलबजावणी करतांना दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील महिलांना आदि अशा महिलांच्या गटांना प्राधान्य देण्याची विशेष तरतुद मनपाच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केल्यास औरंगाबाद ही पुरोगामी विचारांना पुरस्कार करणारी महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका ठरले.

२) **बचत गट/महिला मंडळाच्या वतीने गांडूळ खत निर्मिती :** औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील महिलांनी गांडूळखत निर्मिती केल्यास आणि खतीची खरेदींची हमी महानगरपालिकेने घेतल्यास आर्थिकदृष्टया गरीब महिलांना उत्पन्नाचे मोठे साधन उपलब्ध होवू शकेल.

महानगरपालिकेच्या उद्यान विभागातर्फे गांडूळ खत खरेदीसाठी जाहीर निविदा प्रकाशित करण्यात यावी. दारिद्रय रेषेखालील कुंटूबातील महिलांनी जर निविदा भरती तर त्यांना निविदेची अनामत रक्कम भरण्यापासून सुट देण्यात यावी. सदर महिला किंवा अशा महिलांना स्थापन केलेले बचत गट हे व्यावसायिक अथवा गुत्तेदार नसल्याचे त्यांना दुकान नोंदणी प्रमाणपत्र/आयकर भरल्याचा पुरवा इ. कागदपत्र निविदेसोबत जोडण्याचे बंधन असू नये.

३) **धन कचरा व्यवस्थापनात सहभाग :** नागरिकांनी ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवावा. असे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. बेरोजगार युवकांनी/महिलांनी घरोघर जावून ओला आणि सुका कचरा महापालिकेच्या घंटागाडीपर्यंत दररोज आणून टाकणे किंवा असा कचरा गोळा करणे व महिला मंडळांनी स्वखर्चाने घंटा गाडीची व्यवस्था करणे त्यास या कामासाठी त्यांना नागरिकांकडून प्रति कुटूंब रु. दहा शुल्क आकारावेत. शुल्क वसुल केल्याबद्दल महिला मंडळ/बेरोजगारांची सेवा सहकारी संस्था/महिला बचतगट/महिला व्यवसाय गट यांनी नागरिकांना दरमहा पावती द्यावी. अशा संस्था धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत आसाव्यात. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. १८३/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनों ०७ मार्च २००३ चे शासन पत्रकाप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक स्वच्छतेबाबत व महिलांच्या विकासा संदर्भात प्रस्तावित केल्याप्रमाणे महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी, बचत गट/महिला मंडळाच्या वतीने गांडूळ खत निर्मिती आणि घन कचरा व्यवस्थापनात सहभाग यात प्रस्तावित योजनेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८४/४ :** कार्यकारी अभियंता ( जलनिःसारण व विद्युत ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेने राज्य शासनाचे अनुदान व हडको अर्थ साहाय्याने शहरात नागरी स्वच्छता कार्यक्रम शासन निर्णय क्रमांक क. ख. स्व. यो. १०९८/प्र.क्र./५२/पापु/२१/मंत्रालय. मुंबई/३२ दिनांक ०१ डिसेंबर १९९८ नुसार राबविण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत एकूण ४५०० शौचकुप बांधण्याचे उद्दीष्ट आहे. त्यासाठी एकूण खर्च रुपये २२५ लाख इतका अपेक्षीत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने आतापर्यंत (३४५ + ७५६) शौचाकुप असे एकूण ११०१ शौचकुप विविध भागामध्ये बांधून पूर्ण केले आहेत. त्यावर एकूण रुपये ५४.३६ लाख खर्च झालेला आहे.

अर्थसंकल्प २००२-२००३ च्या अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार रक्कम रुपये ८.८३ लाखाचे अंदाजपत्रकास मंजूरी मिळालेली असून, निविदा निश्चितेची प्रक्रिया पूर्ण झालेली

आहे. त्यामध्ये एकूण १७६ शौचकुप बांधण्याचे प्रस्तावित आहे. शासनाकडून अद्याप पावतो. हडकोचे कर्ज व अनुदान असे एकत्रीत रक्क्म रुपये ६५.६० लाख प्राप्त झाले आहेत.

सदर प्रस्ताव हा उर्वरित उद्दिष्ट पुर्तीचार भाग असून, सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रुपये ३१.१५ लाख रुपयाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यामध्ये ६२३ शौचकुप बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदरील योजनेत प्रति शौचालय रुपये ५०००/- खर्च अंदाजीत आहे. सदर रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | राज्य शासन अनुदान ३०% | रुपये १५००/- |
| ब) | हडको अर्थ सहाय्य २७% | रुपये १३५०/- |
| क) | हडको कर्ज ३०% | रुपये १५००/- |
| ड) | लाभार्थीचा सहभाग १३% | रुपये ६५०/- |
| | एकूण १००% | रुपये ५०००/- |

सदर प्रस्तावात दिनांक २१-१०-२००३ रोजी प्रशासकीय मान्यता झालेली आहे. करीता सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार उपरोक्त रक्कम रुपये ३१.१५ लक्ष रुपयाचे अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर.

उर्वरित उद्दीष्टपुर्तीसाठी शासन अनुदान व अर्थसंकल्पीय तरतुदीनुषंगाने काम प्रस्तावित करण्यात येईल.

**संवाद :**

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (ज.नि./वि) : राज्य शासनाचे अनुदान हडको यांच्या साहयाने वितरित होते. नागरी स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत शासन निर्णयाप्रमाणे एकूण ६२३ शौचकुप बांधायाचे आहे. यामध्ये लाभार्थीचा सहभाग व हडकोचे अर्थसहाय्य, कर्ज शासन अनुदान असे अ ब क ड दिले आहे. एका शौचकुपचा खर्च ५०००/- रुपये आहे. वैयक्तिक शौकचुप आहे. लाभार्थींनी ६५०/- रु. भरणा केल्यानंतर कामास सुरुवात होईल. एकूण रु. ३१.१५ लक्ष अंदाजपत्रकास मान्यता द्यायची आहे.

श्री अविनाश कुमावत : अनाधिकृत वस्त्यामध्ये ही योजना राबविणार आहे का? खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (ज.नि./वि) : अशा वस्त्यात गुंठेवारी कायदा लागू झाल्यास करता येईल.

श्री भागवत कराड : शासनाच्या वतीने शौचकुप करण्याची ही योजना आहे. संबंधित यांनी तसा प्रस्ताव सादर केला. ज्या ठिकाणी उपलब्ध नाही, तेथे बांधकाम करणे. शक्य होत नाही. त्या भागात ही पोर्टेबल टॉयलेट करणे योग्य होईल अशी मान्यता देण्यात यावी.

मा. महापौर : विषय क्र. ४ वरील प्रमाणे दुरुस्ती करुन मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. १८४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय दिनांक ०१-१२-१९९८ नुसार नागरी स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत शौचकुप बांधण्याचे उर्वरित उद्दीष्ट पूर्तीसाठी सन २००३-२००४ च्या तरतुदीनुसार तयार केलेले रक्कम रु. ३१.१५ लाखाचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८५/५ :** सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगबाद शहर मुळ मंजूर विकास योजना १९७५ नुसार आरक्षण क्रमांक २५० "खुली जागा" २५१ "प्राथमिक शाळा" व ५० फुट रुंद रस्ता सर्व्हे क्र. ३२ मौजे भागसिंगपूरा मिळकत धारक श्री सदाशिव सखारात लोखंडे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिनांक ०६-११-१९९५ रोजी खरेदी सूचना दिलेली आहे. त्यानुसार सदर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी मार्फत विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांचेकडून भूसंपादन कार्यवाही पूर्ण होवून निवाडा जाहीर केलेला आहे. निवाडयाप्रमाणे मोबदला रक्कम रु. १,२२,७४,६८०/- विशेष भूसंपादन अधिकारी यांनी मागणी केलेली आहे. उक्त प्रस्तावाने बाधित मिळकतधारक सदाशिव लोखंडे यांनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. २८५०-२००३ दाखल केली असून, मोबदला रक्कम मागणी केली आहे. दुसरे मिळकतधारक श्रीमती एस.एल.पेठे (त्रिमुर्ती एन्टरप्रायजेस) यांनी मा. लोकआयुक्त यांचेकडे मोबदला मिळणेबाबत नुकतीच तक्रार केलेली आहे.

सदर परिसराची स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे. उक्त परिसरात नंदनवन कॉलनी व भिमनगर, भावसिंगपूरा या दोन ठिकाणी म. न. पा. शाळा आहेत. सदर आरक्षणाखालील शाळेची जागा विद्यमान शाळेपासून १ ते १-२ कि.मी. अंतरावर आहे. तसेच उक्त आरक्षणालगत पेठेनगर पूर्णपणे विकसित झालेले असून, त्यालगत मंजूर रेखांकन झालेली आहेत. तर काही भागात अनाधिकृत वस्ती झालेली आहे. आरक्षणाखालील जमीन संपूर्ण खुली असल्याने आणि लगतचे विकास पाहता उक्त आरक्षणाखालील जमीन संपादन करणे आवश्यक आहे.

दरम्यान मूळ विकास योजना सुधारित करतांना (जुने आरक्षण क्र. २५० व २५१ "खुली जागा" व प्राथमिक शाळा) खालील जमीन मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. १४६ "बगीचा" १४७ "क्रिडांगण" १४८ "प्राथमिक शाळा" असे दर्शविलेले आहे. विकास योजना भाग नकाशा मा. सभागृहात बोर्डावर चिकटलेला आहे. कृपया अवलोकन व्हावे.

सबब उक्त परिसरातील झालेला विकास व त्या अनुषंगाने आवश्यक असलेले आरक्षणाची आवश्यकता, विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांनी केलेली संपूर्ण भूसंपादनाची कार्यवाही पाहता तसेच मिळकत धारकांनी मोबदला मिळण्यासाठी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका व मा. लोक आयुक्ताकडे केलेली तक्रारीनुसार मोबदल्याची रक्क्म रुपये १,२२,७६ (रु. एक कोटी बावीस लाख चौऱ्याहत्तर हजार सहाशे ऐंशी) विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री अविनाश कुमावत : १.२२ कोटी रुपये कोणत्या लेखाशिर्ष मधून देणार आहेत.

श्री नंदकुमार घोडेले : असे प्रस्ताव ठेवतांना त्या जागेचा नकाशा सभागृहात ठेवावा. अशी चर्चा पूर्वीच्या बैठकीत मी मागणी केलेली होती. आर्थिक मोबदला देण्या करीता स्थायी समिती यांना अधिकार आहे. या अगोदर काही आरक्षणे ताब्यात घेतलेली असून गेल्या ३ ते ३ १-२ वर्षापासून एकही शाळेच्या इमारती बांधण्यात येवू नये. असा निर्णय घेतलेला आहे. शिवाय कोणतेही उद्यान विकसित करण्यात आलेले नाही. एक तर महापालिका आर्थिक अडचणीत असून अशी आरक्षणे ठेवून महापालिका काय साध्य करणार आहे.

आरक्षणे ठेवून जागा ताब्यात ठेवायची व त्यावर अतिक्रमण होतात, सभागृहात सदर जागेचा नकाशा का ठेवण्यात आलेला नाही.

श्री भागवत कराड : या संदर्भात जे काही आरक्षणे आहेत. त्यास महापालिकेने कम्पॅसेशन द्यावे. याबाबत मागेच ठराव मंजूर झालेला असून, या संदर्भात न्यायालयात सुध्दा प्रकरण चालू आहे. तसे अधिकार स्थायी समितीला असतांना या सभागृहासमोर येण्याचे कारण काय? प्रशासनाने खुलासा करावा.

श्री आनंद तांदुळवाडीकर : रस्ते दुरुस्त करावयाचे सोडून भूसंपादनाचे प्रस्ताव येतात. एम. आर. टी. पी. ॲक्टनुसार मा. आयुक्त यांना अधिकार आहे. ही रक्कम खाजगी तडजोड करुन कमील करता येईल.

मा. महापौर : स. सभासदांच्या भावना लक्षात घेवून सभागृहात या जागेचा नकाशासह सविस्तर माहिती देवून पूढील सभेत ठेवावा.

**ठराव क्र. १८५/५ :** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव नकाशा व सविस्तर माहितीसह पुढील सभेत ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. १८६/६ :** मा. आयुक्त यांच्या मान्यतेने उप-आयुक्त (म.) यांनी अग्निशमन प्लस आपत्कालीन परिस्थितीत वेळोवेळी निर्णय घेण्यासाठी धोरणात्मक मान्यतेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**१) अग्निशमन दलाच्या कामाची व्याप्ती :**

| | | |
|---|---|---|
| ०१ | औरंगाबाद मनपाचे क्षेत्र : | १३८ चौ. कि.मी. |
| ०२ | औरंगाबाद शहराची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसारः | ८,७२,६६७ |
| ०३ | औद्यीगिक कार्यक्षेत्र :<br>अ) रेल्वे स्टेशन एम. आय. डी. सी. एरिया<br>ब) वाळूज एम. आय. डी. सी. एरिया<br>क) चिकलठाणा एम. आय. डी. सी. एरिया | <br>३४.९५ हेक्टर<br>१५१८.४७ हेक्टर<br>७१९.६९ हेक्टर |
| ०४ | औद्योगिक क्षेत्रातील कारखाने<br>अ) इंजिनिअरींग<br>ब) केमीकल<br>क) फार्मासीटीकल<br>ड) सर्व्हीस इंडस्ट्रीज<br>इ) इलेक्ट्रॉनीक्स<br>ई) इतर कारखाने<br>फ) टेक्सटाईल | <br>७२०<br>१०५<br>२५<br>१००<br>१५<br>७५०<br>०५ |
| ०५ | अग्निशमन केंद्रे | पदमपूरा/सिडको/वाळूज/ चिकलठाणा |
| ०६ | अग्निशमन कर्मचाऱ्यांची मंजूर पदे<br>रिक्त पदे<br>भरलेली पदे<br>शासनाच्या मान्यते अंतर्गत पदे | ७८<br>१८<br>६०<br>५५ |

| | | |
|---|---|---|
| ०७ | अग्निशमन दलातील वाहनांची संख्या :<br>फायर टेंडर<br>फायर पंप<br>रुग्णवाहिका<br>फायर जीप<br>फोम/वॉटर टेंडर<br>एकूण | <br>०४<br>०६<br>०२<br>०२<br>०२<br>१६ |

**२) बारा वर्षात झालेले एकूण कॉल्स व आगीत झालेली मालमत्ता व जीवित हानी व वाचविलेली मालमत्ता :**

औरंगाबाद अग्निशमन दल महानगरपालिका औरंगाबाद १९९१ ते २००२ पर्यंत मिळालेल्या फायर/रेस्क्यू/अपघात कॉल व त्यामध्ये झालेल्या जिवित व वीत्त हानी बाबत माहिती दर्शविणारा तक्ता :

| अ.क्र | वर्ष | एकूण कॉल्स | मालमत्ता नुकसान | वाचलेली मालमत्ता | जीवित हानी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मृत्यू | जखमी | वाचविलेले |
| १ | १९९१ | १५९ | १,३९,३७,२००/- | ८८,९९,७००/- | १९ | -- | ४० |
| २ | १९९२ | १४९ | २,७५,७७,३००/- | ३,४४,५५,८१०/- | २४ | -- | ५४ |
| ३ | १९९३ | २५० | ४,१६,६६,४५०/- | ५,९२,३६,४५०/- | ८३ | १२६ | १२६ |
| ४ | १९९४ | २४१ | ५,६१,१७,०५२/- | ५,८६,५०,१९८/- | १६ | ४१ | २४ |
| ५ | १९९५ | ३०९ | ३९,००,३१,५५०/- | ८०,९८,५०,३५०/- | ३७ | १२१ | २०६ |
| ६ | १९९६ | ३१५ | ८,४३,६२,८०७/- | २४,९४,१५,९४३/- | २४ | ४७ | ४७ |
| ७ | १९९७ | २५७ | १,८१,१०,५००/- | ३,१९,३९,९४०/- | ३६ | ८४ | ८४ |
| ८ | १९९८ | ४४६ | ५,०१,८४,५००/- | ५,३४,८८,२७०/- | ३० | १६४ | १६४ |
| ९ | १९९९ | ४०५ | ७४,३४,७००/- | ५१,९१,२७,७००/- | १३ | ४५ | २६ |
| १० | २००० | ५८० | १,००,३७,३००/- | ८९,८८,०१,७००/- | ४० | ३४ | ३४ |
| ११ | २००१ | ५६२ | ३,११,२३,६००/- | ५२,३४,९१,९६८/- | ३८ | ४४ | ४५ |
| १२ | २००२ | ५६१ | ५०,९६,८२,६१०/- | ७४,९६,९६,४००/- | २२ | २४ | २४ |

**३) शहरात व जिल्हयातील अग्निशमन दलाला मिळालेल्या मोठया आगी (MASOR FIRE/RESCUE CALS) बद्दलचा अहवाल :**

१) पैठण येथील होडीचा अपघात दि. ०२-०१-१९८८
२) विमान अपघात दि. २६-०४-९३
३) लातुर भूकंप दि. ३०-०९-९३
४) म्हैसमाळ येथील पाण्यातील मृतदेह काढणे दि. २३-८-९४
५) गरवारेतील स्फोट दि. ९-१२-९५
६) युनीटेक फार्मा अपघात दि. १७-१०-९७
७) करोना कंपनीस लागलेली मोठी आग दि. २६-०३-१९९८
८) शहरातील पेट दुकानास लागलेली मोठी आग दि. २५-०९-१९९८

९) सॉमीलच्या मोठया आगीतून दि. १६-०४-२००२ वेळ ०१. ५०, १४ जणांना सुखरुप बाहेर काढणे.

१०) नाशिक व पैठण रोडवरील बसचा अपघात

११) नगर रोडवरील बसला अपघात होवून लागलेल्या मागील सर्व प्रवासी जळून मृत्यू पावले.

**४) अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राची अंमलबजावणी कारणे :** औरंगाबाद क्षेत्रातील औद्योगिक कारखाने शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट, बीअर बार, परमीट रुम, लॉजींग बोर्डींग, खानावळ, धाबे, ज्युस सेंटर, थंडपये गृह, मिठाई सेंटर, तारांगित हॉटेल्स, मंगल कार्यालय फंक्शन हॉल, एक्झीबीशन हॉल, पेट शॉप, पेट्रोलपंप, डिझेलपुप, रॉकेलसाठी एल. पी. जी. गोडवून, सॉमिल, अल्कोहील साठा, स्पिरीट साठा, फटाका शॉप, सिनेमा गृह, नाटयगृह, क्रिडा संकुल, हाय राईज बिल्डींग इत्यादी प्रत्यक्ष घटनास्थळी जावून इन्स्पेक्शन करुन अग्निशमन सुरक्षिततेच्या दृष्टीने व्यवस्था करुन घेणे बाबत कार्यवाही करावी लागते.

**५) एन. बी. सी. डिझॅस्टर (Disaster) मॅनेजमेंट :** एन. बी. सी. म्हणजे न्युक्लीअर बायोलॉजीकला अँड केमीकल वारमध्ये काम करण्यासाठी अग्निशामक दलाने एकूण सात जिल्हयासाठी कार्य करणे अपेक्षीत आहे. त्यामध्ये ऑपरेश्न विभाग तसेच फर्स्ट रिस्पाँडर म्हणून अग्निशमन दलास काम करावे लागणार आहे. त्या संदर्भात डॉ. सुरेश जोशी प्रधान सचिव (मदत कार्य व पुनर्वसन) महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र अशाप क्र. ईक्युआर १९९६/प्र.क्र./१०५/भूकंप दि. ३१-०७-०२ नुसार औरंगाबाद, नागपूर, पुर्ण व मुंबई या ठिकाणी चार सेंटर कलम करण्यास मा. मुख्यमंत्री (म. रा.) यांनी संमती दिली असून, त्यानुसार औरंगाबाद येथे सर्च अँड रेस्क्यू टीम तयार करण्यासाठी मा. आयुक्तांना (मनपा औरंगाबाद) आदेशीत करण्यात आलेले आहे. त्यासाठी शासनाकडून वेगळा फंड देण्यात येणार आहे.

**६) अग्निशमन विभागातर्फे वेगवेगळया लायसन्स/ना हरकत प्रमाणपत्रातून झालेली वसुली :** अशा प्रतिकुल परिस्थितीमध्ये सुध्दा सन २००१-२००२ मध्ये अग्निशमन विभागातर्फे खालीलप्रमाणे १०-१८ वर्षापासून थकलेली रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मालमत्ता व पाणीपट्टी एकूण रुपये | ५३,४५,६५२/- |
| २ | ना हरकत प्रमाणपत्र फिस रुपये | ३,३९,०००/- |
| ३ | कॅपीटेशन फिस रुपये | १२,२१,६८४/- |
| ४ | इतर प्रमाणपत्राची फिस रुपये | २४,८२,९५९/- |
| ५ | मालमत्तावर वसुली रुपये | ११,३१,८००/- |
| ६ | पाणीपट्टी वसुली रुपये | ४,२९,७२०/- |
| ७ | ना हरकत प्रमाणपत्र फिस वसुली रुपये | २,४२,०००/- |
| ८ | कॅपीटेशन फिस रुपये | १०,३७,३४६/- |
| ९ | इतर प्रमाणपत्राची वसुली रुपये | ४,३५,८२६/- |

वरील प्रमाणे अग्निशमन दलाच्या ना हरकत प्रमाणपत्राच्या माध्यमातून मनपामध्ये बरेच दिवसापासून थकीत असलेले

| | | |
|---|---|---|
| १ | मालमत्ता व पाणीपट्टी कर | रुपये ६९,०७,१७२/- |
| २ | ना हरकत प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राची फिस | रुपये ५७,५९,५१५/- |
| | **एकूण** | **१,२६,६६,६८७/-** |

अग्निशमन दलाच्या ना हरकत प्रमाणपत्रामुळे शहरातील बऱ्याच दिवसापासून थकित असलेली मालमत्ता व पाणीपट्टी कर वसुली होण्यास चालना मिळत आहे. तसेच शहरातील रीस्क असेसमेंट उघडकीस येत आहे.

या अगोदर मनपाला अग्निशमन विभागातर्फे कसल्याही प्रकारचे वसूलीच्या माध्यामातून उत्पन्न मिळत नव्हते. अग्निशमन विभागातर्फे झीरो उत्पन्न होते.

**७) अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राच्या नवीन ट्रेडमुळे अडीच कोटी रुपये वसुलीत होणारी वाढ अपेक्षीत आहे :** या शिवाय पुन्हा काही नवीन ट्रेर्डस अग्निशमन विभागाच्या लायसंस खाली (एन. ओ. सी) आणावयाचे आहे. जसे पेट्रोल पंप/गॅस/एजंसी/मंगल कार्यालय/पेंट शॉप/कारखाने/सॉमिल/केमीकल गोडावून/स्क्रॅप गोडावून इत्यादी ट्रेड धारकांना अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे. बंधनकार असून, ते त्यांना लागू करणे जरुरी आहे व त्या बाबत कार्यवाही चालू आहे. ते लागू केल्यास अग्निशमन विभागातर्फे मनपास दरवर्षी निश्चितच दोन ते अडीच कोटीचें उत्पन्न अपेक्षीत आहे.

**८) आपत्कालीन केंद्र स्थापन करणे :** भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून महाराष्ट्रामध्ये मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर येथे पूर्ण विभागात काम करण्यासाठी विभागीय आपत्कालीन केंद्र ( Divisional Disaster Management Centre) निर्माण करण्यासाठी सुचित केले आहे. त्यानुसार ३६ कर्मचाऱ्यांची सर्च अँट रेस्क्यू टीम निर्माण करुन कार्यान्वीत करण्यास सुचित/आदेशीत केले आहे. या ३६ कर्मचाऱ्यांमध्ये २६ अग्निशमन अधिकारी व कर्मचारी, ३ प्रशासकीय अधिकारी/३ डॉक्टर्स/४ तांत्रिक अधिकारी राहणार आहेत.

**९) अग्निशमन दलाला खालील आपत्कालीन परिस्थितीमध्ये शहर व मराठवाडयाच्या आठ जिल्हयामध्ये करावयाची कामे :** सर्च अँड रेस्क्यू टीम ही औरंगाबाद शहर व महराठवाडा विभागातील, जिल्हयातील कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी २४ तास सज्ज असणार आहे. आपत्कालीन परिस्थिती (Disaster Management) ज्यामध्ये भूकंप/चक्रवादळ/महापुर/रोड अपघात/मोठया आगी/एल.पी.जी. लीकेज/रस्त्यावरील /केमीकला अपघात/आतंकवाद्यांनी/अतिरेक्यांनी घडवून आणलेले स्फोट/दंगल इत्यादीसाठी कमीत कमी वेळेत जावून संभाव्य जिवीत व वित्तहानी वाचवण्याची कार्यवाही करावी लागणार आहे. अलीकडील काळात औरंगाबाद शहर व काही जिल्हे हे अती संवेदनशील म्हणून ओळखले जात आहेत.

**१०) महानगरपालिकेच्या फंडातून आर्थिक तरतुद करणे व शासनाकडून अनुदान मिळणे :** प्रस्तावति सर्च अँड रेस्क्यू टीमसाठी महाराष्ट्र शासन व महानगरपालिका यांनी संयुक्तपणे आर्थिक तरतुद ७५/२५% नुसार पाच वर्षासाठी करावी लागणार आहे. प्रस्तावित आर्थिक तरतुद प्रत्येक वर्षी महाराष्ट्र शासन १.५० कोटी रुपये व महानगरपालिका ०.५० कोटी रुपये करावी लागणार आहे. एकूण ५ वर्षासाठी आर्थिक तरतुद महाराष्ट्र शासन ७.५० कोटी रुपये व महानगरपालिका २.५० कोटी रुपये करावी लागणार आहे. कारण महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्याधुनिक अग्निशमन साहित्य खरेदीसाठी सक्षम नाही. अशा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत काम करण्यासाठी अत्याधुनिक अग्निशमन साहित्य/दुरुस्ती/कर्मचारी/प्रशिक्षण द्यावे लागणार आहे.

**११) अत्याधुनिक अग्निशमन साहित्य व वाहने खरेदी करणे :** अत्याधुनिक अग्निशमन साहित्याची अत्यंत आवश्यकता भासत आहे. सर्च अँड रेस्क्यू टीम निर्मितीमुळे अत्यावश्यक सेवेतील अग्निशमन विभाग हा कोणत्याही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी पूर्णत: मा. आयुक्त यांच्या नियंत्रणात ठेवावा लागणार आहे. तसेच मराठवाडा विभागातील ८ जिल्हयातील जिल्हा अधिकारी व पोलीस अधिक्षक यांचयाही संपर्कात राहावे लागणार आहे.

वेळोवेळी निर्णय घेणे व त्यांची अंमलबजावणी मा. आयुक्त यांच्या निदर्शनाखाली करण्यासाठी काही प्रमाणात मुख्य अग्निशमन अधिकारी यांना प्रशासकीय व आर्थिक अधिकार देणे आवश्यक आहे.

**१२) मुख्य अग्निशमन अधिकारी या पदास प्रशासकीय तथा आर्थिक अधिकार देणे ज्यामध्ये :**

१) मुख्य अग्निशमन अधिकारी या पदास एच. ओ. डी. म्हणून मान्यता देणे

२) मनपा विभागाअंतर्गत तातडीची मदत घेणे/देणे.

३) महाराष्ट्र शासनाच्या इतर खात्याची मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीची मदत घेणे/देणे.

४) अग्निशमन विभागातील कर्मचारी अपघात स्थळी नेमणे अथवा वापस बोलवणे.

५) अपघातखाली J.C.B./CRANE/LABOUR/TRACTOR ची मदत घेणे.

६) अग्निशमन विभागातील कामे करण्यासाठी साहित्य खरेदी/दुरुस्ती/पेट्रोल, डीझेलचा खर्च/फिल्डवरील कर्मचाऱ्यांचे जेवण/वैद्यकीय खर्च/J.C.B./CRANE/LABOUR/TRACTOR चा खर्च देणे इत्यादी साठी रुपये २५,०००/- पर्यंतचे आर्थिक अधिकार प्रदान करणे.

७) फायर एन. ओ. सी. देतांना कॅपीटेशन फि/फायर लायसंस फि/पेनल्टी फि इतर बाबत निर्णय घेणे.

करीता सर्च अँड रेस्क्यू टीम निर्माण करणे व मा. आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली आपत्कालीन परिस्थितीत मराठवाडा विभागामध्ये वेळोवेळी काम करणे व निर्णय घेवून अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य अग्निशमन अधिकारी या पदास उपरोक्त अ. क्र. १ ते ७ प्रशासकीय तथा आर्थिक अधिकार देणे व महाराष्ट्र शासनाकडे आर्थिक अनुदानासाठी रुपये ७.५ कोटी पाच वर्षासाठी देण्यासाठी पत्र पाठविणे व महानगरपालिका अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद रुपये ५० लाख प्रतीवर्ष व रुपये २.५ कोटी पाच वर्षासाठी करण्याच्या धोरणात्मक निर्णयास्तव व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री नंदकुमार घोडेले : या प्रस्तावात मुख्य अग्निशमन अधिकारी यांना प्रशासकीय व आर्थिक अधिकार देणे असे दिले. महापालिकेमध्ये माझ्या माहितीप्रमाणे कोणत्याही विभाग प्रमुखास आर्थिक अधिकार दिलेले नाही. असे आर्थिक अधिकार फक्त अग्निशमन अधिकारी यांनाच देता येतात. का, इतरांना का नाही. चार कार्यकारी अभियंता यांना सुध्दा देयके अदा करण्याचे अधिकार द्यावे. यात असे म्हटले की, महापालिकेच्या उत्पन्नात वाढ झाली यात सर्वांचेच श्रेय आहे. नुसते एकाच अधिकाऱ्याचे नाही.

श्री सुनलि मगरे : प्रस्तावात १०-१२ मुद्दे दिलेले आहे. १२ क्रमांकाच्या मुद्दयामध्ये सात वेगवेगळे क्रमांक आलेले आहेत, या सातही क्रमांकावर सवस्तिर स्पष्टीकरण करणे आवश्यक असून, त्यानंतर चर्चा करणे सोयीस्कर होईल.

श्री संजय शिरसाठ : ४-५ पानाचा प्रस्ताव एकदम समोर येते. वाचन होत नाही. या प्रस्तावाच्या अनुषगाने अग्निशमन अधिकारी यांनी स्पष्टीकरण करावे.

श्री जयवंत ओक : नाशिक, पुणे, पिपंरी, चिंचवड तसेच नागपूर महापालिकेमध्ये अग्निशमन अधिकारी यांना कोणते व काय अधिकार आहे. या संदर्भात मा. आयुक्तांनीच खुलासा केला तर योग्य होईल. एखादा अधिकारी चांगले काम करीत असेल तर मान्य केले पाहिजे. या सभागृहात एकीकडे त्या अधिकाऱ्याचा सत्कार करतो, शहराचा व्याप वाढलेला आहे. मा. आयुक्तांच्या अधिकारत

हे आहे का? सविस्तर खुलासा द्यावा. सिडकोचे अग्निशमन केंद्र बंदच आहे. कामाच्या व्यापामुळे ते बंद आहे.

सौ. विजया रहाटकर : बऱ्याच वेळा असे होते की, प्रस्ताव सादर होतात चार ओळींचा असतो व चर्चा होते व संपूर्ण माहिती का दिली नाही. अशी विचारणा सभागृहात होते व माहिती व्यवस्थित सादर केलेली नाही. म्हणून सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा. असा निर्णय होतो. या प्रस्तावाकडे लक्ष वेधल्यास संपूर्ण माहिती सादर करण्यांत आलेली आहे, असे दिसून येते. जी माहिती आणखी आवश्यक आहे ती सभागृहाला घेता येईल. अग्निशमन केंद्र स्थापन होणे अतिशय आवश्यक आहे. बऱ्याच वेळा आपत्कालीन वेळ येते. त्यावेळी बऱ्याचदा काही काम मंजूर होण्यास वेळ लागतो. एखादी कार्यवाही करण्यात उशीरही होवू शकतो. हा महत्वाचा ठराव असून आवश्यक आहे. सर्वांनी अनुमोदन देवून मान्यता द्यावी.

मुख्य अग्निशमन अधिकारी : महाराष्ट्र शासनाने, केंद्र शासनाने आपत्कालीन केंद्र उभारणे बाबत काही मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहे. महाराष्ट्रासाठी पुणे, मुंबई, औरंगाबाद व नागपूर या ठिकाणी चार केंद्र स्थापन करायचे असून, विभागीय पातळीवर या केंद्रामार्फत काम चालणार आहे. औरंगाबादसाठीचे विभागीय केंद्र हे ८ जिल्हयासाठी राहील व यासाठी आर्थिक तरतुद महाराष्ट्र शासन १.५ कोटी व महापालिकेमार्फत रु. ५० लक्ष रुपये ठेवावी लागेल. उदा. औरंगाबादहून नांदेडला गाडी पाठविली कर्मचाऱ्यांना ८-८ दिवस जेवण मिळत नाही. एखाद्या केसेसमध्ये कर्मचारी जखमी होतात. हॉस्पीटलमध्ये जावे लागते प्राथमिक उपचारासाठी लागणार खर्च आहे. कर्मचारी महापालिकेचे आहे. यासाठी आर्थिक अधिकार आवश्यक आहे.

श्री सलिम पटेल : जे आर्थिक व प्रशासकीय अधिकार देवू नये इतर महापालिकेमध्ये काय अधिकार आहेत ते पहावे.

श्री जयवंत ओक : प्रस्ताव महापालिकेच्या हिताचा असेल, तर निर्णय घ्यावा. मा. आयुक्तांनीच प्रस्ताव ठेवलेला आहे. झोपडपट्टीस आग लागल्यास साहित्य नसेल तर आग कसे विझवणार म्हैसमाळ येथे घटना घडली ती व्यक्ती २४ तास पाण्यात होती. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी काढले. प्रत्येक विभाग प्रमुख आपआपले अधिकार वापरतात. शासन निर्देशानुसार हे काम होणार आहे व मा. आयुक्तांच्या अधिकारात त्यांना अधिकार देण्यास हरकत नसावी. नाशिक, पुणे, पिपंरी, चिंचवड येथे अग्निशमन अधिकार यांनी आर्थिक अधिकार आहे. येथे का नको. या प्रस्तावासंबंधी वेगळी दिशा दाखवू नये. सभागृहात संबंधित अधिकारी यांनी भावना व्यक्त केल्या. अग्निशमन अधिकारी यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. महापालिकेने त्यांचा सत्कार केला. त्या अधिकाऱ्यांना अधिकार द्यायचे आहे. एवढा विरोध करणे योग्य नाही. स्वत:च्या फायदयासाठी अधिकारांची मागणी नाही. नागरिकांच्या संरक्षणासाठी त्यांना अधिकार पाहिजे आहे. सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे. चर्चा होवू द्यावी. महापौरांना अधिकार आहे. प्रस्ताव मान्य करावा.

श्री स. अली सलामी : काही ना काही अधिकार असते. म्हणून ते अधिकार असतात. प्रशासकीय अधिकार देण्यासंबंधी प्रस्ताव आहे. या महापालिकेत माजी आरोग्य अधिकारी यांना अधिकार देत गेले व त्यांना मा. आयुक्तापेक्षा जास्त वेतन होते. सेवा निवृत्त झाले अद्यापपर्यंत चौकशीच चालू आहे. आरोग्य

वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणतीच कार्यवाही झालेली नाही. जास्त अधिकार देवू नये. त्यांचा सत्कार केला हे खरे आहे. तरीही सांगतात माझा अधिकार होता. काही अधिकारी यांनी त्यांचे अधिकार वापरुन गैरफायदे घेतलेले आहे. एका संदर्भात एन. ओ. सी. घेण्यासाठी या विभागात भाडेकरुनां घरपट्टी भरावी लागली. लोकांना त्रास देण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांचा असतो. अशा अधिकाऱ्यांना अधिकार देणे कितपत योग्य आहे. आज अधिकार देणार पुन्हा याच सभागृहात संबंधित अधिकारी यांची चौकशी करावी म्हणून चर्चा होईल, अधिकार प्रदान करण्याबाबत दुमत नाही. परंतू सर्वच अधिकार देवू नये. आताच खुलासा केला जे कर्मचारी बाहेर गाडीवर जातात. त्यांचा खाण्यापिण्याचा खर्च, औषधोपचार यासाठी ॲडव्हॉन्स रक्कम देता येते. सभागृहाचे मत लक्षात घेवून जो निर्णय घ्यायचा तो घ्यावा.

मा. आयुक्त : गेलया ४-५ महिन्यात काम करील असतांना अग्निशमन दलाचे कामाबाबत अहवाल मागविलेला होता. तो सभागृहासमोर आलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. मुख्य प्रस्ताव असा की, दरवर्षाला १.५० कोटी असे पुढील वर्षाला शासनाकडून मिळणार आहे व महानगरपालिकेस दरवर्षी ५० लक्षची तरतुद या विभागासाठी ठेवावी लागणार आहे. असा प्रस्ताव विभागाकडून ठेवत असतांना त्या विभागाची दैनंदिन कामे, वसुली ही आकडेवारी दिली आहे. ती आकडेवारी नेमकी या प्रस्तावाशी संबंधित आहेत का? असा प्रश्न काही सदस्यांनी विचारणा केली. संबंध नसला तरी तो विभाग काय काम करतात, हे या सभागृहासमोर आलेले नव्हते. प्रशासकीय व आर्थिक अधिकार देणे अपेक्षित आहे. त्यावर आयुक्त म्हणून माझे निवेदन आहे की, प्रशासकीय व आर्थिक अधिकार हे सभागृहापेक्षाही आयुक्तांना अधिकार देण्याचे अधिकार आहे. एकूण ७ प्रकारचे त्यांना अधिकार अपेक्षित आहे. हे अधिकार देण्यासाठी प्रशासन विभाग उपआयुक्त (म.), (प्र.) व मुख्यलेखाधिकारी तपासून पाहतील. त्यातील औचित्य, कायदे, सेक्शन, नियम तपासून घेतल्याशिवाय आणि माझी वैयक्तिक धारणा झाल्याशिवाय अधिकार दिले जाणार नाही.

श्री सुनिल मगरे : मा. आयुक्तांनी खुलासा केला सर्वांचे समाधान झाले असावे. प्रस्तावाच्या संदर्भात स्पष्टीकरण करतांना असे नमुद केलेले आहे की, औरंगाबाद जिल्हयामध्ये वेगवेगळया ठिकाणी आपत्कालीन केंद्र स्थापन करणे त्या केंद्राच्या मार्फत सुविधा पुरविणे, ३ प्रशासकीय अधिकारी, ३ डॉक्टर्स यांची नियुक्ती करणे. वेगवेगळया टिमची नियुक्ती करणे, असे याच प्रस्ताव क्र. ७ मध्ये अग्निशमन ना हरकत प्रमाणापत्राच्या नविन ट्रेडमुळे अडीच कोटी वसुलीत होणारी वाढ अपेक्षित आहे. या अगोदर एन. ओ. सी. देत नव्हतो का? एन. ओ. सी. देत आहोत. बऱ्यापैकी महसूला जमा झालेला आहे. प्रस्तावात गोलमोल माहिती सादर केलेली आहे. असा स्पष्ट आरोप माझा आहे. एन. ओ. सी. देत नसाल तर ठिक समजू शकलो असतो. इतका महसूल जमा होईल. मोठमोठे आकडे फुगवून दाखविण्याचा प्रयत्न झालेला आहे. ३ प्रशासकीय अधिकारी तसेच वेगवेगळया टीम नियुक्त करावयाच्या आहे. ३ डॉक्टरांची नियुक्ती करायची आहे. या सर्व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्यानंतर अग्निशमन अधिकारी यांना अधिकार दिल्यास उचीत होईल. मा.

आयुक्त यांनी केलेले निवेदनानुसार त्यांचे समाधान होईल. त्यानुसार ते अधिकार देतील.

श्री काशीनाथ कोकाटे : या महानगरपालिकेमध्ये वेगवेगळे विभागा असून, कार्यकारी अभियंता पदे आहेत. विभाग व त्यावरील वरीष्ठ विभाग असा प्रत्येक विभागासाठी आहेत. विभाग व त्यावरील वरीष्ठ विभाग असा प्रत्येक विभागासाठी आहेत. असे किती विभाग आहेत की, ते विभाग प्रमुखामार्फत कार्यवाही होत नाही. याचा सुध्दा प्रथमतः खुलासा द्यावा. अग्निशमन विभाग सक्षम असतांना देखील जाणीव पूर्वक कामाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी मा. आयुक्तांनी प्रस्ताव ठेवला असेल. प्रस्तावात स्पष्ट दिले आहे, आयुक्तांनी प्रस्ताव ठेवला आहे. उप आयुक्त (म.) मार्फत प्रस्ताव आलेला आहे. त्यानंतरच हा प्रस्ताव सादर झालेला आहे. प्रस्तावात प्रशासनाने संपूर्ण माहिती सादर केलेली आहे. म्हणून हा प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसावी, मान्य करायचा नसेल तर का करता येत नाही. सुध्दा स्पष्ट खुलासा द्यावा. अधिकार दिल्यास अधिकाऱ्यांना काम करणे सोयीस्कर होते. या विभागाच्या गाडया इतरत्र ठिकाणी पाठवायच्या असेल, कधीही कॉल येतात. त्यामुळे निर्णय घेणे आवश्यक असते. सदर विभागास सक्षम करणे आवश्यक आहे. प्रशासकीय प्रस्ताव आहे. मान्य करावा.

श्री भागवत कराड : हे शहर मराठवाडयाचे राजधानीचे ठिकाण आहे. या शरासाठी अग्निशमन ही सेवा आवश्यक आहे. संबंधित अधिकारी यांचे काम चांगल्या प्रकारचे आहे, त्यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. जे अधिकार द्यायचे ते आयुक्त व उपआयुक्त तपासणी करुन देतील प्रस्ताव मान्य करावा. यामुळे पूर्ण मराठवाडयातील जनतेची सेवा हा विभाग करु शकेल.

मा. महापौर : विषय मंजूर करण्यात येतो.

श्री सुनिल मगरे : या संबंधी मा. आयुक्तांचे समाधान असेल तर अधिकार देतील.

श्री आनंद तांदुळवाडीकर : सभागृहाने भावना व्यक्त केलया. मा. आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी सविस्तर असा खुलासा केला. मा. विभागातील कर्मचारी इ. शिष्ट मध्ये काम करतात. प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री सलिम पटेल : सभागृह नेता यांना न्यायालयाने फाईन केलेला आहे. त्यांना बोलण्याचा अधिकार नाही.

श्री राधाकृष्ण गायकवाड : स. स. श्री सलिम पटेल यांचे प्रकरण सुध्दा न्यायप्रविष्ट असून विषयाला वेगळे वळण देत आहे. सभासदत्व रद्द करावे.

श्री आनंद तांदुळवाडीकर : विषय वगळता इतर प्रश्न उपस्थित केला स. सभासद श्री सलिम पटेल यांचे १ दिवसासाठी सभासदत्व रद्द करावे.

श्री काशीनाथ कोकाटे : श्री सलिम पटेल यांचे प्रकरण सुध्दा न्यायालयात चालू आहे.

(याचवेळी मा. महापौर डायस समोर जावून स. सभासद मोठमोठयाने बोलतात. काहीही एकू येत नाही.)

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. नसता सभासदत्व रद्द होईल.

श्री राधाकृष्ण गायकवाड : स. सदस्य श्री सलिम पटेल यांचे सभासदत्व रद्द करावे.

श्री जयवंत ओक : ज्यांनी राजदंड पकडण्याचा प्रयत्न केला त्या स. सभासदांचे सभासदत्व रद्द करावे.

श्री स. अली सलामी : विधी सल्लागार यांचेकडून खुलासा घ्यावा. दोघांनाही बोलू नये.

मा. महापौर : विषयाला धरुन चर्चा करावी. स. स. श्री सलिम पटेल यांचे १ दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते. स. सदस्य श्री सलिम पटेल यांनी बाहेर जावे.

श्री आनंद तांदुळवाडीकर : ज्यांचे सभासदत्व रद्द केले, त्यांना बाहेर पाठविण्यात यावे.
(आजची सभा १५ मिनिटांसाठी तहकुब करण्यात येते. वेळ दुपारी १.१० वाजता सभेला सुरुवात दुपारी २.१० वाजता).

श्री सुरजितसिंग खुंगर : आपण नेहमीच माफ करीत आलेले आपणांस विनंती आहे की, त्यांचे सभासदत्व रद्द केले. तो निर्णय मागे घेण्यात यावा.

मा. महापौर : स. सदस्य श्री सलीम पटेल यांचे रद्द केलेले सभासदत्वाचा निर्णय मागे घेण्यात येतो. जर कुणी सदस्य यांनी डायस समोर येवून राजदंड पकडल्यास सभासदत्व रद्द होईल. यांची नोंद घ्यावी.

श्री राधाकृष्ण गायकवाड : १ तासापासून यावर चर्चा चालू आहे.

मा. महापौर : विषय क्र. ६ मंजूर केलेला आहे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : अग्निशमन अधिकारी यांचा स्केल वाढवून देण्यात यावा. महत्वाचे काम या अग्निशमन दलाच्या माध्मातून होत आहे. जिवावर उदा होवून कर्मचारी काम करतात. यांना विशेष अधिकार द्यावे. वेतनश्रेणी वाढ करुन प्रमोशन देण्यात यावे. असे माझे मत आहे.

मा. महापौर : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता, विषय क्र. ६ मंजूर करण्यात येतो. त्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव क्र. १८६/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद येथे विभागीय आपत्कालीन केंद्र स्थापनेस व त्यासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे ३६ कर्मचाऱ्यांची रेस्क्यू टिम निर्माण करुन कर्यान्वीत करणे, अत्याधुनिक अग्निशमन साहित्य व वाहन खरेदी करणे, प्रस्तावित १ ते ७ प्रमाणे प्रशासकीय व आर्थिक अधिकार देणे, महाराष्ट्र शासनाकडे आर्थिक अनुदानासाठी प्रस्तावित रक्कम मिळणेस प्रस्ताव पाठविणे आणि रु. ५० लाख प्रतीवर्षी प्रमाणे ५ वर्षासाठी महानगरपालिका अर्थसंकल्पात तरतुद करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी यांना वेतनश्रेणी देण्याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८७/७ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने तयार केलेल्या सेवा भरती नियमास महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने शासन निर्णय क्र. एएमसी १६९३/१२१९/प्र.क्र. ९७/नवि/२४ दि. १६ मे १९९४ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन शासनाने उक्त अधिनियमातील कलम ४५४,४५ (३) आणि ४५७ (३) (अ) अन्वेय मंजूरी प्रदान केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या तसेच रिक्त होणाऱ्या अथवा नव्याने मंजूरी प्रदान होणाऱ्या पदावर उक्त नियमाच्या तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि सदरचे नियम हे किचकट व कालबाहय झालेले असल्याने बऱ्याच प्रकरणात निर्णय घेण्यासाठी प्रशासनास अडचणी निर्माण होतात, ज्यामुळे कर्मचाऱ्यांना न्याय देण्यासाठीही अडचणी निर्माण होतात, ज्यामूळे कालपरत्वे उक्त सेवा भरती नियमामध्ये वेळोवेळी दुरुस्त्यांचा प्रस्तावही सादर करावा लागतो.

करीता, सेवा भरती नियम परिपूर्ण व अद्ययावत तयार करणे गरजेचे आहे. करीता परिपूर्ण व अद्ययावत असे महापालिका सेवा भरती नियम तयार करण्यासाठी महसूल खात्यातील सेवानिवृत्त उप जिल्हाधिकारी किंवा अप्पर जिल्हाधिकारी यांची नियुक्ती करुन त्यांचेकडून सेवा भरती नियमाची अद्ययावत मसुदा तयार करुन घेणे योग्य वाटते. असा मसूदा तयार करण्यासाठी त्यांना ०३ महिने इतका कालावधी देणे योग्य वाटते. करीता, प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

श्री भागवत कराड : या प्रस्तावासंबंधी सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री प्रशांत देसरडा : असेही नमूद केलेले आहे की, नियम हे किचकट व कालबाहय झालेले असल्याने प्रशासनास निर्णय घेतांना अडचणी निर्माण होता. या संबंधी खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

सहा. आयुक्त : प्रशासनाने हा प्रस्ताव ठेवलेला आहे. १९९४ च्या सेवा भरती नियमानुसार अनेकवेळा अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. प्रत्येक वेळेस शासनाचे मार्गदर्शन मागवून पाठपुरावा केलेल्या आहे. उदा. मागील भरतीमध्ये अन्न निरिक्षक पदसाठी यामध्ये भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ अन्वये आवश्यक असलेली गुणवत्ता महापालिका सेवेत आधी पासून असल्यास खेरीज करुन ३० वर्षापेक्षा जास्त वय नसावे. यात स्पष्ट असे उल्लेख नाही. जे म्हणून सेवा भरती करीत असतांना प्रस्ताव वेळोवेळी शासनाकडे पाठवून पाठपुरावा करावा लागतो. त्यास बराच विलंब लागतो. शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शन व प्रकरणाचा पाठपूरावा होत नाही. म्हणून प्रकरणे प्रलंबित होतात. यामुळे प्रशासन व सभागृह यांच्यात दुरावा निर्माण होतो. १९९४ ला नियमावली केल्यानंतर शासनातर्फे बरेच जी. आर. प्राप्त झाले, त्यात पदोन्नती संदर्भात जी. आर नुसार बदल दिसून येतो. यावर सांगोपान चर्चा करुनच निर्णय व्हावा अशी प्रशासनाची विनंती आहे.

मा. आयुक्त : जे नियमाचे पुस्तक तयार केले. त्यात अनेक दुरुस्त्या करण्याची गरज आहे. त्यात कोणत्या दुरुस्त्या करावयाच्या यांचा अभ्यास करुनच दुरुस्ती सह पून्हा दुरूस्त नियमावली सभागृहासमोर सादर होईल. त्यात पारदर्शकता राहावी यासाठी दुरुस्ती करावी लागणार आहे.

मा. महापौर : विषय मंजूर करण्यात येत आहे. दुरुस्त्या करुन पून्हा सभागृहासमोर प्रस्ताव आणावा.

**ठराव क्र. १८७/७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेले सेवाभरती नियम किचकट व कालाबाहय झालेले असल्याने सदर सेवाभरती नियम अद्यावत करणे व त्यासाठी सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी किंवा अप्पर जिल्हाधिकारी यांची नियुक्ती करून ०३ महिन्यात प्रारुप सुधारित सेवाभरती नियम तयार करुन सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८/८ :** मा. उप आयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराची दिवसेंदिवस झपाटयाने वाढ होत आहे. त्यानुसार नागरिकांना सुखसोई व मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी सध्याचे उत्पन्न कमी पडत आहे. त्यातच दि. १७-०४-२००३ पासून

जकात दर कपातीचा निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अंमलात आणावा लागाला. त्यामुळे एकूण ८ वस्तूंच्या दर कपातीमुळे या चालू आर्थिक वर्षात सरासरी रु. ३.०० कोटीचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

औरंगाबाद महापालिका हद्दीतील औद्योगिक वसाहतीतील एकुण ६४० कंपन्यापैकी ३६० कंपन्या पूर्णतः बंद आहेत. यापैकी २८० कंपन्या सद्यस्थितीत चालू असल्या तरी त्यापैकी ५५ ते ६० कंपन्या अंशकालीन (आजारी) बंद असतात व तसेच दरवर्षी औद्योगिक वसाहतीतील कंपन्या बंद पडण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील कंपन्यापासून दरवर्षी मिळणाऱ्या जकात उत्पन्नात घट निर्माण होत आहे.

वरील बाबीसंदर्भात व मनपाच्या एकूण उत्पन्नाचा विचार केल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्न टप्प्या-टप्याने वाढविणे आवश्यक आहे. त्यापैकी प्रथम औरंगाबाद मनपा हद्दीमध्ये प्रवेश करणाऱ्या व शहराबाहेर जाणाऱ्या वाहनासाठी "रहदारी फी" (ट्रान्झिट फि) मध्ये वाढ करणे आवश्यक असून त्यानुसार सद्यस्थितीत शासन निर्णय क्र. एएमसी/१४९८/२६०३/प्रक्र/२४३/९८ नवि/२४ मंत्रालय, मुंबई/३२ दि. ०५ मार्च १९९९ अन्वये प्रत्येक वाहनासाठी "रहदारी फी" (ट्रान्झिट फि) म्हणून रक्कम रु. २०/- (रु. वीस फक्त) आकारण्यात येत आहे. यापासून सन २००२-२००३ येत आर्थिक वर्षात मार्च अखेर रु.१.९५ कोटी महानगपालिकेस प्राप्त झालेले आहे.

औरंगाबाद शहरात प्रवेश करणाऱ्या आणि शहराबाहेर जाणाऱ्या वाहनावर रु. २०/- प्रति वाहन ऐवजी रु. ५०/- अशी वाढ करणे आवश्यक असून, या वाढीमूळे महानगरपालिकेस दरवर्षी रु. २.९३ कोटीचे अतिरिक्त उत्पन्न मिळाले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ व १४२, १४७ मधील तरतुदी नुसार "औरंगाबाद महानगरपालिका स्थायी आदेश १९८४" मधील अनुसूची - "एम" मधील रहदारी फी रु. २०/- वरुन रु. ५०/- अशी वाढ करण्यास महानगरपालिका अधिनियमातील कलम/४६६(१) च्या (अ) मधील/(फ) व (२) अन्वये रहदारी फी मध्ये वाढ करण्याकरीता मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री भागवत कराड : कोणत्या वाहनावर कर आकारण्यात येणार आहे. खुलासा देण्यात यावा.

उपआयुक्त (म.) : जो माल ज्या वाहनाने व्यापार विक्रीसाठी शहरात येतो. त्यावर ट्रान्झिट फि आकारली जात नाही. परंतू महापालिका हद्दीतून येणाऱ्या व आयात नाक्यावरून निर्यात नाक्यातून ३ तासाच्या आत शहराबाहेर जाणाऱ्या वाहनावर हा ट्रान्झिट पास म्हणून पूर्वीचे रु. २०/- प्रति वाहन असे आकारण्यात येते. १९९९ ला ही वाढ केलेली होती. आता त्यात वाढ केल्यास महापालिकेच्या त्यात फायदा आहे. सध्या वाहनांची प्रति दिन संख्या जवळपास २५०० इतकी आहे. इतर महानगरपालिकेचे दर वाढलेले आहे. यात सोलापूर महापालिकेमध्ये ६०/- रु. अकोला महापालिकेमध्ये ५०/- आहे. नागपूर महापालिकेमध्ये ४०/- रु. १००/- प्रस्तावित केले आहे. नांदेड महापालिकेमध्ये रु. ३५/- असून, नाशिक ३०/- पुणे, पिंपरी, चिंचवड महापालिकेमध्ये २०/- आहे. ज्या महापालिकेमध्ये दर कमी जरी असेल, परंतू वाहनांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने उत्पन्न जास्त होते. महामार्गावर वाहनांची संख्या जास्त असते. रु. ५०/- प्रतिवाहन असा रहदारी फी वाढीचा प्रस्ताव आहे.

श्री प्रकाश निकाळजे : छावणी परिषदेने फि आकारणीस सुरुवात केलेली असून पून्हा महापालिकेने दर वाढ केल्यास योग्य होवू शकते का?

श्री भागवत कराड : महापालिकेचा फायदा होणार आहे. ५०/- रु. करण्यास हरकत नाही. प्रस्ताव मंजूर करावा.

मा. महापौर : विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १८८/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम-१२७ व १४२, १४७ मधील तरतुदी नुसार "औरंगाबाद महानगरपालिका स्थायी आदेश १९८४" मधील अनुसूची - "एम" मधील रहदारी फी रु. २०/- वरुन रु. ५०/- अशी वाढ करण्यास महानगरपालिका अधिनियमातील कलम-४६६ (१) च्या (अ) मधील-(फ) व (२) अन्वये रहदारी फी मध्ये वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ***<u>पुरवणी विषय</u>***

**विषय क्र. १८९/१ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर विकास योजना (सुधारित) मध्ये प्रभाग क्र. ६४ भोईवाडा येथील खडकेश्वर भागातील पुर्व पश्चिम २४ मी. डीपी रोउ वरुन अमेय अव्येन्यू ते अनुराधा अपार्टमेंट हा रस्ता १२ मी. दाखविला आहे. शहर विकास योजना (सुधारित) म. प्रा. व. न. र अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास सदर करतांना ९ मी प्रस्तावित करुन पाठविले होते. परंतू शासनाने मंजूर करतांना पून्हा १२ मी. दाखविलेला आहे. सदर रस्ता पूर्व पश्चिम दोन रस्त्यांना जोडला जातो. सदर रस्त्याची लांबी सुमोर १६० ते १७० मी. आहे.

औरंगाबाद महानगरपालिका शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावली नुसार ३०० मी. पर्यंत ९ मी. रुंदीचा रस्ता अनुज्ञेय होतो. सदरच्या रस्त्याची लांबी ही १६० ते १७० मी. असल्यामुळे नियमानुसार ९ मी. रुंदीचा रस्ता अनुज्ञेय आहे. त्यामुळे अमेय, अव्येन्यू ते अनुराधा अपार्टमेंट या रस्त्याची रुंदी पूर्व बाजूने कमी करुन ९ मी ठेवण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्याची कार्यवाही करणे. अधिसूचना काढणे, सुनावणी देणे व प्रस्ताव शासनाकडे सादर करणे. बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना देणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर.

सूचक : सौ. चंद्रभागाबाई दाणे.

अनुमोदक : श्री प्रकाश निकाळजे

मा. महापौर : मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. १८९/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजना (सुधारित) नुसार भोईवाडा ते खडकेश्वर या २४ मी. रुंद विकास योजना रस्त्यावरुन दक्षिणेस अमेय, अव्येन्यू ते अनुराधा अर्पाटमेंट ते पूढे १२ मी. विकास योजना रस्त्याला जोडणार उत्तर दक्षिण १२ मी रुंद विकास योजना रस्त्याची पूर्व बाजून रुंदी कमी करुन ९ मी रुंद करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फरेबदल करण्याची कार्यवाही करण्यास व या संबंधी अधिसूचना काढणे, सुनावणी देणे, प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे, इ. संपूर्ण कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९०/२ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, येत्या सर्वसाधारण सभेत चालू वर्ष २००३-२००४ च्या तयार करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाच्या नियोजित माझ्या वार्डाच्या खालीलप्रमाणे कामचे शिर्षक बदलण्यात यावे व कामास मंजूरी देण्यात यावी.

१. विदयापीठ मेन बिल्डींग ते बौध्द लेणी रस्त्याचे डांबरीकरण.
२. विद्यापीठ ते बौध्द लेणी येथे २५० वॅट चे पथदिवे बसविणे.
३. गोगाबाबा ते विदयापीठ रस्त्यावर २५० वॅट चे पथदिवे बसविणे.
४. पेठे नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे.

करीता, सदरील कामाचे नियोजन करण्यात आले आहे. परंत या शिर्षकात खालीलप्रमाणे बदल करावा. १. पेठेनगर, भावसिंगपूरा येथील भिल्ल समाज दफन भूमी विकसित करावी. २. भिमनगर भावसिंगपूरा रस्त्याचे अंतर्गत डांबरीकरण करणे. ३. भिमनगर भावसिंगपूरा (स्लम) गल्ल्यामध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणे करीता सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री गणेश तांबे
अनुमोदक : सौ. मंदाबाई पवार

**संवाद :**

श्री किशोर शिंदे : प्रस्तावातील अ. क्र. ३ वरील काम वगळून मंजूर करावे. तो भाग माझ्या वार्डात येतो.

श्री गणेश तांबे : माझ्या वार्डात येतो. खात्री करुन घ्यावी. क्र. ३ चे काम स. सदस्य श्री शिंदे यांचे वार्डात असेल तर वगळण्यात यावा.

मा. महापौर : क्र. ३ चे काम स. सदस्य श्री शिंदे यांचे वार्डातील असेल तर वगळण्यात येईल. क्रमांक ३ चे काम वगळून प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. १९०/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००३-२००४ अर्थसंकल्पातील अ. क्र. १, २ व ४ चे लेखाशिर्ष बदलून त्या कामाऐवजी १. पेठेनगर, भावसिंगपूरा येथील भिल्ल समाज दफन भूमी विकसित करणे. २. भिमनगर भावसिंगपूरा रस्त्याचे अंतर्गत डांबरीकरण करणे. ३. भिमनगर भावसिंगपूरा (स्लम) गल्ल्यामध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणे असा बदल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१/३ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र. १५५ वर अनुक्रमांक ४१ नुसार फुलेनगर येथील जलवाहिनी बदलून नविन जलवाहिनी टाकणे करीता र. रु. २ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतू सदरील तरतुदीतून उपरोक्तचे काम न करता त्यातून फुलेनगर येथील अंतर्गत ड्रेनेज लाईल बदलून टाकण्यात यावी व ड्रेनेज चेंबरची उंची वाढविण्यात यावी. करीता उपरोक्त तरतुद वापरण्यात यावी. उपरोक्त प्रमाणे बदल करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

सूचक : श्री प्रकाश निकाळजे
अनुमोदक : सौ. चंद्रभागाबाई दाणे.

**ठराव क्र. १९१/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र. १५५ वर अनुक्रमांक ४१ नुसार फुलेनगर येथील जलवाहिनी बदलून नविन जलवाहिनी टाकणे करीता र. रु. २ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतू सदरील तरतुदीतून

उपरोक्तचे काम न करता त्यातून फुलेनगर येथील अंतर्गत ड्रेनेज लाईल बदलून टाकण्यात यावी व ड्रेनेज चेंबरची उंची वाढविण्यात यावी. करीता उपरोक्त बदल करुन तरतुद वापरण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९२/४ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पातील पान क्र. १३८ वरील शहरी भागात पूर्ण डांबरीकरण करणे या शिर्षकाखाली येणाऱ्या बिल्डर्स सोसायटी रस्त्याचे डांबरीकरणे करणे हया कामाऐवजी वसुंधरा कॉलनी येथे पुजा अपार्टमेंट ते देवानंद शिंदे याच्या घरापर्यंत पूर्ण डांबरीकरणांचे काम घेण्यात यावे. या संबंधिचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

सूचक : श्री सुनिक मगरे

अनुमोदक : श्री संजय शिरसाठ

**ठराव क्र. १९२/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पातील पान क्र. १३८ वरील शहरी भागात पूर्ण डांबरीकरण करणे या शिर्षकाखाली येणाऱ्या बिल्डर्स सोसायटी रस्त्याचे डांबरीकरण करणे हया कामाऐवजी वसुंधरा कॉलनी येथे पुजा अपार्टमेंट ते देवानंद शिंदे याच्या घरापर्यंत पूर्ण डांबरीकरणांचे काम घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/५ :** नगररचना विभागाशी संबंधित कामामध्ये १ बांधकाम परवानगी २ ले-आऊट मंजूरी ३ आरक्षित जागांचे/रस्त्यांचे आखणीतील जमिनीचे भूसंपादन अशा अनेक विषयासंबंधित नागरिकांची कामे महापालिकेकडे असतात. अशा कामासंबंधी शहरातील नागरिकांना वारंवार अडचणी येतात. नागरिकांचे नगररचना विभागाशी वारंवार काम पडते. परंतू सर्वसाधारणपणे असा अनुभव आहे की, अशा प्रकारच्या कामांना या विभागाकडून विलंब लागतो. त्यामुळे अनेक नागरिकांच्या तक्रारी आहेत. अशा प्रकारच्या तक्रारीचे निवारण करणे व नागरिकांची कामे त्वरील निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रत्येक महिन्यातून एकदा नियमितपणे "जन अदालत" आयोजित करण्यात यावी. यामध्ये मा. महापौर मा. आयुक्त शहर सुधार समितीचे सभापती व नगररचना विभागाचे अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती असावी. या बैठकीत नागरिकांना निमंत्रित करुन त्याचे कामाची प्रगती व विभागाची पारदर्शकता याबाबत विचारविनिमय करुन प्रकरणे त्वरील निकाली काढत येतील. करीता, प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : सौ. साधना गणेश सुरडकर

अनुमोदक : श्री भाऊसाहेब ताठे.

श्री नंदकुमार घोडेले : यात कर अदालत घेण्यात यावे. अशी दुरुस्ती करावी.

मा. महापौर : दुरुस्तीसह मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. १९३/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगररचना विभागाशी संबंधित कामांमध्ये १ बांधकाम परवानगी २ ले-आऊट मंजूरी ३ आरक्षित जागांचे-रस्त्यांचे आखणीतील जमिनीचे भूसंपादन अशा अनेक विषयासंबंधित नागरिकांची कामे महापालिकेकडे असल्यामुळे व नागरिकांची कामे त्वरील निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रत्येक महिन्यातून एकदा नियमितपणे "जन अदालत" आयोजित करण्यात यावी. यामध्ये मा. महापौर मा. आयुक्त शहर सुधार समितीचे सभापती व नगररचना विभागाचे अधिकारी प्रमुख उपस्थिती असावी. या बैठकीत नागरिकांना निमंत्रित करुन त्याचे कामाची प्रगती व विभागाची पारदर्शकता याबाबत

विचारविनिमय करुन प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यास तसेच "कर अदालत" आयोजित करण्यासही सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४/६ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डात आंबेडकर चौक पासून गावांत अहिल्यादेवी पुतळयाकडे जाणारा रस्ता आहे. तरी या रस्त्यास "अहिल्याबाई मार्ग" असे नांव देण्यात यावे. येत्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

सूचक : श्री भाऊसाहेब वाघ
अनुमोदक : १. श्री भरत लकडे, २. श्री राजु शिंदे

**संवाद :**

श्री साहेबराव कावडे : विषय क्र. ६,७,८ हे प्रस्ताव चुकीच्या पध्दीतीने ठेवले. वार्ड क्र. ९ मध्ये येतात. वार्ड क्र. १० स. सदस्यांनी प्रस्ताव ठेवलेले आहेत. रद्द करावा.

श्री आनंद तांदुळवाडीकर : स. सदस्य श्री कावडे यांचे सुचक म्हणून या प्रस्तावात टाकण्यात यावे. प्रस्ताव मंजूर करावे.

श्रीमती पार्वती मानकापे : यापुढे ज्या सदस्यांच्या वार्डातील काम असेल, त्यांचे नांव त्या प्रस्तावात असावे, नसता असे प्रस्ताव मंजूर करु नये.

श्री प्रकाश निकाळजे : नामांतर कमीटीकडे पाठवावे.

मा. महापौर : विषय क्र. ६,७,८ नामांतर कमीटीकडे पाठविण्यात मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. १९४/६ :** सदरील प्रस्ताव नामांतर कमीटीकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५/७ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डात चिकलठाणा परिसरात आठवडी बाजार भरतो. तरी या आठवडी बाजारात "राजे संभाजी" आठवडी बाजार असे नांव देण्यात यावे. येत्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

सूचक : श्री भाऊसाहेब वाघ
अनुमोदक : १. श्री भरत लकडे, २. श्री राजु शिंदे

**ठराव क्र. १९५/७ :** सदरील प्रस्ताव नामांतर कमीटीकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र. १९६/८ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे चिकलठाणा हनुमान चौक जुना बीड रस्त्याच्या सुरुवातीला श्रीमान छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुर्ण आकृती पुतळा बसविण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री भाऊसाहेब वाघ
अनुमोदक : १. श्री. मोतीवाला जगताप,
२. सौ रुख्मीणीबाई राधाकिसन शिंदे

**ठराव क्र. १९६/८ :** सदरील प्रस्ताव नामांतर कमीटीकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७/९ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद या ऐतिहासिक शहरात हजारो हिंदु, मुस्लीम व इतर धर्माचे नागरिक शहरात एकजुटीने राहत असून एकमेकांच्या सणासुदीत आनंदाने सहभागी होतात. त्या दृष्टीकोनातून ही एकजुट कायम राहून शहराचे वातावरण आनंदी राहावे, यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे "ईद मिलन" चा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा व या कार्यक्रमास येणाऱ्या संभाव्य खर्चासह मंजूरी व्हावी. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री. मीर हिदायत अली
अनुमोदक : श्री पांडूरंग तायडे, सौ. सिद्यीकी नईम सुलताना.

**संवाद :**

श्री डॉ. भागवत कराड : ईद मिलन बरोबर दिवाळी मिलन घेण्यात यावे.
मा. महापौर : ईद मिलन बरोबरच दिवाळी मिलन कार्यक्रम घेण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. १९७/९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे "ईद मिलन" चा कार्यक्रम आयोजित करण्यास व या कार्यक्रमासोबतच दिवाळी मिलनाचाही कार्यक्रम घेण्यास तसेच या कार्यक्रमास येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळेचे विषय*

**विषय क्र. १९८/१ :** आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहरात ७७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मलेन संपन्न होत असून या संमेलनासाठी देशभरातून किमान ३००० प्रतिनिधी येण्याची शक्यता आहे. या संमेलनासाठी एकूण अंदाजे रु. १.०० कोटी पर्यंत खर्च संम्मेलनाच्या आयोजकांना अपेक्षित आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष यांनी महानगरपालिकेस पत्र देवून साहित्य संमेलनास रक्कम रु. १५.०० लक्षची भरीव मदत मिळाली म्हणून विनंती केली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात "अंशदान" या लेखाशिर्षाअंतर्गत रु. २.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. ७७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे स्वागतध्यक्ष यांनी केलेल्या विनंतीप्रमाणे तसेच सन २००३-२००४ च्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील अंशदान लेखाशिर्षांतर्गत असलेल्या तरतुदीच्या आधिन राहून साहित्य संमेलनास अंशदान देण्याबाबत प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री आनंद तांदुळवाडीकर : या शहरात अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन संपन्न होत असून अभिमानाची बाब आहे. या कार्यक्रमासाठी १५ लक्षची मागणी केलेली जरी असेल तरी, अर्थसंकल्पात २ लक्षची तरतुद आहे. जी मागणी केलेली आहे, ती मान्य करावी.

श्री काशीनाथ कोकाटे : ७७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन होत आहे. आर्थिक मदतीची मागणी झालेली आहे. २ लक्षची तरतुद अर्थसंकल्पात आहे. १० ते ११ लक्ष देण्यात यावे.

श्री संजय शिरसाठ : या कार्यक्रमासाठी शासनाकडे संबंधितांनी मागणी केलेली होती. शासनाने ५ लक्ष मंजूर केलेले आहे. जेवढी तरतुद ठेवलेली आहे. तेवढीच रक्कम देण्यात आली.

श्री सुनिल मगरे : महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सध्या बरोबर नाही. म्हणून जेवढी २ लक्ष रुपये तरतुद आहे. तेवढीच रक्कम देण्यात यावी.

श्री पांडूरंग तायडे : १५ लक्षची मागणी केलेली आहे. ११ लक्ष देण्यात यावे.

श्री नंदकुमार घोडेले : ११ लक्ष मंजूर करण्यास विनंती केली आहे. ४७ वर्षानंतर होते, आपले भाग्य आहे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे, त्यांनी ११ लक्षची विनंती केली आहे. ११ लक्ष मंजूर करावे.

श्री प्रशांत देसरडा : या शहरात गेल्या ४७ वर्षानंतर हे अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन होत आहे. आनंदाची बाब आहे. शासनाने ५ लक्ष मदत केलेली आहे. महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात २ लक्षची तरतुद आहे. ५ लक्षची आर्थिक मदत करण्यात यावी. तसेच महानगरपालिकेच्या वतीने पाणी, स्वच्छता, विद्युत अशा काही सुविध पुरविता येथील त्या देण्यात याव्यात.

श्री भागवत कराड : आपल्या शहराला बहूमान मिळतो आहे. सर्व भाषिक या संम्मेलनात भाग घेणार आहे. १५ लक्षची मागणी केलेली आहे. अर्थसंकल्पात २ लक्षची तरतुद आहे. २ लक्षापेक्षा जास्त रक्कमेची आर्थिक मदत करावी. किमान ५ लक्ष तरी करावे.

श्री सुरजितसिंग खुंगर : १५ लक्षची मागणी केलेली आहे. मराठी साहित्य संम्मेलन होत आहे. महत्वाचा कार्यक्रम होत आहे. सर्वांच्या सन्मानाची बाब आहे. ११ लक्ष पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी.

श्री संजय शिरसाठ : तरतुद जेवढी आहे, तेवढीच रक्कम देण्यात यावी. महापौरांच्या दालनात बैठक झाली. मा. आयुक्त तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित होते. इतर काय सुविधा देवू शकतो. शासनाने ५ लक्ष मंजूर केलेले आहे, महापालिकेच्या वतीने २ लक्ष देण्यात यावे. सदस्यांनी मानधनातून २-२ हजार द्यावे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : ४७ वर्षानंतर या शहरात अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन होत आहे. १५ लक्षची मागणी केलेली आहे. अधिकारी - पदाधिकारी एकत्रित येवून चर्चा करुन किती रक्कमेपर्यंत आर्थिक मदत देवू शकतो. याबाबतीत निर्णय घेण्यात यावा. इतर ज्या सुविधा देता येतील. त्या महानगरपालिकेने कराव्यात. पुढील महिन्यात पुन्हा महाएक्स्पो भरणार आहे. त्यांना रु. ५ लक्ष भाडे आकारले ते ही कमी करण्याची मागणी करतील. त्याचाही विचार करण्यात यावा.

श्री माणिक साळवे : या शहरात अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन होत आहे. आनंदाची बाब असून, या साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष श्री. जाधव यांचा महानगरपालिकेतर्फे सन्मान करुन सत्कार करण्यात यावा.

मा. आयुक्त : या शहरात अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन संपन्न होत असून संम्मेलनाचे स्वागताध्यक्ष यांनी १५ लक्षची आर्थिक मदत करावी, म्हणून मागणी केली. त्यानुसार प्रस्ताव ठेवलेला आहे. सभागृहात याबाबत आपआपल्या सूचना स. सदस्यांनी मांडल्या. प्रशासनाची बाजू विचारात घेवून व माझ्यावर असलेल्या मर्यादाचा विचार करुन रु. ३ लाखापर्यंत जास्तीत जास्त ५ लाखापर्यंत अर्थसाहय देण्यात यावे.

श्री भागवत कराड : महाएक्सपो बद्दल मा. महापौर व पदाधिकाऱ्यांनी ठरवावे.
मा. महापौर : ५ लाख मंजूर करण्यास व सत्कार करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. १९८/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ७७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन औरंगाबाद शहरात संपन्न होत असल्याने सदर साहित्य संम्मेलनस रु. ५.०० लक्ष अंशदान मंजूर करण्यास आणि या साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष श्री जाधव यांचे महानगपालिकेतर्फे सन्मान करुन सत्कार करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९/२ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पामध्ये पृष्ठ क्र. १७८ वर रक्कम रु. ५,००,०००/- "नविन पथदिव्यांची व्यवस्था करणे" या शिर्षकाखाली बीड बायपास रोडवरील शहानगर ते कमलनयन बजाज रुग्णालय पर्यंत विद्युत पथदिवे लावण्याच्या कामाकरीता ठेवण्यात आली असून, बीड बायपास रोड हा मनपाच्या मालकीचा नसल्याने सदरील काम सुरु करण्याबाबत तांत्रिक अडचण आहे. यापूर्वी सदरील रस्त्याच्या दोन्हीकडील बाजूस यापूर्वी रस्त्यावर महानगरपालिकेतर्फे विद्युत पथदिवे लावण्यात आले असतांना सदरील काम करणे बाबत कुठल्याही प्रकारची अडचण नसावी. करीता, रहदारीचा रस्ता, आधारामुळे वारंवार होणारे अपघात, नामांकित रुग्णालय कमलनयन बजाज हॉस्पीटल येथे येणारे रुग्ण व नागरिकांच्या सोयीकरीता सदरील विद्युत पथदिवे लावणेचे काम अत्यावश्यक बाब म्हणून त्वरीत करणे बाबतचा प्रस्ताव सर्वानुमते स्विकृतीसह मंजूर करावा. ही विनंती.

सूचक : श्री नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री राधाकृष्ण गायकवाड

**ठराव क्र. १९९/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पामध्ये पृष्ठ क्र. १७८ वर रक्कम रु. ५,००,०००/- "नविन पथदिव्यांची व्यवस्था करणे" या शिर्षकाखाली बीड बायपास रोडवरील शहानगर ते कमलनयन बजाज रुग्णालय पर्यंत विद्युत पथदिवे लावण्याच्या कामाकरीता ठेवण्यात आली असून, बीड बायपास रोड हा मनपाच्या मालकीचा नसल्याने सदरील काम सुरु करण्याबाबत तांत्रिक अडचण आहे. यापूर्वी सदरील रस्त्याच्या दोन्हीकडील बाजूस यापूर्वी रस्त्यावर महानगरपालिकेतर्फेच विद्युत पथदिवे लावण्यात आले असतांना सदरील काम करणे बाबत कुठल्याही प्रकारची अडचण नसावी. करीता, रहदारीचा रस्ता, आधारामुळे वारंवार होणारे अपघात, नामांकित रुग्णालय कमलनयन बजाज हॉस्पीटल येथे येणारे रुग्ण व नागरिकांच्या सोयीकरीता सदरील विद्युत पथदिवे लावणेचे काम अत्यावश्यक बाब म्हणून त्वरीत करणे बाबतचा प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २००/३ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये पृष्ठ क्र. १११ वर रक्कम रुपये ८,००,०००/- (आठ लक्ष रुपये) नविन खडी रस्ते या शिर्षकाखाली ही विटखेडा नाथव्हॅली रोड ते सैनिकी शाळेला जोडणाऱ्या रस्ता तयार करणे तसेच नळकांडी पूल बांधण्यासाठी राखीव ठेवण्यांत आली असून, सदरील कामाऐवजी प्रभाग क्र. २८ मध्ये सदरील रक्कमेच्या एवढेच १००% विकास खर्च भरलेल्या अजिंक्य गृहनिर्माण संस्था, राघवेंद्र गृहनिर्माण संस्था श्री. दत्तनगर (वाल्मी मनपा जकात नाक्याप्रमाणे) तसेच

श्रीनाथपुरम भाग-२ इ. भागामध्ये खडी रस्ते तसेच डांबरीकरण करण्याचे काम त्वरीत अंदाजपत्रक बनवून कार्यवाही होणे बाबतचा प्रस्ताव सर्वानुमते स्विकृतीसह मंजूर करावा. ही विनंती.

सूचक : श्री नंदकुमार घोडेले
अनुमोदक: श्री राधाकृष्ण गायकवाड

**ठराव क्र. २००/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये पृष्ठ क्र. १११ वर रक्कम रुपये ८,००,०००/- (आठ लक्ष रुपये) नविन खडी रस्ते या शिर्षकाखाली ही विटखेडा नाथव्हॅली रोड ते सैनिकी शाळेला जोडणाऱ्या रस्ता तयार करणे तसेच नळकांडी पूल बांधण्यासाठी राखीव ठेवण्यांत आली असून, सदरील कामाऐवजी प्रभाग क्र. २८ मध्ये सदरील रक्कमेच्या एवढेच १००% विकास खर्च भरलेल्या अजिंक्य गृहनिर्माण संस्था, राघवेंद्र गृहनिर्माण संस्था श्री. दत्तनगर (वाल्मी मनपा जकात नाक्याप्रमाणे) तसेच श्रीनाथपुरम भाग-२ इ. भागामध्ये खडी रस्ते तसेच डांबरीकरण करण्याचे काम त्वरीत अंदाजपत्रक बनवून कार्यवाही होणे बाबतचा प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०१/४ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर अन्न निरिक्षक पद रिक्त असल्याने शहरात भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्रीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. यापूर्वी महापालिका वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीने भेसळयुक्त दुध प्रकरणे उघडकीस आणले होते. त्यावेळी देखिल या समितीच्या सभेत सदरील पद तात्काळ भरण्याबाबत मा. सभापती आरोग्य समिती यांनी आदेशित केले होते.

यापूर्वी महापालिका प्रशासनामार्फत मनपातील पात्र उमेदवारांकडून सदरील पद भरणे करीता, अर्ज मागविण्यात आलेले आहेत. त्यावर काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. नागरिकांचे आरोग्याचे दृष्टीकोनातून अन्न निरिक्षक पद मनपातील पात्र कर्मचाऱ्यांमधून भरल्यास मनपावर आर्थिक बोजा पडणार नाही. करीता, अन्न निरिक्षक पद मनपातील पात्र कर्मचाऱ्यांमधून भरणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री भाऊसाहेब ताठे, श्री राधाकृष्ण गायकवाड
अनुमोदक : श्री प्रकाश निकाळजे, श्री संजय शिरसाठ,
श्री पांडूरंग तायडे.

**ठराव क्र. २०१/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर अन्न निरिक्षक पद रिक्त असल्याने यापूर्वी महापालिका प्रशासनामार्फत मनपातील पात्र उमेदवारांकडून सदरील पद भरण्याकरीता अर्ज मागविण्यात आलेले आहेत. नागरिकांचे आरोग्याचे दृष्टीकोनातून अन्न निरिक्षक पद मनपातील पात्र कर्मचाऱ्यांमधून भरल्यास मनपावर आर्थिक बोजा पडणार नाही. करीता, अन्न निरिक्षक पद मनपातील पात्र कर्मचाऱ्यांमधून भरण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०२/५ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डातील एन-२ सिडको येथील मॉंसाहेब चौक ते विठ्ठलनगर चौक येथे जाणाऱ्या रस्त्यास "श्री भगवान शांतीनाथ मार्ग" नांव देण्यात यावे व येत्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. ही विनंती

सुचक : श्री भाऊसाहेब बाबुराव वाघ
अनुमोदक : १. श्री राजु शिंदे, १. भरत श्रीपती लकडे.

**ठराव क्र. २०२/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्डातील एन-२ सिडको येथील मॉंसाहेब चौक ते विठ्ठलनगर चौक येथे जाणाऱ्या रस्त्यास "श्री भगवान शांतीनाथ मार्ग" नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३/६ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ब्रिजवाडी येथे स्वच्छालयाचे काम झालेले असून त्या कामात सेविंग (बचत) झाली असून उरलेल्या पैशात अधुरे सोडलेले काम करण्यात यावे.

१. स्वच्छालयास पाणी पुरवठा करण्याकरीता खोदलेल्या बोरवर मोटारपंप बसवून पाईपलाईन करणे
२. स्वच्छलायाच्या बाजूस दोन बाथरुम बांधणे.
३. बसैय्ये बंधु यांच्या निधीतून बांधलेल्या सभागृहात एक छोटे स्वच्छलाय व एक बाथरुम बांधण्यात आले.
४. बांधलेल्या स्वच्छलायासमोर क्रॉंकीट करणे.

सदर कामास सर्वसाधारण सभेसमोर ठेवून कामास मंजूर देण्यात यावी. ही विनंती.

सूचक : श्री भगवान रगडे
अनुमोदक : सौ. कुसूमताई खरात, सौ शंकुतलाबाई इंगळे.

**ठराव क्र. २०३/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ब्रिजवाडी येथील स्वच्छालयाच्या झालेल्या कामाच्या बचती मधून खालील कामे पूर्ण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१. स्वच्छालयास पाणी पुरवठा करण्याकरीता खोदलेल्या बोरवर मोटारपंप बसवून पाईपलाईन करणे
२. स्वच्छलायाच्या बाजूस दोन बाथरुम बांधणे.
३. बसैय्ये बंधु यांच्या निधीतून बांधलेल्या सभागृहात एक छोटे स्वच्छलाय व एक बाथरुम बांधण्यात आले.
४. बांधलेल्या स्वच्छलायासमोर क्रॉंकीट करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## चर्चा

डॉ. आशा बिनवडे : या सभेसाठी प्रश्न क्र. १७४ विचारलेला होता, अर्धवट उत्तर दिले. माझ्या वार्डामध्ये एक व्यायाम शाळा ५ वर्षापूर्वी आमदार जयवंत ठाकरे यांचे निधीतून बांधण्यात आलेली होती. गेल्या ५ वर्षापासून व्यायाम शाळा बंदच होती. महापालिकेस कोणतेही उत्पन्न मिळत नव्हते. ही शाळा शासकीय जमिनीवर बांधलेली असून दोन वर्षापूर्वी ही व्यायाम शाळा हरीओम नावाच्या संस्थेने भाडे तत्वावर मागणीसाठी अर्ज दिला होता. स्थायी समितीमध्ये याबाबत चर्चा होवून ही व्यायाम शाळा भाडे तत्वावर चालविण्यासाठी दिलेली होती. ४०००/- रु. प्रतिमहिना असे वर्षाचे ४८,०००/- रु. भाडे ठरवून डिपॉझिट करुन घेतले. करारनामा केला. जागा ताब्यात दिली, त्यांच्या दुसऱ्या दिवशी मा. आमदार जयवंत ठाकरे यांनी त्या व्यायाम शाळेत कुलूप लावले. संबंधित भाडे तत्वार घेणाऱ्या पार्टीला तेथून दमदाटी करुन हकलावून देण्यात आले व त्यानंतर संबंधित हरीओम संस्थेचे अध्यक्ष यांनी

ही जागा माझ्या ताब्यात द्यावी. म्हणून वेळोवेळी अर्ज केलेला आहे. त्या व्यक्तीने महापालिकेकडे ४८,०००/- रु. भरणा केलेले आहे. असे त्यांच्या विनंती अर्जात नमुद आहे. परंतू महापालिकेमार्फत कुठलाही कार्यवाही झ ालेली नाही. मधल्या काळात जयवंत ठाकरे यांनी त्या जागेला तार फिन्सींग करुन घेतले. संबंधित व्यक्तीचे माझे पैसे परत करावे म्हणून मागणी केली. ही लज्जास्पद बाब आहे. एखादया लोक प्रतिनिधींनी जनतेची म्हणजे शासकीय जमीन जनतेच्या पैशातून म्हणजे शासकीय फंडातून बांधून पून्हा आक्षेप असा घेतला की ही व्यायाम शाळा फक्त त्यांचेच संस्थेला चालविण्यास द्यावी. कारण त्यांच्या संस्थेच्याच जागेमध्ये ती व्यायाम शाळा बांधलेली आहे. जनतेच्या पैशाची स्वत:ची मालमत्ता असल्याचा व त्याचा वापर करण्याचा शासनाने किंवा महापालिका प्रशासनाने परवानगी दिली आहे का आणि हे सर्व प्रशासनास मान्य असेल तर मा. खा. श्री. चंद्रकांतजी खैरे तसेच मा. आमदार बसैय्ये बंधु यांच्या निधीतून किती तरी व्यायाम शाळा बांधलेल्या आहेत. या त्यांच्या ताब्यात देणार आहात का? प्रश्नाचे उत्तर असे दिले की, जी व्यायाम शाळा बांधण्यात आली ती शासकीय जमीन असून, दि. साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी साक्री ता. साक्रां. जि. धुळे यांना शासनाने भाडे तत्वावर दिलेले आहे. सदरील व्यायाम शाळेचे बांधकाम महापालिका देखरेखीखाली पूर्ण झाले. याचा अर्थ ती व्यायाम शाळा महापालिकेच्या ताब्यात आलेली होती. त्यामुळे अध्यक्ष हरी ओम संस्थेला भाडे तत्वावर दिली त्यानंतर साक्री (एज्युकेशन सोसायटी साक्रा ता. साक्री यांनी ही व्यायाम शाळा दुसऱ्यांना भाडयाने दिल्याबद्दल आक्षेप घेतला. त्यामुळे महापालिकेस कोणतेही उत्पन्न प्राप्त झालेले नाही. अशा प्रकारचे उत्तर दिले. या कार्यालयाने कोणताही खर्च केला नाही. परंतु चुकीचे स्टेटमेंट या प्रश्नाच्या उत्तरात दिसून येते. हरीओम संस्थेला जागा देण्याआधी सर्व डागडूजीची कामे तसेच लाईट फिटींग, रंगरंगोटी सर्व काम केल्यानंतर श्री. ठाकरे यांनी त्या व्यायाम शाळेला कुलूप लावणे ही अगदी निषेधार्थ बाब आहे. ज्यांना जागा भाडयाने दिली त्यांना कोणतेही संरक्षण न देता, संबंधित लोकप्रतिनिधींना संरक्षण देण्याचे काम मालमत्ता विभागाकडून झालेले आहे. म्हणून यात जे दोषी असेल, त्यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. मा. आयुक्तांनी खुलासा द्यावा.

श्री भागवत कराड : साक्री एज्युकेशन सोसायटीला ती जागा शासनाने दिली. त्या संस्थेचे पदाधिकारी मा. आमदार श्री जयवंत ठाकरे यांनी त्यांच्या स्वेच्छा निधीतून महापालिकेच्या माध्यमातून बांधले ती जागा महापालिकेने ताब्यात घेतली. मालमत्ता अधिकारी यांचे ताब्यात आहे. त्या जागेवर महापालिकेचा अधिकार येतो. म्हणून एखाद्या संस्थेला ती व्यायाम शाळा स्थायी समितीकडे प्रस्ताव ठेवून भाडयाने दिले आहे. इतर अनेक कामे आमदार, खासदार निधीतून झाले व्यायाम शाळा, समाजमंदिर ई चे बांधकाम झाले. त्यांनी मागणी केल्यास त्यांना देणार का? गैरमार्गाने व्यायामशाळा ताब्यात घेतली संबंधित मा. आमदार यांचेवर पोलीसात गुन्हा दाखल करावा. आमदार निधी हा आमदाराचा नसतो. जनतेचा पैसा असतो. त्यावर त्यांचा हक्क नसतो. ताबडतोब कार्यवाहीचे आदेश द्यावेत.

उपआयुक्त (म.) : आमदार निधीतून व्यायामशाळा बांधण्यात आलेली होती. मालमत्ता विभागाने ताब्यात घेतलेली आहे. रितसर भाडे तत्वावर दिलेली होती. लगेच वापर सुरु केला नाही, इतर व्यक्तीने तेथे कुलूप लावल्यानंतर ज्यांना भाडे तत्वावर दिली त्यांना अशा सूचना दिल्या की, महापालिकेचे पोलिस कुमक तैनात करण्यात येतील. आपण आपली जागा ताब्यात घ्यावी व चालू ठेवावी. परंतू भिंतीच्या कारणाने किंवा इतर कारणाने संबंधिताने असा अर्ज दिला की, मी डिपॉझीट भरलेली रक्कम मला परत मिळावी. व्यायाम शाळा नको आहे. असा अर्ज दिला. त्यानंतर संबंधितास डिपॉझिट पोटी भरलेली ४८,०००/- हजार परत करण्यास आले. यापूढे व्यायाम शाळा भाडे तत्वार द्यावयाचे झाल्यास जाहीर प्रगटन देवूनच कार्यवाही होणार आहे. आमदान निधीतून ते बांधकाम झाले. म्हणूंन त्यांनाच ती व्यायाम शाळा द्यावी. असा उद्देश नाही. जाहीर प्रगटन काढून जो कुणी जास्तीत जास्त भाडे देईल. त्यांना देण्यात येईल.

श्री भागवत कराड : सध्या ही जागा महापालिकेच्या ताब्यात आहेत का? माजी आमदार यांच्या ताब्यात आहे, एवढाच खुलासा द्यावा.

उपआयुक्त (म.) : व्यायाम शाळा सध्या महापालिकेच्या ताब्यात आहे.

डॉ. आशा बिनवडे : आताच खुलासा केला ज्यांना भाडे तत्वावर दिली. त्यांनी लगेच वापर सुरु केलेला नाही. संबंधित व्यक्तीला जागा ताब्यात दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी माजी आमदार यांनी कुलूप लावले. आज त्यांचेच कुलूप आहे. २४ तासाच्या आत वापर सुरु केला नाही. तर रात्रीच्या वेळी वापर सुरु करावयास पाहिजे होता का? कुलूप दुसऱ्यांनी लावल्यानंतर अनाधिकृत रित्या झाले. त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे. ४ महिन्यात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आज श्री जयवंत ठाकरे याचेच कुलूप आहे.

श्री प्रशांत देसरडा : हा विषय गंभीर आहे. यात दर महिना ४०००/- रु. तसेच ४८,०००/- डिपॉझिट असे नुकसान महापालिकेचे झालेले आहे. सन १९९६ पासून आतापर्यंत ४०००/- दरमहा भाडे या प्रमाणे त्या संस्थेकडून अगोदर वसुल करावे. ती रक्कम जर भरण्यास तयार नसेल तर त्या संस्थेची मालमत्ता जप्त करावी तसा अधिकार आहे. भाडे वसुल करावे. डिपॉझिट ४८,०००/- रु. भरणा केल्यानंरत प्रशासनाने या संदर्भात बघायाची भूमिका घेतली नियमाने कार्यवाही केली असता तर हरी ओम संस्थेला ही व्यायाम शाळा दिल्या गेली असती. या संदर्भात प्रशासन कमी पडलेले आहे. अशी शंका आहे. नगरसेवक स्वेच्छा निधी संदर्भात नियमावली असून त्याप्रमाणे आमदार निधीसाठी सुध्दा नियमावली आहे. व्यायाम शाळा बांधली तेव्हा संबंधित आमदार त्या संस्थेचे अध्यक्ष होते. आता ते सचिव आहे. योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी. नसता शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. एखादया आमदाराला स्वत:च्या संस्थेकरीता निधी देता येतो का? त्यांचेवर पोलिस केस करुन ४ वर्षाचे भाडे सुध्दा वसुल करावे.

श्री राधाकृष्ण गायकवाड : स्वेच्छा निवृत्तीच्या संदर्भात चौकशी करण्या संबंधिचा प्रश्न दिला होता. प्रश्नाचे उत्तर उपआयुक्त (प्र.) यांनी दिले. ते समाधानकारक वाटत नाही. उत्तरात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील कलम ६६ (अ) अन्वये त्यांनी फसवणूक केलेली आहे. ६६ (अ) मध्ये निवृत्त सेवा निवृत्ती नंतर अर्हताकारी सेवा वाढू असा मजकूर आहेत. वास्तविक या

कायदयातील ६६ असे म्हणण्या ऐवजी ६६ (अ) असे दिले. तसेच या कायदयाचा आधार कलम ११० नुसार सेवा निवृत्तीचा फायदा घेता येतो. असे म्हटले आहे. मला निर्दशनास आणून द्यायचे की, कलम ११० नुसार निवृत्ती वेतनाची रक्कम अबादीत आहे. कलम ६६ व ११० वाचन करावे.

श्री भगवान घडामोडे : स. स. बिनवडे यांनी तसेच स.स. श्री गायकवाड यांनी प्रश्न उपस्थित केला. ते दोन्ही प्रश्न गंभीर असून खुलासा आवश्यक आहे. व्यायामशाळा संबंधित आमदाराने स्वतःच्या संस्थेसाठी निधी वापरुन ताब्यात घतला त्यांचेवर काय कार्यवाही केली एक प्रकारचा त्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे. दुसऱ्या प्रश्नासंबंधी लेखा व उप आयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

मा. महापौर : स.स. श्री गायकवाड यांनी विचारलेल्या प्रश्नाच खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : सभागृह नेता यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत खुलासा की, श्रीमती चित्रा गंभीर कनिष्ट लिपिक या माझ्या विभागात नाही. चित्रा गंभीर जेव्हा रजेवर गेल्या त्यावेळेस दि. २०-११-९६ ला प्रशासनास पत्र दिलेले होत की, सदर कर्मचारी दिर्घ मुदतीच्या रजेवर जात आहे. त्यांच्या जागी बदली कर्मचारी देण्यात यावे. दि. २०-११-९६ ला त्यांनी लेखा विभागाला कळविलेले नव्हते. प्रशासनास पत्र दिले आहे. दि. १०-११-९६ ला शारदा आनंदराव नावाच्या दुसऱ्या लिपीक माझ्या विभागात देण्यात आलेल्या होत्या. त्या मुख्यलेखाधिकारी या विभागात कार्यरतच नव्हत्या त्यामुळे रजा वगैरे मंजूर करण्याचा प्रश्नच माझ्याकडे उध्दवत नाही. पेन्शन प्रकरण अद्याप पर्यंत पेन्शन विभागाकडेच आलेले नाही. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ हे सेवा निवृत्तीसाठी नियम वापरले जातात. तेच आपण वापरतो. पाचवा वेतन आयोग हा फक्त वेतन श्रेणीसाठी आहे. पाचवा वेतन आयोग आणि सेवा निवृत्तीचा कोणताही संबंध नाही. कलम ६६ नुसार जो १९८२ नियम नुसार २० वर्षाची सेवा झाल्यास स्वेच्छा निवृत्ती घेण्याची तरतुद आहे. तसेच ११० कलमानुसार १० वर्षाची अर्हताकारी सेवा झाल्यास सेवा निवृत्ती फायदा देता येतो आणि जी गैरहजेरीचा कालावधी असतो. कलम ३५ सेवा निवृत्ती अधिनियम १९८२ च्या नुसार जी काही सर्वसाधारण विना पगारी रजा असते, ती रजा सुध्दा अर्हताकारी सेवा धरावी म्हणून, शासनाचे निर्देश आहे ही प्रशासकीय बाब असल्याने पेन्शन मंजूर करीत असतांना प्रशासकीय विभाग, मुख्यलेखा परिक्षक, लेखा विभाग आणि मा. आयुक्त या चार विभागातून त्या बाबतची छानणी होवून नंतरच पेन्शन मंजूर होते. श्रीमती चित्रा गंभीर यांचे प्रकरण अद्याप लेखा विभागाकडे आलेले नाही. त्या जानेवारी १९९७ पासून कार्यरतच नाही. हे योग्य नाही.

श्री राधाकृष्ण गायकवाड : संबंधित अधिकारी यांनी असा खुलासा केला की, संबंधिताने धरणाधिकार रजा मागविलेली नसल्यामुळे मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात आलेली नाही. संबंधिताने २० वर्षाची अर्हताकारी सेवा झालेली असल्यामुळे स्वेच्छा निवृत्ती मंजूर करण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे. लेखा विभागात कार्यरत नसल्यातरी इतरत्र कोणत्या विभागात होत्या, सेवेत होत्या हा मुळ प्रश्न आहे. विषय गंभीर असून चित्रा गंभीर या दि. २४-१२-९६ पासून विना पगारी रजेवर आहे. रजेच्या काळात संबंधित कर्मचारी इतरत्र सेवेत होते किंवा कसे. याबाबत प्रशासनाकडे माहिती उपलब्ध नाही. त्या रजेवर गेल्या की नाही. ते या उत्तरावरुन स्पष्ट होत नाही. सभागृहाच्या

माहितीस्तव बोलू इच्छितो की, जनतेने आपणा सर्वांना त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी येथे पाठविले आहे. पदाधिकारी / अधिकारी यांचेत कुठेच समन्वय राहिला नाही. कायद्यात बसून जे काही करता येते, त्याबाबतचे हे सध्याचे उदाहरण आहे. श्रीमती चित्रा गंभीर हया दि. २४-१२-९६ पासून विना पगारी रजेवर आहे. त्यांना अशी रजा घेता येते का? जर त्यांची २४-१२-९६ पासूनची ७ वर्षाची रजा मंजूर होत असेल व त्यांना स्वेच्छा निवृत्ती लागू होत असेल तर माझे तीन प्रश्न प्रशासनास आहे. १. दिपक रामराव पवार हा दलित कर्मचारी १९९६ ला एक महिना काही कारणास्तव गैरहजर होते. त्यावेळाचे आयुक्त मा. भोगे साहेब यांनी त्यांना निलंबीत केले. त्यानंतर त्यांनी बऱ्याच वेहा पून्हा नोकरीवर घ्यावे. त्यांचेवर अन्याय झाला म्हणून विनंती अर्ज दिले शेवटी त्यांचे निधन झाले परंतु त्यांना कामावर घेण्यात आलेली नव्हते. त्यांचे पेन्शन मंजूर केले नाही. चित्रा गंभीर यांना स्वेच्छा निवृत्ती लागू होत असेल तर दिपक पवार यांचे नातेवाईकांना नोकरी द्यावी. अशी माझी मागणी आहे. तसेच श्री. उदावंत नाका कारकून हे देखील विना परवानगी रजेवर होते. त्यांना रुजू करुन घेतले नाही. त्याचप्रमाणे कैलास पाणी मुंगळीकर यांनाही कामावर रुजू करुन घेतले नाही. ते १९७२ साली सेवेत कायम झालेले होते. १९९० साली त्यांचा मृत्यू झाला, त्यानंतर त्यांच्या पत्नीने पेन्शन लागू करण्या संदर्भात वारंवार विनंती अर्ज केला. अद्याप न्याय मिळाला नाही. हे प्रकरण अतिशय गंभीर असून मा. आयुक्त यांनी जातीने चौकशी करावी. दि. २४-१२-९६ पासून सदर कर्मचारी कामावर आले नाही. त्यांना कुणी विरोध केला का? आज रोजी २० वर्ष पूर्ण होत असेल व त्यांची पेन्शन मंजूर होत असेल तर गेल्या ७ वर्षापासून सदर कर्मचारी कोठे होत्या कुणाच्या परवानगीने गैरहजर होत्या, तया संबंधित वेळोवेळी मा. आयुक्त समोर संचिका सादर झालेली होती का? तसेच त्यांची रजा मंजूर करण्याबाबत सर्वसाधारण सभेची मान्यता होती का? या सर्व बाबींचा मा. आयुक्तांनी चौकशी करुन इतर कर्मचारी यांना सुध्दा न्याय मिळेल अशी कार्यवाही करावी. एक नाही असे अनेक प्रकरण प्रशासनासमोर मी सादर करणार आहे.

मुख्यलेखाधिकारी : धारणाधिकारी म्हणजे एका पदावर सेवा करीत असेल व इतरत्र दुसऱ्या ठिकाणी जाण्याची इच्छा असेल त्यावेळी धारणाधिकार घेण्यासाठी मंजूरी घ्यावी लागते. असाधारण रजा वगैरे मंजूर करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांचे आहे. शासनाने दि. ०२ जून २००३ ला एक परिपत्रक काढले. महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियमानुसार नियुक्ती प्राधिकार महानगरपालिकेत नियुक्ती प्राधिकार मा. आयुक्त आहे व नियुक्ती प्राधिकार मा. आयुक्त आहे व नियुक्ती प्राधिकार यांनी जर इतर अधिकाऱ्यांना अधिकार दिले असेल तर ते अधिकार वापरु शकतात. माझ्या माहितीप्रमाणे संपूर्ण रजा मंजूर करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी उपआयुक्त (प्र.) यांना दिलेले आहे. पेन्शनसाठी चित्रा गंभीर यांचे प्रकरण अद्याप समोर आलेले नाही. उपआयुक्त (प्र.) हे प्रकरणाची तपासणी करतील त्यांनतर मंजूरीसाठी येईल.

श्री राधाकृष्ण गायकवाड : ७ वर्षात प्रशासनाकडे कोणती रजा दिलेली नाही असे उपआयुक्त (प्र.) यांचे उत्तरात स्पष्ट दिले आहे. नियम १९८२ जे दाखविण्यात आले. तसेच ६६ व ६६ (अ) मध्ये असा कोणताही उल्लेख होत

नाही. जर सेवा निवृत्ती घ्यावयाची असेल तर २० वर्ष सेवा झालेलीच पाहिजेच. चित्रा गंभीर यांनी १३ वर्षाची सेवा केलेली आहे. ७ वर्षापासून कोठे व कोणत्या विभागात त्यांची नियुक्ती होती याचा शोध घेण महत्वाचे आहे. २० वर्ष झाल्यानंतर सदर महिलेने अर्ज केलेला आहे. असे मला उपआयुक्त (प्र.) यांनी उत्तरात दिले. जर १३ वर्षात सेवा निवृत्ती वेतन लागू होणार असेल तर सर्वांनाच द्यावे.

मुख्यलेखाधिकारी : सेव निवृत्तीसाठी २० वर्षात सेवा आवश्यक आहे. परंतु १० वर्ष सेवा केली असेल व काही कर्मचारी रुग्ण असतील तर सेवा निवृत्ती लागू करता येते. ही प्रशासकीय बाब असल्यास प्रकरण आयुक्तापर्यंत जाईल.

उपआयुक्त : सविस्तर उत्तर स. सदस्य यांना दिलेले आहे. त्यावर त्याचा उपप्रश्न म्हणून लेखी पत्र माझ्याकडे प्राप्त नाही तरी सुध्दा मुख्यलेखा परिक्षक यांचे खुलाशावरुन यामध्ये चित्रा गंभीर यांनी सेवा निवृत्तीसाठी काल परवा अर्ज प्राप्त झाल. त्यावर कोणताही निर्णय घेतेलेला नाही. त्यांनी जी ६ वर्षाची रजा घेतलेली आहे. ती कोणत्या नियमाने मंजूर करायची, कार्यवाही करण्याचे अधिकार रिव्हयू कमीटीला दिलेले आहे. त्याचा निर्णय आल्यानंतरच त्यांची सेवा व सेवा निवृत्ती बाबत निर्णय घेता येईल.

श्री राधाकृष्ण गायकवाड : तीन दलित अधिकारी सुध्दा न सांगता गैरहजर होते, त्यांचे निलंबन केले, त्यांना कामावर घेण्यात आले नाही. चित्रा गंभीर या सुध्दा ७ वर्ष गैरहजर होत्या. जो कर्मचारी १ महिना गैरहजर होते. आयुक्त श्री भोगे यांनी त्यांना निलंबीत केले गेल्या ७ वर्षापासून चित्रा गंभीर महापालिका सेवेत गैरहजर आहेत, त्यांना का निलंबित करण्यात आले नाही. त्यांनी कोणतीही रजा दिली नाही तरी, कार्यवाही झाली नाही. तीन दलित कर्मचाऱ्यांवर ताबडतोब कार्यवाही केली.

उपआयुक्त (प्र.) : चित्रा गंभीर यांचे सेवा निवृत्तीचा अद्याप प्रशासनाने निर्णय घेतलेला नाही. याची दक्षता घेतली जाईल.

आयुक्त : जो चर्चेला विषय येतो, तो अस्थापना/१ चा सेवा विषयक विषय आहे. नियुक्ती अधिकारी म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेत आयुक्त आहे आणि तो सक्षम आहे. चित्रा गंभीर यांचे रजेच्या संदर्भात अद्याप प्रकरण माझ यासमोर आलेले नाही. जो प्रश्न स. सदस्यांनी विचारला त्याचे उत्तर उप आयुक्त (प्र.) यांनी दिलेले आहे. त्यानंतर आयुक्त म्हणून जे प्रश्न माझ्याकडे आले. त्याबद्दल पुन्हा माहिती विचारणा केलेली आहे. कोणत्याही कर्मचारी यांनी रजेची मागणी केल्यानंतर त्याचे स्वरुप बघून ती किती कालावधी साठी आहे. याचा निर्णय वाजवी वेळेपर्यंत घेणे प्रशासनाचे काम आहे. १-२ महिने उशिर झाला. त्यावेळेस नियुक्ती अधिकारी माफ करु शकेल. हृदयविकार, कॅन्सर आणि दुर्देवाने दीर्घ कालावधीचा आजार असेल त्यासाठी विशिष्ट नियमात तरतुदी आहेत. २-३ वर्ष जे कर्मचारी अशा प्रकारे सेवा सोडून निघून जातात. तेव्हा राज्य शासन त्यास फरार म्हणून घोषीत करतो. अशी प्रकरणे राज्य शासनाच्या इतर खात्यामध्ये जिल्हा परिषदेमध्ये आढळून येते. पहिल्यांदाच या मनपामध्ये तसे प्रकरण समोर आले. अशा घटना राज्य शासनाच्या लक्षात आल्यानंतर जे विनापरवानगी रजेवर जातात. त्याबाबत शासनाचे विशिष्ट आदेश आहे. तो मला प्रशासनाचा प्रमुख म्हणून तपासणी करावी लागते. अशा विनापरवानगी रजा मंजूर करुन

त्यास रेग्युलर (regular) करुन घेणे हा सुध्दा निर्णय सहजासहजी घेता येणार नाही. अनाधिकृत गैरहजेरी विचारात घेतली तर सेवाकाळ होत नाही. सदर कर्मचारी १९९६ पासून कामावर नाही व ती कोणत्या विभागात होते याची माहिती मागविलेली आहे. यास जे पर्यवेक्षक अधिकारी असतील जे जबाबदार आहे. त्यांना जबाबदार धरले जाईल. ७ वर्षे कर्मचारी कामावर नाही. अमुक मला माहित नाही असेल विधान करणे चौकशी मध्ये टिकणार नाही. जर ती रजा ज्यांना अधिकार दिले असतील, त्यांच्या अधिकारात मंजूर केली असेल तर, ती तपासून पाहता येईल. जो काही निर्णय घ्यायचा तो माझ्या अधिकारात होईल व गेल्या ७ वर्षाच्या काळात यामध्ये ज्या ज्या कर्मचाऱ्यांच्या कालावधीत ज्या ज्या तृटया सादर करण्याच्या राहून गेल्या असतील त्यांना जबाबदार धरले जाईल तसेच स. स. डॉ. बिनवडे यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा असा की, एखाद्या संस्थेला ताबा दिल्यानंतर त्या मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांचीच असते. या संदर्भात मा. महापौरांच्या परवानगीने उपआयुक्त (म.) यांनी तात्काळ प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करावी. यात जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करता येईल. तसा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा. अशी आयुक्त म्हणून सूचना आहे.

डॉ. आशा बिनवडे : संबंधित आमदार यांनी असा आक्षेप घेतेलेला आहे की, जे बांधकाम झाले ते माझ्या संस्थेच्या जागेत झाले व माझ्या निधीतून झाले व पुढे ही व्यायाम शाळा माझ्याच संस्थेला देण्यात यावी. असा करारनामा केलेला आहे. म्हणून आपला मालमत्ता विभाग हा करारनाम्याचा शोध घेत आहे. गेल्या ४ महिन्यात संबंधित व्यक्तिला कोणतेही मनपातर्फे प्रोटेक्श्न दिले नाही. त्या आमदारांनी लावलेले कुलूप काढलेली नाही. एखाद्या आमदारात त्यांचे स्वत:च्या संस्थेसाठी स्वत:चा निधी वापरता येता का? असा करारनामा करता येतो का? हे सुध्दा पडताळून पाहण्याची गरज आहे.

मालमत्ता अधिकारी : सदर जागा शासनाने संस्थेला भाडयाने दिलेली आहे. त्या जागेवर व्यायाम शाळा मनपाने बांधलेली असून व्यायाम शाळा संबंधित आमदार यांना दिलेली नाही. महानगरपालिकेचे कुलूप लावलेले आहे.

श्री प्रशांत देसरडा : व्यायाम शाळा बांधकाम केले. तेव्हा तेवढीच जागा मनपाला हस्तांतर झाली.

श्री भगवान घडामोडे : असेल. आमदार निधीतून बांधकाम केले असेल काही निधी मनपाच्या वापरला गेला असेल. शासनाची जागा घेतली मनपाचे नांव मध्ये टाकून निधी वापरुन व्यायाम शाळा ताब्यात घेणे. एक प्रकारचा भ्रष्टाचार केलेला आहे हे सिध्द होते. त्या आमदारावर पोलीस गुन्हा दाखल करावा. विधन सभेत पाठवावा.

डॉ. आशा बिनवडे : संबंधित संस्थेच्या आक्षेप काय होता म्हणून भाडे मिळाले नाही.

मालमत्ता अधिकारी : सदर संस्थेच्या जागेवर व्यायाम शाळेचे बांधकाम झाले. म्हणून ती व्यायाम शाळा संस्थेलाच द्यावी. असे म्हणणे संस्थेचे आहे.

श्री डॉ. भागवत कराड : सदर संस्था व त्या संस्था चालक यांचे दर भ्रष्टाचांराचा गुन्हा दाखल करावा असे आदेशित करावे.

मा. आयुक्त : जागा संस्थेची होती त्या जागेसह ताबा घेतला असेल तर कार्यवाही करण्यास सोपे होईल. परंतु जागा भाडयाने संस्थेची घेतली व त्यावरील

बांधकाम मनपाने केले असेल तर शहर अभियंता याबाबत तपासणी करतील तसेच आता ताबा अनाधिकृत आहेत का तपासून घेवू.

श्री भगवान रगडे : माझ्या वार्डाचाही गंभीर विषय आहे. शहरातील कचरा नारेगांव येथील डेपोमध्ये टाकण्याचे कामकाज कशा पध्द्तीने हलविल्या जाईल. ते पहावे नागरिक भविष्यात आजारी पडणार नाही. याबद्दल सर्वांनी सहकार्य केले त्याबद्दल मी सभागृहाचे अभिनंदन करतो. सत्यम फर्टिलायजर लि. या कारखान्यास सील लावण्यात आले, सील लागल्यानंतर पुन्हा एक प्रकरण उघडकीस आले की, महानगरपालिकेने त्या कारखान्यास ती जागा लिजवर देण्यात आलेली होती. त्या कारखानदाराने ती जमीन तारण ठेऊन बँकेकडून लाखो रुपयांची उचल केली. त्या बँकेचे पत्र महापालिकेकडे आले ती जागा बँकेकडे तारण ठेवली. कर्ज घेतले म्हणून महापालिकेने लिजवर दिलेली जमीन संबंधित व्यक्ती कोणत्या आधारे तारण ठेवू शकतो. यावरही चर्चा व्हावी व प्रशासनाने खुलासा द्यावा. फर्टीलायजर कारखान्यास सील लावण्यात आले असता शहरातील कचरा जवळपास दररोज ३५० टन कचरा माझ्या वार्डात येऊन पडतो. त्या कचऱ्यावर कोणतीच प्रक्रिया होत नाही. त्यामुळे दुर्गंधी सुटलेली आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. या बाबत प्रशासन काय उपाय योजना करणार आहेत. तसेच सत्यम फर्टीलायजर कंपनीने मनपाची ३० एकर जागा बँकेकडे तारण ठेवली, लिजरवर दिलेली जागा तारण ठेवता येते का? याचाही खुलासा करावा.

श्री सुरजितसिंग खुंगर : या कारखान्या संदर्भात चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली होती. त्या समितीने सर्व रिपोर्ट दिलेली आहे. संबंधित कारखान्यास ५ ते ६ एकर जागा देण्याचा स्थायी समितीकडे प्रस्ताव होता. त्यास ५ ते ६ एकर जागेस मंजूरी दिली. करारनामा ६ हेक्टर जागेचा केला, आम्ही प्रश्न उपस्थित केला. लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. ६ एकरचे ६ हेक्टर यास कोण जबाबदार आहे? त्याबाबत काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा द्यावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : मनपाची जागा तारण ठेवली मनपाची एन. ओ. सी. घेतली का? घेतली असेल तर दिलेली एन. ओ. सी. बरोबर आहे का? सत्यम फर्टीलायजर या कारखान्यास सील केले चांगली बाब आहे. परंतु दररोजचा पडणार कचरा यांची विल्हेवाट लावणसाठी प्रशासनाने तात्काळ टेंडर काढावे. ६ एकर ऐवजी ६ हेक्टर जागा कशी दिली. त्याचाही खुलासा करावा.

श्री भगवान रगडे : चौकशी समितीचा अहवाल येऊन दोन वर्ष झाले त्या अहवालात स्पष्ट असे दिले की, महानगरपालिकेचा त्या कंपनीने फसवणूक केलेली आहे. कार्यवाही होत नाही. म्हणून मी आंदोलन केले. उपोषण केले व व्यक्तीवर फसवणूक केली. म्हणून फसवणूकीचा गुन्हा दाखल करावा. अशी मागणी केली. कारण जनतेचा पैशाचा दुरपयोग होतो हे लक्षात घेतले पाहिजे. आतापर्यंत पोलीस गुन्हा दाखल झालेला नाही.

श्री जयवंत ओक : राज्य शासनाने १९२४ पदांना मंजूरी दिली किती कामगार काम करतात. न्यायालयाच्या यादीनुसार सध्या मनपात किती कामगार काम करतात. हा पहिला प्रश्न यादीमध्ये व त्या व्यतिरिक्त किती कामगार आहेत व उर्वरीत जे कामगार राहतील. त्यांचे बाबतीत प्रशासन काय निर्णय घेणार आहेत.

सन १९९२ जे ९६ मधील कामगारांना डावलून त्यानंतर ९७, ९८, ९९, २००० या वर्षात आलेले कामगार यांना कायम करणार का? याबाबत सविस्तर खुलासा करावा.

श्री संजय शिरसाठ : ज्या बँकेने नारेगांव येथील कचरा डेपोची जागा तारण ठेवली मनपाने एन. ओ. सी. कशाच्या आधारे दिली खुलासा द्यावा. सदर बँकेने १२-११-२००३ रोजी मनपास पत्र पाठविले आहे वाचून दाखवावे.

मा. महापौर : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : सत्यम फर्टीलायजर कंपनीच्या मालकास दि. १७-०८-२००३ ला अंतिम नोटीस दिलेली आहे. ९० दिवस पूर्ण झाल्यानंतरच कायदेशीर कार्यवाही करता येईल. उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार या कारखान्यासाठी मनपाने पाणीपुरवठा विद्युत तसेच अंतर्गत रस्ते चौकशी समितीने आकारलेला दंड शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेला कचरा या सर्वांवर मनपास ५९.२२ लक्ष रुपय खर्च आलेला आहे. तो दंड म्हणून आकारलेला होता. ९० दिवस समाप्त झाल्यानंतर दि. ०१-११-२००३ रोजी झालेला करारनामा रद्द केला. बिजलींक प्रमाणे अंतिम नोटीस प्रमाणे ३ दिवसांत भरणा करावा. असे कळविले आहे ती मुदत संपली रक्कम भरणा केलेली नाही. म्हणून संबंधित कंपनीचे मशीनरी व इतर साहित्यास सील केले. यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून १३ लोकांचे दि. १६-०९-२००३ रोजीच घनकचरा सेक हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली स्थापन केलेले आहे. त्यासाठी जेसीबी मशीन लाऊन जागा स्पष्टीकरण करुन कर्मचारी / अधिकारी यांची त्या कचऱ्यांची व्यवस्थीतपणे विल्हेवाट लावण्साठी दि. १२-०९-०३ रोजी आदेश काढून कार्यवाही केलेली आहे. कचऱ्यापासून दुर्गंधी येऊ नये. यासाठी औषध फवारणीचे काम चालू आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३१ डिसेंबर पर्यंत हा प्रश्न इतरत्र ठिकाणी हलविण्यात आलानाही. तर पूर्वी प्रमाणेच शेतकऱ्यांना कचरा मोफत देण्याची कार्यवाही करावी लागेल. सत्यम फर्टीलायजर कंपनीस जी जागा महापालिकेने दिलेली होती. ती बँकेकडे तारण ठेवून कर्ज उचलण्याबाबत चर्चा झाली. महानगरपालिका त्या बँकेचे पत्र प्राप्त झालेल असून, मनपाची जागा तारण ठेवून कर्ज देण्यात यावे म्हणून महापालिकेने एन. ओ सी. दिलेली नाही.

मा. आयुक्त : आपण करार केला ती जमीन निर्विवाद आहे. त्या मालकाविरुध्द महानगरपालिकेने १ नोव्हेंबर २००३ रोजी ॲक्शन घेतलेली आहे. त्यानंतरच्या मधल्या काळात महानगरपालिकेला अंधारात ठेवून संबंधितोन एन. ओ. सी. तयार करुन बँकेला सादर केलेली असावी. महानगरपालिकेच्या जागे संदर्भात एन. ओ. सी. दिलेली नाही. आताच आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केला. कोणत्या बँकेकडून कर्ज घेतले. केव्हा घेतले कोणत्या अटीशर्तीनुसार मंजूर केले. त्याबाबत माहिती घेऊन कार्यवाही करावी लागेल. एन. ओ. सी. दिलेली नसतांना जागा तारण ठेवली नसेल तर, गुन्हा होऊ शकतो. विधी विभागाने ताबडतोब तपासणी करावी.

श्री संजय शिरसाठ : संबंधित मालक व महानगरपालिका यांचा करारनामा संपलेला आहे. कोणताही संबंध महापालिकेशी नाही व महानगरपालिकेने एन. ओ. सी. दिलेली नाही. असे जाहीर प्रगटन देऊन टाकावे.

श्री भगवान रगडे : संबंधित व्यक्तींवर पोलीस गुन्हा का दाखल होत नाही. समितीने मागेच अहवाल सादर केलेला आहे. संबंधिताने महापालिकेची फसवणूक केलेली आहे.

श्री जयवंत ओक : शासनाने ११२४ पदांना मंजूर दिली. न्यायालयाच्या यादीनुसार सेवा भरती होणार आहे का? माहिती देण्यात यावी.

मा. आयुक्त : जेव्हा तेव्हा रोजंदारीवर कर्मचारी घेण्याची पध्दत सुरु झाली. तेव्हापासूनचे अखंड सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा या पदामध्ये समावेश आलेला आहे. ज्यांना कायमपणाचे फायदे द्यावयाचे आहे, प्रस्तावाप्रमाणे संवर्ग निहाय यादया तयार केल्या या उपर ही एखाद्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होवू शकतो ते होऊ नये म्हणून यादया प्रसिध्द करुन सूचना हरकती मागविल्या, वर्तमानपत्रात जाहिरात देवून हरकती मागविल्या त्यानुसार जवळपास २०० हरकती प्राप्त झालेल्या आहेत. त्या हरकतीवर प्रशासनाने विचारपूर्वक तपासणी करुन एक अंतिम जेष्ठता यादी बनविलेली आहे. या तक्रारींची निपक्षपातीपणे व कुणावर अन्याय होणार नाही. याची काळजी घेतली जाईल. यासाठी उपआयुक्त (म) यांना लेखी आदेश दिलेले आहे. सेवा ज्येष्ठता यादी तयार केलेली आहे त्याची पुन्हा छानती होईल. अहवाल प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत जी काही प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर जे की, कोणते कर्मचारी कोणत्या विभागात ज्येष्ठेतेनुसार काम करतात हे ठरेल. त्यानुसार कामगार सेवेत कायम होतील. यापेक्षा प्रशासन काही करु शकणार नाही. कारण एखाद्या कर्मचाऱ्यांनी १२ वर्ष सेवा केली. त्यानंतर ४ वर्ष खंड पडला. तसेच १ ते दीड वर्षापासून कामावरच नाही. अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांना कुठेही वाव मिळणार नाही. आयुक्त म्हणून मी माझे मत मांडलेले आहे.

श्री सुरजितसिंग खुंगर : डॉ. भागवत कराड यांनी स्वतंत्र गट स्थापन करण्यासंदर्भात आपण परवानगी दिली. तसेच काँग्रेस स. स. श्री कोकाटे यांनी इतर पक्षामध्ये समावेश केला काँगेस पक्षात दोन गट निर्माण झाले किंवा कसे परिस्थिती काय आहेत. याबाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा. या संदर्भात नागरिकांमध्ये चर्चेचा विषय झालेला आहे.

श्री नंदकुमार घोडेले : वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. गारखेडा येथील भूखंडामध्ये घोटाळा १९७८ साली ले-आऊट मंजूर झालेला आहे. जागा महापालिकेने ताब्यात घेतलेल्या आहेत. संरक्षित भिंत झालेल्या आहेत. त्या तोडण्यात आल्या लोकांनी अतिक्रमण केले. काही नागरिकांनी अतिक्रमण झाल्या बाबत तक्रारीही मनपाकडे दिल्या परंतू या जागांच्या संदर्भात नागरिकांची तसेच महापालिकेच्या संबंधित विभागाने दिशाभुल केलेली आहे. याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

श्री काशीनाथ कोकाटे : गेल्या अर्थसंकल्पात डिजनी लॅण्ड सारखे प्रकल्प बोल्ड पध्दतीने विकास करण्याचे ठरविले होते. त्यातुर उत्पन्न वाढणार होते. यासाठी स्वामी विवेकानंद उद्यान तसेच समृतीवन या दोन जागा निश्चित केलेल्या होत्या. कार्यवाही केल्यास मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल व उद्यानामध्ये येणारांची

संख्याही वाढेल. बोल्ड पध्दतीने हा प्रोजेक्ट राबविण्यात यावा. निविदा मागविण्याचे आदेश द्यावेत.

श्री डॉ. भागवत कराड : स. सदस्यांनी केलेली सूचना बरोबर आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढेल कार्यवाही करण्यात यावी. मुलांना व नागरिकांना सहलीसाठी जागा उपलब्ध होईल. ताबडतोब कार्यवाही करावी.

मा. महापौर : स. स. श्री कोकाटे व डॉ. कराड यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत येणाऱ्या बैठकीपर्यंत प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री सुरजितसिंग खुंगर : डॉ. भागवत कराड यांनी दि. ०७-०५-२००१ रोजी आपल्या परवानगीने स्वतंत्र गट स्थापन केलेला आहे. त्यात असे दिलेले आहे की, औरंगाबाद मनपाचे आम्ही भारतीय राष्ट्रीय काँगेस (आय) पक्षाचे निर्वाचित सदस्य एकत्रित येऊन एक स्वतंत्र गट निर्माण केला आहे. यानंतर आम्ही भारतीय राष्ट्रीय काँग्रस (आय) पक्षाचे सदस्य न राहता एक स्वतंत्र गट म्हणून काम करणार आहे. त्यानंतर आपण ०१-११-२००३ रोजी दुसऱ्या एका गटाची मान्यता दिलेली आहे. याबाबतीत प्रशासन काय कार्यवाही करीत आहे.

श्री तुळशीबागवाले किशोर : विरोधी पक्ष नेते पदी नियुक्ती होण्यासाठी हा मुद्द उपस्थित केला असावा. विरोधी पक्षातील सदस्यांची सर्वांत मोठी संख्या कोणत्या पक्षाची आहे. तपासून पहावे. यादी मागवून घ्यावी. १० सदस्य काँगेस पक्षाचे आहेत. ६ सदस्य राष्ट्रवादी काँग्रसचे आहेत, एकूण १६ सदस्य होतात.

मा. महापौर : ज्या पक्षाच्या सदस्यांची संख्या जास्त असेल त्यांना देण्यात येईल माझ्याकडे जेव्हा यादया सादर करतील. त्यावेळी तपासून कार्यवाही होईल स. स. श्री घोडेले यांनी उपस्थित केलेला प्रश्नाचा खुलासा सादर करावा.

सहा. संचालक (न. र.) : खुलासा सादर करण्यात येतो की, गारखेडा येथील सर्व्हे नंबर ५२/१ व १९/१ या मिळकतीवर शेख उस्मान शेख अब्दुल रहेमान व शे. हमीद शे. भिकन गारखेडा यांनी तात्पुरती मंजूरी मागविली होती. त्यानुसार २६ जुलै १९७८ ला मंजूरी दिलेली होती. अभिलेख विभागात याची मुळ प्रत, आदेश उपलब्ध नाहीत. या कार्यालयाने पत्र क्र. ५०३ दि. १२-१०-९० ला या जागे संबंधीची मुळ कागदपत्रे सह. संचालक शाखा कार्यालय औरंगाबाद यांचेकडून मागविल्याची नोंद या कार्यालयाकडे आहे. सदर रेखांकनातील खुली जागा रस्ते हे नोंदणीकृत दस्तऐवजाने महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्याचे अभिलेखानुसार आढळून येत नाही. सदर जागेतील २५ गुंठे जागा श्री. भगवान लक्ष्मणदास पवार यांनी मालकी हक्काचा हवाला देऊन दिवाणी न्यायालयात दावा क्र. ७०-१९९३ नुसार दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचा निकाल महानगरपालिकेच्या विरुध्द लागला व सदर जागेस बांधलेली संरक्षित भिंत पाडण्यात व संबंधितांच्या मालकी हक्कात कुठलाही कब्जा करु नये. असे आदेशात म्हटलेले होते. या विरुध्द महापालिकेने दावा क्र. २९१-१९९३ नुसार जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपील न्यायालयाने फेटाळल्याची नोंद अभिलेखात आहे. तसेच मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन केल्याचे कागदपत्रे अभिलेख विभागात आहे. याबाबतीत विधी विभागाकडून माहिती घेणे योग्य होईल.

श्री नंदकुमार घोडेले : १९७८ ला महानगरपालिकेच्या जागा हस्तांतर झाल्याची नोंद नाही. न्यायालयात केसेस गेल्यानंतर बाजू मांडण्यासाठी कोणतीही कागदपत्र

मनपाकडे नसल्याने केसेस मनपाच्या विरुध्द बाजूने जातात. यात मनपाचे नुकसान होते. संरक्षित भिंत बांधण्यात आली. पुन्हा अपील केले. अपील केव्हा करण्यात आले. खुलासा द्यावा. संपूर्ण कागदपत्रे कोठे मिळणार आहे.

सहा. संचालक (न. र.) यासंबंधीची कागदपत्र सह. संचालक शाखा कार्यालय औरंगाबाद याचे कार्यालयाकडून मिळाले. हा ले-आऊट त्यांचेकडून मंजूर झालेला आहे. मनपाकडे शिफारस केलेली आहे.

श्री नंदकुमार घोडेले : रेकॉर्ड नसल्यामुळे न्यायालयातील दावा हारलो. जवळपास ३०० रु. स्क्वे. फुट याप्रमाणे लाखो रुपयांची ती जागा आहे. होणारे नुकसान झाले नसते. विधी सल्लागार यांनी खुलासा करावा. रेकॉर्ड आहे की नाही.

श्री विकास जैन : या जागेच्या संदर्भात न्यायालयात केस चालू असतांना त्या जागेवर संबंधित मालकाने संरंक्षित भिंत बांधलेले आहे. असे महानगरपालिकेच्या पॅनल वरील वकीलांनी न्यायालयात बाजू मांडलेली होती. संरंक्षित भिंत महापालिकेच्या जागेवर त्या व्यक्तीने बांधलेली आहे, हे खरे आहे का? खुलासा देण्यात यावा.

विधी सल्लागार : गारखेडा येथील सर्व्हे क्र. ५२/१ मधील २५ गुंठे जागाच्या संदर्भात नगररचना विभागाकडून ले-आऊट मंजूर झाल्याचे सांगण्यात आले. स. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला की, कागदपत्रे न्यायालयात सादर न केल्याने निकाल मनपाच्या विरुध्द लागला परंतु न्यायालयात सर्व कागदपत्रे सादर केलेली आहेत. महानगरपालिकेतर्फे साक्षी पुरावे देण्यात आलेले आहे. संरंक्षित भिंतीचे बांधकाम हे महानगरपालिकेनेच केलेले आहे. असा लेखी जबाब दिलेला आहे आणि न्यायालयाच्या निर्णयामध्ये या बाबी सर्व स्पष्ट आहे. खालच्या न्यायालयाने जो निर्णय दिला आहे. तो संबंधिताने जागा खरेदी खताच्या आधारे न्यायालयात वाद सुरु केलेला होता. जागा मी विकत घेतली असे त्या व्यक्तीचे म्हणणे आहे. खरेदीखत रेकॉर्ड साक्षीपुरावे गृहीत धरुन न्यायालयाने मनपाच्या विरुध्द निर्णय दिलेला होता. त्यानंतर जिल्हा न्यायालयात अपील करण्यात आले. तसेच मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केले आहे.

श्री प्रशांत देसरडा : खरेदी खत कशाच्या आधारे बनविले. यासंबंधी महानगरपालिकेने काय ॲक्शन घेतलेली आहे. रजिस्ट्री विरुध्द अपील केले आहे का? खुलासा करण्यात यावा.

श्री आनंद तांदुळवाडीकर : पी. आर. कार्ड कुणाच्या नावाने आहे. यासंबंधी संपूर्ण चौकशी व्हावी. महापालिकेला जागा मिळाली पाहिजे. यासाठी योग्य तो पाठपुरावा करावा.

विधी सल्लागार : संबंधित लोकांनी त्यांचे नावाचे पी. आर. कार्ड तयार केलेले आहे. रजिस्ट्रीच्या आधारे न्यायालयात दावा दाखल केला. कंपाऊन्ड वॉल बद्दलच आक्षेप आहे. बाकीची जागा विकसित करता येत नाही.

श्री नंदकुमार घोडेले : या प्रकरणात चांगले तज्ञ वकिलांमार्फत न्यायालयात प्रकरणे चालवावे.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेवून अशा प्रकरणाच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी महापौरांच्या दालनात तज्ञ वकील बोलावून चर्चा करण्यात येईल.

## प्रश्नोत्तरे

मा. श्री. स. अली सलामी, नगरसेवक
(प्राप्त दि. ३१-१०-२००३)

**प्रश्न क्र. १६८ :** मनपा नगररचना विभागातून अनेक संचिका गायब असल्याचे उघड झाले, गायब संचिकांची संख्या किती व कोणती, गायब संचिका प्रकरणी नगररचना विभागाने जबाबदारी निश्चित केली काय? किंवा या प्रकरणी मनपा प्रशासन काय कार्यवाही करीत आहे, तपशीलवार माहिती द्यावे.

**उत्तर क्र. १६८ :** अप्राप्त.

**प्रश्न क्र. १६९ :** माजी मनपा आयुक्त श्री बलदेव सिंह यांनी नगररचना विभागातील गायब संचिका प्रकरणी पोलीसाकडे तक्रार दिली काय? असेल तर तक्रार कोणत्या संचिका बाबत आहे, या प्रकरणी पोलीसाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केले?

**उत्तर क्र. १६९ :** अप्राप्त.

**प्रश्न क्र. १७० :** बारुदगर नाला येथे सुराणा कॉम्लेक्सची संचिका गायब झाल्याचे केव्हा निदर्शनास आले. या प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात आली काय? असेल तर दोषी मनपा सेवक कोणते?

**उत्तर क्र. १७० :** अप्राप्त.

**प्रश्न क्र. १७१ :** सुराणा कॉम्लेक्सचे संपूर्ण बांधकाम महाराष्ट्र नगररचना नियमानुसार झाले काय? तसेच या इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आले काय? नसेल तर नगररचना विभाग या प्रकरणी काय कार्यवाही करणार.

**उत्तर क्र. १७१ :** अप्राप्त.

**प्रश्न क्र. १७२ :** नगररचना विभागातील कारभाराचे विशेष परिक्षण करण्यासाठी मनपा प्रशासनाने शासनाकडे विनंती केले काय? असेल तर परिक्षण किती वर्षाचा केला जाईल. तसेच नगररचना विभागातील कोण कोणत्या बाबींचा परिक्षण केला जाईल.

**उत्तर क्र. १७२ :** अप्राप्त.

मा. डॉ. आशा बिनवडे, नगरसेविका
(प्राप्त दि. १३-१०-२००३)

**प्रश्न क्र. १७३ :** औषधी खरेदी झालेल्या गैरव्यवहारासंबंधी दिनांक १८ मार्च २००२ रोजी स्थायी समिती सभेत मा. सभापतींनी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी झालेली आहे काय, असल्यास काय कार्यवाही झाली, नसल्यास त्याची कारणे काय?

सदर प्रकरणांत निवृत्त वैद्यकीय अधिकारी यांचेवर आरोपपत्र बजाविण्यात आलेले आहे काय? नसल्यास का बजावले नाही व केव्हा बजवणार व आरोपपत्र बजावले असल्यास कोणत्या तारखेस बजाविण्यात आले. सदर प्रकरणांत चौकशीमध्ये कामे पूर्ण झाले काय? नसल्यास कधी पूर्ण होईल. निश्चित कालावधी किती लागेल त्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच चौकशी पूर्ण झाली असल्याच आरोप सिध्द झाले आहे किंवा कसे? आरोप सिध्द झाले असल्यास प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**उत्तर क्र. १७३ :** उपआयुक्त (प्र.) :

१) दि. १८-०३-२००२ रोजी स्थायी समिती सभेत मा. सभापतींनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.
२) प्रकरणी डॉ. डी. एस. देशपांडे यांना दि. १३-०६-२००२ रोजी आरोपपत्र बजावण्यात आलेले आहेत.
३) प्रकरणात दि. १३-०६-२००२ रोजीच्या आदेशन्वये चौकशी अधिकारी म्हणून श्री. एस. एस. निरखी, सेवा निवृत्त न्यायाधिश यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.
४) प्रकरणांत चौकशीचे काम प्रगती पथावर असून मा. न्यायालयाचे आदेशानुसार चौकशी पूर्ण करण्यासाठी तिन महिन्याचा कालावधी वाढवून दिला असून चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

**प्रश्न क्र. १७४ :** शास्त्री नगर गारखेडा येथील व्यायाम शाळे संबंधी.

सदरील व्यायाम शाळेची जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे किंवा कसे? व हे बांधकाम कधी पूर्ण झाले. सदर व्यायाम शाळेत व्यायामशाळा कार्यरत आहे काय? सदर व्यायामशाळा सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहे काय? व त्यापासून महानगरपालिकेस आतापर्यंत किती उत्पन्न मिळाले व मासिक उत्पन्न किती? तसेच सदर व्यायामशाळा महानगपालिकेतर्फे एखाद्या व्यक्तीस किंवा संस्थेस भाडे तत्वावर चालविण्यास दिलेली आहे काय? व सद्य:स्थितीत या व्यायामशाळेवर महानगरपालिका प्रतिमहा किती खर्च करते वरील सर्व प्रश्नांची माहिती देण्यात यावी.

**उत्तर क्र. १७४ :** उपआयुक्त (महसुल) : उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपणांस संविनय माहिती सादर करण्यात येते की, मौजे गारखेडा, शास्त्रीनगर येथे माजी आमदार जयवंतराव ठाकरे यांचे स्वेच्छा निधीतून व्यायाम शाळा बांधण्यात आलेली आहे.

सदर ठिकाणी व्यायाम शाळा बांधण्यात आली ती जागा शासकीय जमिनी असून ती साक्री तालुका एज्युकेश्न सोसायटी, साक्री, ता. साक्री जिल्हा धुळे यांना शासनाने भाडेतत्वावर दिलेली आहे. सदर व्यायाम शाळेचे बांधकाम महानगरपालिका देखरेखी खाली पूर्ण झालेली आहे. सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर उपअभियंता (उद्यान) मनपा यांनी दि. २४-११-२००० रोजी मालमता विभागाच्या ताब्यात दिलेली आहे. सदरील व्यायाम शाळा या विभागाच्या ताब्यात आल्यापासून रिक्त आहे. सदरची व्यायाम शाळा या विभागाच्या ताब्यात असल्याने अध्यक्ष हरीओम समाज विकास मंडळ औरंगाबाद यांना भाडेतत्वावर देणे संबंधी मंजूरी झाली होती, परंतु सदर व्यायाम शाळेचा मंजूर झालेल्या संस्थेस या विभागामार्फत ताबा देण्यात आला होता, तथापि साक्री तालुका एज्युकेशन सो. साक्री यांनी उक्त व्यायाम शाळा इतर संस्थेस भाडे तत्वावर देणे संबंधी आक्षेप घेतल्याने आजपर्यंत उत्पन्न मिळाले नाही. सदर व्यायाम शाळेस कार्यालयाने अद्याप खर्च केलेला नाही. करीता माहितीस्तव सादर.

मा. श्री. मोहमद जावेद मोहम्मद इसाक
(प्राप्त दि. १६-१०-२००३)

**प्रश्न क्र. १७५ :** पंचायत समिती कार्यालय ते सलीम अली सरोवरापर्यंतच्या (अब्दुल रज्जाक मास्टर रोड) या रस्त्यारी रुंदी किती? या रस्तयामध्ये बाधीत झालेले एकूण क्षेत्र किती? बाधीत झालेल्या मालमत्ता किती? (सि. स. न. व नाव) या रस्तयामध्ये बाधीत झालेल्या मालमत्ता धारकांना मोबदला देण्यात आला का किती? या रस्त्यामध्ये बाधीत झालेल्या काही

मालमत्ता धारकांना अद्यापही मोबदला मिळाल नाही हे खरे आहे का? सविस्तर माहिती द्यावी.

**उत्तर क्र. १७५ :** सहा. संचालक, नगररचना : पंचायत समिती कार्यालय ते सलीम अली सरोवर या रस्त्याची रुंदी मंजूरी विकास योजनेनुसार २४ (८० फुट) आहे. सदर रस्त्यात बाधित मिळकत धारकांना देण्यात आलेला मोबदला सि. स. न. व नावाची यादी सोबत जोडण्यात येत आहे.

**८० फुट रुंद रस्ता पंचायत समिती ते सिडको रस्त्याने बाधित मिळकत धारकांना मोबदला देण्यात आलेल्याची यादी.**

| अ.क्र. | मिळकत धारकांचे नांव | न. भू. क्र. | संपादित क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|---|
| १ | श्री एम. ए. मुकीद | ११४२४ | २०.८० |
| | श्री एम. ए. अजीज | | |
| २ | श्रीमती लिलाबाई आसाराम ठाकै | ११४२४/पी | २६.०० |
| ३ | श्री. शेख अकरम शे. अजीर | ११४३६/पी | ३२.५ |
| ४ | श्रीमती ताहेरा बेगम शे. अमिर | ११४३६/पी | ३२.५ |
| ५ | श्री बाजीराव किसनराव कोलते | ११४३६/पी | १३.० |
| ६ | श्री मोहमदखान सालारखा | ११४२४/पी | २६.० |
| ७ | श्री मो. शमीद आफंदी मो. इस्माईल | ११४२६/पी | ३२.० |
| ८ | श्रीमती अमिना बेगम भ्र. अ. मजिद | ११४३६/पी | १६.३ |
| ९ | श्री महंमद इलियास पि. म. याकुब | ११४२४/पी | २६.० |
| १० | श्री एकनाथ भिकाजी मगरे | ११४२४/पी | ३२.५ |
| ११ | श्री खाजा सिरोजोद्दीन खाजा मोईनोद्दीन | ११४२४/पी | २१.४ |
| १२ | श्री शेणराव किसनराव बलांडे | ११४२४/पी | २६.२ |
| १३ | श्रीमती बतुल नसरील इस्माईल कुरैशी | ११४२४/पी | २४.० |
| १४ | श्री अयुबखान | ११४२२/पी | ७.८ |
| १५ | श्री शे. मुबारक शे. मन्नान | ११४२२/पी | १३.० |
| १६ | सौ. शंकुतला सदाशिव कुंठे | ११४२४ | १९.५ |
| १७ | श्री सदाशिव संभाजी कुंठे | ११४२४ | १९.५ |
| १८ | श्रीमती अन्वरी बेगम भ. कासीम | ११४२४/पी | ३२.६ |
| १९ | श्री. सलिमाबी अजीजखा | ११४२४/ | १५.६ |
| २० | श्री सय्यदा रहिमुन्निसा बेगम | ११४२४/ | १९.५ |
| २१ | श्री हफिजोद्दीन गुलाम मोहियोद्दीन | ११४२४/पी | १३.०० |
| २२ | सौ. विमल विश्वानाथ गवळी | ११४२४/पी | २१.४ |
| २३ | श्री युसुफोद्दीन पि. अमिरोद्दीन | ११४२२/पी | १३.०० |
| २४ | श्री मोहमंद इसाक मो. उस्मान | ११४२०/पी | १३.०० |
| २५ | श्री रंगनाथ नारायण म्हस्के | ११४२४/पी | २६.०० |
| २६ | श्री माधवराव अंबादासराव कोथळीकर | ११४२४ | १३.०० |
| २७ | श्री जब्बार खा सरदार खा | ११४२२/पी | १५.६ |
| २८ | श्रीमती शाहेदा परवीन भ्र. सलिमुल्ला | ११४२२/१० | १९.५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | श्री अब्दुल रहिमान बीन अमर | ११४२२/पी | ८१.३ |
| ३० | श्री इनादोद्दीन अन्सारी पित अहेमद मोहियाद्दीन अन्सारी | ११४२०/पी | १३.०० |
| ३१ | श्री. महंमद रशिद म. इबादतुप्ला | ११४२४/पी | ३२.५ |
| ३२ | श्रीमती नजमा कलम भ्र कलीम अख्तर | ११४२६/पी | ३२.५ |
| ३३ | श्री स. नजीर स. शमशोद्दीन कंडक्टर | ११४२४/पी | २६.०० |
| ३४ | श्रीमती हजराबी अ. हउफ | ११४२४ | १३.०० |
| ३५ | श्रीमती सय्यद रहिमुन्निसा बेगम पि. सय्यद मोहम्मद | ११४२२/पी | १९.५ |
| ३६ | श्री अब्दुल रहिमान बीन अन्वर | ११४२२ | ४५.५० |
| ३७ | श्री मोहम्मद अब्राहिम पि. ताज मोहम्मद (मेट्रो हॉटेल फाजलपूरा) | ११४२४/पी | १७.५ |
| ३८ | श्री सय्यद नजीर पि. सय्यद शमशोद्दीन | ११४२४/पी | २६.०० |
| ३९ | श्री शेख मुबारक शे. मन्मात | ११४२४/पी | १३.०० |
| ४० | श्री युनूसद्दीन पि. यासीन खान | -//- | १३.०० |
| ४१ | श्री जब्बार खान पि. सरदार खान | -//- | १५.६० |
| ४२ | श्रीमती हाजरो भ्र. अब्दुल रऊफ | ११४२४/पी | १३.०० |
| ४३ | श्री. शेख अक्रम शे. अमीर | ११४३६/पी | ३२.५० |
| ४४ | श्री खाजा सिरोजोद्दीन पि. खाजा | ११४२४/पी | २१.४ |
| ४५ | श्री मोहम्मद इसाक पि. मा. उस्मान | ११४२०/पी | १३.०० |
| ४६ | श्रीमती ताहेराबी शेख अमीर | ११४३६/पी | ३२.५० |
| ४७ | श्री खान महंमद खान सालार खान | ११४२२/पी | १५.६ |
| ४८ | श्री महंमद शमीन आफंदी पि. म. ईस्माईल | ११४३६/पी | ३२.५ |
| ४९ | श्री सदाशिव संभाजी कुंठे | ११८२८/पी | १९.५ |
| ५० | सौ. शंकुतला सदाशिव कुंठे | ११४२४/पी | १९.५ |
| ५१ | सय्यद मोहम्मद सिराजुद्दीन पि. एस. एम. कमरुद्दीन` | ११३२४/१० | ६५.०० |

स्वाक्षरित/-,
सहाय्यक संचालक नगररचना,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रश्न क्र. १७६ :** णेश कॉलनी (अब्दुल रज्जाक मास्टर रोड) ते औरंगाबाद टाईम्स कॉलनी या प्रस्तावित रस्तयाची रुंदी किती? या रस्त्यामध्ये बाधीत होणारे एकूण क्षेत्र किती? (सि. स. न.) या प्रस्तावित रस्त्या करीता भूसंपादन करण्यात आली का? भूसंपादनाची कार्यवाही चालत आहे किंवा कसे? सविस्तर माहिती द्यावी.

**उत्तर क्र. १७६ :** सहा. संचालक, नगररचना : गणेश कॉलनी ते औरंगाबाद टाईम्स कॉलनी या रस्त्याची रुंदी मंजूर विकास योजनेनुसार १२ मी (४० फुट) आहे. या रस्त्याने बाधीत मिळकती सि. स. न. ११३२५ व ११३१४ नुझुलशिट प्रमाणे असून सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत विशेष भूसंपादन अधिकारी विशेष घटक यांचे पाठविण्यात आलेला आहे. भूसंपादनाची कार्यवाही नुकतेच सुरु झालेले आहे.

**प्रश्न क्र. १७७ :** चंपा मस्जिद ते भूमी अभिलेख कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यामध्ये बाधीत होणारी शासकीय इमारत तोडणार का? या ठिकाणी पुलाचे बांधकाम केव्हा होणार? पुलाचे व जागा संपादन करण्याची कार्यवाही थांबण्याचे कारण काय? सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर क्र. १७७ :** सहा. संचालक, नगररचना : सदर विकास योजना रस्त्याने "दमडी महल" ही इमारत संपूर्ण बाधीत होते. सदरील इमारत संपादन करणे बाबत मा. विभागीय आयुक्त मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आलेले आहे. बैठकीस मा. आयुक्त मनपा, सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग, मा. अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम खाते हजर होते. सदरील इमारत ही ऐतिहासिक असल्याने तोडू नये. असे पुरातत्व विभागाचे मत असून तसे पत्राने कळविलेले आहे. प्रकरणांत झालेले भूसंपादन कार्यवाही बाबत बैठकीचे इतिवृत्त, पुरातत्व, विभागाचे पत्र, झालेले पत्र व्यवहार इ. कागदपत्रे आपणांस या विभागाने जा. क्र. मनपा/नरवि/भू.स./५९५/०३ दि. २५-०३-०३ नुसार दिलेले आहे. सबब उक्त दमडी महल इमारतीचा ताबा मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही करता येईल.

मा. श्री जयवंत ओक, नगरसेवक
(प्राप्त दि. ०१-११-२००३)

**प्रश्न क्र. १७८ :**

अ) औरंगाबाद महापालिका हद्दीत एकूण रस्त्यांची संख्या किती आहे?

ब) त्यापैकी राज्यशासन, जिल्हा परिषद व रस्ते विकास महामंडळ यांचे किती व मनपाचे किती?

क) रस्त्याचे (महापालिकेच्या) वर्गीकरण कसे आहे? १.९ मीटरपेक्षा कमी, २.९ ते १५ मीटर ३.१५ मीटर पेक्षा जास्त

ड) महापालिकेच्या स्थापनेपासून महापालिका आपल्या रस्त्याचा देखभाल करते. महापालिकेने आपले रस्ते अभिलेखात असलेले व प्रत्यक्षात असलेले यांची एकदा तरी पडताळणी (Verification) केलेली आहे काय?

इ) सदर पडताळणी केली असल्यास, किती रस्ते कमी व जास्त आढळून झालेले आहेत? कमी आढळून आलेल्या रस्त्याबाबत मनपाचे काय कार्यवाही केली आहे?

फ) वरील पडताळणी केलेली नसल्यास भविष्यात मनपा अशा प्रकारे पडताळणी करणार आहे काय?

**उत्तर क्र. १७८ :** अतिरिक्त शहर अभियंता :

अ) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत एकूण रस्त्याची संख्या ऐवजी लांबी देता येईल. संख्या देणे सध्या शक्य नाही, एकूण लांबी ५७२ कि. मी. आहे.

ब) मनपा हद्दी अंतर्गत राज्य शासनाचे रस्ते खालील प्रमाणे आहे.

१) क्रांती चौक ते चिकलठाणा २) दिल्ली गेट ते हर्सूल, जळगांव टी पॉईंट ते हर्सूल ३) लेबर कॉलनी मधील रस्ते ४) शासकीय कार्यालय व शासकीय निवासस्थाना अंतर्गत असलेले सर्व रस्ते ५) रस्ते महामंडळातर्फे सध्या मनपाच्या दोन प्रमुख रस्त्याचे काम चालू आहे. परंतू ही मनपाची रस्ते आहेत. अ) रेल्वे स्टेशन ते दिल्ली गेट ब) जळगांव टी पॉईंट ते चेलीपूरा ५) जिल्हा परिषद कार्यालय व जिल्हा परिषद निवासस्थाने अंतर्गत सर्व रस्ते जिल्हा परिषदेची आहेत.

क) विकास आराखडयानुसार ९ मी. १२ मी १५ मी. २४ मी. ३० मी. रुंद रस्ते आहेत. आर. १ झोनमध्ये विविध करण्याचे आयोजन आहे.

ड) पडताळणी करण्याचे आयोजन आहे.

इ) वरीलप्रमाणे

फ) होय करणार आहे.

मा. श्री राधाकृष्ण गायकवाड, नगरसेवक
(प्राप्त दि. १२-११-२००३)

**प्रश्न क्र. १७९ :** मनपा आस्थापनेवर लेखा विभागात श्रीमती चित्रा एस गंभीर या महिला कर्मचारी लिपिक संवर्गात कार्यरत होत्या. तथापी त्यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी अर्ज केल्याचे समजते, परंतु श्रीमती चित्रा गंभीर हया १९९६ पासून रजेवर आहे. त्या संदर्भात श्री खालील प्रश्न विचारत आहे, त्याचे प्रशासनाने उत्तर द्यावे.

१) श्रीमती चित्रा गंभीर मनापा सेवेत केव्हापासून रुजू झाल्या?

२) त्या पगारी / विनापगारी धारणाधिकार (लिव्ह) रजेवर केव्हापासून गेल्या?

३) धारणाधिकार आयोजीत असतांना त्या इतरत्र सेवेत कार्यरत आहेत काय? असल्यास मनपाने त्यांना रितसर परवानगी दिली आहे काय? धारणाधिकार रजा (लिव्ह) किती वर्ष घेता येते?

४) पाचव्या वेतन आयोगानुसार नियमाप्रमाणे किती वर्षाच्या सेवेनुसार सेवा निवृत्ती वेतनाचा फायदा मिळू शकतो?

५) जवळपास (८) वर्ष धारणाधिकार रजा उपभोगण्यासाठी सदरील व्यक्तीने सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतली आहे का?

**उत्तर क्र. १७९ :** उपआयुक्त (प्र.) :

१) श्रीमती चित्रा गंभीर महानगरपालिका सेवेत दि. ०६-०८-१९८३ पासून कार्यरत आहेत.

२) दि. २४-१२-१९९६ पासून विमा पगारी रजेवर आहेत.

३) रजेच्या काळात संबंधित कर्मचारी इतरत्र सेवेत होते किंवा कसे? याबाबत कार्यालयास माहिती उपलब्ध नाही. संबंधिताने धारणाधिकार (लिव्ह) रजा मागितलेली नाही. त्यामुळे रितसर परवानगी देण्याचा प्रश्न उध्दवत नाही. धारणाधिकार (लिव्ह) रजा, नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या संमतीने ५ वर्षापर्यंत घेता येते.

४) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील कलम ६६ (अ) अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांला त्याची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर सेवेतून केव्हाही सेवानिवृत्त होता येते. तसेच कलम ११० नुसार वर्षाची अर्हताकारी सेवा झाल्यावर सेवा निवृत्ती वेतनाचा फायदा देता येतो.

५) संबंधिताने धारणाधिकार रजा मागितलेली नसल्यामुहे मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात आलेली नाही. संबंधिताने २० वर्षाची अर्हताकारी सेवा झालेली असल्यामुळे स्वेच्छा निवृत्ती मंजूर करण्यासाठी विनंती केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतुदीनुसार त्यांचे प्रकरणांत अनुज्ञेय नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.